Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06
वर्ष ३९, अंक १३९, ७ रुपये, शहर आवृत्ती, सहदैनिकासह पृष्ठे २०

**अग्रलेख**

## जंतर मंतर नंतर...

झारखंड असो वा महाराष्ट्र वा कर्नाटक वा अन्य कोणते राज्य. सगळीकडेच सर्वांनाच सरकारी नोकऱ्या हव्यात. त्यासाठी तर झारखंडी तरुणांनी थेट विधानसभेस धडक दिली...

पुणे, बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

पुणे, मुंबई, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!



**क्रीडा**

## परदेश दौऱ्यात सराव सामना मोलाचा - कोटक

NCC
Vencobb

| | | |
|---|---|---|
| ब्रॉयलर विकण्याचा दर (पोल्ट्रीफार्मवर) | ९४ | रु. प्रति किलो |
| किरकोळ विक्रीचा दर जिवंत कोंबडी | १२२ | रु. प्रति किलो |
| ड्रेस्ड कोंबडी (चिकनसह) दर | १५० | रु. प्रति किलो |
| अंडी किरकोळ विक्री दर | ७६ | रु. प्रति १२ अंडी |

[illegible]

**तापमान**

कमाल २७.०°से | किमान २३.०°से

**हवामानाचा अंदाज**
आकाश ढगाळलेले राहील. पावसाची शक्यता.

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी



या रस्त्यावर प्रचंड खड्डे असल्याचे काही फायदेही आहेत! वर्षभर संपूर्ण रहदारी थांबल्याने गाडीचा एकही अपघात नाही की कोणतं प्रदूषणही नाही!!

# भाजप आमदाराच्या कारखान्यावर सरकारची 'कृपादृष्टी'

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** सहकार आणि वित्त विभागाचा विरोध डावलून लातूर जिल्ह्यातील औसा येथील भाजप आमदार अभिमन्यू पवार यांच्या निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यास मदतीचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून (एनसीडीसी) १८ कोटींचे कर्ज घेण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**विविध विभागांचे आक्षेप असतानाही आमदार अभिमन्यू पवार यांच्या साखर कारखान्यास १८ कोटींचे कर्ज घेण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.**



किल्लारी येथील निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखाना काही वर्षांपूर्वी आमदार पवार यांनी चालविण्यास घेतला असून मागील गळीत हंगामापासून हा कारखाना पुन्हा सुरू झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक म्हणून त्यांनी काम केले असून त्यांच्या विश्वासातले मानले जातात. या कारखान्यास सरकारने यापूर्वीच गाळप क्षमता दुप्पट करण्यासाठी १८ कोटींचे शेअर कॅपिटल दिले असून आता पुन्हा एकदा राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून भांडवली खर्च व खेळत्या भांडवलासाठी सुमारे २५ कोटी रुपयांचे कर्ज मिळावे यासाठीचा प्रस्ताव कारखान्याने साखर आयुक्तांना सादर केला होता.

सहकार, वित्त विभागाचा विरोध हा कारखाना गेली काही वर्षे बंद असल्याने तसेच एनसीडीसीच्या कर्जासाठीच्या निकषात बसत नसल्याचे सांगत सहकार आणि वित्त विभागाने या कारखान्यास शासनहमीवर कर्ज देण्यास तसेच त्याबाबतचा प्रस्ताव एनसीडीसीला पाठविण्यास विरोध दर्शविल्याचे समजते. मात्र आता हा कारखाना सुरू *(पान ५ वर)*




वायुदलाच्या वैमानिकांच्या स्क्रीनवरील वेब सीरीजला मिळतो आहे चांगला प्रतिसाद!

# 'एफसीआरए'वर माघार?

## विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचा केंद्राचा विचार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** वादग्रस्त परदेशी योगदान नियमन दुरुस्ती विधेयक (एफसीआरए) संसदेच्या पावसाळी अधिवेशनात संमत होण्याची शक्यता नसल्याचे मंगळवारी स्पष्ट झाले. यापूर्वी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान केरळ विधानसभा निवडणूक सुरू असताना केंद्राने चर्चा टाळली होती. काँग्रेस व तृणमूल काँग्रेस या दोन्ही पक्षांनी हे विधेयकच रद्द करण्याची भूमिका घेतल्याने आता केंद्र सरकार हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्याचा गांभीर्याने विचार करत आहे.

पावसाळी अधिवेशनाचे फक्त दोन दिवस उरले असून 'जेपीसी'च्या मुद्द्यावर सर्वसंमतीसाठी सरकार प्रयत्न करत आहे. 'एफसीआरए' विधेयकासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कॅथलिक चर्चशी निगडीत संस्थांशी चर्चा करून त्यांचे आक्षेप समजून घेतले आहेत. परदेशी देणग्यांच्या मदतीने सुरू असलेल्या स्वयंसेवी संस्थांची नोंदणी रद्द झाली तर त्यांच्या मालमत्ता ताब्यात घेण्याचा अधिकार सरकारला असल्याची दुरुस्ती *(पान ४ वर)*



राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री, रालोआच्या घटक पक्षांचे नेते आणि खासदारांनी तिरंगा फडकावत 'वंदे मातरम' आणि 'भारत माता की जय'च्या घोषणा दिल्या.

### 'मंगल मीलन'मध्ये मोदींचे स्वागत

संसद भवन परिसरात सत्ताधारी एनडीएच्या साप्ताहिक संसदीय पक्षाच्या बैठकीपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खासदारांनी जोरदार स्वागत केले. 'मंगल मीलन' बैठकीला एनडीएतील घटक पक्षांचे मंत्री, नेते आणि खासदार उपस्थित होते. मोदी बैठकीच्या ठिकाणी पोहोचताच खासदारांनी तिरंगा फडकावत आणि 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय' अशा घोषणा देत त्यांचे स्वागत केले.

# 'धर्मस्वातंत्र्य' कायद्यानुसार पहिले दोन गुन्हे पुण्यात

## धर्मपरिवर्तन करण्यास सांगितल्याच्या तक्रारी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६'नुसार राज्यातील पहिले दोन गुन्हे नुकतेच पुण्यात दाखल झाले. यातील फुरसुंगी पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलीवर धर्मांतर करण्यासाठी दबाव आणल्याचा गुन्हा दाखल झाला, तर खडक पोलीस ठाण्यात एका धर्मगुरूविरुद्ध धर्मपरिवर्तनासाठी आकर्षित केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला. विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. प्रशांत अमृतकर यांनी ही माहिती दिली. फुरसुंगी येथील गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्यात आली.

फुरसुंगी येथे दाखल गुन्ह्याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पंजाबमधील लुधियानात राहणाऱ्या एका अल्पवयीन युवतीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून २२ वर्षीय तरुणाने पुण्यात आणले. विवाहाचे आमिष दाखवून तिच्यावर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकण्यात आला. तरुणाविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण *(पान ४ वर)*

### धर्मगुरूवर गुन्हा

अन्य प्रकरणात खडक पोलीस ठाण्यात धर्मगुरूबरोबरच त्याचे प्रवचन आयोजित करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मूळचे ब्रिटनमधील मँचेस्टरचे असलेले धर्मगुरू ५० वर्षांचे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवार पेठेतील एका प्रार्थनास्थळाच्या वर्धापनदिनानिमित्त सध्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये ७ ते ९ ऑगस्टदरम्यान ब्रिटनहून आलेल्या धर्मगुरूंचे प्रवचन आयोजित केले होते. 'या कार्यक्रमात हिंदू देवदेवतांविषयी भ्रम निर्माण करण्यात आला. अंधश्रद्धा पसरवली. तसेच, नागरिकांना धर्मपरिवर्तन करण्यासाठी आकर्षित केले,' असे धर्मगुरूविरोधात एकाने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. धर्मगुरूविरुद्ध स्थलांतर आणि परदेशी नागरिक कायदा २०२५ तसेच महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शिरवळजवळ अपघातात चार ठार



**सातारा :** पुणे-बंगळूरु राष्ट्रीय महामार्गावर शिरवळ येथे मध्यरात्री सव्वाएकच्या सुमारास झालेल्या मोटारीच्या भीषण अपघातात चार तरुणांचा मृत्यू झाला तर दोघे जण गंभीर जखमी झाले. अपघातातील सर्व जण पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील आहेत. वेदांत अर्जुन वारिंगे, सोनलिंग धीरेंद्र ठाकूर, आदित्य बाळासाहेब गरुड (रा. कामशेत) आणि निखिल बाळू राऊत (रा. तळेगाव दाभाडे) अशी मृत तरुणांची नावे आहेत.

# अदानींना अमेरिकी न्यायालयाचा दिलासा

**वृत्तसंस्था, न्यूयॉर्क**

**नवी दिल्ली :** अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी आणि त्यांचे पुतणे सागर अदानी यांच्या विरोधातील फौजदारी खटला अमेरिकेतील न्यायालयाने कायमस्वरूपी रद्द केला आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाच्या विनंतीला न्यूयॉर्कच्या ईस्टर्न डिस्ट्रिक्ट न्यायालयाने मंजुरी दिली असून, या निर्णयामुळे अदानी समूहाला दोन वर्षांपासून भेडसावणारा मोठा कायदेशीर अडथळा दूर झाला आहे. न्यायालयाने आरोप कायमस्वरूपी बंद केले असून तेच आरोप पुन्हा दाखल करता येणार नाहीत, असे नमूद केले आहे.

हा निकाल अदानींवरील आरोप खरे किंवा *(पान ४ वर)*

## चाकणमधील प्रश्न गंभीर; मुख्यमंत्र्यांची कबुली

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'चाकणमधील प्रश्न गंभीर असून, सरकारने त्याची दखल घेतली आहे. या संदर्भात एक बैठकही झाली आहे. पावसाळा संपल्यानंतर चाकणमधील सगळ्या पायाभूत सुविधांत सुधारणा केली जाईल,' असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले.

चाकण औद्योगिक क्षेत्रातून कंपन्या स्थलांतरित होणार असल्याची चर्चा सुरू आहे. यामुळे चाकणमधील जागेच्या टंचाईची समस्या समोर आली. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री बोलत होते. चाकण औद्योगिक क्षेत्र सुमारे सात हजार एकरांवर विस्तारले असून, या क्षेत्राबाहेर तेवढ्याच जागेवर औद्योगिक विस्तार झाला आहे. मात्र, उद्योगांना पायाभूत सुविधांचा अभाव त्रासदायक ठरत आहे.

'चाकणमध्ये तीन वर्षांत पाचशे नव्या कंपन्यांची गुंतवणूक आली आहे. जागेच्या वाढत्या मागणीमुळे आगामी काळात चाकण औद्योगिक क्षेत्राचा सहावा टप्पा विकसित केला जाणार आहे,' अशी माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) दिली.

दरम्यान, राज्य सरकारच्या औद्योगिक नगरी कायद्याचा उल्लेख करून फडणवीस म्हणाले, 'या कायद्यानुसार औद्योगिक क्षेत्रांना नागरी वसाहतीत परावर्तित करावे लागेल. त्यामुळे तेथील पायाभूत सुविधांचा एकात्मिक विकास शक्य होईल. याची सुरुवात पुण्याच्या परिसरातील औद्योगिक क्षेत्रामधून केली जाईल. याबाबत नगरविकास विभाग आणि उद्योग विभागाला निर्देश देण्यात आले आहेत.'

Estd. 1999 | Suryadatta Education Foundation's
SURYADATTA®
GROUP OF INSTITUTES, PUNE
OFFERS CAREER / JOB ORIENTED UG & PG PROGRAMMES
IN EMERGING SECTORS AT MULTIDISCIPLINARY INTEGRATED CAMPUS
ADMISSION OPEN FOR A.Y. 2026-2027



12+ Unique World Record Endorsed by 100+ World Record Agencies
100+ National & International MOUs
SURYADATTA Celebrating 28 years of Academic Excellence
1.10 Lakh + Students and Alumni Across the Globe
230+ National & International Awards



Professor Dr. Sanjay B. Chordiya, Founder President & Chairman - SEF, and Mrs. Sushama S. Chordiya, Vice President - SEF, seeking blessings & appreciation from H.E. Hon'ble President of India and H.E. Hon'ble Vice President of India

SURYADATTA OFFERS CUTTING EDGE SKILL BASED TECH CERTIFICATE MODULES IN AI & ML, DATA SCIENCE, CYBER, BLOCKCHAIN, FINTECH FROM RENOWNED ASSOCIATIONS & PROFESSIONALS

**Management** (AICTE Approved)
• MBA • PGDM
• MCA • BCA • BBA
7774039902, 8975003811, 8956932402

**Hotel Management**
• B.Sc. Hospitality Studies
• B.Sc. Home Science
• M.Sc. Hospitality Studies
• Diploma in Hotel Management
8956932408, 8669602056, 8956938603

**Animation, Design & Event Management**
• B.Sc. Animation
• B.Sc. MGA (Media Graphics & Animation)
• B.Sc.- Fashion Design
• Diploma in Interior Design & Decoration
• Diploma & Advance Diploma in Interior Design
• Diploma & Advance Diploma in Event Management
8956932405, 8956932416, 8956932402

"A" CATEGORY TOP 50 GROUP OF INSTITUTIONS in India for 25 consecutive years by Leading National Surveys

**Cyber Security, AI & ML Computer Science Data Science**
• B.Sc. Cyber Security
• M.Sc. Cyber Security
• B.Sc. Cyber & Digital Science
• B.Sc. AI & ML
• B.Sc. Data Science
• M.Sc. Data Science
• B.Sc. Computer Science
• M.Sc. Computer Science
• B.Sc. Computer Application
• M.Sc. Computer Application
• B.Sc. Information Technology
8378998126, 8956932419, 8956932402

**Law**
• B.A.LL.B • B.B.A.LL.B.
• LL.B. • LL.M.
• Diploma Course in Cyber Laws
• Dip. in Labour Laws & Labour Welfare
• Dip. in Taxation Laws
• Dip. in Intellectual Property Rights Laws
8956932411, 9371096506, 9763266829

**HEALTH SCIENCE**
**Physiotherapy**
• Bachelor of Physiotherapy (B.P.Th.)
7262011338, 7262011774, 9763266829
**Pharmacy**
• Diploma in Pharmacy (D. Pharm)
• Bachelor of Pharmacy (B. Pharm)
7262011339, 7499915674, 9763266829
**Nursing**
• ANM • GNM
7391000526, 7391000533, 7776072000
• Alternative Therapy • Osteopathy
• Kyropathy • Nutrition & Dietetics
• Naturopathy

**Junior College XI & XII**
• Arts • Commerce • Science
• I.T. • Bifocal • MCVC
Languages Offered : IT / Marathi / Hindi / Sanskrit / French / German / Japanese
8956943822, 8669602051, 9763266829

**CBSE School**
• Foundational Stage : Playgroup to Grade II
• Preparatory Stage : Grade III TO V
• Middle Stage : Grade VI to VIII
• Secondary Stage : Grade IX to X
8956932413, 9112297608, 8975003810

UNIQUENESS Earn while you Learn opportunities through internships, industry projects, campus engagements, and entrepreneurship initiatives

| | | |
|---|---|---|
| Global immersion programme to develop global mindset & to become globally competent professionals | Dynamic Industry-Academia Interface: Bridging the gap between education and enterprise to create industry-ready graduates | Engaging and Experiential Learning: Encouraging immersive, hands-on, & collaborative academic experiences. |
| Pioneering Education for the Future: Shaping trailblazing professionals through modern, interdisciplinary learning frameworks. | Prestigious Academic MOUs / Tieups / Membership with National & International Organizations / Universities | Global Perspective, Limitless Opportunities: Equipping students with a cosmopolitan outlook for thriving global careers. |

For Details Scan
Follow us on www.suryadatta.org For Career Guidance : 9763266829
SURYADATTA - ENRICHING CAREERS AND ENHANCING LIVES SINCE 1999

An investor education initiative by
LIC MUTUAL FUND

बाजारातील चढ-उतार सावरतात.
भावनेतून घेतलेले निर्णय मात्र नेहमीच सावरत नाहीत.

बहुतेक गुंतवणूकदार बाजारातील अस्थिरतेसाठी तयार असतात. पण स्वतःच्या भावनिक प्रतिक्रियांसाठी मात्र फारसे तयार नसतात.




गुंतवणूक ही एक शिस्त आहे. प्रतिक्रिया देणे ही एक निवड आहे.

सुयोग्य गुंतवणूक दृष्टिकोन दीर्घकालीन उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित ठेवण्यास मदत करतो.

अधिक माहितीसाठी आपल्या आर्थिक सल्लागाराशी संपर्क साधा

म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांना "नो युअर कस्टमर (KYC)" प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे, जी पूर्ण KYC फॉर्म आणि आवश्यक कागदपत्रे कोणत्याही AMC च्या शाखा कार्यालयात किंवा अधिकृत स्वीकार केंद्रात सादर करून करता येते. KYC दस्तऐवजीकरणाच्या आवश्यकता, पत्ता, फोन नंबर, बँक तपशील इत्यादी बदलाची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी कृपया भेट द्या: https://www.licmf.com/kyc-redressal. गुंतवणूकदारांनी फक्त SEBI नोंदणीकृत म्युच्युअल फंडांमध्येच गुंतवणूक करावी, ज्याचे तपशील SEBI च्या संकेतस्थळावरील 'Intermediaries/Market Infrastructure Institutions' (https://www.sebi.gov.in/intermediaries.html) अंतर्गत पडताळले जाऊ शकतात. कोणत्याही तक्रारी आणि तक्रार निवारणासाठी गुंतवणूकदार संबंधित AMC च्या गुंतवणूकदार संबंध अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात, आणि AMC द्वारे दिलेल्या उपायाने समाधान न झाल्यास, ते SEBI च्या SCORES पोर्टलवर (https://scores.sebi.gov.in/) तक्रार नोंदवू शकतात आणि/किंवा ऑनलाइन वाद निवारण पोर्टलद्वारे (https://smartodr.in/login) तक्रार वाढवू शकतात.

Scan here to know more

SEBI Reg: LIC Mutual Fund | Reg No: MF/012/94/5

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखमींना अधीन आहे, सर्व योजना संबंधित कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.
MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.

## वास्तुकला पदवीसाठी पहिली प्रवेश यादी जाहीर

**मुंबई :** २०२६-२७ साठी वास्तुकला पदवी (बी.आर्किटेक्चर) अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची पहिली यादी जाहीर करण्यात आली. यात ३ हजार ४४९ पैकी २ हजार ५३२ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली आहे. तसेच पहिल्या यादीत ९७६ विद्यार्थांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे.

राज्यात या अभ्यासक्रमासाठी ३ हजार ७१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३ हजार ४४९ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे पसंतीक्रम भरल्याने त्यांचा पहिल्या फेरीसाठी विचार करण्यात आला. पहिल्या यादीत ९७६ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले असून या विद्यार्थ्यांनी हा प्रवेश नाकारला तर त्यांना थेट खुल्या फेरीत म्हणजे संस्थात्मक फेरीत सहभागी व्हावे लागेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. पहिल्या फेरीतील पात्र विद्यार्थ्यांनी ११ ते १३ ऑगस्टदरम्यान मिळालेल्या महाविद्यालयामध्ये प्रत्यक्ष हजर राहून आवश्यक ती कागदपत्रे सादर करून व शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानंतर १४ ऑगस्ट रोजी दुसऱ्या फेरीसाठी तात्पुरत्या रिक्त जागा जाहीर करण्यात येतील.

### लोकसत्ता दुर्गा पुरस्कार २०२६

# आजपासून स्त्रीकर्तृत्वाचा जागर सुरू

**मुंबई :** स्वतःच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करत असतानाच समाजाच्या भल्यासाठीही योगदान देणाऱ्या स्त्रियांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी 'लोकसत्ता दुर्गा पुरस्कार' दिले जातात. यंदा या पुरस्काराचे १३ वे वर्ष असून आपल्या कामातून वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या, आपल्या कार्याचा समाजाला लाभ मिळवून देणाऱ्या आणि इतरांसाठी प्रेरणेचा स्रोत ठरणाऱ्या स्त्रियांची यंदाच्या पुरस्कारासाठी आजपासून नामांकने मागविण्यात येत आहेत.

आपल्या कार्यातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या आणि आपल्या कामाचा ठसा समाजावर उमटविणाऱ्या स्त्रियांना 'दुर्गा पुरस्कार' देऊन सन्मानित केले जाते. त्याचसाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देतानाच समाजाच्या उन्नतीसाठी संवेदनशीलतेने आणि सातत्याने काम करणाऱ्या स्त्रियांची नामांकने यंदाच्या पुरस्कारासाठी मागविण्यात येत आहेत. विज्ञान-तंत्रज्ञान, क्रीडा, कला-संस्कृती, शिक्षण, संशोधन, समाजकार्य, वैद्यकीय क्षेत्र, उद्योग-व्यवसाय, प्रशासन अशा विविध क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या, नवे आदर्श निर्माण करणाऱ्या स्त्रियांचा या पुरस्कारांसाठी विचार केला जाणार आहे.

दरवर्षी दिल्या जाणाऱ्या पुरस्काराला राज्यभरातून भरघोस प्रतिसाद मिळत असतो. त्यात अनेकदा समाज आणि कुटुंबीयांचाही विरोध पत्करून समाजासाठी धडाडीचे कार्य करणाऱ्या स्त्रियांचाही समावेश असतो. आपल्या परिसरात, संस्थेत, कार्यक्षेत्रात किंवा समाजात अशा प्रेरणादायी, समर्पित, समाजहितासाठी झटणाऱ्या स्त्रिया असतील तर त्यांचे नामांकन अवश्य पाठवा. तुम्हीसुद्धा स्वतःचे नामांकन पाठवू शकता. तज्ज्ञ परीक्षकांची समिती आलेल्या नामांकनांतून 'दुर्गां'ची निवड करते. 'लोकसत्ता दुर्गा पुरस्कार २०२६'च्या निवडीनंतर दरवर्षीप्रमाणे नवरात्रीत दररोज एका दुर्गेची ओळख 'लोकसत्ता'मधून करून दिली जाणार आहे. त्यानंतर होणाऱ्या बहारदार संगीतमय सोहळ्यात आणि नामवंतांच्या हस्ते नऊ दुर्गांचा सन्मान केला जाईल.

Gravittus FOUNDATION Towards a better world An initiative by Usha Kakade

प्रस्तुत

लोकसत्ता दुर्गा २०२६

सहप्रायोजक

**मुख्य प्रायोजक**

ग्रॅव्हिटस फाउंडेशन

**सहप्रायोजक**

- पितांबरी प्रॉडक्टस प्रायव्हेट लिमिटेड
- टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड
- केसरी टूर्स
- ठाणे भारत सहकारी बँक लिमिटेड

### माहिती कुठे पाठवाल?

नामांकने फक्त loksattanavdurga@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवावीत. त्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. टपालाने पाठवायची असल्यास पत्ता पुढीलप्रमाणे - 'लोकसत्ता' - महापे कार्यालय, प्लॉट नं. ईएल-१३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई- ४००७१०.

### नामांकन पाठविण्यासाठी काही नियम

**काय अपेक्षित ?**

- दुर्गा पुरस्कारासाठी स्त्रियांची माहिती जास्तीत जास्त ५०० शब्दांत पाठवावी. कोणतीही कात्रणे जोडू नयेत. संबंधित स्त्रीचे काम प्रेरणादायी, विधायक, समाजावर सकारात्मक परिणाम करणारे असावे.
- माहिती नेमक्या शब्दांत आणि मुद्द्यांच्या स्वरूपात आणि थोडक्यात असल्यास उत्तम. त्यामुळे निवड प्रक्रिया सहज होते. निवड झालेल्या स्त्रियांकडून नंतर अधिक माहिती मागवली जाईल.
- नामांकन पाठवताना एकाच ई-मेलमध्ये त्या स्त्रीचे छायाचित्र, संपूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक आणि ई- मेल आयडी असणे आवश्यक.
- एका व्यक्तीसाठी फक्त एकच ई-मेल पाठवावा. जास्त ई-मेल्सचा विचार केला जाणार नाही.
- इंग्रजीमधून पाठवलेले नामांकन बाद ठरवले जाईल.
- व्हिडीओ, यूट्यूब लिंक्स किंवा इतर कोणत्याही लिंक्स पाठवू नयेत.
- अंतिम निवडीसाठी परीक्षकांचा निर्णय बंधनकारक राहील.






### दिनदर्शिका

**बुधवार, १२ ऑगस्ट २०२६**
भारतीय सौर २१ श्रावण शके १९४८
मिती आषाढ कृष्णपक्ष
अमावास्या २३ : ०७ पर्यंत.
नक्षत्र : पुष्य ०८ : ००
चंद्र : कर्क उत्तर पहाटे ०६ : ०७ पर्यंत.
सूर्योदय - ०६ : २० ; सूर्यास्त - १९ : ०७

- **मेष** : समीकरण जुळून येईल.
- **वृषभ** : जिव्हाळा वाढेल.
- **मिथुन** : कुटुंबाची साथ मिळेल.
- **कर्क** : पारंपरिक गोष्टींची आवड.
- **सिंह** : वेळेचा अपव्यय टाळा.
- **कन्या** : दगदग कमी होईल.
- **तूळ** : इतरांची मने जिंकाल.
- **वृश्चिक** : वाटचाल सोपी होईल.
- **धनू** : अनुभव विसरू नका.
- **मकर** : व्यावसायिक वाढ होईल.
- **कुंभ** : नियम पाळा.
- **मीन** : शुभवार्ता कळेल.

**शुभ राशी : कन्या, मीन**






# राज्यातील ११ वैद्यकीय महाविद्यालयांना 'आयआयआरएफ' मानांकन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क'ने (आयआयआरएफ) देशातील २०२६ मधील वैद्यकीय महाविद्यालयांची मानांकने जाहीर केली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय संलग्न जे.जे. रुग्णालयाला १८ वे स्थान मिळाले असून त्यांनी राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. तसेच मुंबईतील सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय संलग्न केईएम रुग्णालयाने ३३ वा क्रमांक पटकावला आहे. यादीत पहिल्या १०० मध्ये राज्यातील ११ महाविद्यालयांचा समावेश असून त्यातील ८ शासकीय महाविद्यालये आहेत.

नवी दिल्लीतील 'एम्स'ने ९५३.५२ गुण मिळवून देशातील अग्रगण्य वैद्यकीय संस्था होण्याचा मान कायम राखला आहे. त्यानंतर मद्रास वैद्यकीय महाविद्यालयाने ९५२.६७ गुणांसह दुसरे, तर पुदुचेरीमधील 'जेआयपीएमईआर' या संस्थेने ९५१.७५ गुण मिळवून तिसरे स्थान पटकावले आहे. 'आयआयआरएफ'ने जाहीर केलेल्या या क्रमवारीमध्ये पहिल्या ५० महाविद्यालयांत राज्यातील पाच, तर १०० मध्ये ११ महाविद्यालयांना स्थान मिळाले आहे. यामध्ये ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयाने ९२९.२७ गुणांसह देशात १८ वे, पश्चिम विभागामध्ये दुसरे आणि राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. नागपूरच्या 'एम्स' या संस्थेने ९१४.८८ गुण मिळवून राज्यामध्ये दुसरे स्थान पटकावले आहे. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय संलग्न केईएम रुग्णालयाने ९०६.९९ गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला आहे. जे.जे. रुग्णालय, केईएम रुग्णालयाप्रमाणे मुंबईतील टोपीवाला नॅशनल वैद्यकीय महाविद्यालयानेही (नायर रुग्णालय) पहिल्या १०० महाविद्यालयांच्या यादीमध्ये स्थान मिळवले आहे.

या मानांकनासाठी यंदा आम्ही प्रथमच अर्ज केला होता. त्यामुळे आम्हाला मिळालेला क्रमांक हा प्रेरणादायी आहे. पुढील वर्षी अधिक शिस्तबद्ध पद्धतीने आवश्यक माहिती संकलित करून ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय हे देशातील पहिल्या १० महाविद्यालयांमध्ये स्थान मिळवेल, अशी आशा जे.जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय भंडारवार यांनी व्यक्त केली.

### राज्यात ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय पहिले
#### पहिल्या १०० मधील यशस्वी संस्था

ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय (१८), एम्स, नागपूर (२८), सेठ जी. एस. महाविद्यालय (३३), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय - नागपूर (३७), औरंगाबाद वैद्यकीय महाविद्यालय (४९), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-मिरज (७५), वैशंपायन मेमोरियल वैद्यकीय महाविद्यालय-सोलापूर (७६), आर्मड् फोर्स वैद्यकीय महाविद्यालय-पुणे (८१), बी. जे. महाविद्यालय (८४), टोपीवाला नॅशनल वैद्यकीय महाविद्यालय (नायर रुग्णालय) (८७), इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय - नागपूर (९३).

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
प्रस्तुत
लोकसत्ता यशस्वी भव! ५८






# एस.एस.सी. मार्गदर्शन - गणित भाग I (बीजगणित)

## प्रकरण 4 अर्थनियोजन

**विद्यार्थी मित्रांनो,** आजच्या लेखातून आपण अर्थनियोजन या प्रकरणातील महत्त्वाचे घटक, संकल्पना अभ्यासणार आहोत.

### लक्षात ठेवा

**GST:** Goods and Service Tax.
**CGST:** केंद्रीय वस्तू व सेवा कर (Central Goods and Services Tax)
**SGST:** राज्य वस्तू व सेवा कर. (State Goods & Services Tax)
**PAN :** 10 अंकाक्षरे असतात.
व्यापाऱ्याचा ओळख क्रमांक GSTIN : 15 अंकाक्षरे असतात.
ज्या व्यापाऱ्याची मागील आर्थिक वर्षातील उलाढाल 20 लाख रुपयांपेक्षा जास्त असते, त्यांना हा GSTIN क्रमांक घेणे बंधनकारक असते.
(सुरुवातीचे 2 अंक राज्याचा संकेतांक, पुढील 10 अंकाक्षरी पॅन क्रमांक, 1 नोंदणी अंक, 1 (Z) सर्वांसाठी समान, शेवटी 1 चेक सम डिजिट अंक असतो.)

$\boxed{GST = CGST + SGST}$

$\boxed{CGST = SGST + \frac{GST}{2}}$

जेवढा केंद्राचा कर (CGST) असतो, तेवढाच राज्याचा कर (SGST) असतो.
वस्तू खरेदी केल्यानंतर

$\boxed{\text{ग्राहकांस द्यावी लागणारी रक्कम = करपात्र किंमत + केंद्राचा कर + राज्याचा कर}}$

**उदा. (1)** एका वस्तूवरील CGST चा दर 9 % असेल, तर SGST चा दर किती? तसेच GST चा दर किती?

**उकल :** SGST चा दर = CGST चा दर = 9 %
∴ GST चा दर = SGST चा दर + CGST चा दर
∴ GST चा दर = 9 % + 9 % = 18 %
∴ वस्तूवरील SGST चा दर $\boxed{9\%}$ व GST चा दर $\boxed{18\%}$ असेल.

**HSN कोड :** HSN कोड म्हणजे त्या **वस्तूचा वर्गीकरणातील विशिष्ट क्रमांक** होय. कर बीजकामध्ये त्याचा अंतर्भाव करणे आवश्यक असते.
HSN : Harmonized System of Nomenclature.
कर बीजकामध्ये (Tax Invoice) दुकानाचे नाव, पत्ता, तारीख, बीजक क्रमांक, मोबाइल नंबर व इ-मेल आयडीसुद्धा असतो.
**SAC कोड :** SAC (Service Accounting Code) कोड म्हणजे **सेवांच्या वर्गीकरणातील विशिष्ट क्रमांक** असतो. उपाहारगृहाच्या बिलावर SAC कोड असतो.
**करपात्र किंमत :** ज्या किमतीवर कर आकारला जातो ती किंमत म्हणजे करपात्र किंमत.
**बीजक मूल्य :** करासह दिलेली एकूण किंमत म्हणजे बीजक मूल्य (विक्रीची किंमत)

$\boxed{\text{विक्रीची किंमत = करपात्र किंमत + GST}}$

$\boxed{\text{विक्रीची किंमत = करपात्र किंमत + CGST + SGST}}$

**उदा. (2)** 'मेसर्स रियल पेंट'ने प्रत्येकी ₹ 2800 करपात्र किमतीचे लस्टर पेंटचे 2 डबे विकले. GST चा दर 28 % असल्यास कर बीजकात CGST व SGST किती रुपये आकारला असेल ?

**उकल :** एका पेंटच्या डब्याची करपात्र किंमत = ₹ 2,800
2 पेंटच्या डब्यांची करपात्र किंमत = 2 × 2,800 = ₹ 5,600
GST चा दर = 28 %
∴ CGST चा दर = SGST चा दर = $\frac{\text{GST चा दर}}{2} = \frac{28\%}{2} = 14\%$
∴ CGST = CGST चा दर × करपात्र किंमत
∴ CGST = 14 % × 5,600 = $\frac{14}{100} \times 5{,}600$
∴ $\boxed{CGST = ₹\ 784}$
∴ $\boxed{SGST = CGST = ₹\ 784}$
∴ कर बीजकात CGST व SGST प्रत्येकी ₹ 784 आकारला जाईल.

**उदा. (3)** खेळण्यातील एका रिमोट कन्ट्रोल कारची जीएसटी करासह एकूण किंमत 1770 रुपये आहे. जीएसटीचा दर 18 % आहे, तर त्या कारची करपात्र किंमत, त्यावरील CGST व SGST चे गणन करा.

**उकल :** GST ची रक्कम ₹ $x$ मानू.
रिमोट कंट्रोल कारची GST सह एकूण किंमत = ₹ 1770
∴ रिमोट कंट्रोल कारची करपात्र किंमत = ₹ (1770 - $x$)
आता, GST = करपात्र किमतीच्या 18 %
∴ $x = (1770 - x) \times \frac{18}{100}$
$100x = 18 \times (1770 - x)$
∴ $100x = 18 \times 1770 - 18x$
∴ $100x + 18x = 18 \times 1770$
∴ $118x = 18 \times 1770$
∴ $x = \frac{18 \times 1770}{118}$
∴ $x = \frac{18 \times 1770}{118}$
∴ $x = 270$
∴ $\boxed{GST\ (x) = ₹\ 270}$
∴ रिमोट कंट्रोल कारची करपात्र किंमत = ₹ (1770 - $x$) = ₹ (1770 - 270) = ₹ 1500
CGST = SGST = $\frac{GST}{2} = \frac{270}{2}$
∴ $\boxed{CGST = SGST = ₹\ 135}$
रिमोट कंट्रोल कारची करपात्र किंमत ₹ 1500 व त्यावरील CGST व SGST प्रत्येकी ₹ 135 असेल.

**उदा. (4)** प्रसादने 'महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स गुड्स'मधून ₹ 40,000 रुपये छापील किमतीचे वॉशिंग मशीन विकत घेतले. त्यावर दुकानदाराने 5% सूट दिली. जीएसटीचा दर 28% आहे. तर प्रसादला ते वॉशिंग मशीन किती रुपयांस मिळाले? कर बीजकात CGST व SGST किती रुपये असेल ते काढा.

**उकल :** वॉशिंग मशीनची छापील किंमत = ₹ 40,000
छापील किमतीवरील सूट = 5%
वॉशिंग मशीनवरील सूट = छापील किमतीच्या 5%
= $\frac{5}{100} \times 40000 = \boxed{₹\ 2000}$
वॉशिंग मशीनची करपात्र किंमत = छापील किंमत - सूट = 40,000 - 2000
∴ वॉशिंग मशीनची करपात्र किंमत = $\boxed{₹\ 38000}$
GST चा दर = 28 %
CGST चा दर = SGST चा दर = $\frac{\text{GST चा दर}}{2} = \frac{28}{2} = 14\%$
∴ CGST = SGST = ₹ 38000 × 14 % = ₹ 38000 × $\frac{14}{100}$ = $\boxed{₹\ 5320}$
∴ वॉशिंग मशीनची खरेदी किंमत = करपात्र किंमत + CGST + SGST
= ₹ 38000 + ₹ 5320 = ₹ 48640
∴ वॉशिंग मशीनची खरेदी किंमत = $\boxed{₹\ 48640}$ असेल.
आणि कर बीजकात CGST = SGST = $\boxed{₹\ 5320}$ असेल.

**व्यवसाय साखळी :**

उत्पादक → घाऊक व्यापारी → किरकोळ व्यापारी → ग्राहक

**B2 B व्यवहार :** दोन GSTIN धारक व्यापाऱ्यांमधील झालेल्या व्यवहारास Business to Business म्हणजे थोडक्यात B2B व्यवहार म्हणतात.
**B2 C व्यवहार :** वस्तूचे उत्पादन झाल्यापासून ती ग्राहकांपर्यंत पोहोचते त्या साखळीतील अंतिम कडीतील व्यवहारास Business to Consumer थोडक्यात B2C व्यवहार म्हणतात.
**इनपुट टॅक्स क्रेडिट (ITC) :** व्यापारी त्याने गोळा केलेल्या करातून दिलेल्या कराची वजावट घेतो त्याला इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणतात.
वस्तूचे उत्पादन केल्यापासून ती वापरणाऱ्या ग्राहकाकडे पोहोचेपर्यंत मधल्या प्रत्येक व्यवहारात GST आकारला जातो.

$\boxed{\text{व्यापाऱ्याचा देय GST = आऊटपुट टॅक्स - इनपुट टॅक्स क्रेडिट (ITC)}}$

प्रत्येक व्यापारी गोळा केलेल्या करामधून खरेदीच्या वेळी दिलेला कर वळता करून घेऊन **(इनपुट टॅक्स क्रेडिट)** देय GST भरणा करतात. म्हणजेच GST हा अप्रत्यक्षपणे शेवटी ग्राहकानेच भरलेला असतो. GST हा अप्रत्यक्ष कर आहे. घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांनी त्यांच्या खरेदीवर भरलेला कर त्यांना परत मिळतो.

| व्यवसाय साखळी | वस्तूची किंमत | 12% GST | विक्रीची किंमत | ITC | देय GST |
|---|---|---|---|---|---|
| उत्पादक | ₹ 200 | ₹ 24 | ₹ 224 | ₹ 0 | ₹ 24 |
| घाऊक व्यापारी | ₹ 300 | ₹ 36 | ₹ 336 | ₹ 24 | ₹36 - ₹24 = ₹12 |
| किरकोळ व्यापारी | ₹400 | ₹48 | ₹448 | ₹36 | ₹48 - ₹36 = ₹12 |
| ग्राहक | खरेदी किंमत=₹448 | | एकूण दिलेला GST = ₹48 | | |

**उदा (5) :** चेतना स्टोअर्सने 1 जुलै 2017 ते 31 जुलै 2017 या कालावधीत खरेदी वर 1,00,500 रुपये जीएसटी दिला व विक्रीवर 1,22,500 रुपये जीएसटी गोळा केला. तर सदर कालावधीत चेतना स्टोअर्सला भरावा लागणारा देय जीएसटी काढा?

**उकल :** (i) विक्रीच्या वेळी घेतलेला (आउटपुट टॅक्स) = ₹ 1,22,500
(ii) खरेदीच्या वेळी दिलेला (इनपुट टॅक्स) = ₹ 1,00,500
∴ इनपुट टॅक्स क्रेडिट (ITC) = ₹ 1,00,500
(iii) देय कर = आऊटपुट टॅक्स इनपुट टॅक्स क्रेडिट (ITC)
देय कर = 122500 - 100500
= ₹ 22000
∴ चेतना स्टोअर्सला भरावा लागणारा $\boxed{\text{देय GST} = ₹\ 22000}$

**उदा (6) :** श्रीमती मल्होत्रा यांनी 85,000 रुपये करपात्र किमतीचे सोलार ऊर्जा संच विकत घेतले व 90,000 रुपयांना विकले. वस्तू व सेवा कराचा दर 5% असल्यास त्यांना या व्यवहारात किती रुपयांची वजावट (ITC) मिळेल व किती रुपये कर भरावा लागेल ?

**उकल :** इनपुट टॅक्स = 85,000 चे 5 %
= $\frac{5}{100} \times 85000$
$\boxed{\text{इनपुट टॅक्स क्रेडिट (ITC)} = ₹\ 4{,}250}$
आऊटपुट टॅक्स = ₹ 90,000 चे 5 %
= $\frac{5}{100} \times 90000$
∴ $\boxed{\text{आऊटपुट टॅक्स} = ₹\ 4500}$
∴ देय GST = आऊटपुट टॅक्स - इनपुट टॅक्स क्रेडिट
= ₹ 4,500 - ₹ 4,250
∴ $\boxed{\text{देय कर GST} = ₹\ 250}$
∴ या व्यवहारात श्रीमती मल्होत्रा यांना ₹ 4,250 ची वजावट (ITC) मिळेल व ₹ 250 GST कर भरावा लागेल.

दिलीप भिकाजी सातपुते
चेंबूर वेल्फेअर मराठी शाळा, चेंबूर

उद्याचा विषय : गणित भाग II - भूमिती

समन्वयक - सी. डी. वडके

# नवजात बालकांमध्ये के जीवनसत्त्वाचे महत्त्व काय?

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** नवजात बालकांच्या शरीरात 'के' जीवनसत्त्व पुरेशा प्रमाणात नसते. रक्त गोठण्यासाठी हे आवश्यक आहे. म्हणूनच जगातील बहुतांश देशांत जन्मानंतर सर्व नवजातांना 'के' जीवनसत्त्वाचे इंजेक्शन दिले जाते. हे इंजेक्शन न दिल्यास त्यांना 'के' जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या रक्तस्त्रावाचा धोका असतो. ही दुर्मीळ, जीवघेणी स्थिती असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

शरीरात के जीवनसत्त्वाचे प्रमाण कमी असल्यास बाळाला 'व्हिटॅमिन के डेफिशियन्सी ब्लीडिंग' हा गंभीर आजार होऊ शकतो. शिवाय बाळाच्या मेंदूत किंवा पोटात धोकादायक अंतर्गत रक्तस्त्राव होण्याचा धोका असतो. यकृतावर परिणाम होऊन बाळाच्या के जीवनसत्त्वाचे शोषण बिघडते. के जीवनसत्त्व ही लस किंवा औषध नसून, ते आवश्यक पौषकतत्त्व आहे.

गर्भधारणेदरम्यान गर्भनाळेतून फारच कमी के जीवनसत्त्व बाळापर्यंत पोहोचते. नवजातांच्या आतड्यात के जीवनसत्त्व तयार करणारे जिवाणू व्यवस्थित तयार झालेले नसतात. मानवी दुधातही त्याचे प्रमाण कमी असते. निरोगी नवजातांसाठी जन्माच्या वेळी एक मिलिग्राम इंजेक्शन सहसा मांडीच्या स्नायूतून दिले जाते.

के जीवनसत्त्वाचे इंजेक्शन न घेतलेल्या नवजातांची संख्या वाढत असल्याचे अमेरिका आणि स्वीडनमधील दोन मोठ्या अभ्यासांमध्ये समोर आले आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सरकारी आणि खासगी दोन्ही रुग्णालयांमध्ये बाळाच्या जन्मानंतर पहिल्या काही तासांतच हे इंजेक्शन देणे अनिवार्य आहे.







# रेल्वे उड्डाणपुलासाठी डिसेंबरपर्यंतची मुदत

## महापालिका आयुक्तांकडून कामाची पाहणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे महापालिकेच्या वतीने गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या साधू वासवानी रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाची महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मंगळवारी पाहणी करून आढावा घेतला. या उड्डाणपुलाचे काम डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश आयुक्त राम यांनी दिले.

या उड्डाणपुलाच्या कामासाठी वाहतूक पोलीस, रेल्वे विभाग यांच्याशी समन्वय साधून महापालिकेला काम करावे लागत आहे. हा प्रकल्प अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येणार असून, महापालिका प्रशासनाने प्रत्येक महिन्याला या कामाचा आढावा घेऊन डिसेंबरपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे आदेश आयुक्त राम यांनी दिले. या वेळी अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, प्रकल्प विभागाचे प्रभारी मुख्य अभियंता दिनकर गोजारे, पथ विभागाचे प्रमुख राजेश बनकर, उपायुक्त आशा राऊत, संतोष वारुळे, तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या उड्डाणपुलाचे काम करण्यासाठी पोलिसांचा वाहतूक विभाग, तसेच रेल्वे विभागातील अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात येत आहे. साधू वासवानी चौकातील रेल्वे मार्गावरील सुमारे ५४ मीटर लांबीचा 'ओपन वेब गर्डर रेल्वे स्पॅन' हा प्रकल्पातील अत्यंत महत्त्वाचा व तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक भाग आहे. या ठिकाणी दररोज २४० हून अधिक रेल्वेगाड्यांची वाहतूक होते. त्यामुळे रेल्वे वाहतुकीची सुरक्षितता कायम ठेवून कामाचे नियोजन केले जात असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.



### जलवाहिनीचे स्थलांतर

या ठिकाणी अस्तित्वात असलेली एक मीटर व्यासाची जुनी ओव्हरहेड जलवाहिनी कामामध्ये अडथळा निर्माण करीत होती. या जलवाहिनीचे स्थलांतर करून ती भूमिगत पद्धतीने टाकण्यात आली. तसेच, रेल्वे स्पॅनच्या ठिकाणी असलेले विद्यमान ओव्हरहेड स्ट्रक्चर काढण्याचे काम प्रकल्प विभागामार्फत नव्याने नियुक्त केलेल्या कंत्राटदाराकडून करण्यात येत आहे. एका आठवड्यात हे काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# मैलापाणी केंद्रांबरोबर मलवाहिन्यांनाही गती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** केंद्र सरकारच्या राष्ट्रीय नदीसंवर्धन योजनेच्या माध्यमातून शहरातील मुळा-मुठा नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे तातडीने सुरू करण्याबरोबरच मलवाहिन्यांच्या कामांना गती देण्याची सूचना राष्ट्रीय नदीसंवर्धन संचालनालयाचे (एनआरसीडी) सहसचिव झैगम अली खान यांनी महापालिका प्रशासनाला केली.

खान यांच्या उपस्थितीत पुणे महापालिकेत बैठक घेण्यात आली. बैठकीला महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर आदी उपस्थित होते.

'शहरात तयार होणाऱ्या मैलापाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी केवळ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे उभारून उपयोग नाही, तर या केंद्रांपर्यंत मैलापाणी पोहोचविण्यासाठी आवश्यक मलवाहिन्यांचे जाळेदेखील वेळेत विकसित करणे आवश्यक आहे. त्यामुळे शुद्धीकरण केंद्रांच्या कामाबरोबरच मलवाहिन्यांची कामेही पूर्ण करावीत,' असे खान म्हणाले. 'या प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांपैकी चार केंद्रे सध्या सुरू झाली असून, पाच केंद्रे डिसेंबरअखेरपर्यंत सुरू करण्याचे नियोजन आहे. या पाच केंद्रांची एकत्रित क्षमता २९० एमएलडी आहे,' अशी माहिती महापालिका आयुक्त राम यांनी दिली.

ते म्हणाले, 'या प्रकल्पांतर्गत तानाजीवाडी येथे १५ एमएलडी क्षमतेचे मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारण्याचे काम सुरू असून, हे काम सप्टेंबर २०२७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच, बोटॅनिकल गार्डन येथे १० एमएलडी क्षमतेचे मैलापाणी शुद्धीकरण केंद्र प्रस्तावित आहे. या केंद्रासाठी आवश्यक जागेसंदर्भात नुकतेच ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे या केंद्राच्या कामाला आता मार्ग मोकळा झाला असून, पुढील दोन वर्षांत हे काम पूर्ण करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.'

# दगडूशेठ मंदिराच्या विस्तारीकरणासाठी प्रयत्न

## फरासखाना, विश्रामबाग पोलीस ठाण्यांच्या जागेची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरामध्ये येणाऱ्या भाविकांना 'अ' दर्जाच्या पर्यटन केंद्राच्या सुविधा देण्याबरोबरच मंदिराच्या विस्तारीकरणासाठी फरासखाना आणि विश्रामबाग पोलीस ठाण्यांच्या जागेच्या मागणीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे,' अशी माहिती ट्रस्टचे सरचिटणीस आमदार हेमंत रासने यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.



'श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दररोज असंख्य भाविक दर्शनासाठी येतात. दररोज किमान ५० हजार, तर सुटीच्या दिवशी ही संख्या एक लाख ते दीड लाखाच्या आसपास असते. सध्याची मंदिराची जागा अपुरी पडत असल्याने मंदिराचे विस्तारीकरण आवश्यक आहे. त्यासाठी फरासखाना आणि विश्रामबाग पोलीस ठाण्याची जागा ट्रस्टने मागितली आहे. यासंबंधीच्या मागणीचा प्रस्ताव मी राज्य शासनाकडे पाठविला आहे. तसेच मंदिर विस्तारीकरणाचा मास्टर प्लॅनदेखील तयार करण्यात येईल,' असे रासने यांनी सांगितले.

फरासखाना व विश्रामबाग पोलीस ठाण्यांची वास्तू जुनी झाली असून, त्या जागेचाही पुनर्विकास होणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. 'छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर शनिवारवाडा, लाल महाल, नाना वाडा, भिडे वाडा या वास्तू आहेत. हे ध्यानात घेऊन शनिवारवाडा ते सारसबागपर्यंतच्या परिसराचा विकास व्हावा आणि वाहतुकीची कोंडी सुटावी, यासाठी भूमिगत मार्ग करण्याचाही प्रस्ताव आहे,' असे त्यांनी सांगितले.

# स्पीड पोस्टद्वारे राखी पाठविण्यावर सवलत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** रक्षाबंधनाच्या सणानिमित्त टपाल विभागाच्या वतीने स्पीड पोस्टद्वारे राखी पाठविणाऱ्या ग्राहकांसाठी विशेष सवलतीची योजना सुरू करण्यात आली.

या योजनेअंतर्गत राखी लिफाफा स्पीड पोस्ट पत्र स्वरूपात पोस्ट केले असता, लागणाऱ्या शुल्कावर दहा टक्के सूट देण्याची तरतूद केली गेली आहे. त्यामुळे ग्राहकांना कमी खर्चात सुरक्षितपणे राखी पाठविता येणार आहे. त्यासाठी टपाल विभागाने विशेष वॉटरप्रूफ राखी लिफाफे उपलब्ध करून दिले असून, देशभरातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये स्पीड पोस्ट सेवा उपलब्ध आहे.

प्रमुख टपाल कार्यालयांमध्ये पार्सल पॅकिंग सेवा, तसेच देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय स्तरावर राखी व भेटवस्तू पाठविण्याची सुविधा उपलब्ध आहे. रक्षाबंधनाच्या काळात ग्राहकांनी आपल्या जवळच्या टपाल कार्यालयाला भेट देऊन या विशेष सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन टपाल विभागातर्फे करण्यात आले आहे.

# बदलीच्या ठिकाणी रुजू न झाल्याची चौकशी

## अतिरिक्त आयुक्तांचे आदेश



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे महापालिकेच्या मिळकतकर विभागात वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेल्या तीन कर्मचाऱ्यांची अन्य विभागांत बदली करण्यात आली. मात्र, एक महिना झाल्यानंतरही बदलीच्या ठिकाणी रुजू न झाल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी नोटीस देऊन खातेनिहाय चौकशी सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

मिळकतकर विभागात सहा ते सात वर्षे कार्यरत असलेल्या तीन कर्मचाऱ्यांची मध्यवर्ती भांडार विभाग, मुख्य लेखा व वित्त विभाग यामध्ये बदली करण्यात आली. बदली झाल्यानंतरही एक महिना हे कर्मचारी संबंधित विभागात रूजू झाले नाहीत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना नोटीस बजाविण्यात आली.

त्यानंतरही हे कर्मचारी मिळकतकर विभागातच काम करत होते. ही बाब अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांची कानउघाडणी केली.

तसेच, त्यांची खातेनिहाय चौकशीचे आदेश त्यांनी दिले. त्यानंतर हे कर्मचारी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले आहेत. मात्र, आदेशाचे पालन न केल्यामुळे या कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

**अपर पोलीस महासंचालक,**
**गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे**

जाहिरात क्र.अपोमसं/गुअवि/आस्था-३/सरळसेवा भरती-सशादप/२०२६/५५३

पुणे दि. ०६ ऑगस्ट २०२६

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाच्या आस्थापनेवरील सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांची १६ रिक्त पदे भरणेकरिता दि. १०/०२/२०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करून ११/०३/२०२६ रोजीपर्यंत अर्ज स्वीकारण्यात आले आहेत.
उक्त पद भरती संबंधातील या कार्यालयाच्या www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमधील व शुद्धीपत्रकातील सर्व अटी व शर्ती लागू राहतील. सदर भरती संबंधात अर्हता प्राप्त करणारे उमेदवारांना खालील दिलेल्या विहित दिनांकापर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे तसेच ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
उमेदवार फक्त ऑनलाईन पद्धतीने www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर भेट देवून आवेदन अर्ज भरू शकतात.

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन आवेदन अर्ज सुरु होण्याचा दिनांक व वेळ :- | दि. १२/०८/२०२६ वेळ १०.००वा. पासून |
| २ | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ :- | दि. १०/०९/२०२६ वेळ २४.००वा. पर्यंत |

भरतीकरिता तपशिलवार जाहिरात व शुद्धीपत्रक क्र. २ www.mahacid.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

सही/-
पोलीस उपमहानिरीक्षक, (प्रशासन)
अपोमसं, गु.अ.वि., म.राज्य, पुणे कार्यालय.

डीजीआयपीआर-२२३६-२०२६-२७

**VASANTDADA PATIL PRATISHTHAN'S LAW COLLEGE**
Vasantdada Patil Educational Complex, Eastern Express Highway, Padmabhushan Vasantdada Patil Marg, Sion Mumbai 400022.

**UNAIDED**

**Applications are invited for the following Teaching Posts from the Academic year 2026-27**

| Sr. No. | Cadre | Subject | Total No. of Posts | Posts Reserved for |
|---|---|---|---|---|
| 1. | Principal | -- | 01 | 01- Open |
| 2. | Assistant Professor | Law | 08 | 01 - SC, 01-ST, 01 - DT (A), 01 - OBC, 01 - SEBC, 01 - EWS, 02 - Open. Horizontal Reservation - Women - 01 Post (Open - 01) |
| 3. | Librarian | -- | 01 | 01 - Open |

The posts for the reserved category candidates will be filled in by the same category candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.

Reservation for women will be as per **University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.**

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

**"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018 Government of Maharashtra Resolution No. Misc - 2018 / C.R.56 / 18 / UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS / (CT) / ICD / 2018-19 / 1241, dated 26th March, 2019 and revised from time to time" The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in**

Applicants who are already employed must send their application through proper channel. Applicants are required to account for breaks, if any in their academic career.

Application with full details should reach the **GENERAL SECRETARY, Vasantdada Patil Pratishthan's LAW COLLEGE, Vasantdada Patil Educational Complex, Eastern Express Highway, Padmabhushan Vasantdada Patil Marg, Sion, Mumbai - 400022,** within 15 days from the date of publication of this advertisement.
**This is University approved advertisement.**

**Sd/-**
**GENERAL SECRETARY**

**Clean Science**

**क्लीन सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी लिमिटेड**

**नोंदणी कार्यालय:** कार्यालय क्र. ६०३ आणि ६०४, ६वा मजला, टॉवर क्र. १५, सायबरसिटी, मगरपट्टा सिटी, हडपसर, पुणे, महाराष्ट्र -४११०१३.
**संकेतस्थळ:** www.cleanscience.co.in, **ई-मेल:** compliance@cleanscience.co.in
**दू.क्र.:** +९१ २० ४१२६४७६१, **CIN:** L24114PN2003PLC018532

**कंपनीच्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (AGM) सूचना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC) / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे (OAVM) आयोजित करण्यात येणारी सभा**

सर्व सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की, **क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लिमिटेड** ची तेविसावी (२३ वी) वार्षिक सर्वसाधारण सभा ('AGM') ही **शनिवार, १२ सप्टेंबर, २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता (IST)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('VC') / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('OAVM') आयोजित करण्यात येणार आहे. ही सभा कंपनी अधिनियम, २०१३ मधील लागू तरतुदी, त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('MCA') द्वारे जारी करण्यात आलेले सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ (यापूर्वी जारी करण्यात आलेल्या संबंधित परिपत्रकांच्या पुढे) तसेच सेबी (सूचीबद्धतेच्या जबाबदाऱ्या आणि प्रकटीकरणाच्या आवश्यकता) विनियम, २०१५ ('सेबी सूचीबद्धता विनियम') मधील लागू तरतुदींनुसार आयोजित करण्यात येत आहे. या सभेमध्ये २३ व्या AGM च्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या कामकाजाचा विचार करण्यात येईल.

**AGM सूचना व वार्षिक अहवालाचे इलेक्ट्रॉनिक वितरण**

कंपनी अधिनियम, २०१३, त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('MCA') व भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ ('SEBI') यांनी जारी केलेली संबंधित परिपत्रके तसेच सेबी सूचीबद्धता विनियम नुसार, २३ व्या AGM ची सूचना व आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे त्या सभासदांना पाठविण्यात येईल, ज्यांचे ई-मेल पत्ते त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट, एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत.

AGM ची सूचना व आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर **https://cleanscience.co.in/investors/annual-report/**, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('NSDL') च्या वेबसाइटवर **https://www.evoting.nsdl.com/**, तसेच स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर म्हणजेच **बीएसई लिमिटेड ('BSE') - https://www.bseindia.com/** आणि **नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ('NSE') - https://www.nseindia.com/ येथे उपलब्ध असेल.**

सभासद AGM मध्ये फक्त VC/OAVM सुविधेद्वारे **https://www.evoting.nsdl.com/** येथे सहभागी होऊ शकतील. VC/OAVM द्वारे AGM मध्ये सहभागी होण्याच्या सविस्तर सूचना AGM नोटीसमध्ये देण्यात आल्या आहेत. VC/OAVM द्वारे AGM मध्ये सहभागी होणाऱ्या सभासदांची गणना कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरमच्या उद्देशासाठी करण्यात येईल.

**रिमोट ई-मतदान**

कंपनी AGM च्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर सभासदांना रिमोट ई-मतदान द्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देत आहे. रिमोट ई-मतदान ची सविस्तर प्रक्रिया व सूचना AGM नोटीसमध्ये देण्यात आल्या आहेत.

AGM दरम्यान देखील ई-मतदान ची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. VC/OAVM द्वारे AGM मध्ये सहभागी होणारे आणि ज्यांनी रिमोट ई-मतदानाद्वारे मतदान केलेले नाही असे सभासद AGM दरम्यान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतील.

ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंटकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांनी AGM नोटीसमध्ये दिलेल्या प्रक्रियेनुसार ई-मेल पत्ता नोंदणी तसेच यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त करून रिमोट ई-मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे.

**लाभांश**

कंपनीच्या संचालक मंडळाने दिनांक १४ मे, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी रु. १/- दर्शनी मूल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी रु. ४.०० अंतिम लाभांश देण्याची शिफारस केली आहे. सदर लाभांश AGM मध्ये सभासदांच्या मंजुरीच्या अधीन राहील. अंतिम लाभांशासाठी सभासदांची पात्रता निश्चित करण्यासाठी शनिवार, ५ सप्टेंबर, २०२६ ही कट-ऑफ दिनांक निश्चित करण्यात आली आहे. AGM मध्ये मंजुरी मिळाल्यास, ज्या सभासदांच्या बँक खात्याचा तपशील डिपॉझिटरी किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंटकडे उपलब्ध आहे, त्यांना अंतिम लाभांश इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अदा करण्यात येईल. ज्या सभासदांचे बँक खाते तपशील उपलब्ध नाहीत किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लाभांश अदा करणे शक्य होणार नाही, अशा सभासदांना लाभांश वॉरंट/डिमांड ड्राफ्ट/चेक पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल. सभासदांनी लाभांश इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्राप्त करण्यासाठी AGM नोटीसमध्ये नमूद केलेल्या पद्धतीनुसार बँक खाते तपशील अद्ययावत करावेत.

**लाभांशावरील कर**

वित्त अधिनियम, २०२० मधील तरतुदींनुसार लाभांश उत्पन्न हे सभासदांच्या हातात करपात्र आहे आणि कंपनीला आयकर अधिनियम, १९६१ मधील लागू तरतुदींनुसार लाभांश अदा करताना स्रोतावर कर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचा अंतिम लाभांश AGM मध्ये सभासदांनी मंजूर केल्यास, लागू दराने कर कपात करून अदा करण्यात येईल. सभासदांनी AGM नोटीसमध्ये दिलेल्या 'TDS on Dividend' संबंधी सूचनांचा संदर्भ घ्यावा. सदर माहिती कंपनीच्या वेबसाइटवर **https://cleanscience.co.in/investors/compliance/notices/** येथे उपलब्ध असेल. कर सवलत मिळविण्यासाठी किंवा कमी दराने कर कपातीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे **https://web.in.mpms.mufg.com/formsreg/submission-of-Form-121-41.html** येथे **शनिवार, ५ सप्टेंबर, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावीत.

ज्या सभासदांनी लाभांश प्राप्तीसाठी ई-मेल पत्ता आणि/किंवा बँक खाते तपशील नोंदणीकृत/अद्ययावत केलेले नाहीत, त्यांनी कंपनी/डिपॉझिटरीच्या नोंदींमध्ये खालीलप्रमाणे ते अद्ययावत करावेत:

| | |
|---|---|
| **डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणारे सभासद** | संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटमार्फत |
| **भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणारे सभासद** | आवश्यक कागदपत्रांसह विहित अर्ज कंपनीच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंटकडे सादर करून |

**क्लीन सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी लिमिटेड करता**

दिनांक: ११ ऑगस्ट, २०२६
स्थळ: पुणे

**रुचिता विज**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

**Finolex Cables Limited**

**Registered Office :** 26/27, Mumbai-Pune Road, Pimpri, Pune 411 018 (India)
**Tel :** (91) (20) 27475963 | **Fax :** (91) (020) 27472239
**Website :** http://www.finolex.com | **Email :** sales@finolex.com
**CIN :** L31300MH1967PLC016531

**Statement of Standalone & Consolidated Financial results of Finolex Cables Limited for the quarter ended 30th June, 2026**
**Prepared in compliance with the Indian Accounting Standards (Ind AS)**

(Rs. In Crore)

| | Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended | | | Year Ended | Quarter Ended | | | Year Ended |
| | | 30-Jun-2026 | 31-Mar-2026 | 30-Jun-2025 | 31-Mar-2026 | 30-Jun-2026 | 31-Mar-2026 | 30-Jun-2025 | 31-Mar-2026 |
| | | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| 1. | Total Income from Operations | 2,064.64 | 1,983.76 | 1,449.64 | 6,558.99 | 2,064.64 | 1,983.76 | 1,449.64 | 6,486.64 |
| 2. | Net Profit before Tax | 277.37 | 218.86 | 170.76 | 806.93 | 314.46 | 303.38 | 202.55 | 928.52 |
| 3. | Net Profit after Tax | 221.28 | 161.19 | 138.82 | 622.87 | 249.04 | 224.43 | 162.62 | 713.72 |
| 4. | Total Comprehensive Income | 238.91 | 152.83 | 150.46 | 621.85 | 266.67 | 216.08 | 174.21 | 712.99 |
| 5. | Paid up equity share capital (face value Rs.2/-each) | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 |
| 6. | Earnings per share (of Rs. 2/-each)(Not annualised) | | | | | | | | |
| | (a) Basic (in Rs)/Share (not annualised for quarters) | 14.47 | 10.54 | 9.08 | 40.73 | 16.28 | 14.67 | 10.63 | 46.67 |
| | (b) Diluted (in Rs)/Share (not annualised for quarters) | 14.47 | 10.54 | 9.08 | 40.73 | 16.28 | 14.67 | 10.63 | 46.67 |

**Note :**
The above is an extract of the detailed format for quarter and year ended financial results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Standalone & Consolidated financial results for the quarter ended 30th June, 2026 are available on the Stock Exchange websites www.nseindia.com and www.bseindia.com and under the Investor Relations section of our website at http://www.finolex.com.

**Place :** Pune
**Date :** 11th August, 2026

**By Order of the Board**
Sd/-
Ratnakar Barve
Whole Time Director-Chairman
(DIN :09341821)

## प्रख्यात अणुशास्त्रज्ञ परमेश्वरन यांचे निधन



**थ्रिसूर :** प्रख्यात अणुशास्त्रज्ञ, लेखक आणि डाव्या विचारसरणीची सिद्धांताची मांडणी करणारे एम. पी. परमेश्वरन यांचे मंगळवारी त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. विज्ञानाच्या लोकप्रियतेचा प्रसार करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच त्यांचा चौथ्या जगाचा सिद्धांतही वादग्रस्त ठरला होता. परमेश्वरन यांनी शास्त्रज्ञ, विज्ञान प्रसारक, लेखक, सिद्धांतकार आणि साक्षरता प्रचारक अशी विविधांगी कामगिरी केली. ते केरळ शास्त्र साहित्य परिषदेच्या (केएसएसपी) संस्थापकांपैकी एक होते. या संस्थेने सामान्य जनतेमध्ये विज्ञानविषयक जनजागृतीचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. परमेश्वरन यांच्या निधनामुळे विज्ञान, सामाजिक कार्य, साहित्य आणि डावे राजकारण यामध्ये लीलया संचार करणारा दीर्घकालीन प्रभावशाली प्रवास थांबला आहे. परमेश्वरन यांनी १९५७ ते १९७५ या कालावधीत भाभा अणुसंशोधन केंद्रात (बीएआरसी) शास्त्रज्ञ म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी 'केएसएसपी'च्या कामास स्वतःला वाहून घेतले. त्यांनी विज्ञान आणि सामाजिक समस्यांवर मल्याळी आणि इंग्रजी भाषांमधून विपुल लेखन केले.

# अमित शहा पुन्हा गैरहजर!

## गृहमंत्र्यांच्या निवेदनावरून मतभेद; संसदेतील कोंडी कायम

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** जंतर-मंतरवरील विद्यार्थी-आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या मारहाणीच्या मुद्द्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा संसदेच्या सभागृहांमध्ये निवेदन देण्यास तयार असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले तरीही संसदेतील कोंडी कायम राहिली. शहा मंगळवारीही सभागृहांमध्ये गैरहजर राहिले.

शहांचे निवेदन चर्चेआधी की चर्चेनंतर यावरून वाद कायम राहिला. त्यामुळे मंगळवारी दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांचा गदारोळ सुरू राहिला, सभागृहे तहकूब झाली. लोकसभेमध्ये दोन विधेयके चर्चेविना मंजूर झाली. देशभरातील विद्यार्थी-आंदोलनावर सविस्तर चर्चा केली जाईल व त्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उत्तर देतील व निवेदन सादर करतील. फक्त निवेदन देणे ही औपचारिकता होईल, अशी भूमिका केंद्र सरकारने घेतली. त्यामुळे आधी चर्चा मगच शहांचे निवेदन यावर केंद्र सरकार ठाम राहिले. मात्र, शहांनी आधी निवेदन दिले पाहिजे मग, या विषयावर चर्चा केली जाऊ शकते, अशी भूमिका काँग्रेसने घेतली. २० जुलैच्या मोर्चातील विद्यार्थ्यांवर पॅलेट गनचा वापर करण्याचा आदेश कोणी दिला, या प्रमुख प्रश्नाचे उत्तर शहांनी दिले पाहिजे, असे विरोधी पक्षनेते राहुल गांधींचे म्हणणे आहे. पोलिसांना आदेश कोणी दिला याचे उत्तर मिळाल्याशिवाय काँग्रेस चर्चा होऊ देणार नाही, असे राहुल यांनी स्पष्ट केले.

### आरोप-प्रत्यारोप

गृहमंत्र्यांनी संसदेत देणग्यांच्या चोरीच्या आरोपांवर आणि विद्यार्थ्यांवरील अत्याचारांवर निवेदन करावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागावी, असे काँग्रेस खासदार पवन खेरा म्हणाले. तर काँग्रेस सतत गोलपोस्ट बदलत असल्याचा आरोप भाजपने केला. काँग्रेसने आधी शहांच्या निवेदनाची मागणी केली, आता आधी निवेदन मग चर्चा अशी मागणी करत आहेत. मंदिर देणगी अपहाराचा मुद्दा समाविष्ट केल्याची टीका भाजपने केली.



### सत्ताधारी-विरोधक आमनेसामने

अमित शहांनी संसदेत निवेदन द्यावे व अयोध्येतील राम मंदिर देणगी अपहार प्रकरणी चर्चा करावी, या मागण्यांसाठी विरोधकांनी मकरद्वाराबाहेर जोरदार आंदोलन केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून सत्ताधारी रालोआच्या खासदारांनीही त्याच ठिकाणी प्रतिआंदोलन केले. दोन्ही बाजूंच्या खासदारांनी परस्परांविरोधात घोषणाबाजी केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# सत्ताधाऱ्यांकडून राहुल गांधी लक्ष्य

**नवी दिल्ली, मुंबई :** राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (रालोआ) खासदारांनी मंगळवारी संसदेच्या आवारात राहुल गांधी यांना लक्ष्य केले. काँग्रेसने दिल्लीसाठी एक न्याय तर झारखंडसाठी दुसरा अशी दुटप्पी भूमिका घेतली आहे, असा आरोप या खासदारांनी केला. भाजप खासदारांच्या हातातील फलकांवर, 'झारखंडमध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराला राहुल गांधी उत्तर द्या', अशा आशयाच्या घोषणा होत्या.

याच मुद्द्यावरून भाजपचे नेते आशिष शेलार यांनी काँग्रेस, झारखंड मुक्ती मोर्चा तसेच इंडिया आघाडीतील घटक पक्षांना लक्ष्य केले. रांचीतील विद्यार्थ्यांचे आंदोलन रोजगार, परीक्षेतील पारदर्शकता, नोकरी, रोजगाराशी संबंधित असूनही राहुल गांधी यांच्यासह महाराष्ट्रातील विरोधी पक्षातील नेत्यांना त्यांचा आवाज ऐकू येत नसल्याचा आरोप शेलार यांनी

मंगळवारी मुंबईतील पत्रकार परिषदेत केला.



झारखंडमधील विद्यार्थ्यांवरील लाठीमारावरून 'रालोआ'ने राहुल यांना लक्ष्य केले. त्यांच्या विरोधातील फलक वाचताना प्रियंका गांधी यांना हसू फुटले.



# झारखंडमध्ये भाजप आक्रमक

## विद्यार्थ्यांना लाठीमारप्रकरणी बंद, 'अभाविप'ची निदर्शने

**पीटीआय, रांची**

**झारखंड विधानसभेवर** मोर्चा काढणाऱ्या विद्यार्थी आंदोलकांवर पोलिसांना लाठीमार केल्याचा आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्याचा मुद्दा विधानसभेत आणि बाहेरही मंगळवारी गाजला. याप्रकरणी भाजपने राज्यात बंद पुकारला, तर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) विधानसभेवर मोर्चा काढला. विधानसभेत या मुद्द्यावरून गदारोळ झाल्यामुळे नियोजित वेळेच्या एक दिवस आधीच पावसाळी अधिवेशन तहकूब करण्यात आले.

झारखंड लोकसेवा आयोगातर्फे (जेपीएससी) घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षा आणि झारखंड कर्मचारी निवड आयोगाच्या (जेएसएससी) भरती परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांविरोधात सोमवारी मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी पोलिसांनी लाठीमार केल्याप्रकरणी भाजपने आक्रमक भूमिका घेतली. दिल्लीतील २० जुलैच्या मोर्चावरील पोलिसांच्या कठोर कारवाईमुळे दिल्लीमध्ये काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपने त्याचे प्रत्युत्तर झारखंडमध्ये देण्याचा प्रयत्न केला.

अभाविपच्या कार्यकर्त्यांनी सकाळी विधानसभेवर काढलेला मोर्चा अडवून ११० कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले, अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. मात्र, आपले २००पेक्षा जास्त कार्यकर्ते पोलिसांनी ताब्यात घेतल्याचा दावा अभाविपने केला. कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलेली बस आंदोलकांनी अडवल्यामुळे अभाविप कार्यकर्ते आणि पोलिसांदरम्यान झटापट झाली. दुसरीकडे, भाजपने बंद पुकारल्याचा परिणाम जनजीवनावर झाला. अनेक शहरांत शाळा आणि महाविद्यालये बंद राहिली. तर रस्त्यांवर वाहतूक तुरळक राहिली.

### विधानसभेत गदारोळ

मंगळवारी विधानसभेचे कामकाज सुरू होताच भाजप आमदारांनी विद्यार्थ्यांवरील लाठीमाराचा मुद्दा उपस्थित करत गदारोळ केला. तर, भाजपचे समर्थन असलेल्या समाजकंटकांनी शांततापूर्ण निदर्शनांदरम्यान हिंसाचार केल्याचा आरोप काँग्रेसचे आमदार प्रदीप यादव यांनी केला. गदारोळ सुरूच राहिल्याने विधानसभा अध्यक्ष रवींद्रनाथ माहतो यांनी विधानभेचे अधिवेशन अमर्याद वेळेसाठी तहकूब केले.

## गडचिरोलीतील आश्रमशाळेची मान्यता रद्द

**गडचिरोली :** तीन आदिवासी विद्यार्थिनींच्या सर्पदंशाने झालेल्या मृत्यूप्रकरणी धानोरा तालुक्यातील जपतलाई आश्रमशाळेची मान्यता कायमस्वरूपी रद्द करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले. मूलभूत सुविधा, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची व्यवस्था नसतानाही शाळेला पात्र ठरवणाऱ्या अधिकाऱ्यांचे निलंबन करण्याचे निर्देश दिले आहेत. संस्थाचालकाविरोधात फौजदारी कारवाईचे आदेश दिल्याचे सहपालकमंत्री आशीष जयस्वाल यांनी स्पष्ट केले. आश्रमशाळेतील एका खोलीत झोपलेल्या सहा विद्यार्थिनींना रविवारी रात्री सर्पदंश झाला. त्यात तिघांचा मृत्यू झाला तर, जखमी दीपिका बिटलूरसाय मडावी हिला नागपूरला हलवले असून समृद्धी सुरेश नैताम आणि कविता राजकुमार किरंगा या तिघांवर उपचार सुरू आहेत.

# 'एफसीआरए'वर माघार?

*(पान १ वरून)* विधेयकातील तरतूद विरोधाचा मुद्दा ठरला आहे. काही आक्षेपांचे शंकानिरसन करण्यात सरकार अपयशी ठरल्याचा दावा केला जात आहे. केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी संसदेतील कोंडी फोडण्यासंदर्भात चर्चा केल्या होत्या. त्यावेळी 'एफसीआरए' विधेयकासंदर्भात काँग्रेसचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे समजते. मात्र, हे विधेयक रद्दच झाले पाहिजे, अशी भूमिका काँग्रेसने घेतल्याचे सांगितले जाते.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विरोधकांच्या गोंधळात विनाचर्चा दूरगामी परिणाम करणारे महत्त्वाचे विधेयक मंजूर केले जाऊ नये, अशी भूमिका 'इंडिया' आघाडीतील समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी घेतलेली आहे. 'द्रमुक'चे राज्यसभेतील खासदार व अल्पसंख्याक संयुक्त कृती मंचचे अध्यक्ष पी. विल्सन यांच्या नेतृत्वाखाली ख्रिश्चन समाजातील प्रतिष्ठितांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री शहांशी चर्चा केली होती. हे विधेयक पूर्णपणे रद्द करण्याची मागणी या बैठकीमध्ये केली गेल्याचे समजते. तमिळनाडूतील सत्ताधारी 'टीव्हीके' सरकारने 'एफसीआरए' विधेयकाला विरोध केला असून त्या राज्यातील विरोधी पक्ष द्रमुकने, हे विधेयक रद्द करावे किंवा जेपीसीकडे पाठवावे, अशी मध्यममार्गी भूमिका घेतल्याचे समजते.

### अन्य पक्षांच्या मतांचा विचार

'एफसीआरए' विधेयकासंदर्भात केंद्र सरकार दबावाखाली आले असून 'जेपीसी'कडे पाठवणे हाच मार्ग सयुक्तिक ठरू लागला आहे. केंद्र सरकार समाजवादी पक्ष, द्रमुक, झारखंड मुक्ती मोर्चा, बिजू जनता दल आदी पक्षांचा कल लक्षात घेऊन हे विधेयक 'जेपीसी'कडे पाठवण्याची शक्यता आहे. हे विधेयक मार्च २०२६ मध्ये लोकसभेत मांडले होते. त्यामुळे सरकारला विधेयक 'जेपीसी'कडे पाठवण्याचा प्रस्ताव लोकसभेमध्ये संमत करावा लागेल, त्यामध्ये फारशी अडचणी येणार नाही. लोकसभेच्या कामकाज सल्लागार समितीच्या सोमवारी झालेल्या बैठकीमध्ये 'एफसीआरए' विधेयकाबाबत चर्चा झाली नसल्याने मंगळवारीही कामकाजाच्या सूचीमध्ये या विधेयकाचा समावेश केला नव्हता.

**सरकारची कोंडी**

'एफसीआरए' विधेयक मार्च २०२६ मध्ये लोकसभेत मांडण्यात आले होते. मात्र, त्याच वेळी केरळ विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती. ख्रिश्चन मतांवर याचा परिणाम होईल या भीतीने विधेयकावर अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चा केली नाही. आता पावसाळी अधिवेशनात हे विधेयक मंजूर करून घेण्याचा सरकारचा प्रयत्न होता, मात्र त्याला मोठा विरोध होत आहे.

## 'मोदी, ट्रम्प निर्बंधाची समस्या सोडवतील'



**वॉशिंग्टन :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात चांगले संबंध असून ते एकत्रितपणे रशियावरील निर्बंधांचा प्रश्न सोडवतील, असा विश्वास व्हाइट हाऊसचे वरिष्ठ व्यापार सल्लागार पीटर नव्हारो यांनी मंगळवारी व्यक्त केला.

रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या पाच आघाडीच्या देशांवर १०० टक्के आयातशुल्क लादण्याचा अध्यक्षांना अधिकार देणारे विधेयक अमेरिकी सेनेटमध्ये नुकतेच मंजूर झाले.

# एअर इंडियाचा वैमानिक दोषी

## टर्ब्युलन्सप्रकरणी दुसरी तपासणीही पॉझिटिव्ह

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** थायलंडमधील फुकेतहून नवी दिल्लीला येणाऱ्या एअर इंडिया (एआय २३७९) विमानाला ४ ऑगस्ट रोजी प्रवासादरम्यान तीव्र टर्ब्युलन्सला तोंड द्यावे लागले होते. ज्यामुळे विमान ३०० फूट खाली आले व १७ जण जखमी झाले होते. यानंतर विमान दिल्ली विमानतळावर करण्यात आलेल्या चाचणीत मुख्य वैमानिकाचा उत्तेजक चाचणी अहवाल संशयास्पद होता. त्यानंतर दोन्ही वैमानिकांची अमली पदार्थ, उत्तेजक पदार्थांचा शोध घेण्यासाठी (सायोकॲक्टिव सबस्टन्स स्क्रीनिंग टेस्ट) चाचणी केली होती. या दुसऱ्या तपासणीतही मुख्य वैमानिकांनी उत्तेजक पदार्थांचे सेवन केल्याचे निष्पन्न झाले आहे.

फुकेतहून नवी दिल्लीला जाताना एअर इंडियाचे 'एआय ३२०' विमान अचानक ३०० फूट खाली आले आणि त्यानंतर स्थिर झाले. यामध्ये ४ विमान कर्मचारी आणि १३ प्रवासी जखमी झाले होते. विमान अपघात तपास विभाग या घटनेचा तपास करत आहे. यात वैमानिकांच्या चाचणीनंतर अधिक तपासाची गरज असल्याचे समोर आले होते. त्यामुळे हे नमुने पुढील तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते.

मंगळवारी दुसऱ्या तपासणीतही वैमानिक दोषी असल्याचे निदर्शनास आले आहे. तपासणीचा अंतिम अहवाल अद्याप आलेला नाही. वैमानिकाची दुसरी तपासणीही पॉझिटिव्ह आल्याने नागरी उड्डाण महासंचालनालय (डीजीसीए) उत्तेजक चाचणी अधिक कडक करण्याबाबत विचार करत आहे.



### अचानक उत्तेजक चाचणी

विमान उड्डाण सुरक्षेच्या खात्रीसाठी 'डीजीसीए'ने २०२२मध्ये विमान कर्मचारी, हवाई वाहतूक नियंत्रण (एटीसी) आणि देखभाल कर्मचाऱ्यांसाठी उत्तेजक चाचणी (अचानक केलेली उत्तेजक पदार्थांची तपासणी) नियम अनिवार्य केला. याद्वारे कर्मचारी उड्डाणादरम्यान किंवा कामावर असताना कोणत्याही मद्य किंवा मादक द्रव्यांच्या प्रभावाखाली नाहीत हे तपासले जाते.

# 'धर्मस्वातंत्र्य' कायद्यानुसार पहिले दोन गुन्हे पुण्यात

**(पान १ वरून)**

अधिनियम (पोक्सो), तसेच 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६' अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत अल्पवयीन युवतीच्या वडिलांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, युवतीचे वडील लुधियानामध्ये राहतात. त्यांना दोन मुली आणि एक मुलगा आहे. त्यांची १७ वर्षांची मुलगी लुधियानातील एका शाळेत शिक्षण घेत होती. १४ ऑगस्ट २०२५ रोजी ती शाळेत जाते, असे सांगून घराबाहेर पडली. मात्र घरी परतली नाही. त्यामुळे वडिलांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मुलीने वर्षभरानंतर आईच्या मोबाइलवर संपर्क साधत उत्तर प्रदेशातील फिरोजपूर येथे राहणाऱ्या तरुणाबरोबर हडपसर भागात वास्तव्य करत असल्याचे सांगितले.

तरुणाने मुलीला पुण्यात आणले. शिक्षण पूर्ण करतो, असे आमिष दाखविले आणि इच्छेविरुद्ध शरीरसंबंध ठेवले. तसेच, विवाह करायचा असेल, तर धर्म बदलावा लागेल, असे सांगितले. आरोपीने तिला पंजाबमधून अलीगढ, कर्नाटकातील कोलार येथे नेले. दोन महिने तो मुलीबरोबर हांडेवाडी येथे राहत होता. 'मुलीची वैद्यकीय तपासणी केली असून बाल न्यायालयाने तिला निरीक्षणगृहात ठेवले आहे. कायदेशीर प्रक्रियेनंतर मुलीला पालकांच्या ताब्यात देण्यात येईल,' असे पोलिसांनी सांगितले.

# अदानींना अमेरिकी न्यायालयाचा दिलासा

**(पान १ वरून)**खोटे असल्याचा न्यायालयीन निकाल नाही, असे डिस्ट्रिक्ट न्यायाधीश निकोलस गारॉफिस यांनी स्पष्ट केले. ''खटला न्यायालयात चाललाच नाही, साक्षीदारांची तपासणी झाली नाही किंवा आरोपांमागील पुराव्यांची तपासणी झाली नाही. न्याय विभागाने खटला पुढे न चालविण्याचा घेतलेला निर्णय हा त्याच्या अधिकाराचा वापर आहे,'' असे न्यायालयाने नमूद केले.

न्यूयॉर्कचे ईस्टर्न डिस्ट्रिक्ट न्यायाधीश गारॉफिस यांनी १० ऑगस्ट रोजी ४७ पानी आदेश दिला. त्यात गौतम अदानी, सागर अदानी आणि अदानी ग्रीन एनर्जीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी विनीत जैन यांच्याशी संबंधित आरोपांपैकी तीन आरोप रद्द करण्यात आले. या आरोपांमध्ये सिक्युरिटीज फ्रॉड कॉन्स्पिरसी (समभाग रोखेविषयक फसवणुकीचा कट), वायर फ्रॉड कॉन्स्पिरसी (इलेक्ट्रॉनिक माध्यमातून फसवणुकीचा कट) आणि सिक्युरिटीज फ्रॉड (समभाग रोखेविषयक फसवणूक) याचा समावेश आहे.

**मुख्य आरोप**

अमेरिकेतील ग्रँड ज्युरीने २४ ऑक्टोबर २०२४ रोजी अदानींविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. २०२० ते २०२४ या कालावधीत तीन परस्परांशी संबंधित कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप त्यात करण्यात आला होता. भारतातील सौरऊर्जा प्रकल्पांची कंत्राटे मिळविण्यासाठी भारतीय अधिकाऱ्यांना सुमारे २६.५ कोटी डॉलरची (सुमारे २,५२८ कोटी रुपये) लाच देण्याचे आश्वासन दिल्याचा आरोप करण्यात आला होता.

**१० अब्ज डॉलरची गुंतवणूक आणि वाद**

अदानी यांनी अमेरिकेत १० अब्ज डॉलरची गुंतवणूक आणि १५,००० नोकऱ्या निर्माण करण्याची घोषणा नोव्हेंबर २०२४ मध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या निवडणुकीतील विजयानंतर केली होती. या घोषणेचा खटला मागे घेण्याशी संबंध होता का, असा संशय न्यायालयाने आधी व्यक्त केला होता. मात्र, अदानींच्या वकिलांनी ही गुंतवणूक खटला मागे घेण्याच्या बदल्यात नसल्याचे सांगितले.

खटला रद्द करण्यास मंजुरी देताना न्यायाधीश गारॉफिस यांनी न्याय विभागाच्या अंतर्गत प्रक्रियेवर कठोर टीका केली. प्रमुख सहयोगी ॲटर्नी जनरल आर. ट्रेंट मॅककॉटर यांनी एफबीआय, 'एसईसी' किंवा या प्रकरणाचा मूळ तपास करणाऱ्या वकिलांचा सल्ला न घेता, केवळ अदानींच्या वकिलांशी चर्चा करून खटला मागे घेण्याचा निर्णय घेतल्याबद्दल न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

जानेवारी २०२६ मध्ये प्रमुख सहयोगी ॲटर्नी जनरल यांच्या कार्यालयात दाखल झालेल्या मॅककॉटर यांनी या प्रकरणातील प्रतिवादींबद्दल यापूर्वी ऐकलेही नसल्याचे सांगितले होते. तरीही ते या खटला रद्द करण्याच्या प्रक्रियेचे प्रमुख सूत्रधार ठरल्याचे न्यायाधीशांनी नमूद केले.

मूळ आरोपपत्र तयार करणारे न्याय विभागाचे दोन वकील शाय जॅक्सन आणि अँड्र्यू टायलर यांनी खटला रद्द करण्याची मागणी दाखल झाल्यानंतर दोन दिवसांनी या प्रकरणातून माघार घेतली.

# कोलंबियात भूकंपबळींची संख्या १७९वर

**वृत्तसंस्था, बोगोटा**

**दक्षिण कोलंबियात** सोमवारी पहाटे झालेल्या भूकंपामुळे अनेक शहरांतील इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत. यामध्ये आतापर्यंत १७९ नागरिकांच्या मृत्यूची नोंद झाली असून हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या भूकंपाची रिश्टर स्केलवर ७.४ एवढी तीव्रता नोंदवण्यात आली.

मंगळवारी दुसऱ्या दिवशीही भूकंपग्रस्त भागात इमारतींच्या ढिगाऱ्याखालून लोकांना बाहेर काढण्याचे काम वेगाने सुरू होते. या भागात रुग्णालयासह अनेक इमारतींचे वरचे मजले कोसळले असून भिंतींना भेगा पडल्या आहेत. त्यामुळे पेरेरा, काली या शहरांत बेघर झालेल्या लोकांसह रुग्णांनाही रस्त्यांवरील खुल्या भागात आसरा घ्यावा लागला आहे. २२ लाख लोकसंख्या असलेल्या काली शहरात आतापर्यंत ८५ जणांच्या मृत्यूची नोंद झाली असून शंभरहून अधिक लोक बेपत्ता आहेत. पेरेरामध्ये ६६ जण मृत्युमुखी पडले असून चोको या ग्रामीण भागात १३ जणांच्या मृत्यूची नोंद झाली आहे.

कोलंबियाचे अध्यक्ष ॲबेलार्डो डी ला एसप्रिएला यांनी बचावकार्याचा आढावा घेतला. भूकंपाचा सर्वाधिक फटका बसलेल्या कॅली, परेरा या दोन्ही शहरांत मंगळवारी रात्री संचारबंदीही लागू करण्यात आली होती. भूकंपामध्ये कोसळलेल्या इमारतींखाली अनेक जण अडकलेले आहेत. त्यांना सुरक्षित बाहेर काढण्याचे काम पोलीस, सैनिक, स्वयंसेवकांची पथके वेगाने करत आहेत.

**पश्चिम कोलंबियात झालेल्या तीव्र भूकंपात अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत. बचावकार्य वेगाने सुरू असले तरी मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे.**



### बेपत्ता व्यक्तींचा शोध

भूकंपानंतर कोलंबियात तीन हजारांपेक्षा अधिक व्यक्ती बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा तपास सुरू असल्याचे कॅली, परेरो, चोको आणि मनिझालेझ येथील स्थानिक प्रशासनाने सांगितले. भूकंपामध्ये सुमारे ९,६०० इमारती कोसळल्या आहेत किंवा त्यांचे नुकसान झाले आहे. इमारतींच्या ढिगाऱ्याखाली अनेकजण अडकल्याची भीती असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे.

कॅली, परेरा शहरात अनेक ठिकाणी या नैसर्गिक आपत्तीत कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. येथे लुटमारीच्या घटना वाढल्या असून संरक्षण दलाचे एक हजार जवान लवकरच तैनात करण्यात येणार आहे.

**– ॲबेलार्डो डी ला एसप्रिएला,** अध्यक्ष, कोलंबिया

# हल्ल्याच्या भीतीने ट्रम्प यांच्या विमानात बदल



**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे जुलैमध्ये तुर्की येथून ब्रिटनला जात असताना त्यांनी गोपनीयरित्या विमान बदलले होते, असे वृत्त 'द वॉशिंग्टन पोस्ट'ने दिले आहे. अमेरिका आणि इराणदरम्यान तणाव असताना इराणकडून धोका वाढल्याची माहिती अमेरिकेच्या गुप्तचर विभागाला मिळाली होती. डोनाल्ड ट्रम्प हे नेटो परिषदेसाठी तुर्कीला गेले होते. परिषद संपल्यानंतर ब्रिटनला रवाना होताना ट्रम्प यांनी अंकारा विमानतळावर नेहमीच्या 'एअर फोर्स वन जंबो जेट'ऐवजी 'एअर फोर्स सी-३२ अ' या विमानात प्रवेश केला. त्यासाठी त्यांनी विमानतळावरील केटरिंग ट्रकचा वापर केला होता, असे 'द वॉशिंग्टन पोस्ट'च्या वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

## ‘राष्ट्रध्वजाला विरोध करणाऱ्यांकडून तिरंगा यात्रा स्वागतार्ह’

**मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अनेक वर्षे तिरंगा राष्ट्रध्वजाला विरोध केला. तिरंगा अपशकुनी मानणाऱ्या संघाचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग नव्हता. स्वातंत्र्यानंतरही ५०-५५ वर्षे संघाने आपल्या कार्यालयावर तिरंगा फडकविला नाही. आज त्यांना तिरंग्याचे प्रेम वाटत असेल तर त्याचे स्वागतच आहे, ‘देर आये, दुरुस्त आये’, असा टोला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला.

भाजप सरकार सर्वच पातळ्यांवर अपयशी ठरले असून, भ्रष्टाचार, महागाई, शेतकरी, बेरोजगारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे. जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी जात-धर्माच्या नावावर द्वेष पसरविला जात आहे. सरकारच्या या धोरणाविरोधात काँग्रेस आंदोलनात्मक भूमिका घेईल, असे सपकाळ यांनी सांगितले.

# पदे मिळाली तीच पक्षघटना एकनाथ शिंदेंनी नाकारली!

## निवडणूक आयोगाच्या निर्णयाच्या अधिकारक्षेत्रावरच ठाकरे गटाचा आक्षेप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** शिवसेनेच्या आमदारांनी स्वतंत्र बैठका घेतल्या म्हणजे राजकीय पक्षात फूट पडली, असा त्याचा अर्थ होत नाही. २०१८ मधील शिवसेनेची पक्षघटना लोकशाहीविरोधी असल्याचे कारण देत शिंदे गटाने ती अमान्य केली; मात्र, याच पक्षघटनेच्या आधारे पदे मिळवली, निवडणुका लढवल्या आणि मंत्रीपदेही भूषविली. मग हीच पक्षघटना केंद्रीय निवडणूक आयोगाने का फेटाळली? पक्षघटनेत ‘मुख्यनेते’ हे पदच नसताना एकनाथ शिंदे यांनी ते पद कसे स्वीकारले? पक्षाची घटना लोकशाहीवादी आहे की लोकशाहीविरोधी, हे ठरवणे निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेतच नाही, मग, शिंदे गट हीच मूळ शिवसेना का मानले गेले आणि विधिमंडळातील फूट ही राजकीय फूट का ठरवले गेले, असे प्रश्न विचारत ज्येष्ठ वकील कपिल सिबल यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाच्या अधिकारक्षेत्रावरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

शिवसेनेचे निवडणूक चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील ठाकरे गटाच्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी सुरू आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत सिबल यांनी आयोगाच्या वादग्रस्त निर्णयातील चार प्रमुख मुद्द्यांवर तीव्र आक्षेप घेतला. शिवसेनेच्या राजकीय पक्षात फूट पडल्याचा निष्कर्ष आयोगाने कशाच्या आधारे काढला, पक्षघटनेच्या आधारे वाद सोडवण्याची पद्धत का अमान्य केली, बहुमताचा निकष स्वीकारताना संघटनात्मक बहुमताचा विचार का केला नाही आणि विधिमंडळातील बहुमताच्या आधारे पक्षाचे चिन्ह शिंदे गटाला का देण्यात आले, असे प्रश्न सिबल यांनी केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी बुधवारी होणार आहे.

### शिंदे, सावंत, सामंत, पाटील यांच्या पक्षविरोधी कारवाया

**१** विधिमंडळ पक्षाच्या स्वतंत्र बैठका घेणे हा राजकीय पक्षात फूट पडल्याचा पुरावा होऊ शकत नाही. दोन्ही गटांनी स्वतंत्र बैठका घेतल्या, आपापले गटनेते आणि मुख्य प्रतोद नियुक्त केले तसेच एकमेकांच्या आमदारांविरुद्ध अपात्रतेची कारवाई सुरू केली. या बाबींच्या आधारे आयोगाने पक्षात फूट पडल्याचा निष्कर्ष काढला. मात्र, २१ जूनचे पत्र केवळ विधिमंडळ पक्षाशी संबंधित होते. त्याला राजकीय पक्षातील फुटीचा पुरावा मानणे ही आयोगाची चूक होती, असे सिबल यांनी म्हटले.

**२** २५ जून आणि १ जुलै रोजी ठाकरे गटाने केलेल्या पत्रव्यवहारात एकनाथ शिंदे, तानाजी सावंत, उदय सामंत आणि गुलाबराव पाटील यांनी पक्षविरोधी कारवाया केल्याचा, स्वेच्छेने शिवसेनेचे सदस्यत्व सोडल्याचा आणि पक्षघटनेनुसार त्यांची पदे काढून घेतल्याचा उल्लेख होता.



**३** मूळ राजकीय पक्षात प्रथम फूट हवी. समाजवादी पक्षाच्या तसेच अन्य एका प्रकरणाचा आधार घेत आयोगाने विधिमंडळातील फूट ही राजकीय पक्षातील फूट मानली. मात्र, त्या दोन्ही प्रकरणांमध्ये प्रथम राजकीय पक्षात फूट पडली होती, याकडे सिबल यांनी लक्ष वेधले. त्यामुळे आयोगाचा प्रारंभीचा निष्कर्षच बेकायदेशीर ठरल्यास त्यावर आधारित पुढील संपूर्ण निर्णयही अवैध ठरतो, असा दावा त्यांनी केला.

### पक्षघटना अमान्य करून दुसऱ्या गटाला मूळ पक्षाचा दर्जा का देण्यात आला?

शिंदे गटाला याच पक्षघटनेच्या आधारे मिळालेल्या राजकीय लाभांकडे दुर्लक्ष करून तिच्या लोकशाहीविरोधी स्वरूपाचा आधार घेत पक्षाचे चिन्ह देणे कायदेशीरदृष्ट्या विसंगत असल्याचेही त्यांनी नमूद केले. पक्ष ही स्वेच्छेने स्थापन झालेली संघटना असते. एखादी संघटना एकाधिकारवादी आहे, असे मानले तरी तिची अंतर्गत घटना अमान्य करण्यासाठी योग्य कायदेशीर प्रक्रिया आवश्यक आहे. संघटनेला नोटीस बजावून त्यानंतर तिची मान्यता रद्द करता येते. मात्र, अशी कोणतीही नोटीस दिली नव्हती. पक्षघटना अमान्य करून दुसऱ्या गटाला मूळ पक्षाचा दर्जा का देण्यात आला, असा सवाल सिबल यांनी केला.



### आयोगाला अधिकारच काय?

- शिवसेनेची २०१८ची पक्षघटना शिंदे गटाने लोकशाहीविरोधी असल्याचा दावा केला होता. मात्र, ज्या व्यक्तींनी याच पक्षघटनेनुसार पदे मिळवली, निवडणुका लढवल्या आणि मंत्रीपदे भूषविली, त्यांना नंतर तीच घटना लोकशाहीविरोधी असल्याचे कसे म्हणता येईल, असा सवाल सिबल यांनी केला. ही घटना लोकशाहीविरोधी होती, तर त्याआधारे मिळालेले त्यांचे इतर सर्व राजकीय लाभही लोकशाहीविरोधी ठरतील, असा युक्तिवाद त्यांनी केला.
- पक्षघटना लोकशाहीविरोधी असल्याचा दावा हा पक्षाचे निवडणूक चिन्ह दुसऱ्या गटाला देण्याचा आधार होऊ शकत नाही. निवडणूक आयोगाला प्रतिस्पर्धी गटांपैकी कोणता गट मूळ राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करतो, एवढेच ठरवायचे आहे. अशा परिस्थितीत पक्षाची घटना लोकशाहीवादी आहे की लोकशाहीविरोधी, हे ठरवण्याचा अधिकार आयोगाला नाही, असे सिबल यांनी स्पष्ट केले.

# विलंबाने मिळणाऱ्या भूसंपादन मोबदल्याच्या व्याजदरात कपात

## राज्य सरकारचा शेतकऱ्यांना धक्का

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना दिल्या जाणाऱ्या मोबदल्यास विलंब झाल्यास त्यावर दिल्या जाणाऱ्या व्याजामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या व्याजाला कात्री लावण्यात आली असून, शेतकऱ्यांना रिझर्व्ह बँकेच्या रेपो रेटपेक्षा एक टक्का अधिक व्याज दिले जाणार आहे.

सरकारच्या विविध विकास प्रकल्प, योजनांसाठी संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीचा प्रकल्पाची निकड विचारात घेऊन आगाऊ ताबा घेणे आवश्यक ठरते. निवाड्यापूर्वी जमीन शासनास सुपूर्द करण्यात येत असल्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ नुसार बाधित व्यक्तीला मोबदल्याच्या रकमेवर विलंबामुळे व्याज दिले जाते. हे व्याजदर आणि बँकेच्या कर्जावरील प्रचलित व्याजदर यामध्ये तफावत असल्याने कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे.

### होणार काय ?

राज्य सरकारच्या पूर्वीच्या धोरणानुसार शेतकऱ्यांना विलंबाने मिळणाऱ्या भूसंपादन मोबदल्यावर ९ टक्क्यांपेक्षा अधिक व्याज दिले जात असे. मात्र, व्याजामुळे प्रकल्पाच्या मूळ खर्चात होणारी वाढ लक्षात घेऊन विलंबाच्या व्याजासाठी एकच दर निश्चित करताना रिझर्व्ह बँकेचा रेपो रेट हे प्रमाण निश्चित केले होते. मागील वर्षभरात आरबीआयने रेपो रेट कमी करत ५.२५ टक्क्यांवर आणला आहे. याचा आधार घेत आता शेतकऱ्यांना ६.२५ टक्के व्याजदर दिला जाणार आहे. मागील वर्षी रेपो रेट ६.५ टक्के असल्याने शेतकऱ्यांना ७.५ टक्के विलंबाच्या व्याजापोटी दिले जात होते.

# शिंदे शिवसेनेच्या नगराध्यक्षांची मनमानी

## प्रशासनाची परवानगी न घेता परस्पर शार्लोट तलावाचे पाणी सोडले

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अलिबाग :** प्रशासनाची परवानगी न घेता माथेरानचे नगराध्यक्ष आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते चंद्रकांत चौधरी यांनी शार्लोट तलावाचे पाणी परस्पर सोडल्याचे आता समोर आले आहे. तलावात मोठ्या प्रमाणात साचलेला गाळ कमी करण्यासाठी नगराध्यक्षांनी काही नगरसेवकांच्या उपस्थितीत तलावाचा दरवाजा उघडून पाणी सोडल्याचे सांगितले जात आहे. या घटनेची चित्रफितही समोर आली असून, जिल्हाधिकारी कार्यालयाने अहवाल मागविला आहे.

‘आले नगराध्यक्षांच्या मना, कोणाचे काही चालेना’, अशी स्थिती माथेरानकरांची झाली आहे. नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी शार्लोट तलावाच्या गेट-वॉलचे पूजन करून पाणी सोडल्याचे दिसत आहे. यावेळी गाळ काढण्यासाठी नियुक्त केलेला ठेकेदार तसेच काही नगरसेवक उपस्थित होते.

महत्त्वाची बाब म्हणजे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नगराध्यक्ष चौधरी आणि नगर परिषद प्रशासनाला तलावातून सोडलेले पाणी तातडीने बंद करण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्यानंतरही तलावाचा दरवाजा बंद करण्यात आला नाही. त्यामुळे तलावातील पाणी बाहेर पडले. मुसळधार पावसात तलावाचा वॉल उघडून गाळयुक्त माती वाहत्या पाण्यात सोडत गाळ काढण्याचे काम सुरू होते.



### पूर्वपरवानगी घेणे आवश्यक

तलावातील गाळ काढण्यासाठी पाणी सोडण्यात आल्याचे नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, त्यासाठी जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पाटबंधारे विभाग तसेच माथेरान मॉनिटरिंग कमिटीची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक होते. अशी कोणतीही परवानगी न घेताच नगराध्यक्ष आणि काही नगरसेवकांनी पाणी सोडल्याची माहिती आता समोर आली आहे. या घटनेची जिल्हा प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे.

## रशियन भाषा अभ्यासक प्रा. संजय देशपांडे यांचे निधन



**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या ‘सेंटर फॉर सेंट्रल युरेशियन स्टडीज’ विभागाचे संचालक आणि रशियन भाषा विभागाचे प्रमुख, आंतरराष्ट्रीय संबंधांचे गाढे अभ्यासक प्रा. संजय देशपांडे यांचे मंगळवारी दुपारी १ वाजता निधन झाले. ते अनेक महिन्यांपासून कर्करोगाशी लढा देत होते. त्यांच्यावर बुधवारी सकाळी ११ वाजता वांद्रे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि आई असा परिवार आहे. प्रा. देशपांडे यांनी रशियाचा इतिहास आणि राजकारण या विषयांमध्ये प्रावीण्य मिळवले होते. त्यांनी विविध स्रोतांमधून संदर्भसाहित्य संकलित करून उत्कृष्ट संशोधन केले.

## भाजप आमदाराच्या कारखान्यावर सरकारची ‘कृपादृष्टी’

(पान १ वर) झाला असून कारखान्याच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून व हे पूर्व उदाहरण म्हणून गृहीत धरले जाणार नाही आणि फक्त एकवेळचे उदाहरण म्हणून गृहीत धरण्यात येईल या अटीवर मंत्रिमंडळाने या कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगम यांच्याकडून कर्ज घेण्यास मान्यता दिली. त्यानुसार कारखान्याचा १८ कोटी ९ हजार रुपयांच्या कर्ज मागणीचा प्रस्ताव राष्ट्रीय सहकार विकास निगम यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे.

याबाबत अभिमन्यू पवार यांच्याशी वारंवार संपर्क साधण्यात आला. तसेच लघुसंदेशही पाठवण्यात आला. मात्र, त्यांचा प्रतिसाद मिळाला नाही.

# खाणमाफियांच्या बंदोबस्तासाठी नवे संकेतस्थळ

## गौण खनिज उत्खननावर २४ तास नजर

**अशोक अडसूळ, लोकसत्ता**

**मुंबई :** राज्यभर खाण माफियांनी मांडलेला उच्छाद मोडून काढण्यासाठी महसूल विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत ‘महाखनिज २.०’ हे नवे पोर्टल विकसित केले आहे. गौण खनिजांच्या उत्खननावर २४ तास देखरेख ठेवण्यासाठी कोकण आयुक्तालयात राज्य नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल या पोर्टलच्या नोडल अधिकारी असून, पुढील आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पोर्टलचे लोकार्पण होणार आहे.

खाण क्षेत्रे, वाहतूक मार्ग, ड्रोन प्रतिमा आणि अंमलबजावणी संबधीत अलर्ट डॅशबोर्डवर उपलब्ध होतील. महाखनिज २.० पोर्टलमुळे वाहनांची हालचाल, वाहतूक परवाने, वजनकाटा नोंदणी यांची परस्पर पडताळणी होईल, परिणामी पारदर्शी तंत्रज्ञानाधारित खनिज प्रशासनाची नवी व्यवस्था निर्माण होईल.



### उत्खनन किती ?

राज्यात १ लाख ११ हजार ११४ वाळू उत्खनन ठिकाणे आहेत. दगडांच्या ८० हजार २१२ खाणी असून इतर गौण खनिजांचे १ लाख ४६ हजार ७५३ ठिकाणी उत्खनन करण्यात येते. १ लाख ९७ हजार ४०४ वाहनांना परवाने आहेत.

गौण खनिजांची बेसुमार उत्खनन करुन सरकारची दिशाभूल व महसुल बुडवणाऱ्यांच्या सर्व पळवाटा नव्या पोर्टलमुळे बंद होतील. दोषींवर तत्काळ दंडात्मक कारवाई करणे शक्य होणार आहे.

**– रुबल अग्रवाल,** कोकण विभागीय आयुक्त

# कृषी विभागाच्या २३,४७६ पदांना मान्यता

## चार नव्या संचालनालयांनाही मंजुरी; २,६६८ पदांची नव्याने निर्मिती

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** बदलत्या काळातील शेतीच्या गरजा लक्षात घेऊन कृषी विभाग अधिक सक्षम, तंत्रज्ञानाधारित आणि शेतकरीकेंद्रित करण्यासाठी १७ वर्षांनंतर विभागाच्या सुधारित आकृतीबंधाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. नव्या आकृतीबंधानुसार कृषी विभागातील २३,४७६ नियमित पदांना मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी २,६६८ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

काळानुसार कृषी विभागाच्या गरजा आणि मागण्या बदलल्या आहेत. हवामान बदल, बाजारपेठेच्या मागणीनुसार पीक पद्धती आणि पीक व्यवस्थापनातही बदल झाले आहेत. या बदलांमुळे निर्माण झालेल्या नव्या गरजा पूर्ण करण्यासाठी तसेच कालबाह्य झालेली पदे रद्द करण्याची आवश्यकता होती. त्यानुसार सुधारित आकृतीबंध तयार करण्यात आला आहे.

कालबाह्य झालेली काही पदे रद्द करून, तर काही पदांमध्ये कपात करून हा आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. त्यामुळे दरवर्षी सुमारे ९२.६० कोटी रुपयांची बचत होणार आहे. तालुका कृषी अधिकारी आणि तंत्र अधिकाऱ्यांना गट ‘अ’ दर्जा तसेच एस-१९ वेतनश्रेणी देण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. प्रशासकीय कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी विविध अधिकारी आणि कर्मचारी पदांनाही मंजुरी देण्यात आली आहे.

### चार नव्या संचालनालयांना मंजुरी

शेतकऱ्यांना मार्गदर्शन अधिक प्रभावीपणे मिळावे यासाठी कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्यासह विविध स्तरांवरील पदे मंजूर करण्यात आली आहेत. कृषी यांत्रिकीकरण, मालमत्ता व्यवस्थापन, ॲग्रीस्टॅक आणि ‘हवामान अनुकूल व शाश्वत शेती’ यासाठी चार नवी संचालनालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून, त्यासाठी ९८ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. ॲग्रीस्टॅकचे काम गतिमान करण्यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पदेही निर्माण करण्यात आली आहेत.



कृषी विभागातील कालबाह्य झालेली पदे रद्द करून गरजेनुसार चार नवी संचालनालये आणि पदे मंजूर केली आहेत. हवामान बदलास पूरक शेती, कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कृषी यांत्रिकीकरणावर भविष्यात भर राहील. विभागाच्या प्रशासकीय कामकाजात गतिमानता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता येईल.

**– दत्तात्रय भरणे,** कृषिमंत्री

# शासकीय वाहनांवर केवळ गरजेपुरताच खर्च करा

## वित्त विभागाचा सर्व विभागांना सल्ला

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** ‘लाडकी बहीण’सारख्या योजनांमुळे सरकारी तिजोरीवर वाढलेल्या आर्थिक भाराच्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाने खर्चात काटकसर करण्याचे धोरण अवलंबले आहे.

सरकारी वाहनांसाठी प्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) प्रतिष्ठेसाठी विशेष किंवा पसंतीचा क्रमांक घेण्यावर सरकारने लगाम घातला असून, अशा क्रमांकासाठी होणारा अतिरिक्त खर्च शासनाकडून दिला जाणार नाही. सरकारी वाहनांची खरेदी, देखभाल, दुरुस्ती, इंधन तसेच वाहनचालकांचे वेतन यावर मोठा खर्च होत असल्याने वाहनांवर केवळ गरजेपुरताच खर्च करावा, असा सल्ला वित्त विभागाने सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे आणि शासकीय उपक्रमांना दिला आहे.

**पसंतीचा क्रमांक घेण्यास मनाई**

वित्त विभागाने वाहन खर्चातील काटकसरीबाबतचे परिपत्रक मंगळवारी जारी केले. शासकीय वाहनांसाठी आरटीओकडून विशेष किंवा पसंतीचा क्रमांक घेण्यासाठी अतिरिक्त खर्च करण्यास वित्त विभागाने मनाई केली आहे.

पंजाब नैशनल बैंक punjab national bank
डेटा गोपनीयता आणि व्यवस्थापन विभाग, मुख्य कार्यालय
प्लॉट क्र. ५, सेक्टर - ३२, गुरुग्राम, हरियाणा - १२२००१
नोटीस
पीएनबी (PNB) च्या आदरणीय ग्राहकांचे लक्ष वेधण्यात येत आहे!!!
प्रिय PMSBY/PMJJBY पॉलिसीधारक, जनसुरक्षा पोर्टलवरील डुप्लिकेशन टाळण्यासाठी तुमची वैयक्तिक माहिती जसे की नाव, पॉलिसी क्रमांक, जन्मतारीख, आधार क्रमांक, OVD जनसुरक्षा पोर्टलवर संग्रहित केली जाईल. तुम्हाला काही अडचण असल्यास, नमूद केलेल्या योजनांमधून बाहेर पडण्यासाठी कृपया तुमच्या मूळ शाखेशी संपर्क साधा.

## प्रश्न विचारण्यापूर्वीच गोळी झाडण्यासारखा प्रकार; न्यायालयाची कारवाईवरून टीका

# एफडीएने अधिकारांचा विवेकाने वापर करावा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** अन्न व औषध प्रशासनाची (एफडीए) कारवाई म्हणजे डास मारण्यासाठी तलवारीचा वापर करण्यासारखी आणि प्रश्न विचारण्यापूर्वीच गोळी झाडण्यासारखी असल्याची तीव्र टीका उच्च न्यायालयाने बुधवारी केली. एफडीएला आपल्या अधिकारांचा वापर विवेकाने आणि योग्य पद्धतीने करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले. एफडीएकडून केल्या जाणाऱ्या कठोर कारवाईची अनेक प्रकरणे आपल्या निदर्शनास येत असल्याचे नमूद करत, दंड ठोठावण्याचा इशाराही न्यायालयाने पुन्हा दिला.

कोणतीही कठोर कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे, असे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. काही विशिष्ट औषधांविरुद्ध एफडीएने केलेल्या कारवाईला आव्हान देणाऱ्या ‘कॅडिला फार्मास्युटिकल्स’च्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने एफडीएच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली.

त्यानंतर याचिकाकर्त्या कंपनीविरुद्धचे आदेश मागे घेण्यात येतील. कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल आणि सविस्तर आदेश पारित करण्यापूर्वी तिचे म्हणणे ऐकून घेतले जाईल, असे एफडीएच्या वतीने सरकारी वकील नेहा भिडे यांनी न्यायालयाला आश्वासन दिले.

ब्रँडिंगमधील साम्यामुळे याचिकाकर्त्या कंपनीच्या काही औषधांच्या विक्री आणि वितरणावर एफडीएने बंदी घातली होती. तसेच राज्यभरातून सुमारे २.४५ कोटी रुपयांचा औषधसाठा जप्त करण्यात आला होता. या कारवाईला कंपनीने उच्च न्यायालयात आव्हान दिले. संबंधित औषधांबाबत गोंधळ निर्माण झाल्याने हा निर्णय घेण्यात आला असून, ही प्रतिबंधात्मक उपाययोजना होती; मनमानी किंवा कठोर कारवाई नव्हती, असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला.

### कंपनीला आपली बाजू मांडण्याची संधी द्यायला हवी

**१** कोणतीही कठोर कारवाई करण्यापूर्वी एफडीएने कंपनीला आपली बाजू मांडण्याची संधी द्यायला हवी होती, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. आदेश काढल्यापासून कंपनीचे झालेले नुकसान ही आमची चिंता नाही; मात्र ज्या रुग्णांना ही औषधे मिळू शकली नाहीत, त्यांची आम्हाला चिंता आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

**२** एफडीएकडून केल्या जाणाऱ्या अशा कठोर कारवाईची अनेक प्रकरणे आपल्या निदर्शनास येत असल्याचे नमूद करून न्यायालयाने एफडीएवर दंड आकारण्याचा इशाराही पुन्हा दिला. “तुमच्याकडे तलवार वापरण्याचे सामर्थ्य आहे; मात्र तुम्ही तिचा वापर डास मारण्यासाठी करत आहात, ही मूळ समस्या आहे,” अशी टिप्पणी न्यायालयाने केली.

**३** या अधिकाराचा वापर विवेकाने आणि योग्य पद्धतीने केला पाहिजे, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सच्या बाबतीतही एफडीएची अशीच कार्यपद्धती असल्याचे नमूद करत, “तुम्ही आधी कारवाई करता आणि मग प्रश्न विचारता,” अशा शब्दांत न्यायालयाने एफडीएला सुनावले.

## मिसिंग लिंकवरील पुणे-मुंबई मार्गिका आज तीन तास बंद



**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील कनेक्टिंग लिंक (मिसिंग लिंक)वरील पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारी मार्गिका बुधवारी तीन तासांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून या मार्गिकेवर दुरुस्ती आणि देखभालीची कामे तसेच मॉक ड्रिल घेण्यात येणार असल्याने दुपारी १२ ते ३ या वेळेत वाहतूक बंद राहणार आहे. या कालावधीत पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील घाट परिसरातून वळविण्यात येणार आहे.एमएसआरडीसीने खोपोली-कुसगावदरम्यान नवीन मार्गिका बांधली आहे.

म्हाडा MHADA
NAGPUR HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD, NAGPUR
(REGIONAL UNIT OF MHADA)
E-Tender Notice for the Year 2026-2027
Digitally Signed & unconditional online tenders in form B-2 Agreement are invited by the Executive Engineer, Division-I, Nagpur Housing & Area Development Board, Nagpur, Gruha Nirman Bhavan, Opp. Deshpande Hall, Civil Lines, Nagpur- 440001, Phone No. 07122565692, Email ID : exengr01@gmail.com on behalf of Chief Engineer-II / MHADA, Mumbai. It is not necessary for bidder to registered with state PWD/CPWD/MES/MHADA/CIDCO or any other Govt. agency / organization undertaking. The age of organization with experience in similar work shall not be less than 5 years. Also the eligibility criteria is as per PWD Govt. circular no. Sankirna-2017/C.R.121 (part+II)Building. 2. https://mahatenders.gov.in.
Name of Work : CONSTRUCTION OF CEMENT CONCRETE ROAD OF 15 MT. WIDE ROAD NO. 32,33 & 18 MT. WIDE DP ROAD NO. 4 PT, 25 & 24 MT. D.P. ROAD NO. 6, 19, PT AT NEW CHANDRAPUR

| | | |
|---|---|---|
| Estimate Cost | : | Rs. 94,17,75,234/- (Excluding GST, Royalty & Testing Charges) |
| EMD @ 0.5% | : | Rs. 47,08,900/- |
| Period for Completion of work | : | 24 months (including monsoon) |
| Cost of Documents | : | Rs. 3540/- (including GST). |
| Document sale Start to End | : | 12/08/2026 @ 9.00 Hrs. To 27/08/2026 @ 17.00 Hrs. |
| Pre bid meeting | : | 18/08/2026 @ 15.00 Hrs. |
| Bid submission Start to End | : | 12/08/2026 @ 9.00 Hrs. To 27/08/2026 @ 17.00 Hrs. |
| Technical Bid Opening | : | 31/08/2026 @ 16.00 Hrs. |
| Opening Authority | : | Dy. Chief Engineer - Nagpur Board |

The detail tender notice and all other details are available on portal for e–tender. Contractor is required to get enrolled on the portal https://mahatenders.gov.in and get empanelled in relevant sub portal. The registered contractor has to obtain the Digital Certificate.
* The tender document will be published online on the website https://mahatenders.gov.in on dt. 12/08/2026
* Tender may be cancelled at any point of time without given any reason.
Executive Engineer - I
Nagpur Housing And Area Development Board, Nagpur.

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### मानवी समाजाचे अपरिमित नुकसान

'**निवडणूकग्रस्तांचा नरसंहार**' हा संपादकीय लेख (११ ऑगस्ट) वाचला. इस्रायलने पॅलेस्टाइनमध्ये केलेल्या अत्याचारांच्या क्रूरतेचे वर्णन करताना न्या. मुरलीधर यांच्या अध्यक्षतेखालील स्वतंत्र आंतरराष्ट्रीय चौकशी आयोगाने म्हटले आहे की, इस्रायली अधिकाऱ्यांनी नरसंहार, मानवतेविरुद्धचे गुन्हे आणि युद्ध गुन्हे केले आहेत. बालकांची हत्या हा इस्रायलच्या अधिकाऱ्यांना खेळ वाटला, ही तर क्रूरतेची परिसीमा. ज्या समाजाने हिटलरच्या नरसंहाराच्या यातना झेलल्या तोच समाज एवढा क्रूर कसा होऊ शकतो, हे अनाकलनीय आहे. दुर्दैवाने मोजकी राष्ट्रे वगळता इतरांनी याची फारशी दखल घेतलेली नाही. ट्रम्प आणि त्यांचे सरकार इस्रायलच्या म्हणजेच नेतान्याहू, मोसाद आणि अमेरिकी यहुदी लॉबी यांच्या दबावाखाली आहे आणि पश्चिम आशियातील देश अमेरिकेच्या दडपणाखाली आहेत. भारताने तर इस्रायलला 'पितृदेश' मानले आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस आणि या शतकाच्या सुरुवातीस देशोदेशी वंश, धर्म, स्थलांतरित या आधारे द्वेषाधारित राजकारण फोफावले आणि नेतान्याहू, ट्रम्प यांच्यासारखे गुन्हेगार सत्ताधीश झाले. द्वेष, युद्धजन्य परिस्थितीचा आधार घेत सत्ता टिकवणे हेच या उपटसुंभांचे राजकारण. विवेक, नैतिकता, मानवाधिकार पायदळी तुडवून हे निवडणूकग्रस्त नेते त्यांच्या देशाचे, जगाचे आणि मानवी समाजाचे अपरिमित नुकसान करत आहेत.

■ **ॲड. वसंत नलावडे,** सातारा

### अमेरिकेने कणखर भूमिका घेणे आवश्यक

'**निवडणूकग्रस्तांचा नरसंहार**' हा अग्रलेख वाचला. डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधात युद्ध पुकारले तेच मुळी नेतान्याहूंच्या आग्रहाखातर. त्यात आपण पुरते अडकलो आहोत हे लक्षात येताच त्यांनी शस्त्रसंधीचा प्रस्ताव दिला. त्यालाही बिबींची मान्यता नव्हतीच. अमेरिकेच्या जीवावर इस्रायली नेतृत्व गेली अनेक वर्षे गाझा पट्टीत शिरकाण करत आहे. ज्यूंची अमेरिकेतील प्रचंड लॉबी कोणत्याही राष्ट्राध्यक्षाला मनासारखे काम करू देत नाही, हा इतिहास आहे. त्यामुळेच आता तरी अमेरिकेने कणखर भूमिका घेणे आवश्यक आहे.

दुसरीकडे अमेरिकन जनता इस्रायल-पॅलेस्टाइन युद्धातील अमेरिकेच्या अप्रत्यक्ष सहभागाला आधीच कंटाळली होती. त्यात ट्रम्प यांनी इराण युद्ध सुरू करून स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली. ट्रम्प यांच्या विरोधात आज प्रचंड जनक्षोभ आहे. यामागे दोन्ही युद्धांतील सहभाग, नेतान्याहूंची अति तळी उचलणे, शांतता करार न करणे ही कारणे दिसतात. जेडी व्हान्स आणि इतर सहकारी जरी इस्रायल विरोधात भूमिका घेत असले तरी जोवर अमेरिकेकडून इस्रायलला मिळणारी छुपी आर्थिक, लष्करी रसद थांबणार नाही, तोवर इस्रायल आणि पर्यायाने नेतान्याहूंचा अहंकार कमी होणार नाही.

■ **संकेत पांडे,** नांदेड

### हे 'पीएम केअर'लाही लागू

'**एफसीआरए : कर** नाही त्याला डर कशाला?' या भाजप राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य लिखित लेखातील (११ ऑगस्ट) पारदर्शकता, उत्तरदायित्व, कोण निधी देत आहे, का आणि कशासाठी देत आहे, त्या निधीचा त्याच कारणांसाठी विनियोग होतो आहे ना याच्या छाननीची आवश्यकता वगैरे मुद्दे शंभर टक्के बरोबरच आहेत पण मग मागे पीएमकेअर निधीबाबत मात्र हे सर्व मुद्दे बासनात गुंडाळून ठेवले गेले ते कसे काय? पीएमकेअर निधीबाबत त्याची उत्तरे मिळालेली नाहीत किंबहुना ती द्यावी लागू नयेत याची चोख व्यवस्था करण्यात आली. लपविण्याजोगे जर काही नसेल तर उत्तरदायित्व नाकारण्याचा चोख बंदोबस्त करण्याचे कारणच काय, याचेही उत्तर भाजप राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यांकडून अपेक्षित आहे. राम मंदिर, सिद्धिविनायक मंदिर, नाशिक कुंभमेळ्याशी संबंधित आर्थिक अपहाराच्या बातम्या येत आहेत आणि यामागच्या 'खऱ्या' सूत्रधारांना कधी शासन होईल अशी कुणालाही सुतराम अपेक्षा नाही. आहेत त्या कायद्यांची कठोर अंमलबजावणी होत नसताना आणखी एका कायद्यातील सुधारणांविषयी कोणाला शंका आलीच, तर ती अगदीच गैरलागू नाही. तेव्हा विरोधकांनी कायद्यातील सुधारणांविषयी प्रश्न उपस्थित केले म्हणून, एवढे विचलित होण्याचे कारण काय?

■ **प्रवीण नेरुरकर,** माहीम (मुंबई)

### 'तो' पैसाही कुठून तरी येतच असेल ना?

'**एफसीआरए : कर** नाही त्याला डर कशाला?' हा 'पहिली बाजू' सदरातील लेख वाचला. अतिशय एकांगी भूमिका मांडली आहे. लेखक ज्या पक्षाचे काम करतात त्या पक्षाची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे पैसा कुठून येतो हेही त्यांनी सांगितले तर बरे होईल. संघ स्वयंसेवकांचे राहणीमान व त्या संस्थेची कार्यालये यांत २०१४ नंतर आमूलाग्र बदल झाला आहे. त्या संस्थेकडे परदेशातूनच पैसा येतो, असा अजिबात दावा नाही, परंतु कुठून तरी येतच असेल ना? हे सर्व डावपेच विरोधी पक्षांना कमकुवत करण्यासाठी रचण्यात येत आहेत. थोडक्यात सांगायचे तर विरोधक ठेवायचेच नाहीत आणि आम्हाला कुणाचा विरोध नाही, आम्हीच कशी राष्ट्रीय हिताची कामे करत आहोत, असे सांगणे हाच लेखामागचा उद्देश दिसतो.

■ **दिलीप येवले,** नाशिक

### कायदा हा समस्येवरील उपाय नव्हे

'**धर्मांतराचा कायदा** की जातिव्यवस्थेची पुनर्बांधणी' हा लेख वाचला. एखाद्या व्यक्तीला समान प्रतिष्ठा, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सन्मान मिळत नसेल, तर केवळ धर्मांतरावर निर्बंध आणून समस्या सुटणार नाहीत. जाती व्यवस्थेच्या मुळावर प्रहार न करता धर्मांतर रोखणे लक्षणावर उपचार करून मूळ आजाराकडे दुर्लक्ष करण्यासारखे ठरू शकते. अशा कायद्यांचा वापर जर व्यक्तीने स्वेच्छेने केलेल्या निवडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी किंवा विशिष्ट सामाजिक समूहांना लक्ष्य करण्यासाठी झाला, तर तो सामाजिक समानता आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण करू शकतो. धर्मांतर थांबवून जातव्यवस्था संपत नाही. जातीय भेदभाव संपवला तर धर्मांतरामागची अनेक सामाजिक कारणेच कमी होऊ शकतात. त्यामुळे व्यक्तीचा धर्म बदलण्याचा अधिकार नियंत्रित करण्यापेक्षा व्यक्तीला जातीय अन्यायातून मुक्त करणे हा लोकशाहीचा अधिक मूलभूत मार्ग आहे. या समस्येचे समाधान केवळ कायद्यात नाही. जातीय भेदभाव कमी करण्यासाठी शिक्षण, आर्थिक संधी, सामाजिक समावेश, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि सांविधानिक मूल्यांचा प्रसार आवश्यक आहे. व्यक्तीला धर्म बदलण्याची गरज वाटणार नाही अशी समान आणि सन्मानजनक सामाजिक व्यवस्था निर्माण करणे हा अधिक दीर्घकालीन उपाय आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक न्याय यांचा समतोल हेच लोकशाहीचे अंतिम ध्येय आहे.

■ **संतोष खाडे,** गेवराई (बीड)

### 'मिसिंग' मुद्द्यांमागची मनोवृत्ती...

'**महामार्गावरील 'मिसिंग'** मुद्दे...' हा 'अन्वयार्थ' (११ ऑगस्ट) वाचला. नवमध्यम वर्गामध्ये अलीकडे एक वेगळीच वृत्ती वाढीस लागलेली दिसते. आपल्यापुढे जाणारी व्यक्ती 'आगाऊ' आणि मागे असणारी 'मूर्ख' असते असा समज करून घेऊन बरेच जण वावरत असतात. वाहतूक, आरोग्य, वीज, पाणी आदी सेवांसाठी मी पैसे मोजले आहेत, म्हणून संपूर्ण यंत्रणा माझ्या मालकीची झाली आहे, महामार्गावर टोल भरला म्हणजे आता रस्ता आपलाच, अशा कैफात असलेल्या मंडळींच्या बेफिकीर वृत्तीमधून बरेच अपघात आणि दुर्घटना घडत आहेत. विरोधाभास असा की ज्या राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे यंत्रणा मोडकळीस आली आहे त्याविरुद्ध हा नवमध्यमवर्ग अजिबात तोंड उघडत नाही.

■ **सुनील वालावलकर,** गोरेगाव (मुंबई)

### चुकीच्या पद्धतीने वाहन उभे करणे हा गुन्हा

'**महामार्गावरील 'मिसिंग'** मुद्दे...' हा 'अन्वयार्थ' (११ ऑगस्ट) वाचला. एक महत्त्वाचा मुद्दा मांडावासा वाटतो, तो म्हणजे महामार्गावर चुकीच्या पद्धतीने वाहन उभे करणे. काही अडचणींमुळे वाहनचालकाला वाहन उभे करावे लागते; पण तसे करताना मागील वाहनांना सूचना करणे, तसेच लाल त्रिकोणी रिफ्लेक्टर लावणे अत्यंत गरजेचे असते; जेणेकरून मागून येणाऱ्या वाहनचालकांना दुरूनही वाहन उभे आहे याचा अंदाज येऊन ते आधीच सावध होऊ शकतात. गेल्या आठवड्यात झालेल्या अपघाताच्या सीसीटीव्ही चित्रणात अपघाताच्या वेळी उजव्या लेनमध्ये एक-दोन वाहने चुकीच्या पद्धतीने उभी असल्याचे दिसते. अशा पद्धतीने वाहन उभे करणे गुन्हा असून अपघाताला निमंत्रण देण्यासारखे आहे. अशा वाहनचालकांवरदेखील कारवाई करणे गरजेचे आहे.

■ **चंद्रसिंग जाधव,** पाषाण-सुस रोड (पुणे)

# संस्थांची गळचेपी ही लोकशाहीची कोंडी!

**राज्यसत्ता कोणत्याही वैध प्रश्नाला 'परकीय प्रभाव', असहमतीला 'राजकीय हेतू' आणि स्वतंत्र नागरी आवाजाला 'संशयास्पद निधी'चे लेबल लावू लागली, तर ते धोक्याचे निदर्शकच असते, अशी टीका करणारा 'एफसीआरए : कर नाही त्याला डर कशाला?' या 'पहिली बाजू'चा (११ ऑगस्ट) प्रतिवाद...**

**उमाकांत जाधव**
माजी उपकुलसचिव, एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई

'**एफसीआरए : कर** नाही त्याला डर कशाला?' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेला लेख वाचताना सर्वप्रथम जाणवते ती मांडणीतील सोयीस्कर निवड. स्वयंसेवी संस्थांमध्ये उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि आर्थिक शिस्त असलीच पाहिजे, याबद्दल कोणत्याही लोकशाही समाजात दुमत असण्याचे कारण नाही. परकीय निधी हा परकीय प्रभावाचे माध्यम होऊ शकतो, त्याचा गैरवापर होऊ शकतो, धर्मांतर, राजकीय हस्तक्षेप, मनी-लाँडरिंग किंवा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित धोके निर्माण होऊ शकतात, हेही नाकारता येत नाही. परंतु या निर्विवाद सत्यांपासून पुढे जाऊन संपूर्ण स्वयंसेवी क्षेत्राकडे संशयाच्या नजरेने पाहणे, सामाजिक चळवळी आणि अधिकारांसाठी लढणाऱ्या संस्थांना एका संशयाच्या चौकटीत बसवणे आणि त्याच वेळी राज्यसत्तेच्या वाढत्या प्रशासकीय अधिकारावर प्रश्नचिन्ह न लावणे- हीच या लेखाची मूलभूत मर्यादा आहे. प्रश्न 'एफसीआरए असावा की नसावा?' हा नाही; प्रश्न असा आहे की एफसीआरएचा वापर पारदर्शक, समान, प्रमाणबद्ध आणि राजकीयदृष्ट्या निरपेक्ष पद्धतीने होतो आहे का?

लेखात जुन्या काळातील समाजसेवकांचे उदाहरण देऊन आजच्या स्वयंसेवी संस्थांच्या व्यावसायिकीकरणावर बोट ठेवले आहे. ही टीका काही अंशी रास्त आहे. स्वयंसेवी संस्थेचे स्वयंसेवीपण म्हणजे आर्थिक अकार्यक्षमता नव्हे आणि व्यावसायिक व्यवस्थापन म्हणजे सामाजिक बांधिलकीचा अभाव नव्हे. आज ग्रामीण आरोग्य, आदिवासी शिक्षण, महिला सक्षमीकरण, बालहक्क, पर्यावरण, अपंगत्व, मानवी हक्क, आपत्ती व्यवस्थापन आणि कायदेविषयक मदत यांसारखी कामे प्रशिक्षित कर्मचारी, लेखापरीक्षण, डिजिटल नोंदी आणि वैज्ञानिक पद्धतींशिवाय करता येत नाहीत. 'स्वयंसेवी' या शब्दाचा अर्थ 'पगार न घेणारे लोक' असा लावणे अयोग्य आहे. ज्या सरकारला स्वतःच्या योजना राबविण्यासाठी कंत्राटदार, सल्लागार, तज्ज्ञ आणि व्यावसायिक संस्थांची गरज असते, त्याच सरकारने सामाजिक क्षेत्रातील व्यावसायिकतेकडे संशयाने पाहणे हा स्पष्ट दुटप्पीपणा आहे.

लेखातील आणखी एक महत्त्वाचा युक्तिवाद असा की, परकीय निधीमुळे स्वयंसेवी संस्था परदेशी दात्यांवर अवलंबून राहतात आणि त्यामुळे त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक भूमिकेवर परकीय प्रभाव पडतो. येथेही अर्धसत्याला पूर्ण सत्याचे रूप दिले आहे. परकीय निधी म्हणजे परकीय नियंत्रण असे गृहीत धरता येत नाही. निधीचा स्रोत, त्याचा उद्देश, खर्च, लाभार्थी, लेखापरीक्षण आणि अंतिम परिणाम यांची तपासणी करणे ही राज्याची वैध जबाबदारी आहे. पण एखाद्या संस्थेने परदेशातून निधी घेतला म्हणून तिचे प्रत्येक मत, प्रत्येक संशोधन किंवा प्रत्येक सरकारविरोधी भूमिका 'परकीय प्रभाव' ठरत नाही. स्वयंसेवी संस्थेला सरकारच्या धोरणांवर प्रश्न विचारण्याचा अधिकार नसेल तर 'नागरी समाज' या संकल्पनेलाच अर्थ उरत नाही. सर्वोच्च न्यायालयानेही 'इंडियन सोशल ॲक्शन फोरम' प्रकरणात 'पोलिटिकल नेचर' या संकल्पनेचा अर्थ इतका व्यापक ठेवता येणार नाही, की सार्वजनिक प्रश्नांवर वैध मार्गाने मत व्यक्त करणाऱ्या संस्थांनाच राजकीय संस्था ठरवून त्यांचे परकीय निधीचे अधिकार हिरावून घेतले जातील, असा महत्त्वपूर्ण दृष्टिकोन स्वीकारला होता.

सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये २०२०च्या एफसीआरए दुरुस्त्यांना घटनात्मक मान्यता दिली. परकीय देणगी स्वीकारणे हा मूलभूत अधिकार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले; तसेच निधीचे हस्तांतर रोखणे, निधीच्या वापरावर नियंत्रण ठेवणे आणि नियमन अधिक कठोर करणे हे सार्वभौमत्व, सार्वजनिक सुव्यवस्था आणि राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने वाजवी ठरू शकते, असेही सांगितले. पण या निर्णयाचा अर्थ राज्याला अमर्यादित, मनमानी किंवा भेदभावपूर्ण अधिकार मिळाला असा अजिबात होत नाही. नियमनाचा अधिकार आणि दडपशाहीचा अधिकार हे समानार्थी शब्द नाहीत. न्यायालयाने कायद्याची वैधता मान्य केली आहे; प्रत्येक प्रशासकीय कृतीला आपोआप वैधता दिलेली नाही.

आजच्या परिस्थितीचे खरे गांभीर्य येथेच सुरू होते. १५ जुलै २०२६ पर्यंत एफसीआरए पोर्टलवर १४,४४९ सक्रिय नोंदण्या, २२,४९८ रद्द झालेल्या आणि १५,२१२ कालबाह्य झालेल्या नोंदण्या असल्याचे उपलब्ध आकडे दर्शवतात. २०१९-२२ या कालावधीत १३,५२० संस्थांना ५५,७४१ कोटी रुपयांचा परकीय निधी मिळाला होता. या सर्व संस्थांना 'देशविरोधी' किंवा 'संशयास्पद' म्हणायचे आहे का? अर्थातच नाही. त्याचप्रमाणे सर्व संस्था निष्पाप आहेत असेही म्हणता येणार नाही. म्हणूनच व्यक्ती किंवा संस्थेच्या विचारसरणीऐवजी व्यवहाराधारित, जोखमीवर आधारित आणि पुराव्यांधारित तपासणी योग्य ठरते.

याहून गंभीर बाब म्हणजे २०२६च्या प्रस्तावित दुरुस्तीमध्ये एफसीआरए नोंदणी रद्द झाली, परत घेतली गेली किंवा नूतनीकरण झाले नाही तर परकीय निधीतून निर्माण झालेल्या मालमत्तेच्या ताब्याची, व्यवस्थापनाची आणि विल्हेवाटीची नवी यंत्रणा प्रस्तावित आहे. 'डिझिग्नेटेड अथॉरिटी'कडे अशी मालमत्ता जाण्याची तरतूद आहे; काही परिस्थितीत तिची विक्री करून रक्कम केंद्राच्या एकत्रित निधीत जमा केली जाण्याची शक्यताही प्रस्तावित आहे. त्याहून चिंताजनक प्रश्न असा की नूतनीकरण नाकारण्याच्या बाबतीत स्वतंत्र अपिलाची आणि निर्णयापूर्वी प्रभावी सुनावणीची स्पष्ट व्यवस्था नसल्याची संसदीय अभ्यासातून नोंद झाली आहे. त्यामुळे असा प्रश्न उपस्थित होतो की एखाद्या स्वयंसेवी संस्थेचा परकीय निधी बंद करणे हा एक विषय आणि तिची वर्षानुवर्षांपासूनची रुग्णालये, शाळा, वसतिगृहे, ग्रंथालये किंवा सामाजिक पायाभूत सुविधा राज्याने ताब्यात घेणे हा पूर्णपणे वेगळ्या पातळीचा विषय नव्हे का? पहिल्या अधिकारासाठी जेवढे पुरावे पुरेसे असतील, तेच दुसऱ्या अधिकारासाठी पुरेसे असतील का?

नव्या नियमांनी आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. एखाद्या संस्थेने दोन आर्थिक वर्षांत किमान १० लाख रुपयांचा परकीय निधी वापरल्यासच तिने आपल्या क्षेत्रात वाजवी कृती (रिझनेबल ॲक्टिव्हिटी) केली असे मानण्याची अट घालण्यात आली आहे. याचा सर्वाधिक फटका मोठ्या महानगरांतील कोट्यवधी रुपयांच्या संस्थांना नव्हे, तर अल्प निधीत काम करणाऱ्या छोट्या ग्रामीण, आदिवासी आणि स्थानिक संस्थांनाही बसू शकतो. सामाजिक कार्याचे मोजमाप निधीच्या आकाराआधारे करणे हीच जर कसोटी असेल तर लहान पण प्रभावी सामाजिक संस्थांचे काय? एखाद्या दुर्गम गावातील ग्रंथालय वर्षाला चार लाखांत चालत असेल तर ते दोन वर्षांत दहा लाखांचा परकीय निधी खर्च करत नाही म्हणून त्याचे काम 'अपुरे' ठरवायचे का? हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही; तो सामाजिक न्यायाचाही आहे.

आश्चर्याची बाब म्हणजे एफसीआरएचे समर्थन करताना वारंवार फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सचा (एफएटीए) उल्लेख केला जातो; परंतु एफएटीए स्वतः ना-नफा संस्थांत शिक्षण-संवादावर भर देते. त्याचबरोबर चुकीच्या अंमलबजावणीमुळे वैध स्वयंसेवी संस्थांचे दमन होऊ नये, असा स्पष्ट इशाराही एफएटीएच्या मार्गदर्शक तत्त्वांत आहे. भारताच्या २०२४च्या मूल्यमापनातही गैर-नफा क्षेत्राबाबत जोखमीवर आधारित दृष्टिकोन आणि संस्थांशी संवाद वाढवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. त्यामुळे 'एफएटीए म्हणते म्हणून कठोर नियंत्रण' हा अर्धवट युक्तिवाद आहे; एफएटीएचा संपूर्ण संदेश वाचला तर नियंत्रणाइतकेच प्रमाणबद्धता आणि वैध सामाजिक कार्याला संरक्षणही महत्त्वाचे आहे.

म्हणूनच खरी कसोटी अशी असली पाहिजे की एफसीआरएची तलवार कोणावर चालते आणि कोणावर चालत नाही. सरकारच्या वैचारिक भूमिकेशी सहमत असलेल्या संस्था असोत किंवा सरकारवर कठोर टीका करणाऱ्या संस्था- सर्वांसाठी सारखेच लेखापरीक्षण, पारदर्शकता, तपासणी, सुनावणी आणि न्यायिक निकष असले पाहिजेत. 'परकीय पैसा' हा दोषी असल्याचा पुरावा नाही; परकीय पैशाचा अपारदर्शक, बेकायदा किंवा राष्ट्रहितविरोधी वापर हा दोषाचा पुरावा आहे. आणि हा निकष सर्वांना सारखाच लागू झाला पाहिजे. अन्यथा एफसीआरए कायदा न राहता वैचारिक फिल्टर ठरण्याचा धोका निर्माण होतो.

लेखकाने स्वतःची राजकीय आणि संस्थात्मक ओळख नमूद केली आहे. पण म्हणून त्यांचा युक्तिवाद चुकीचा आहे असे म्हणणे अन्यायकारक ठरेल; तरीही लेखातील निवडक उदाहरणे, स्वयंसेवी क्षेत्राचे केलेले चित्रण आणि राज्यसत्तेच्या संभाव्य दुरुपयोगाची चिकित्सा करणे मात्र आवश्यक ठरते. स्वतःच्या वैचारिक छत्राखाली येणाऱ्या संस्थांबाबतही अशीच चिकित्सा आवश्यक ठरते. लोकशाहीची खरी परीक्षा विरोधकांना लावलेल्या निकषात नसते; तीच कसोटी आपल्या समर्थकांना लावण्याच्या प्रामाणिकपणात असते.

म्हणून 'कर नाही त्याला डर कशाला?' हा प्रश्न दिशाभूल करणारा आहे. गैरव्यवहार करणाऱ्या संस्थांना कायद्याचा धाक असलाच पाहिजे; परंतु सामाजिक प्रश्न विचारणाऱ्या, सत्तेला उत्तरदायी धरणाऱ्या आणि वंचितांच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या संस्थांनाही धाक दाखवून गप्प बसवणे ही लोकशाहीची शुद्धी नव्हे, तर तिची कोंडी आहे. परकीय निधीवर नियंत्रण आवश्यक आहे; पण त्याहून अधिक आवश्यक आहे सत्तेच्या नियंत्रणातिरेकावर नियंत्रण. कारण पैसा परदेशातून आला म्हणून लोकशाही धोक्यात येतेच असे नाही; परंतु राज्यसत्ता कोणत्याही वैध प्रश्नाला 'परकीय प्रभाव', कोणत्याही असहमतीला 'राजकीय हेतू' आणि कोणत्याही स्वतंत्र नागरी आवाजाला 'संशयास्पद निधी' असे लेबल लावू लागली, तर धोका तिथेच सुरू होतो. मग एफसीआरए परकीय पैशांपासून राष्ट्राचे संरक्षण करणारा कायदा न राहता, नागरी समाजाच्या स्वायत्ततेची परीक्षा घेणारा कायदा ठरण्याचा धोका आहे. आणि म्हणूनच आज प्रश्न 'एफसीआरएला कोण घाबरते?' हा नसून- 'एफसीआरएच्या नावाखाली राज्यसत्तेला घाबरावे लागू नये, याची हमी कोण देणार?' हा आहे.

## कुतूहल

### मधमाश्या विशिष्ट नृत्य का करतात?

**सगळ्या मधमाश्या** काही सारख्या नसतात. काही मधमाश्या टेहळणी करून नवनवीन ठिकाणची फुलं शोधतात. एखाद्या ठिकाणी अशा फुलांनी डवरलेली झाडं दिसली की, या मधमाश्या त्यातले परागकण आणि मकरंदाचा मनसोक्त आस्वाद घेतात. अन्नकणांची चव आणि गंध त्यांना कळतो. अन्नकणांचा नमुना आपल्याबरोबर घेतात आणि पोळ्याकडे धूम ठोकतात. अन्नपदार्थांचं घबाड कुठे आहे, हे आपल्या भगिनींना, म्हणजे अन्नासाठी भटकणाऱ्या कामकरी मधमाश्या माद्या असतात, म्हणून भगिनी, कधी एकदा सांगू असं त्यांना होऊन जातं! पण सांगणार कसं? अन्नाचं घबाड सापडल्याचा त्यांचा आनंद इतका शिगेला पोहोचतो की या मधमाश्या पोळ्यात येऊन नाच करायला लागतात! या नृत्यबोलीतूनच फुलं कुठं आहेत हे इतर भगिनींना सांगितलं जातं! त्या फुलांतले परागकण आणि मकरंद इतर भगिनींना भरवला जातो.



यातील पहिला नृत्यप्रकार म्हणजे वर्तुळाकार तुरूतुरू चालणं. एका बिंदूपासून ही माशी चालायला सुरुवात करते. एक वर्तुळ पूर्ण करते आणि त्या बिंदूपाशी येते. पुन्हा त्या बिंदूपासून विरुद्ध दिशेने चालत वर्तुळ पूर्ण करते. या प्रकाराची पुनरावृत्ती करते. हा नृत्यप्रकार इतर माश्यांनी बघितल्यावर त्यांना कळतं की, फुलांनी डवरलेली झाडं जवळपासच कुठे तरी ५० ते १०० मीटर अंतरावर आहेत. मात्र या नृत्यातून दिशा कळत नाही. ही माहिती मिळाल्याबरोबर इतर मधमाश्या अन्नासाठी दाही दिशांना उधळतात!

दुसऱ्या नृत्यप्रकाराला 'वॅगल डान्स' म्हणतात. यात मधमाशी पाठीमागचा भाग डावीकडे, उजवीकडे हलवत म्हणजे 'वॅगल' करत सरळ चालते. नंतर डावीकडे वळून लंबअर्धवर्तुळ पूर्ण करून मूळ ठिकाणी येते. पुन्हा सरळ चालते आणि आता उजवीकडे वळून लंबअर्धवर्तुळ पूर्ण करते आणि मूळ ठिकाणी येते. याची आवर्तनं होतात. इंग्रजी आठ आकड्याशी साधर्म्य असल्यासारखा हा नृत्यमार्ग दिसतो. यातून इतर मधमाश्यांना कळतं की ही फुलं दोन किलोमीटरपर्यंत किंवा जास्त अंतरावर आहेत. या नाचातून अन्नाच्या स्रोताची गुणवत्ता आणि किती अन्न उपलब्ध आहे हेही कळतं. मधल्या सरळ रेषेचं अंतर जास्त असेल तर फुलं दूरवर आहेत. शिवाय जितका जास्त वेळ मधमाश्या शरीर हलवतात तितकं अन्न दूर असतं. मधली सरळ रेषा सूर्याकडे तोंड करून असेल तर फुलं त्या दिशेला आहेत. मधली सरळ रेषा सूर्याला काही विशिष्ट कोनात तोंड करून असेल तर फुलं त्या दिशेला आहेत. फुलांची दिशा आणि अंतर कळलं की पोळ्यातील मधमाश्या फुलांवर स्वारी करून त्यातल्या अन्नाची लयलूट करायला सज्ज होतात!

**– बिपीन भालचंद्र देशमाने**
**मराठी विज्ञान परिषद**
**ईमेल :** office@mavipa.org
**संकेतस्थळ :** www.mavipa.org

## व्यक्तिवेध

'**अनुष्टुभ**', '**युगवाणी**' हे अंक महाविद्यालयीन वाचनालयांपासून ते साहित्यप्रेमींच्या घरापर्यंत कुठेही सहज आढळत अशा काळात- १९८० च्या दशकात या दोन्ही अंकांमध्ये श्रीधर अंभोरे यांची चित्रे दिसत. नियतकालिकांमध्ये रेखाटने छापली जाणे आणि ती लक्षवेधी असणे - त्या रेखाटनांमुळे 'वाचका'वर 'प्रेक्षक'पणाचाही संस्कार होणे, हे मराठीत नवे नाही. दीनानाथ दलालांपासून ते बाळ ठाकूर, वसंत सरवटे, प्रभाशंकर कवडी अशा अनेकांनी केवळ रेषेच्या वापराने आणि मराठी नियतकालिकांना येणाऱ्या छपाईच्या मर्यादा पाळून रेखाटने केली! पण या सर्वांची रेखाटने कोणत्या ना कोणत्या प्रकारे शाब्दिक मजकुराशी संबंधित; तर अंभोरे यांची रेखाचित्रे स्वायत्त. ती मजकुराला खुलवण्यासाठी काढलेली नसत. पानपूरक म्हणून, किंवा 'अस्मितादर्श'सारख्या नियतकालिकात एखाद्या मजकुराला साजेशी आहेत म्हणून ती छापली जात. मजकूर वाचून, त्याचा आशय चित्ररूपाने मांडणाऱ्यांपैकी अंभोरे नव्हते; पण तेही एका अर्थाने निराळा मजकूर वाचत होतेच... आजवर बहिष्कृत मानल्या गेलेल्या कष्टकऱ्यांच्या जगण्याचा हा मजकूर होता. माणूस, प्राणीपक्षी आणि झाडे-पाने यांच्यामधल्या दुव्यांची सम्यक जाणीव त्यात होती.



श्रीधर अंभोरे

रेषेतूनच अंभोरे व्यक्त झाले. त्यांना ओळखणारे सांगतात की, ती रेषा बालपणी मातीच्या भिंतीवर कोळशाने उमटू लागली, पुढे बाभळीच्या डहाळीचा बोरू त्यांनी वापरला. हा प्रवास पेनांपर्यंत जाऊनही रेषेची गती, तिची लय शाश्वत राहिली. अंभोरे यांची अनेक रेखाचित्रे एकच रेषा पुढे-पुढे नेणारी, तिची वळणे दाखवणारी आहेत. ती वळणे शोभेसाठी नसून कशाच्यातरी शोधासाठी आहेत, हे प्रेक्षकांनाही जाणवले. कारण प्रेक्षकही अंभोरे यांनी रेषेच्या मनाप्रमाणे (जणू ते मन चित्रकाराचे नसून रेषेचेच) सोडून दिलेल्या भागाचा, एकंदर रेखाचित्राच्या प्रत्ययाचा शोध घेऊ लागतील, अशी ताकद या चित्रांमध्ये होती. अंभोरे आता स्मृतिशेष झाल्याने ती रेषा थांबली. पण यापुढेही त्यांची चित्रे दिसत राहिल्यास तो प्रत्यय पुन्हा येत राहीलच.

तेंडुलकरांनी या चित्रकाराची दीर्घ मुलाखत 'दूरदर्शन'वरून प्रसृत केली, पुलंनी जाहीर कौतुक केले आणि नागराज मंजुळे यांच्यापासूनच्या पिढीने अंभोरे यांचा आदर केला. अ. भा. मराठी नाट्य संमेलनाची कार्यक्रम-पत्रिका 'मान्यवरांच्या फोटोंनी सजवण्या'ऐवजी बॅकस्टेज वर्कर्सची चित्रे त्यांनी केली. त्यांनी बुद्धचित्रांची नवी लयदार शैली रुळवली. दलित जाणिवेच्या कवितेतली स्त्री आणि अंभोरे यांची स्त्रीचित्रे यांत अनेकांना साम्य दिसले. हे सारे, चित्रकार म्हणून स्वतःची स्वायत्तता अंभोरे यांनी टिकवल्यानेच शक्य झाले. त्यांच्या कलेचे मूल्यमापन करताना 'आर्ट ब्रूट' व 'प्रिमिटिव्हिझम' या पाश्चात्त्य कलेतिहासातल्या संकल्पनांचा अधार घेतला जाईल. अनलंकृत कलाकृती त्यांनी केल्या, किंवा भीमबेटकाच्या गुहाचित्रांना ते प्रेरणास्थान मानत हे ठीक; पण तेवढ्याने पाश्चात्त्य संकल्पना पूर्णतः लागू होतीलच असे नाही. त्यासाठी शोषितांच्या कलानिर्मितीची शेदीडशे वर्षांची परंपरा शोधावी लागेल. त्यात युरोपीय ज्यॉं डयूबफे असतील, आफ्रिकी वंशाचे ख्रिस ओफीली असतील आणि श्रीधर अंभोरेही असतील! अंभोरे यांची चित्रे मोठ्या आकाराची नाहीत, त्यामुळे या कला-ठेव्याची जपणूक अणि मूल्यवर्धन करण्याचे आव्हान त्यांच्या जाण्यानंतर वाढणार आहे.

## राजवाडे विचारविश्व

### लांबणीवर पडलेले निजामशाहीचे मरण

**दक्षिणेतील घडामोडींची** दखल घेऊन त्यांचा रोख आपल्या बाजूला वळवून घेण्याच्या इराद्याने शक १५५१च्या अखेरीस खुद्द शहाजहान बऱ्हाणपुरास आला, ही महत्त्वाची माहिती सांगून राजवाड्यांनी नंतर लगेच परिस्थिती त्यामुळे कशी पालटत गेली, ते स्पष्ट केले. त्यांनी लिहिले, 'शहाजहानचा व आदिलशहाचा लोदीला आश्रय न देण्याचा तह ठरला, त्यानुसार आदिलशहाने लोदीला आश्रय देणाऱ्या शहाजीच्या पुणे प्रांतावर मुरार जगदेवास पाठविले. शहाजहानने इकडे आल्याबरोबर पहिली मसलत अशी केली की, शहाजीला लोदी पक्षातून फोडले. दिल्लीपतीशी सामना करण्याची अद्याप आपली ऐपत नाही व शहागडास आपण उभारलेला डोलारा औट घटकाहि टिकणार नाही, हे धूर्त शहाजी जाणून होता. शहाजहानाचे बोलणे मान्य करून शहाजीने लोदीला निरोप दिला आणि स्वतः दिल्लीश्वराचा मनसबदार बनून मिळविलेला प्रांत दाबून बसला. पातशाही मनसबदारी पतकरण्यात शहाजीचा एक हेतू असा होता की, आदिलशाही मुत्सद्द्यांच्या हातून आपणास इजा होऊ नये आणि दुसरा हेतू असा होता की, आपल्या जहागिरीवर निजामशहाने हक्क सांगू नये'...

परंतु त्याने पातशाही पंचहजारी सरदारकी पतकरण्याचा अर्थ हाही झाला की शहाजीच्या ताब्यातील मुलूख मोंगलाईचा अंश झाला. त्यावर राजवाड्यांनी लिहिले, 'लढाई केल्यावाचून फुकटाफाकट निजामशाहीचा प्रांत मिळाला व (शहाजीसारखा) एक उपद्व्यापी लढवय्या गप्प बसविता आला, अशी फुशारकी शहाजहानाला वाटली. पुढेमागे इष्ट वाटेल तेव्हा हा तह मोडता येईल, असा मनोदय शहाजी व शहाजहान या दोघांचाहि होता. तह झाल्यावर आदिलशाही मुत्सद्दी शहाजीच्या वाटेस गेले नाहीत. मुरारपंताने आपला मोर्चा शहाजीऐवजी निजामशाहीच्या कोकणप्रांताकडे वळविला आणि शहाजी संगमनेरादि प्रांत दाबून बसला. तिकडे शहाजहानाने धारूरपर्यंतचा निजामशाही प्रांत आक्रमिण्याचा विचार केला. महामूर्ख मूर्तिजाच्या अंगाचे तिन्ही बाजूंनी तीन हिंस्र श्वापदांनी तीन लचके तोडण्याची तयारी केली...'

'दुबळ्या मूर्तिजाच्या बोकांडीस ही मनुष्यकृत हानि शक १५५१च्या अखेरीस बसल्यानंतर शक १५५२मध्ये दैवी हानीने त्याला पालथे पाडले', अशा शब्दांत निजामशहाच्या त्रेधातिरपिटीचे वर्णन करून राजवाड्यांनी पुढे रेखाटलेले चित्र विलक्षण होते. त्यांनी लिहिले, 'शक १५५२मध्ये गोदातीरी अवर्षणाने भयंकर दुष्काळ पडला. एका हुनक्यास (लहान होनास) दोन शेर दाणे झाले. करवसुली शक्य नसल्यामुळे मूर्तिजाची खंगावलेली तिजोरी शुष्क होऊन गेली. फौज परागंदा, कारभारी अजुर्दा (उदासीन, दुःखीकष्टी) व मुलूख उकीर्डा बनून, मूर्तिजा हलाखीच्या शेवटच्या पायरीस पोहोचला...'

परंतु तो भयानक दुष्काळ निजामशाहीच्या दृष्टीने इष्टापत्तीच ठरली. कशी ते स्पष्ट करताना राजवाड्यांनी लिहिले, 'शक १५५२साली मूर्तिजाच्या तिन्ही शत्रूंच्या हालचाली काही काळ स्तब्ध राहिल्या. पंचमहाभूतांच्या प्रकोपापुढे शत्रुमित्र साऱ्यांच्याच नाड्या आखडल्या. शहाजहानाचे साल दक्षिणेत फुकट गेले. आदिलशाही मुत्सद्दी निजामशाही मरू द्यावी की तरू द्यावी, हा विचार करीत बसले. शहाजी दुष्काळानंतरच्या बनावाला तोंड देण्याकरिता आपले हत्यार पाजवीत राहिला आणि तिघांचा भक्ष्य जो मूर्तिजा तो दैवी, मानवी संकटांतून पार पडण्याचा मार्ग शोधू लागला... निजामशाहीची ही अशी हलाखी झालेली पाहून शहाजी व आदिलशाहीतले मुत्सद्दी यांनाच दया आली. शिवाय निजामशाही बुडाली असता आपल्या व मोंगलांच्या मधील पाचर नाहीशी होईल, मोंगलांशी प्रत्यक्ष रणांगणावर गाठ पडणे बरे नव्हे, हे आदिलशाही मुत्सद्दी जाणून होते. म्हणून त्यांनी मूर्तिजाशी तह केला...'

त्या तहातील तरतुदी कोणत्या होत्या, याचा तपशील देत राजवाड्यांनी पुढे लिहिले की, 'मुरारपंताने गेल्या दोनचार महिन्यांत जिंकिले होते, ते प्रांत निजामशहाने आदिलशहास द्यावेत, शहाजीने जिंकलेला प्रांत शहाजीकडेच ठेवावा, आदिलशहाने निजामशहास मोंगलांविरुद्ध मदत करावी, मलिकंबरच्या पुत्राला-फत्तेखानाला-बंधमुक्त करू नये वगैरे करारमदार ह्या तहात ठेवले व निजामशाहीचे मरण किंचित लांबणीवर ढकलले गेले...'

**– आनंद हर्डीकर**
anand47.hardikar@gmail.com

# जंतर मंतर नंतर...

## झारखंड असो वा महाराष्ट्र वा कर्नाटक वा अन्य कोणते राज्य. सगळीकडेच सर्वांनाच सरकारी नोकऱ्या हव्यात. त्यासाठी तर झारखंडी तरुणांनी थेट विधानसभेस धडक दिली...

**झारखंडमध्ये सुरू** असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने एक बाब स्पष्ट झाली. विद्यार्थ्यांच्या आंदोलनास पुरेशी प्रसिद्धी द्यावयाची असते याची जाणीव इलेक्ट्रॉनिक माध्यमांस झाली. भले त्यामागे त्या राज्यात काँग्रेसप्रणीत सरकार आहे हे कारण असेलही. पण त्यामुळे झारखंडी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे जनतेचे लवकर लक्ष वेधले गेले आणि राजधानी दिल्लीत जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांना प्रतीक्षा करावी लागली नाही. भाजपेतर पक्षांचे, विरोधकांचे सरकार असल्याचा हा एक फायदा. माध्यमे लवकर दखल घेतात आणि समाजमाध्यमी काकांची अभिव्यक्ती जागी होते. तेव्हा जे झाले ते उत्तम झाले. विद्यार्थ्यांचे दिल्लीतील आंदोलन हे माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी होते. झारखंडी विद्यार्थी 'झारखंड मुक्ती मोर्चा'च्या माध्यमातून सरकारविरोधात रस्त्यावर उतरलेले आहेत. विद्यार्थी हा दोन्ही आंदोलनांतील समान घटक. दिल्लीत आंदोलन करणाऱ्यांचा भाजपच्या शिक्षणमंत्र्यांवर राग होता तर झारखंडी विद्यार्थ्यांचा संताप मुख्यमंत्री हेमंत सोरेन सरकारविरोधात आहे. म्हणजे भाजप काय वा घराणेशाहीवाला 'झामुमो' काय; विद्यार्थ्यांसाठी दोघेही एकसारखेच. यातील झारखंडी सरकारला दुसरा 'घराणेदार' पक्ष काँग्रेसचा पाठिंबा आहे. दिल्लीतील आंदोलनामुळे काँग्रेस आनंदली होती तर झारखंडी गोंधळामुळे भाजपीय नेत्यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्याची लकेर दिसते. आपल्याकडे राजकीय पक्षांचा प्रयत्न आहे तो आपल्यापेक्षा अन्य कोणी गुणवान नाही हे सिद्ध करण्याचा. त्यामुळे आपल्याइतकेच वा अधिक कोणी गचाळ निघाल्यास त्यांचा आनंद मिळेल तेथून ओसंडून वाहतो. या आनंदाची योग्य तितकी दखल घेतल्यानंतर आता झारखंडी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाविषयी.

त्यामागील मुख्य कारण आहे ते स्थानिक राज्य सेवा आयोगाची परीक्षा. 'झारखंड पब्लिक सर्व्हिस कमिशन'ने राज्यस्तरीय सेवा भरतीसाठी आयोजित केलेल्या परीक्षेत घोटाळा झाल्याचा विद्यार्थ्यांचा वहीम आहे. घोटाळा म्हणजे काही अपात्रांची भरतीसाठी निवड झाली आणि त्यामुळे योग्य व्यक्ती डावलल्या गेल्या असे विद्यार्थ्यांस वाटते. त्याबाबतचा तपशील समाजमाध्यमांत वितरित झाला आणि विद्यार्थ्यांच्या समजावर शिक्कामोर्तब झाले. या परीक्षांचा निकाल बनावट असल्याची विद्यार्थ्यांची खात्री पटली. त्यामुळे त्यांची मागणी आहे ही परीक्षा रद्द करण्याची आणि त्यानिमित्ताने या सेवा आयोगाच्या भरती प्रक्रियेच्या पुनर्रचनेची. त्यासाठी ते गेले जवळपास तीन आठवडे आंदोलन करत असून सोमवारी आपल्या मागणीच्या पुष्ट्यर्थ त्यांनी थेट विधानसभेत धडक दिली. त्यामुळे त्यांना रोखण्यासाठी पोलिसांस अश्रुधूर, लाठीमार इत्यादी मार्गांचा अवलंब करावा लागला. राहुल गांधी ते भाजपविरोधी भूमिका सातत्याने घेणारे दक्षिणेतील अभिनेते प्रकाश राज अशा अनेकांनी पोलिसांचा निषेध केला आणि 'कॉक्रोच जनता पार्टी'पासून अनेकांनी विद्यार्थ्यांस पाठिंबा जाहीर केला. या संदर्भात घेतल्या गेलेल्या परीक्षा सरकारच्या आश्वासनानुसार रद्द होऊन या सगळ्या प्रकाराची चौकशी होऊन किती दोषींस शासन होते ते यथावकाश कळेलच. पण तोपर्यंत या सर्वांचे मूळ काय या प्रश्नास भिडणे गरजेचे.

रोजगार संधींचा तीव्र अभाव हे यामागील मूळ कारण. जंतर-मंतरवरील आंदोलन हे प्रश्नपत्रिका फुटीविरोधात होते तर झारखंडी विद्यार्थी हे प्रामाणिकांच्या रोजगारावर गदा आली म्हणून निदर्शने करीत आहेत. ही रोजगार संधी सरकारांत आहे. झारखंड असो वा महाराष्ट्र वा कर्नाटक वा अन्य कोणते राज्य. सगळीकडेच सर्वांनाच सरकारी नोकऱ्या हव्या आहेत. याच मुद्द्यावर काही महिन्यांपूर्वी कर्नाटकात आंदोलन झाले आणि आता ते झारखंडात होते आहे. असे होते याचे कारण खासगी क्षेत्रात नोकऱ्यांचा असलेला खडखडाट. पंतप्रधानांपासून अनेकांनी या संदर्भात खासगी उद्योजकांस आवाहन, विनवण्या, मनधरण्या करून झाल्या. ते काही आपल्या तिजोऱ्या उघडायला तयार नाहीत आणि मनुष्यबळासाठी नवी गुंतवणूक काही त्यांच्याकडून होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी क्षेत्रात आवश्यक संधीच आपल्या देशात नाहीत. त्यात 'कृत्रिम प्रज्ञा' (आर्टिफिशल इंटलिजन्स) सारख्या तंत्रज्ञानामुळे आहेत त्या नोकऱ्या राहतात की जातात अशी परिस्थिती. त्यामुळे सरकारी नोकऱ्या हेच काय ते आशास्थान रोजगार इच्छुकांस उरते. ही परिस्थिती अगदी महाराष्ट्रासारख्या विकसित राज्यातही आढळते. या प्रगत राज्यातील काही जिल्ह्यांत सरकारखेरीज रोजगार देणारे अन्य कोणी नाही. अशा वेळी तरुणांच्या हातास काम देणार कोण? 'नोकरी मागणारे नको, नोकरी देणारे व्हा' असा पोपटपंची सल्ला देणे सोपे. पण उद्योजक होणे आपल्यासारख्या देशात इतके सोपे असते तर या इतक्या कंटाळवाण्या नोकऱ्यांसाठी इतके तरुण जीव टाकते ना! आणि ही तरुणांची संख्याही किती विशाल! आजमितीस आपल्याकडे वर्षाला ५० लाखांहून अधिक शिक्षिताची पैदास बाजारात येते. त्यापैकी ४० टक्क्यांस त्यांच्या वयाची पंचविशी आली तरी रोजगार मिळत नाहीत. त्यातील निम्म्यांच्या हातास पुढील काही वर्षांत काम मिळते खरे. पण ते अगदीच जुजबी. त्यावर आयुष्य काढणे कठीण. अशा वेळी सरकारी नोकऱ्या हाच पर्याय राहतो. परिस्थिती इतकी भीषण की एकेका पदासाठी अक्षरशः हजारोंनी अर्ज येतात.

**...रेवड्यांपेक्षा तरुणांस नोकऱ्या देणे अधिक महत्त्वाचे आणि राजकीयदृष्ट्या फायद्याचे, याची जाणीव तरुण वर्गास होत असल्याचे दिसते. ती कायम राहिली तरच खऱ्या विकासाची कास धरली जाईल...**

तथापि यात मेख अशी की सरकारांत नोकऱ्या नाहीत असे नाही. आपल्या देशात विविध सरकारांतील मिळून तब्बल ६० लाख पदे रिक्त आहेत. त्यातील जवळपास १० लाख नोकऱ्या या केंद्र सरकारी सेवेतील आहेत. म्हणजे सरकार या जागा भरण्याच्या मनःस्थितीत आणि आर्थिक स्थितीत नाही. सरकारांत एकही जागा रिकामी नाही असे चित्र असते तर सरकारी रोजगाराचे समर्थन करता आले नसते. सरकार किती नोकऱ्या देणार, नोकऱ्या देणे ही सरकारची जबाबदारी नाही; तर उद्योग, व्यापारउदीम वाढीस लागेल अशी धोरणे आखणे आणि त्यास गती देणे ही प्रायः सरकारी जबाबदारी हे तत्त्वही येथे मान्य करता आले असते. पण वास्तव असे की सरकारी सेवेत लाखोंनी पदे रिक्त असतानाही ती भरली जाताना दिसत नाहीत. राज्याराज्यांची, केंद्र सरकारची खंक आर्थिक स्थिती हे यामागील महत्त्वाचे कारण. ही पदे भरण्यासाठी, भरल्यानंतर त्या सर्वांस वेतन/ भत्ते/ निवृत्तिवेतनादी सुविधा देण्याइतकी सरकारची परिस्थितीच नाही. या उप्पर कोणालाही प्रश्न पडेल तो सरकारच्या परिस्थितीबाबत. एका बाजूने आपण चौथ्या वा तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होत असल्याच्या गमजा मारल्या जात असताना, वस्तू व सेवा करातून गडगंज कमाईच्या सुवार्ता सांगितल्या जात असताना सरकारी तिजोरीत इतका खडखडाट कसा असा हा प्रश्न.

विविध कथित कल्याणकारी योजनांवर सुरू असलेला दौलतजादा हे या प्रश्नाचे उत्तर. राज्यातील लाडक्या बहिणींपासून देशातील ८२ कोटी गरिबांस मोफत किराणा पुरवण्यापर्यंत अनेक कल्याणकारी योजनांवर सरकारला खर्च करावा लागत असल्याने पदभरती आणि व्यापक हिताच्या योजनांवर खर्च करण्यासाठी सरकारच्या हाती फारसे काही उरतच नाही. पदे सरकारी वैद्यकीय सेवेतील असोत की शिक्षकांची! या पदांपेक्षा निवडणुका जिंकण्यासाठीचा दौलतजादा अधिक महत्त्वाचा. या रेवड्यांपेक्षा तरुणांस नोकऱ्या देणे अधिक महत्त्वाचे आणि राजकीयदृष्ट्या फायद्याचे हे जोपर्यंत सप्रमाण सिद्ध होत नाही तोपर्यंत हा दौलतजादा असाच होत राहील.

याची जाणीव जंतर-मंतर आणि आता झारखंड येथील आंदोलनांतून विद्यार्थी, तरुण वर्गास होत असल्याचे दिसते. ती कायम राहिली तरच खऱ्या विकासाची कास धरली जाईल. म्हणून जंतर मंतर नंतर काय होते ते अधिक महत्त्वाचे.

---

# 'देशद्रोही मानू नका' म्हणायची वेळ का आली?

लेख

ॲड. राजा देसाई
rajadesai13@yahoo.com

**सरसंघचालक मोहन भागवत यांनी जंतर-मंतरवरील आंदोलक तरुणांच्या तक्रारी खऱ्या असल्याचे सांगत त्यांना 'देशविरोधी' न मानता त्यांच्याशी संवाद साधण्याचे आवाहन केले. पण आंदोलनाच्या सुरुवातीपासून त्यांना देशद्रोही ठरवण्याची भाषा कोणी केली, आणि आता संवादाची भाषा का केली जात आहे?**

"**आंदोलक तरुणांच्या** तक्रारी खऱ्या आहेत, ते प्रश्नांची उत्तरे मागत आहेत. त्यांना 'देशविरोधी' न मानता संवाद साधायला हवा'' एका संघ-संस्थेच्या कार्यक्रमात सरसंघचालक भागवत यांचे हे आवाहन. त्याला संदर्भ अर्थातच 'जंतर-मंतर'वरील 'कॉक्रोच' आंदोलनाचा आहे.

सत्ताकारणी साठमारीपासून दूर असलेल्या आम्हा सामान्यांच्या मनात आलेला एक साधा प्रश्न : 'त्यांना देशद्रोही मानू नका' असं सांगायची वेळ स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच का आली? कोणी आणली? त्या तरुणांना आंदोलनाच्या पहिल्या क्षणापासून 'देशद्रोही' कोणी म्हटलं? आंदोलनाला 'फॉरिन फंडिंग' आहे असा आरोप करून त्याच्या चौकशीची मागणी कोणी केली? केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा मागणाऱ्या आंदोलकांना देशद्रोही कोण म्हणेल? संघसत्तेचे विरोधक की समर्थक? थोडक्यात, वरील आवाहन हे 'सबका साथ'सारखंच ठरतं!

समाजात कोणतीही ओळख नसलेले व कोणतीही संघटना नसलेले चार तरुण एकत्र येतात व त्यांना लाखोंचा उस्फूर्त पाठिंबा मिळतोय हे नक्कीच आश्चर्य वाटण्याजोगे, समाजमन खदखदत असल्याचा यापेक्षा मोठा पुरावा नाही. संसद मोर्चानंतर हे लक्षात आल्यावर सदैव 'व्होट-कॉन्शस' असलेल्या दिल्लीतील सत्ताधीशांना जाग आली. तोपर्यंत आपल्या 'सत्ता-बंधूं'साठी कवच म्हणून का होईना पण 'त्यांना समजून घ्या, संवाद साधा, राष्ट्रविरोधी म्हणू नका' ही भाषा तेव्हा कोणा संघ-वरिष्ठांनी केली होती का? मग आताच हे आवाहन का? समाजमानसात व तरुणाईत आपली/ सत्ताधाऱ्यांची प्रतिमा सुधारण्याच्या गरजेपोटी तर नव्हे?

असो, मात्र एवढंही नशीब ना 'मणिपूर'चं होतं, ना राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय पदकं मिळवणाऱ्या व लैंगिक शोषणाविरुद्ध दिल्लीच्या रस्त्यावर दोनतीन महिने धरणं धरणाऱ्या महिला खेळाडूंचं. का? कारण त्यांचा सत्तेला धोका दिसत नव्हता हे तर नव्हे? नाही तर आपल्या सत्ताधारी बंधूंची राजकीय गणितं व अहंकार सोडा पण 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' हे सांगणारी भारतीय संस्कृती कोणा संघ-वरिष्ठांनाही त्या वेळी आठवल्याचं स्मरत नाही! उलट न्यायालयात बलात्कार-गुन्हेगार ठरलेल्या तुरुंगातील 'गुरू'लाही राजकीय गणितांपोटी कायम जणू जामिनासारखे एकापाठोपाठ एक असे कितीही पॅरोल मिळत आहेत? अयोध्येत मंदिरपूर्तीपूर्वीच प्राणप्रतिष्ठेला ठाम विरोध करणाऱ्या शंकराचार्यांवर 'पॉक्सो'खाली योगींच्या राज्यात केस दाखल झाली आहे (खरंखोटं न्यायालय ठरवेल) पण हेच विरोधी राज्यात घडतं तर 'सनातन धर्माचा अवमान' म्हणून आगडोंब उसळवला गेला असता की नाही? काही काळापूर्वी काँग्रेसशासित कर्नाटकात मठाधिपतींविरोधात काही एफआयआर दाखल करून सरकारनं सनातन धर्माचा अवमान केला अशी टीका करून भाजपने आंदोलनाचा इशारा दिला होता! आम्हा सामान्य धार्मिकांसाठी प्रश्न आहे तो धर्माला सत्ताकारणासाठी जुंपलं की धर्माचं काय होतं हा! इतर धर्मांचे इतिहास याला साक्षी आहेत. भारताला मात्र हा अनुभव नवा आहे, पण 'व्होट-सेक्युलॅरिझम'च्या प्रभावातून मुक्त होतानाच उन्मादी 'व्होट-धर्मा'चेही गंभीर परिणाम भोगून झाल्याशिवाय आपल्याला हे कळणार नाही. त्यासाठी काही काळ जावा लागणार!

राज्य कोणाचंही असो. कोणाकडेही ज्यांची उत्तरं नाहीत, असे अनेक प्रश्न आहेत; अगदी जगभर. पण ओठांवर सतत संविधानाची भाषा करताना सत्तेचा उपयोग साम दाम दंड भेद वापरून विरोधी विचार दडपणारा उलटा व्यवहार सार्वजनिक जीवनातली नैतिकता संपवतो. नैतिकतेविना धर्म जगेल? भाषा ती नसते पण 'कॉक्रोच'सारखे उत्स्फूर्त उद्रेक हा त्या नैतिकतेचा आक्रोश असतो. आणि लोकशाही युगात तर सत्ताकारण ही अनैतिकतेची गंगोत्रीच झाली आहे. लोकशाहीतील 'राजा'ही, 'कालस्य कारणं' ठरतोच!

उच्चतम नेतृत्वाच्या सांस्कृतिक उंचीवर बरंच काही अवलंबून असतं. विरोधकांची कल्याणकारी योजना ती 'रेवडी' म्हणणाऱ्यांना त्यांच्याच 'लाडक्या बहिणी' गप्प बसवतात! पेपरफुटी असो की बलात्काराची घटना... मेणबत्ती मोर्चे काढायचे की नाही हे, कोणाच्या राज्यात ते घडलं यावर ठरणं... वा पूल कोणाच्या राज्यात कोसळला यावर ती घटना 'ॲक्ट ऑफ गॉड' की 'ॲक्ट ऑफ फ्रॉड' ठरवणारी देशाच्या उच्च नेतृत्वाची भाषा. कोणत्या 'सनातन धर्म-संस्कृती-संवर्धना'चा संदेश देशाला यातून जातो? उलट अशा व्यापारी वातावरणात मुख्यतः निष्ठा ही बाजार-वस्तू बनते व नैतिकतेला अब्रू झाकायला वस्त्र मिळणं कठीण होतं. त्यावरही 'व्होट'-मुद्रा उमटली की समाजाची घुसमट अधिकच होते. अशा वेळी समाजालाही आत्मपरीक्षण करायला सांगणारं कोणी उरत नाही ही स्थिती अधिक दुर्दैवी आहे. अशा अनैतिकतेचा संबंध राजकारणापेक्षा संस्कृतीशीच अधिक असतानाही 'आम्ही केवळ सांस्कृतिक' म्हणणाऱ्यांच्या खुद्द सत्ताधारी स्वयंसेवकांचं तरी राजकारण संस्कृती संवर्धन करणारं आहे का? 'कॉक्रोच'सारख्या निमित्तानं सर्वच पक्षांसहित एकंदरीतच राजकीय व्यवस्थेविषयीची अविश्वसनीयता सिद्ध होते.

कोणत्याही सेवेचीही स्पर्धात्मक करिअर झाली की ही अनैतिकता अटळ. सत्तेचं समाजजीवनात स्थान, विशेषतः आधुनिक काळात, नक्कीच अत्यंत महत्त्वाचं आहे, पण सत्तेद्वारे मौलिक समाजपरिवर्तनाचं काय होतं हे विसाव्या शतकानं उत्तम शिकवलं आहे. तसेच उच्च नेतृत्वच अनुदार असेल तर घटना/कायदा यांचा दुरुपयोग करून लोकशाहीचं काय होतं हेही भारत/अमेरिकेसहित जगभर आपण पाहिलं आहे, पाहत आहोत.

असो, मागे जाऊ. राष्ट्रद्रोह हा शब्दप्रयोग या देशात मुख्यतः 'संघसत्ता मजबूत झाल्यावर अधिकाधिक होऊ लागला. अगदी राष्ट्रीय संरक्षण विषयाचाही द्वेष पसरवण्यासाठी उपयोग. प्रत्यक्ष सैनिकी सूत्र काहीही बोलत नाहीत तरीही! 'बालाकोट हल्ल्यात शेकडो दहशतवादी ठार असं आम्ही म्हणू' पण आधार काय विचाराल तर विरोधक राष्ट्रद्रोही! हे आता रोजचं झालंय.

आता तर जोडीला 'सनातन धर्माचा अपमान' हे शब्द राष्ट्रद्रोहाचे समानार्थी व परवलीचे झाले आहेत. हा अपमान त्यांना आजकाल उठताबसता जळीस्थळी काष्ठीपाषाणी दिसत असतो. राजकीय/सामाजिक टीकेच्या विचारांसाठीही रोज फौजदारी/बदनामी खटले, मग लागोलाग देशभरात ठिकठिकाणी पोलिसांनी निमूटपणे एफआयआर दाखल करून पकडणं वा न्यायालयांनी निमूटपणे आरोपींना समन्स काढणं हे आलंच! हे अगदी सत्ताविरोधी व्हॉट्सॲप मेसेज फक्त पुढे पाठवण्याबाबतही! केसेसचं शेवटी काहीही होवो, पण वर्षानुवर्षं न्याय-प्रक्रियेत सोलून निघण्याची भयंकर शिक्षा तर मिळतेच; शिवाय सामान्यांसहित असंख्यांना जरब! संपूर्ण राजकीय/सामाजिक वातावरणच (रामराज्यात) राम-प्रेमाऐवजी द्वेष-धर्मानं ओतू जात आहे. हे कोणतं संस्कृती-संवर्धन? हा प्रश्न सत्ताकारणाचा नव्हे; समाजस्वास्थ्याचा, राष्ट्रीय ऐक्याचा व हिंदू संस्कृतीचा आहे.

असो. वरील काळजीला आधारभूत म्हणून ताजी पूर्वपीठिका त्यात जीव नसतानाही नाइलाजाने द्यावी लागली. उदाहरणांत गेलं की त्यावर पक्षपातीपणाचे ठप्पे बसतात व म्हणून ते टाळावं तर उरणाऱ्या गोडगोड गोष्टींनी सारेच माना डोलावतात; मात्र मग मानवी सृजनशीलता कुजणारं एक चैतन्यहीन डबकं बनतं (हेच झालं अख्ख्या निधर्मी-विश्वाचं!). शुद्ध द्वेषरहित भावानं पुढे जावं हा मार्ग उरतो.

राष्ट्रीय ऐक्याचा एक मंत्र आपल्या हृदयात आपण सदैव जागृत ठेवला पाहिजे. असामान्य विविधता असूनही एक असलेल्या भारतीय ऐक्याचा आधार हा रूढार्थानं धर्म नव्हे. तो आहे मनुष्य जीवनाबरोबरच हे विश्व काय आहे, या प्रश्नाच्या 'सनातन' या उत्तरात. प्रश्न पडतो : काही हजार वर्षांच्या संस्कारांवर मात करून राजकीय हिंदुत्व हिंदूंचा डीएनए बदलू शकेल का? कोणता?

'सर्वं खल्विदं ब्रह्म'! केवळ सारे धर्म आणि मानवच नव्हे तर जडासहित सारी सृष्टीच एका चैतन्यमय अविनाशी (म्हणून सनातन) तत्त्वानं व्यापलेली आहे व म्हणून तिचा कणन् कण जणू नैसर्गिकरीत्या (ऑर्गेनिकली) एक आहे, हा तो हिंदू डीएनए. विश्वात अशी वस्तू नाही की जी सनातनच्या पोटात नाही; केवळ सद्गुणच नव्हे तर दुर्गुणही! इथे सैतानही वेगळा नाही! साऱ्या अस्तित्वाला व्यापून असलेल्या सनातनाबाहेर राहूच काय शकणार? मग द्वेष कुणाचा? अन्यायाविरुद्ध परिस्थितीनुरूप स्वभावजनित युद्धकर्मही कर्तव्य असेल पण युद्धातही 'मा मनुस्मर युध्य च' हा मार्गदर्शक ध्रुव तारा : ईश्वर-स्मरणातील कर्म द्वेषरहित होतं!

भारताचा हा उद्घोष हा केवळ बुद्धीजनित विचार नव्हे तर ती आमच्या पूर्वजांची अनुभूती आहे असं म्हटलं जातं; म्हणजे? आम्हा पामरांस ठाऊक नाही. उद्या विज्ञान यावर अंतिम निर्णय देईल. असो, वरील भारतीय विचारात निरीश्वरवादीही आपापल्या मार्गानं मुक्तीला पोहोचू शकतो. हा अत्यंत उदार हिंदू विचार आहे. या 'सनातना'ला राष्ट्र, रूढ (अस्मिता) धर्म इत्यादी लेबलांत कोंडल्यानं आमचं स्वत्व परिणामतः राष्ट्रैक्यही कमकुवत होईल. काळानुरूप भौतिक विकास संरक्षण-सिद्धता इ. गोष्टी हव्यातच, पण त्या समाजाचं शरीर! आत्म्याशिवाय शरीर ते काय? प्रत्यक्षात उतरण्यासाठी, त्याच त्याच न म्हणता, जीवन-मार्गदर्शक चांगल्या गोष्टींचा रामनामासारखाच पुन्हा पुन्हा जप करावा लागतो : 'भारत या ऐक्यधर्माला पकडून राहील तर त्याच्या नखालाही धक्का लागणार नाही, तो या ऐक्यधर्माला सोडेल तर त्याला कोणीही (ईश्वरही) त्याला वाचवू शकणार नाही!' -स्वामी विवेकानंद. या भूमीचं भाग्य थोर की आकाशाएवढी विशाल जीवनदृष्टी आपल्याला लाभली आहे. तीही कशी? 'धर्म विज्ञानाला सामोरा जायला तयार नसेल तर त्याच्या लवकरात लवकर मरणातच मानवाचं कल्याण आहे' (विवेकानंद) असंही म्हणण्याचं धाडस असलेली.

हे सारं पेलण्याचा प्रश्न जरूर उरतो; पण हा प्रश्न सर्वच धर्मी/निधर्मींच्या ध्येयांबाबत सदैव राहिला आहे. उत्तर साधं आहे. 'योग्य ध्येय असलेला माणूस जीवनात शंभर चुका करील तर तेच चुकीचं असलेला दहा हजार!' -स्वामी विवेकानंद... हाच नियम राष्ट्रालाही लागू!

---

अन्वयार्थ

## सर्पदंश नव्हे, भ्रष्टदंश!

**सगळीकडे आदिवासी** दिनाची धामधूम सुरू असताना राज्यात गडचिरोली जिल्ह्यात मात्र आदिवासी अनुदानित आश्रमशाळेत तीन मुली सर्पदंशाने मरण पावतात आणि तीन मुलींचे प्रकृतीस्वास्थ्य गंभीर होते, हे संतापजनक आहे. ही घटना धानोरा या तालुका मुख्यालयापासून दहा किलोमीटरवर जपतलाई येथील कुप्पा लिंगो शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन शाळा तथा अनुदानित आश्रमशाळेतील. पुरेसे पलंग उपलब्ध नसल्यामुळे जमिनीवर गाद्या टाकून झोपणाऱ्या या आश्रमशाळेतील मुलींना जीव गमवावा लागणे हे शिक्षण व्यवस्था किती निगरगट्ट आहे, याचे द्योतक.

याचे कारण आदिवासी विकास खात्यांतर्गत राज्यात एकूण एक हजार ५६ आश्रमशाळा आहेत. त्यातल्या ४९७ शासकीय तर ५५६ अनुदानित. यावर दरवर्षी साडेपाच हजार कोटी रुपये खर्च होतात. हे हजारो कोटी रुपये खर्च होतात तरी कुठे? तर बहुतांश अनुदानित शाळा राजकीय नेत्यांच्या. त्यातले ९० टक्के आदिवासींचे तारणहार म्हणून ओखळले जाणारे व याच जमातीतून येणारे. यातील बहुतेकांना केवळ शिक्षणाच्या या धंद्यातून नफा कमवायचा आहे. साऱ्यांची भाषणे मात्र आम्हीच समाजाचे उद्धारकर्ते असे सांगणारी. गडचिरोलीत जिथे हा प्रकार घडला ती काँग्रेसचे दीर्घकाळ आमदार व खासदार राहिलेले मारोतराव कोवासे यांच्या संस्थेची शाळा. सरकारकडून दरवर्षी लाखोचे अनुदान लाटून या संस्थेला विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी साधे पलंग देता येत नसेल तर यांची आजवरची तोंडपाटीलकी कोणत्या कामाची? अगदी अलीकडेच मेळघाटातील एका शाळेत विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाली. काही महिन्यांपूर्वी गडचिरोलीतील लाहेरीच्या शाळेत असाच प्रकार घडला. २०२४ मध्ये पालघरलाही! एकूणच या शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या हजारो आदिवासी मुलांचे जीवन असुरक्षित. या वास्तवाची मुख्यमंत्र्यांपासून साऱ्यांना कल्पना. या शाळा प्रामुख्याने दुर्गम भागात. तिथे नेमके काय चालले आहे याची साधी पाहणीही वर्षानुवर्षे होत नाही. त्यामुळे गैरव्यवस्थेवरून कुणाला जबाबदार धरण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

राज्यातील ८० टक्के अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांची वर्गखोली व झोपण्याची खोली एकच आहे. ६० टक्के शाळांमध्ये २४ तास वीज नाही. २५ टक्के शाळांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी नाही. ७० टक्के शाळांना कुंपणभिंत नाही. १४ टक्के शाळांमध्ये स्वच्छतेचा मागमूसही नाही. ८२ टक्के शाळांमध्ये शिक्षणासाठी आवश्यक साधने व उपकरणे नाहीत. ८० टक्के शाळांमध्ये झोपण्यासाठी पलंग नाहीत. हे वास्तव आहे २०१७ मध्ये प्राइस वॉटरहाऊस कूपर या जगविख्यात संस्थेने (पीडब्ल्यूसी) केलेल्या पाहणीतले. हा अहवाल येऊन नऊ वर्षे होत आली. या काळात यावर आधारित एकही उपाययोजना अमलात आली नाही. सरकारच इतके उदासीन असेल आणखी काय होणार?

आजवर या जिल्ह्याच्या दुर्गम भागात न फिरण्यासाठी प्रशासनाकडे नक्षलींचा बहाणा होता. आता तेही संपले. तरीही परिस्थिती बदलत नसेल तर मग प्रशासनाचे नेमके उत्तरदायित्व काय? असे काही घडले की दोन चार अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निलंबन, संस्थेवर कारवाई करून राज्यकर्ते हात झटकून मोकळे होतात. मग व्यवस्थेत सुधारणेचे काय? आदिवासींच्या मुलांनी जंगलातच शिक्षण घ्यावे ही संकल्पना देशातील अनेक राज्यांनी कधीचीच त्यागली. छत्तीसगड, ओडिशाने आश्रमशाळा जंगलातून महामार्ग तसेच मुख्य रस्त्यावर आणल्या. उद्देश हाच की त्यावर सहज लक्ष ठेवता यावे. या मुलांनाही नागरी जीवनाची ओळख व्हावी. सनदी अधिकारी उत्तम खोब्रागडे या खात्यात असताना त्यांनी हाच विचार उचलून धरला पण त्याची अंमलबजावणीच झाली नाही. कशी होणार? कुठलीही देखरेख नसलेल्या दुर्गम भागात या शाळा असणे संस्थाचालक, प्रकल्प अधिकारी यांच्या फायद्याचेच. यामुळे अनुदानातला मलिदा सहज लाटता येतो. इतकी निर्लज्ज व्यवस्था असल्यावर अशा पद्धतीचे बळी जाणार नाहीत तर आणखी काय होणार? ही घटना घडल्यावर गडचिरोलीचे पालकमंत्री असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या निर्देशावरून सहपालकमंत्री आशीष जयस्वाल शाळेला भेट द्यायला गेले व म्हणाले, 'आता या शाळांसाठी मानक कार्यपद्धती लागू करणार.' पण ती आधीपासून अस्तित्वात आहे हे त्यांना कोण सांगणार? नक्षलमुक्तीनंतर सध्या गडचिरोलीत उद्योग व जमीन अधिग्रहणातच सारे व्यस्त. त्यांच्या या व्यस्ततेत बाधा निर्माण करण्याचे काम या घटनेने केले पण पुढे काय हा प्रश्न आजही अनुत्तरित.

शिक्षण क्षेत्रातील दुरवस्थेबाबत दिल्लीपासून गल्लीपर्यंत गदारोळ सुरू असताना शालेय पातळीवरही हीच परिस्थिती कशी आहे, हे अधोरेखित करणारे हे जळजळीत वास्तव कधी तरी बदलेल का?

---

# गोबरधन योजनेमुळे वाहनांमध्ये 'सीएनजी' ऐवजी 'सीबीजी'?

विश्लेषण

दत्ता जाधव
dattatray.jadhav@expressindia.com

**केंद्र सरकारने 'गोबरधन' योजनेतून 'बायो-सीएनजी'च्या प्रसारासाठी २३,७३१ कोटी रुपयांना मंजुरी दिली आहे. 'स्वच्छ भारत मिशन'चा भाग म्हणून २०१८ पासून सुरू असलेली ही योजना आता पेट्रोलियम व नैसर्गिक वायू खात्यातर्फे राबवली जाईल, यामुळे फरक काय पडेल?**

**'गोबरधन' योजनेचे मूळ कुठे?**

देशात १९८१-८२ मध्ये ग्रामीण भागात गोबर गॅस संयंत्रे उभारणीला सुरुवात झाली, तिथे आजच्या गोबरधन योजनेचे मूळ आहे. तत्कालीन केंद्र सरकारने २०१८ मध्ये कॉम्प्रेस्ड बायोगॅससाठी (सीबीजी किंवा 'बायो-सीएनजी') 'गॅल्व्हनायझिंग ऑरगॅनिक बायो-ॲग्रो रिसोर्सेस (GOBARdhan - गोबरधन) ही योजना 'स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)' अंतर्गत सुरू केली. प्रारंभी पशुधनजन्य कचरा, स्वयंपाकघरातील उरलेले अन्न, पिकांचे अवशेष आणि बाजारपेठेतील कचरा या सारख्या जैव-कचऱ्याचे बायोगॅस आणि 'बायो-स्लरी'मध्ये (सेंद्रिय खत-मिश्रण) रूपांतर करून त्याद्वारे कचरा व्यवस्थापन करणे हा मुख्य उद्देश होता. देशात आतापर्यंत एकूण २१६ प्रकल्प सुरू झाले. त्यापैकी बहुतांश प्रकल्प उत्तर प्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक व हरियाणात आहेत.

**मग यात नवे काय?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच या योजनेसाठी २३,७३१ कोटी रुपये खर्चाला मंजुरी दिली. या योजनेची अंमलबजावणी २०२६-२७ ते २०३५-३६ या आर्थिक वर्षांपर्यंत केली जाईल.

**'सीएनजी'चे काम 'बायो-सीएनजी' करेल?**

'कॉम्प्रेस्ड बायोगॅस' किंवा सीबीजी हे बायो-गॅसचे शुद्ध केलेले स्वरूप आहे, ज्याची रचना आणि ऊर्जा क्षमता जीवाश्म - आधारित नैसर्गिक वायूसारखीच असते. शुद्धीकरणानंतर याला संकुचित बायो-गॅस (कॉम्प्रेस्ड बायोगॅस) म्हणतात, त्यात मिथेनचे प्रमाण ९२ टक्केपेक्षा जास्त असते. म्हणजेच, आजच्या 'सीएनजी' इतकाच वा त्यापेक्षा किंचित जास्त मिथेनचे प्रमाण 'कॉम्प्रेस्ड बायोगॅस'मध्ये असते. 'सीएनजी' हे जमिनीखालून मिळणारे जीवाश्म इंधन. त्याच्या साठ्यांवर मर्यादा आहेत. तर 'कॉम्प्रेस्ड बायोगॅस' हा सर्व प्रकारच्या सेंद्रिय वा जैव कचऱ्यापासून तयार होणार आहे. रासायनिक गुणधर्म तेच असल्याने 'कॉम्प्रेस्ड बायोगॅस'चा वापर वाहनांसाठी एक पर्यायी, अक्षय्य इंधन म्हणून केला जाऊ शकतो; म्हणूनच त्याला 'बायो-सीएनजी' म्हणतात.

**केंद्र सरकार यासाठी नेमके काय करणार?**

केंद्र सरकारने सीबीजी उत्पादनावर भर दिला आहे. सेंद्रिय खतांसाठी बाजारपेठ विकास सहाय्य योजना, जैव वस्तुमान एकत्रीकरण यंत्रणा योजना, सीबीजीसाठी पाईपलाईनची पायाभूत सुविधा उभारणे आणि राष्ट्रीय जैवऊर्जा कार्यक्रमाच्या अंतर्गत सीबीजी प्रकल्पांसाठी केंद्रीय आर्थिक मदतीद्वारे सीबीजी क्षेत्र विस्तारले जात आहे.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाद्वारे राबवली जाणारी ही योजना संपूर्ण सीबीजी मूल्य साखळीसाठी एकात्मिक व्यासपीठ तयार करणार आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या माहितीनुसार, देशात सध्या २१६ सीबीजी प्रकल्प कार्यरत असले तरी, नोंदणी झालेल्या एकूण बायोगॅस प्रकल्पांची संख्या १,९१५ असून त्यापैकी बांधकाम सुरू असलेल्या प्रकल्पांची संख्या ३५७, तर उभारणीच्या प्रारंभीच्या टप्प्यावर असलेल्या प्रकल्पांची संख्या १,३४२ आहे. देशातील एकंदर ७९३ जिल्ह्यांपैकी २५३ जिल्ह्यांत हे प्रकल्प असतील. त्यामुळे देशांतर्गत सीबीजी उत्पादनात जवळपास १० पटीने वाढ होईल. शहरी वायू वितरण अर्थात सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन, सीजीडी संस्थांद्वारे केल्या जाणाऱ्या खरेदीमुळे, सीएनजी वाहतुकीसाठी आणि पीएनजी (घरगुती वापरासाठीच्या क्षेत्रांमध्ये सीबीजी वापर अनिवार्य होईल) त्याचे प्रमाण २०२६-२७ मध्ये ३ टक्के, २०२७-२८ मध्ये ४ टक्के आणि २०२८-२९ पासून पाच टक्के सीबीजीचा वापर करण्याचे उद्दिष्ट आहे.

**किंमत किती? भवितव्य काय?**

गोबरधन अंतर्गत 'सीबीजी'साठी २,११० रुपये प्रति मेट्रिक दशलक्ष ब्रिटिश थर्मल युनिट (एमएमबीटीयू हे गॅसचे परिमाण 'सीबीजी'साठी साधारण २१ किलोइतके भरते) इतकी स्थिर आणि नियंत्रित किंमत निश्चित करण्यात आली आहे. पण सध्या महाराष्ट्रात तेवढ्याच 'सीएनजी'ची किंमत सध्या १९०० रुपयांपेक्षा कमी आहे. इथेनॉल या जैव इंधनाबाबत सध्या सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर सीबीजीला दिलेली चालना आणि व्यावसायिक वापर शास्त्रीयदृष्ट्या तपासून पाहण्याची गरज आहे. अन्यथा सध्या मागणी अभावी इथेनॉल प्रकल्पांसाठी केलेली आर्थिक गुंतवणूक जशी अडचणीत आली आहे, तशीच अवस्था सीबीजी प्रकल्पांची होऊ शकते. तसे होऊ नये, इतकीच माफक अपेक्षा.

## बँक ऑफ महाराष्ट्र / Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे-५ / Lokmangal, 1501 Shivajinagar, Pune-5

आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal Office, Solapur

आंचलिक कार्यालय, अग्रवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट - भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - ४१३००४
Zonal Office, Agarwal Palace, First Floor, D Mart-Bharati Vidyapith Road, Opp. Patanjali Mall, Jule Solapur, Solapur - 413004
फोन / Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@bankofmaharashtra.bank.in

### नियम ८(१) ताबा सूचना

ज्याअर्थी खाली सही करणार **बँक ऑफ महाराष्ट्र** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, २००२ च्या कलम १३ च्या उपकलम (१२) रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार आणि जामीनदार यांना **दि.१३/०५/२०२६** रोजी मागणी नोटीस बजावली होती की, सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून **६० दिवसांच्या** आत परत करावी.

कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्यामुळे विशेषत: वर नमूद केलेले कर्जदार/जामीनदार तसेच सर्व साधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३ च्या उपकलम ४ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमुद केलेल्या मालमत्तेचा **दि.०७/०८/२०२६ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.**

विशेषत: कर्जदार तसेच सर्व साधारण जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास नमूद केलेल्या रकमेसाठी **बँक ऑफ महाराष्ट्र** च्या रकमेच्या अधीन राहील.

सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सरफेसी ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३ उपकलम ८ अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

| अ. क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणीची सूचनेची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| १. | शाखा : तुळजापूर<br>कर्जदार : श्रीमती. आम्रपाली विकास जाधव, (स्वर्गीय) श्री. विकास भगवान जाधव आणि जामीनदार श्री. स्वप्नील चंद्रकांत जगताप | (स्वर्गीय) विकास भगवान जाधव आणि श्रीमती आम्रपाली विकास जाधव यांच्या नावावर गहाण मालमत्ता जमिन सर्वे क्र.८८ पैकी प्लॉट क्र.१००, १०१, १११, ११२ आणि ११३ पैकी रो हाऊस क्र. आर-६ असलेल्या मालमत्तेचे सर्व सामाईक भाग, एकूण मोजमापीत प्लॉट क्षेत्रफळ ९३.०० चौरस मीटर असून त्यावर बिल्डिंग आहे. समर्थ नगर, तुळजापूर-४१३६०१. **खालीलप्रमाणे चर्तुःसीमा : पूर्व** : रो हाऊस क्र. ५, **पश्चिम** : रो हाऊस क्र.७, **दक्षिण** : रो हाऊस क्र. २, **उत्तर** : ०६ मीटर अंतर्गत रस्ता. | मागणी सूचना :<br>दि.१३/०५/२०२६<br>रु. २२,४२,०५२/- (रुपये बावीस लाख बेचाळीस हजार बावन्न फक्त) कर्ज सुविधेसाठी मासिक आधारावर न लावलेले व्याज, तसेच उपरोक्त रकमेवर करारानुसार दराने पुढील व्याज आणि दिनांक १३/०५/२०२६ पासून पुढे पेमेंटच्या तारखेपर्यंत झालेले/होणारे अनुषंगिक खर्च, शुल्क, आकार इत्यादी.<br>प्रतिकात्मक ताबा<br>दिनांक : ०७/०८/२०२६ |

ठिकाण : तुळजापूर-सोलापूर
दिनांक : ०७/०८/२०२६
( टिप : स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य )
सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन

---

## ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालयः आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400059, भारत

शाखा कार्यालयः पहिला मजला, ऑफिस क्र. 23, 24, 25, सातारा सिटी बिझनेस सेंटर, स.क्र. 283/1प, फायनल प्लॉट क्र. 29, उप-प्लॉट क्र. 1, राधिका रोड, कारंजे तर्फ, सातारा - 415002

शाखा कार्यालयः दुसरा मजला, युनिट क्र. 208, 209 आणि 210, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस क्र. 26878, भांबुर्डा, ई-स्क्वेअर लगत, युनिव्हर्सिटी रोड, शिवाजीनगर, पुणे - 411005

### खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून अचल मत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(8) सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून अचल मत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (आयसीआयसीआय एचएफसी) यांनी खाली नमूद तारण मालमत्तेच्या विक्रीसाठी किंतीही ई-लिलाव आयोजित केले, परंतु हे सर्व ई-लिलाव अयशस्वी ठरले. आता, हया मालमत्तेसाठी इच्छुक खरेदीदाराने आयसीआयसीआय एचएफसीकडे आरक्षित किमतीपेक्षा (खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे) रकमेस सदर मालमत्ता विकत घेण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि आम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली वर्णनाच्या अचल मालमत्तेची आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून तिची खाली नमूद संक्षिप्त तपशिलानुसार ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर खाजगी कराराच्या माध्यमातून विक्री करण्यात येईल:

| अ. क्र. | कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारसाचे नाव कर्ज खाते क्र. | अनामत मत्तेचे तपशील आणि ज्ञात बोजे | थकबाकी रक्कम | आरक्षित किंमत / बयाणा रक्कम | मालमत्तेच्या पाहणीचा दिनांक व वेळ | लिलावाचा दिनांक व वेळ | लिलावाचा प्रस्ताव सादरीकरणाचा एक दिवस | सर्फेसी टप्पा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (ए) | (बी) | (सी) | (डी) | (ई) | (एफ) | (जी) | (एच) | (आय) |
| 1 | ऋषिकेश जगताप देवरखे (कर्जदार) सुप्रिया सतीश साते (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. LHSRA00001506873 & LHSRA00001506924 | सदनिका क्र. एस-1/ए, दुसरा मजला, कल्पना रेसिडेन्सी, सीटीएस क्र. 16/54/53, सीटी सातारा पेठ चिमणपुरा, ता. आणि जिल्हा सातारा, महाराष्ट्र | रु. 13,41,617/- 07 ऑगस्ट, 2026 | रु. 6,00,000/-<br>रु. 60,000/- | 21 ऑगस्ट, 2026 स. 11.00 ते दु. 03.00 वाजेपर्यंत | 28 ऑगस्ट, 2026 दु. 11.00 ते 12.00 वाजेपर्यंत | 27 ऑगस्ट, 2026 दु. 04.00 पर्यंत | प्रत्यक्ष ताबा |
| 2 | शेळके सागर नंदकुमार (कर्जदार) सोळखे नंदकुमार शेळके (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. LHPWK00001567928 & LHPWK00001567927 | सदनिका क्र. 301, सदनिका क्र. 302, सदनिका क्र. 303, तिसरा मजला, कृष्णा रेसिडेन्सी, स.क्र. 47, हिस्सा क्र. 13, मौजे नऱ्हे, ता. हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र- 411041 | रु. 32,45,835/- 07 ऑगस्ट, 2026 | रु. 9,00,000/-<br>रु. 90,000/- | 21 ऑगस्ट, 2026 स. 11.00 ते दु. 03.00 वाजेपर्यंत | 28 ऑगस्ट, 2026 दु. 11.00 ते 12.00 वाजेपर्यंत | 27 ऑगस्ट, 2026 दु. 04.00 पर्यंत | प्रत्यक्ष ताबा |

ऑनलाईन लिलाव हा लिलाव एजन्सी व्हॅल्यू ट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड च्या वेबसाईटवर राबविण्यात येईल (यूआरएल लिंक - https://BidDeal.in). संभाव्य बोलीदारांनी दि. 27 ऑगस्ट, 2026 रोजी दु. 04.00 वाजेपर्यंत लेखाच्या वरच्या भागात नमूद करण्यात आलेल्या आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी च्या शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर आपले प्रस्ताव / डिमांड ड्राफ्ट (डीडी) च्या माध्यमातून सादर करावी (स्तंभ ई पाहावा). संभाव्य बोलीदारांनी दि. 27 ऑगस्ट, 2026 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत लेखाच्या वरच्या भागात नमूद करण्यात आलेल्या आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड च्या शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर नोंदणी प्रपत्र आणि अटी व शर्तींच्या स्वाक्षरी केलेली प्रत सादर करावी. बयाणा रक्कम ''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. इ लिलाव'' च्या नावे काढण्यात आलेल्या आणि लेखाच्या वरच्या भागात नमूद करण्यात आलेल्या शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर देय असलेल्या राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँकेवर काढण्यात आलेल्या डिमांड ड्राफ्ट (डीडी) च्या स्वरूपात सादर करावी.

याद्वारे आम जनतेस विनंती करण्यात येते की त्यांनी वर नमूद इच्छुक खरेदीदाराने सादर केलेल्या रकमेपेक्षा अधिक रकमेची बोली सादर करावी. याद्वारे सूचित करण्यात येते की आयसीआयसीआय एचएफसी यांना वर नमूद इच्छुक खरेदीदाराने सादर केलेल्या रकमेहून अधिक रकमेची बोली प्राप्त न झाल्यास सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(8) नुसार सदर इच्छुक खरेदीदारास तारण मालमत्तेची विक्री करण्यात येईल.

पाहणी, विक्रीच्या अटी व शर्ती किंवा बोली सादरीकरणाच्या संदर्भात अधिक स्पष्टीकरणासाठी कृपया आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांचेशी 9920807300 वर किंवा वॅल्युट्रस्ट सेंट्रलाईझ्ड हेल्पडेस्क क्र. 6200-22-6200 संपर्क साधावा.

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्वच बोली फेटाळण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवतात.

दिनांकः 12 ऑगस्ट, 2026
स्थानः सातारा, पुणे
प्राधिकृत अधिकारी, ''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड''
CIN क्रमांक :- U65922MH1999PLC120106

---

## माननीय कर्ज वसुली न्यायाधिकरण-II यांचे समक्ष बंगलोर येथे

ओ. ए. क्र. - 1157/2022

ॲक्सिस बँक लि. ...अर्जदार
आणि
मणियोग टेक्सटाइल्स प्रा. लि. ...प्रतिवादी
यांच्या दरम्यान

**कर्ज वसुली न्यायाधिकरण (कार्यपद्धती) नियम 1993 च्या नियम 23 (VIII) अंतर्गत जारी केलेली सूचना**

ज्याअर्थी, अर्जदाराने तुमच्याविरुद्ध रक्कम **रु. 7,09,53,368.22/- (रुपये सात कोटी नऊ लाख त्रेपन्न हजार तीनशे अडुसष्ट आणि बावीस पैसे फक्त)** तसेच पूर्ण रक्कम मिळेपर्यंत किंवा रक्कम वसूल होईपर्यंत वर्तमान आणि भविष्यातील व्याज, या रकमेच्या वसुलीसाठी, बँक आणि वित्तीय संस्थांना देय असलेल्या कर्जाच्या वसुली अधिनियम, 1993 च्या कलम 19 अन्वये अर्ज दाखल केला आहे.

म्हणून, उपरोक्त प्रतिवादींना याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी प्रकाशनाच्या तारखेपासून **30 दिवसांच्या आत** किंवा **दि. 12/10/2026 रोजी सकाळी 10:30 वाजेपर्यंत,** मागितलेली दाद मंजूर का करू नये, याचे कारण स्पष्ट करण्यासाठी स्वतः किंवा वकिलाद्वारे किंवा अधिकृत प्रतिनिधीद्वारे त्यांच्या बचावाच्या समर्थनार्थ न्यायाधिकरणासमोर हजर राहावे.

नोंद घ्यावी की, कसूर झाल्यास सदर अर्जावर आपल्या अनुपस्थितीत सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल.

**दिनांक 31 जुलै 2026** रोजी, माझ्या सहीनिशी आणि या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**प्रति,**

**(डी1) मणियोग टेक्सटाइल्स प्रायव्हेट लिमिटेड,**
**नोंदणीकृत कार्यालय** : क्र.- 8/10, कार्यालय क्र. 17, तिसरा मजला, मनोग्राम बिल्डिंग, तेलीगढी, विठ्ठलवाडी, काळबादेवी रोड, मुंबई-400002, महाराष्ट्र राज्य.
**तसेच येथे** : मणियोग टेक्सटाइल्स (पी) लिमिटेड, पी. बी. क्र.-2, बेट्टाडापुरा रोड, सीगुर गाव, पेरियापटना तालुका, म्हैसूर जिल्हा - 571 107 कर्नाटक राज्य

**(डी2) श्री. योगेश सत्यनारायण मानधने**
**सत्यनारायण पन्नालाल मानधने यांचा मुलगा, राहणार** : क्र- 8/795, योगेश बिल्डिंग, थोरात चौक, शांती नगर, शहापूर रोड, इचलकरंजी-416115 महाराष्ट्र राज्य

**(डी3) सौ. अर्चना योगेश मानधने**
**योगेश सत्यनारायण मानधने यांची पत्नी, राहणार** : क्र- 8/795, योगेश बिल्डिंग, थोरात चौक, शांती नगर, शहापूर रोड, इचलकरंजी-416115.

**अर्जदार बँकेचे वकील**
**धीरेंद्र एन कट्टी**

दिनांक : 20-06-2026
ठिकाण : बंगलोर
शिक्का
स्वा./- रजिस्ट्रार
कर्ज वसुली न्यायाधिकरण-II

---

## वसूली अधिकारी व्दारा-दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि., वाई

प्रधान कार्यालय ५९१, गणपती आळी, वाई, ता. वाई, जि. सातारा
फोन -०२१६७-२२०७७७, मो. ९८९०१०२९४२ www.wai.bank.in

### स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव

(महाराष्ट्र सह.संस्था कायदा १९६० चे कलम १५६ व त्याखालील नियम क्र. १०७ अन्वये)

ज्याअर्थी दि वाई अर्बन को. - ऑप. बँक लि. वाई या बँकेने उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. पुणे यांचेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १०१ अन्वये कर्जदार प्रविण चंद्रकांत विसपुते व जामिनदार यांचे विरुद्ध वसुली दाखला क्रमांक ३६७/२०२२-२३ दिनांक २५/०७/२०२२ नुसार येणे रक्कम रु.४,३२,६२९/-व मुद्दल रु.४,०२,५२९/- यावर दिनांक ०१/०४/२०२२ पासून १२.५०% प्रमाणे पुढील व्याज अधिक खर्च व सरचार्ज इ. सहित मिळाला असून तो बँकेचे वसुली अधिकारी यांचेकडे वसुलीच्या कायदेशीर कारवाईसाठी प्राप्त झाला असून कर्जदार, जामिनदार यांना महाराष्ट्र सह.संस्था कायदा १९६० चे कलम १०७ अन्वये दि. ०४/०८/२०२२ रोजी मागणी नोटिसा बजावल्या आहेत आणि

- ज्याअर्थी कर्जदार श्री. प्रविण चंद्रकांत विसपुते यांनी दिलेल्या मुदतीत हुकूमनाम्यानुसार रक्कमेचा भरणा करणेस कसूर केली आहे आणि
- ज्याअर्थी कर्जदार श्री. प्रविण चंद्रकांत विसपुते यांची खाली नमूद केलेली स्थावर मालमत्ता दि. ०७/०२/२०२३ रोजीच्या आदेशाने जप्त करणेस आली असून जप्ती आदेश त्यांचेवर बजावणेत आला आहे आणि
- सदर खाली नमूद केलेल्या मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ व त्याखालील नियम क्रमांक १०७ चे पोटकलम ११-ड व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार मा. जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारीसो पुणे (गृह शाखा) यांनी प्राधिकृत केलेले आदेश क्र.को. ऑप/एसआर/९८४/२०२३ दिनांक २५/१०/२०२३ व तहसीलदार कार्यालय हवेली (पुणे) यांचा आदेश क्र. फौज/ताबा/एसआर/१५२/२०२३ दिनांक २८.११.२३ नुसार मा. मंडल अधिकारी, थेऊर यांनी कर्जदार प्रविण चंद्रकांत विसपुते यांचेकडून काढून घेऊन सदर स्थावर मिळकतीचा कब्जा विना हरकत विना तक्रार मंगेश वसंत कांबळे वसुली अधिकारी दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि. वाई यांचेकडे दिनांक १०.०१.२०२४ रोजी देणेत आला.

ज्याअर्थी कर्जदार यांनी मागणी रक्कमेनुसार मुदतीत रक्कमेचा भरणा करण्यास कसूर केली आहे त्यामुळे वसुली अधिकारी यांची खात्री झाली आहे, की जमा मालमत्तेची नियमानुसार जाहीर लिलावाने विक्री केलेशिवाय हुकूमनाम्यानुसार येणे रक्कमेची वसुली होणार नाही आणि

ज्याअर्थी मी राहुल रविंद्र कदम दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि. वाई यांना शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ व त्याखालील नियम क्रमांक १०७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा जाहीर लिलाव बोली लिलाव प्रकारे करणेचे घोषित करण्यात येत आहे.

**विक्री करण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशील**

| अ. क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | लिलाव करावयाच्या स्थावर मिळकतीचे गाव | लिलाव करावयाच्या स्थावर मिळकतीचा तपशील | एकुण क्षेत्र चौ.मी./ चौ.फूट | मंजूर वाजवी किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रविण चंद्रकांत विसपुते व सौ सारिका प्रविण विसपुते. रा. स.नं. ६, हिस्सा नं. २/२, वेताळ वस्ती, फ्लॅट नं. २२/४०४, चौथा मजला, समर्थ निवास, मांजरी बु., ता.हवेली, जि. पुणे | मौजे मांजरी बु., ता.हवेली, जि. पुणे | स.नं.६ हिस्सा नंबर २/२, समर्थ निवास, या इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २२/४०४ ही संपूर्ण मिळकत | ४१० चौ.फूट / ३८.१० चौ.मी. | १५,००,०००/- (अक्षरी रुपये पंधरा लाख फक्त) |

**लिलाव स्थळ : दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि. वाई, शाखा सदाशिव पेठ, पुणे. पत्ता - १९९९, अभिनव कला वाणिज्य महाविद्यालया समोर, सदाशिवपेठ, पुणे. ४११०३०. जाहीर लिलाव शनिवार दिनांक २९/०८/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता.**

१. लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) बँकेच्या कोणत्याही शाखेत रोखीने दिनांक २८/०८/२०२६ अखेर वा लिलावा दिवशी बँकेच्या सदाशिवपेठ, पुणे शाखेत लिलावाच्या वेळेपूर्वी भरणा करणे आवश्यक आहे. तसेच सोबत अनामत रक्कम भरले बाबतचे चलन, पॅनकार्ड व आधार कार्ड यांचे मूळ व सत्यप्रती सादर कराव्यात त्याशिवाय भाग घेता येणार नाही. लिलावाच्या इतर अटी व शर्ती लिलावाच्या ठिकाणी वाचून दाखविण्यात येतील.

२. सदर लिलावाच्या इतर अटी व शर्ती बँकेत पहावयास मिळतील.

ठिकाण : पुणे
दिनांक : १०/०८/२०२६
वसुली अधिकारी शिक्का
राहुल रविंद्र कदम
वसुली अधिकारी
दि वाई अर्बन को-ऑप.बँक लि.वाई.

---

## टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** 11वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई- 400013.
**शाखा पत्ता :** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि., एबीआयएल, पहिला मजला अवंती रेसिडेन्सी, अभिनव चौक, टिळक रोड, पुणे - 411030.

### अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना

**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 9(1) सह वाचलेल्या नियम 8(6) अंतर्गत)**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि नियम 9(1) सह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी 15 दिवसांची ई-लिलाव सूचना.
याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि कर्जदार / सह-कर्जदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारस / प्रतिनिधींना (कर्जदार) सूचित करण्यात येते की टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (टीसीएचएफएल) यांचेकडे तारण असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा टीसीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांनी ताबा घेतलेला असून त्यांची खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांकडून वसूल करणे असलेल्या एकूण रकमेसाठी ''जशी आहे जेथे आहे'' व ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथेच आहे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय'' तत्त्वावर **दि. 28-08-2026** रोजी विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम खाली देण्यात आलेली आहे. याद्वारे सूचित करण्यात येते की विक्री पुढे ढकलण्यात / खंडित करण्यात न आल्यास सदर अनामत मत्ता / मालमत्तेची **दि. 28-08-2026 रोजी दु. 2.00 वाजता** ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. या ई-लिलावात सहभागी होण्यासाठी असलेला डिमांड ड्राफ्ट असलेला मोहरबंद लिफाफा **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड,** एबीआयएल, पहिला मजला अवंती रेसिडेन्सी, अभिनव चौक, टिळक रोड, पुणे - 411030 येथील शाखा कार्यालयात **दि. 27-08-2026** रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत किंवा त्या पूर्वी सादर करावा.
अनामत मत्ता / अचल मालमत्तेची विक्री खाली वर्णन केलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार "जशी आहे जेथे आहे" अटीवर करण्यात येईलः

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जदार / सह-कर्जदार / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधी / जामीनदार यांचे नाव | मागणी सूचना दिनांक | आरक्षित किंमत | नुसार थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 9348299 | सौ. मनीषा भावेश लायवाला<br>श्री. भावेश बहरती लायवाला | रु. 51,93,897/-<br>26-04-2025 | रु. 21,25,000/-<br>बयाणा रक्कम (ईएमडी): रु. 2,12,500/-<br>ताबा प्रकार : प्रत्यक्ष | रु. 6074773/-<br>31-07-2026 |
| | **अचल मालमत्तेचे वर्णन :** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. ए-1/905, इमारत ए-1 च्या 9व्या मजल्यावर, मोजमाप सुमारे 40.46 चौ. मीटर कार्पेट क्षेत्रफळ, उक्त फ्लॅटला लागून असलेले टेरेस, जो फ्लॅटचा अविभाज्य भाग आहे, मोजमाप सुमारे 4.73 चौ. मीटर कार्पेट क्षेत्रफळ, सदर फ्लॅटचे एकूण कार्पेट क्षेत्रफळ सुमारे 45.19 चौरस मीटर आहे, बाल्कनी, अंतर्गत पॅसेज आणि टेरेस यांचा समावेश आहे (सदर फ्लॅट, सोबत जोडलेल्या परिशिष्ट-डी मधील नकाशात, विशेषतः लाल रंगाच्या सीमा रेषेने दर्शवलेला आहे) 'डीएसके सदाफुली' नावाच्या प्रकल्पात स्थित. वराळे गावात वसलेले, जे स्थानिक पातळीवर 'बोरिचे शेत' म्हणून ओळखले जाते, वराळे ग्रामपंचायतीच्या हद्दीत, पुणे जिल्ह्यातील मावेल उप-जिल्ह्यात नोंदणीकृत आहे. चतुःसीमा पुढीलप्रमाणे - **पूर्वेकडे -** मजल्याच्या आराखड्यानुसार, **पश्चिमेकडे -** मजल्याच्या आराखड्यानुसार, **उत्तरेकडे -** मजल्याच्या आराखड्यानुसार, **दक्षिणेकडे -** मजल्याच्या आराखड्यानुसार. खुलासा :- यशस्वी बोलीदारास सोसायटीचे शुल्क सोसायटीकडे भरावे लागेल. | | | | |
| 2 | 9852649 | श्री. गोरख बनसुडे (कर्जदार), सौ. अश्विनी बनसुडे (सह-कर्जदार) | रु. 11,48,407/-<br>26.04.2021 | रु. 7,50,000/-<br>बयाणा रक्कम (ईएमडी) : रु. 75,000/-<br>ताबा प्रकार : प्रत्यक्ष | रु. 3192168/-<br>31-07-2026 |
| | **अचल मालमत्तेचे वर्णन : अनुसूची - अ :** मालमत्ता 01 : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे - फ्लॅट क्र. 705, 7 व्या मजल्यावर, ए- 5 बिल्डिंग, मोजमाप 509 चौ. फूट, म्हणजे 47.29 चौ. मीटर, लगतच्या टेरेससह मोजमाप सुमारे 82 चौ. फूट, म्हणजे 7.62 चौ. मीटर, आणि सोबत एक आच्छादित कार पार्किंगचे क्षेत्रफळ सुमारे 9.29 चौ. मीटर, "आपल घर उरळीकांचन" म्हणून ओळखल्या जाणारया प्रकल्पात, येथील जमिनीवर बांधलेल्या नवीन गट क्रमांक 751 आणि 752. मोजे गाव शिंदवणे, ताः हवेली, जि : पुणे. चतुःसीमा पुढीलप्रमाणे :- **पूर्व** : गट क्रमांक 773, **पश्चिम** : गट क्रमांक 754, 752, **उत्तर** : गट क्रमांक 774, आणि तलाव, **दक्षिण** : गट क्रमांक 756, 757. **मालमत्ता 02** : बेअरिंग फ्लॅट क्रमांक 706, 7 व्या मजल्यावर, बिल्डिंग ए - 5, कार्पेट क्षेत्रफळ 509 चौ. फूट, म्हणजे 47.29 चौ. मीटर, लगतच्या टेरेससह सुमारे 82 चौ. फूट, म्हणजे 7.62 चौ. मीटर, आणि सोबत एक आच्छादित कार पार्किंगचे क्षेत्रफळ सुमारे 9.29 चौ. मीटर, "आपल घर उरळीकांचन" म्हणून ओळखल्या जाणारया प्रकल्पात, येथील जमिनीवर बांधलेल्या नवीन गट क्रमांक 751 आणि 752. मोजे गाव शिंदवणे, ता : हवेली,जि : पुणे. चतुःसीमा पुढीलप्रमाणे :- **पूर्व** : गट क्रमांक 751, **पश्चिम** : रस्ता, **उत्तर** : तलाव (गट क्रमांक 752 चा भाग), **दक्षिण** : गट क्रमांक 753. | | | | |
| 3 | 9460505 | श्री. रोशन वसंतराव नांदेकर (कर्जदार) | रु. 20,61,726/-<br>16 सप्टेंबर 2019 | रु. 9,99,000/-<br>बयाणा रक्कम (ईएमडी):रु. 99,900/-<br>ताबा प्रकार : प्रत्यक्ष | रु. 5673132/-<br>31-07-2026 |
| | **अचल मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट क्रमांक सी 309, मोजमाप 549 चौ. फूट. म्हणजे 51 चौ. मीटर तिसरया मजल्यावर आणि 1 स्कूटर पार्किंग मोजमाप 2 चौ. मीटर, फेज II मधील "आपलं घर सणसवाडी" या नावाने ओळखल्या जाणारया प्रकल्प, गट क्रमांक 165, गट क्रमांक 175, गट क्रमांक 176, गट क्रमांक 181 आणि गट क्रमांक 183 यावरील बांधकाम, गाव धिंग्रजवाडी, तालुका शिरूर जिल्हा पुणे येथे स्थित. | | | | |
| 4 | 9512250 | प्रतिमा सूर्यकांत उपाध्याय (कर्जदार), हेमंत कुमार नरेंद्र उपाध्याय (सह-कर्जदार) | रु. 12,51,525/-<br>07 फेब्रुवारी 2018 | रु. 4,00,000/-<br>बयाणा रक्कम (ईएमडी) : रु. 40,000/-<br>ताबा प्रकार : प्रत्यक्ष | रु. 4049024/-<br>31-07-2026 |
| | **अचल मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट / युनिट क्र. 212, दुसरया मजल्यावर, मोजमाप 336 चौ. फूट. म्हणजे 31.21 चौ. मी. (एकूण चटई क्षेत्र), इमारत "ए 2 जास्पर", गट क्रमांक 697 (जुना गट क्रमांक 217 /1) एकूण मोजमाप 06 हेक्टर 46 आर जमिनी पैकी 05 एच 26 आर, 04 रुपये 69 पैसे मूल्यमापन, गाव कारेगाव, तालुका शिरूर, जिल्हा पुणे आणि जिल्हा परिषद कारेगाव गावाच्या स्थानिक हद्दीत, ग्रामपंचायत कारेगाव आणि चतुःसीमा खालीलप्रमाणे आहे : पूर्व : गट क्रमांक 680 आणि 697, पश्चिम : गट क्रमांक 696, दक्षिण : कारेगाव फलके मळा रोड, उत्तर : गट क्र. 685. | | | | |
| 5 | 9541815 | सौ. पूनम संतोष जाधव (कर्जदार), श्री. संतोष भीमराव जाधव (सह-कर्जदार) | रु. 13,09,861/-<br>30-04-2021 | रु. 7,00,000/-<br>बयाणा रक्कम (ईएमडी): रु. 70,000/-<br>ताबा प्रकार : प्रत्यक्ष | रु. 2593021/-<br>31-07-2026 |
| | **अचल मालमत्तेचे वर्णन :** निवासी मालमत्ता संबंधित फ्लॅट क्र. 509, मोजमाप क्षेत्र 299 चौ. फूट. म्हणजे 27.78 चौ. मी. टेरेसच्या मोजमापासह 43 चौ. फूट. म्हणजे 3.99 मीटर, पाचव्या मजल्यावर, विंग क्र. ए 6 मध्ये, एक दुचाकी पार्किंगसह मोजमाप 2 चौ.मी. "मॅपल शेल्टर्स उरळीकांचन -1" म्हणून ओळखल्या जाणारया प्रकल्पात, गट क्रमांक 751 आणि गट क्रमांक 752 पैकी, गाव, शिंदवणे तालुका, हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित. | | | | |
| 6 | 10036671 | श्री. प्रदीपकुमार गणेशप्रसाद जयस्वाल, सौ. सुनिता पी जयस्वाल | रु. 11,06,108/-<br>12-06-2025 | रु. 7,00,000/-<br>बयाणा रक्कम (ईएमडी): रु. 70,000/-<br>ताबा प्रकार : प्रत्यक्ष | रु. 1458424/-<br>31-07-2026 |
| | **अचल मालमत्तेचे वर्णन :** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, निवासी फ्लॅट मोजमाप 19.32 चौ. मीटर (208 चौ. फुट च्या समतुल्य) कार्पेट क्षेत्रफळ संबंधित क्र. 619, एक्सर्बिया अंबी म्हणून ओळखल्या जाणारया कॉम्प्लेक्स मध्ये ए-6 इमारतीच्या सहाव्या मजल्यावर, अंबी गाव, तालुका मावळ, जिल्हा पुणे, महाराष्ट्र येथे स्थित आणि वसलेले. | | | | |
सदर नोटीस ही प्रादेशिक भाषेमध्ये सुद्धा प्रसिद्ध करण्यात येते. कोणत्याही प्रकारच्या स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य धरली जाईल.

दिनांक : १०/०८/२०२६ ठिकाण : पुणे

सहाय्यक महाप्रबंधक आणि अधिकृत अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र

---

TATA

## टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** 11वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400013.
**शाखेचा पत्ता :** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, क्र. 301 ते 303, 163, तिसरा मजला, देसाई हाऊस, वॉर्ड क्र. ई, राजारामपुरी, कोल्हापूर - 416008 आणि शाखेचा पत्ता : 82, दुसरा मजला, कनाले प्लाझा बिल्डिंग, रेल्वे लाईन, डॅफरिन चौक, सोलापूर - 413001.

### अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना

**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 9(1) सह वाचलेल्या नियम 8(6) अंतर्गत)**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि नियम 9(1) सह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी 15 दिवसांची ई-लिलाव सूचना.**

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि कर्जदार / सह-कर्जदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारस / प्रतिनिधींना (कर्जदार) सूचित करण्यात येते की टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (टीसीएचएफएल) यांचेकडे तारण असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा टीसीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांनी ताबा घेतलेला असून त्यांची खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांकडून वसूल करणे असलेल्या एकूण रकमेसाठी **''जशी आहे जेथे आहे'' व ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथेच आहे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय'' तत्त्वावर दि. 28-08-2026** रोजी विक्री करण्यात येईल. आरक्षित किमत आणि बयाणा रक्कम खाली देण्यात आलेली आहे. याद्वारे सूचित करण्यात येते की विक्री पुढे ढकलण्यात / खंडित करण्यात न आल्यास सदर अनामत मत्ता / मालमत्तेची **दि. 28-08-2026** रोजी दु. 2.00 वाजता ई - लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. या ई-लिलावात सहभागी होण्यासाठी असलेला डिमांड ड्राफ्ट असलेला मोहरबंद लिफाफा **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड,** क्र. 301 ते 303, 163, तिसरा मजला, देसाई हाऊस, वॉर्ड क्र. ई, राजारामपुरी, कोल्हापूर - 416008. आणि 82, दुसरा मजला, कनाले प्लाझा बिल्डिंग, रेल्वे लाईन, डॅफरिन चौक, सोलापूर - 413001 येथील शाखा कार्यालयात **दि. 27-08-2026** रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत किंवा त्या पूर्वी सादर करावा.

अनामत मत्ता / अचल मालमत्तेची विक्री खाली वर्णन केलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार "जशी आहे जेथे आहे" अटीवर करण्यात येईलः

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जदार / सह-कर्जदार / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधी / जामीनदार यांचे नाव | मागणी सूचना दिनांक | आरक्षित किंमत | नुसार थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | TCHHL028200 0100258644 & TCHIN0282000 100262258 | श्री. मनोज परशुराम अजेतराव सौ. मिनाक्षी मनोज अजेतराव श्री. परसराम ईश्वर अजेतराव | Rs. 73,83,552/- 07-07-2025 | रु. 75,00,000/- बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) :- रु. 7,50,000/- ताबा प्रकार : प्रत्यक्ष | Rs. 85,12,980/- 31-07-2026 |
| **अचल मालमत्तेचे वर्णन :** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, प्लॉट क्र. 199 त्याचे मोजमाप क्षेत्रफळ 360.00 चौ. मी. संबंधित गट क्र. 111 सोबत त्यावर उभी संरचना, मौजे सावळी, ता. मिरज, जिल्हा सांगली येथे स्थित. | | | | | |
| 2 | TCHIN0282000 100321152 & TCHHL028200 0100320553 | श्री. रोहन गोविंद चांदवानी सौ. दक्षा रोहन चांदवानी श्री. गोविंद फेरुमल चांदवानी | Rs. 76,34,369/- 07-01-2025 | रु. 75,00,000/- बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) :- रु. 7,50,000/- ताबा प्रकार : प्रत्यक्ष | Rs. 91,86,154/- 31-07-2026 |
| **अचल मालमत्तेचे वर्णन :** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, मालमत्ता संबंधित सीटीएस क्र. 875, ए/4बी/2, मोजमाप 77.7 चौ. मीटर, सी वॉर्डमध्ये स्थित, कोल्हापूर महानगरपालिका हद्दीत. | | | | | |
| 3 | TCHHL068200 0100073135 & TCHHF068200 0100073589 | श्री. ज्ञानेश्वर दत्तात्रय धावडे, सौ. पल्लवी ज्ञानेश्वर धावडे | Rs. 19,48,967/- 06-05-2023 | रु. 11,75,000/- बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) :- रु. 1,17,500/- ताबा प्रकार : प्रत्यक्ष | Rs. 32,12,999/- 31-07-2026 |
| **अचल मालमत्तेचे वर्णन :** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 06, मोजमाप 48.30 चौ. मीटर "खमिताकर कॉम्प्लेक्स" बिल्डिंग क्र. 2 मध्ये दुसरया मजल्यावर, सिटी सर्व्हे क्रमांक 8458/1-अ/9 पैकी लेआउट प्लॉट क्रमांक 1, मुरारजी पेठ, तालुका उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथे स्थित, चतुःसीमाः पूर्व : खुला प्लॉट, पश्चिम : खुली जमीन, उत्तरः फ्लॅट क्रमांक 1, दक्षिणः फ्लॅट क्रमांक 5. | | | | | |
| 4 | 10324728 & 10325620 | श्री. रुपेश कमलकिशोर उपाध्ये, सौ. प्रीती रुपेश उपाध्ये | Rs. 42,52,133/- 14-02-2019 | रु. 28,35,000/- बयाणा रक्कम (ईएमडी) : रु. 2,83,500/- ताबा प्रकार : प्रत्यक्ष | Rs. 1,17,97,233/- - 31-07-2026 |
| **अचल मालमत्तेचे वर्णन : अनुसूची अ** – पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे - सेठ एलजे चांडक पथ, बुधवार पेठ, सोलापूरच्या नोंदणी जिल्ह्यात आणि सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीत येथे स्थित मालमत्ता, संबंधित एस. क्र. 28/1बी/1/1/ (1+3+4+6) मोजमाप 5139.62 चौ. मी., **चतुःसीमा पुढीलप्रमाणे** – पूर्व किंवा त्या दिशेने - अंतर्गत रस्ता / एफ. पी. क्र. 28/1बी/1/7, पश्चिम किंवा त्या दिशेने - एफ. पी. क्र. 26, उत्तर किंवा त्या दिशेने - एफ. पी. क्र. 28/1बी/1/1ए/5, दक्षिण किंवा त्या दिशेने - सोलापूर महानगरपालिका रोड. कमलश्री अपार्टमेंट च्या चतुःसीमा - पूर्व किंवा त्या दिशेने - अंतर्गत रस्ता, पश्चिम किंवा त्या दिशेने - चांडक गार्डनचे श्री आणि सुयश अपार्टमेंट, उत्तर किंवा त्या दिशेने - अंतर्गत रस्ता, दक्षिण किंवा त्या दिशेने - जुना टी.पी. II, एफ. पी. क्र. 28/1बी/1/4. **अनुसूची – ब :** कमलश्री अपार्टमेंटचे युनिट / फ्लॅट क्र. 203 चे **चतुःसीमा** – पूर्व किंवा त्या दिशेने - अंतर्गत रस्ता, पश्चिम किंवा त्या दिशेने - फ्लॅट क्र. 204 आणि 205, उत्तर किंवा त्या दिशेने - फ्लॅट क्र. 202, दक्षिण किंवा त्या दिशेने - अंतर्गत रस्ता. उक्त युनिट / फ्लॅटचे कार्पेट क्षेत्र विवरणः फ्लॅट क्र. 203, हे आयताकृती आकाराचे अपार्टमेंट असून ज्याचे बिल्टअप क्षेत्रफळ मोजमाप 930.00 चौ. फूट म्हणजे 86.40 चौ. मी. या डीडच्या प्रदर्शित केलेल्या अ मध्ये विशेषतः दर्शविल्याप्रमाणे, त्याच्या मुख्य दरवाजाला संबंधित मजल्यावरील कॉरिडॉरमध्ये प्रवेश आहे. फ्लॅट क्र. 203 चे एकूण क्षेत्रफळ मोजमाप 66.03 चौ. मी. म्हणजे 711.00 चौ. फूट आहे. | | | | | |
| 5 | 10426527 | श्री. रफीक नबीसाब नल्लामांडू, सौ. सैदाबी नबीसाब नल्लामांडू, सौ. जहानारा मोहम्मदिशाक शेख | Rs. 19,32,512/- 22-10-2019 | रु. 15,00,000/- बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) :- रु. 1,50,000/- ताबा प्रकार : प्रत्यक्ष | Rs. 45,68,321/- 31-07-2026 |
| **अचल मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट क्र. 05, मोजमाप 47.36 चौ. मीटर, तिसरया मजल्यावर, "श्री काशी-राम अपार्टमेंट" मध्ये, टी.पी. योजना क्रमांक 1 पैकी, सिटी सर्व्हे क्र. / अंतिम भूखंड क्रमांक 9/203, रविवार पेठ, तालुका उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथे स्थित. चतुःसीमा पुढील प्रमाणे - पूर्व :- पॅसेज आणि फ्लॅट क्रमांक 6, पश्चिम :- रस्ता, उत्तर :- रस्ता, दक्षिण :- अंतिम भूखंड क्र. 9/203. | | | | | |

**टीप : बोलीदारांना बोली सादर करण्यापूर्वी योग्य ती काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. लिलाव खटल्याच्या निकालावर, जर काही वाद असेल तर त्यावर अवलंबून असेल.**

लिलावाच्या वेळी सर्व लोकांना सामान्यपणे व्यक्तीशः बोली सादर करण्याचे आवाहन करण्यात येते. या विक्रीच्या संदर्भात कोणतेही कर्तव्य बजावणारया अधिकारयास किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विक्री करण्यात येणारया मालमत्तेसाठी बोली देता किंवा काही हित साधता येणार नाही.

सदर विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मध्ये विहित करण्यात आलेल्या तसेच पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येईल :

**टीप :- सदर ई-लिलाव हा दि. 28-08-2026 रोजी दु. 2.00 ते दु. 3.00 वा. दरम्यान https://BidDeal.in पोर्टलच्या माध्यमातून घेण्यात येईल व यात प्रत्येकी 5 मिनिटांचे मर्यादित कालविस्तार असतील.**

**अटी व शर्ती : 1.** खाली परिशिष्टात देण्यात आलेला तपशील निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध माहितीच्या आधारे देण्यात आलेला असून या घोषणेत चूक असल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी निम्नस्वाक्षरीकार जबाबदार असणार नाहीत. बोलीची रक्कम अथवा बोलीदारासंदर्भात काहीही वाद निर्माण झाल्यास ती अचल मालमत्ता सुरक्षित धनकोच्या संमतीने पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **2.** सदर मालमत्तेची आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस विक्री करण्यात येणार नाही. **3.** बोली वृद्धी रक्कम **रु. 10,000/-** (रुपये दहा हजार फक्त) असेल. **4.** सदर मालमत्तेच्या खरेदीसाठी प्रस्तुत करण्यात येणारया सर्व बोली डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपातील ''टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.'' यांचे नावे काढण्यात आलेल्या आणि शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर देय असलेल्या बयाणा रकमेसह सादर कराव्यात. अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम लिलावानंतर परत करण्यात येईल. बयाणा रकमेचा एनईएफटी / आरटीजीएस / आयएमपीएस द्वारे भरणा करण्यासाठी कृपया प्राधिकृत अधिकारयांशी संपर्क साधावा. **5.** सर्वोच्च बोलीदार बोली देण्यास पात्र असल्यास आणि त्याने प्रस्तुत केलेली बोलीची रक्कम आरक्षित किमतीपेक्षा कमी नसल्यास त्यास खरेदीदार घोषित करण्यात येईल. सर्वोच्च बोलीदाराने प्रस्तुत केलेली बोली रक्कम अत्यंत कमी वाटत असल्यास ती बोली फेटाळण्याचा अधिकार 'प्राधिकृत अधिकारयास' असेल. **6.** नमूद केलेल्या कारणांसाठी विक्री बरखास्त करण्याचा / खंडित करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारयास असेल. **7.** आधीच वेळ घेऊन **दि. 20-08-2026** रोजी स. 11 ते सायं. 5.00 वाजेपर्यंत अचल मालमत्तेची पाहणी करता येईल. **8.** यशस्वी बोलीदार घोषित करण्यात आलेल्या व्यक्तीस अशी घोषणा करण्यात आल्यानंतर लगेच बयाणा रक्कम धरून खरेदी किमतीच्या 25 टक्के रक्कम 'प्राधिकृत अधिकारया'कडे 24 तासांच्या जमा करावी लागेल आणि ही रक्कम जमा न केल्यास सदर मालमत्ता पुन्हा लिलावात / खाजगी तहाद्वारे पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **9.** वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीची रक्कम जमा करण्यात आल्यास खरेदी रकमेपैकी उर्वरित देय रक्कम खरेदीदारास मालमत्तेच्या विक्रीची निश्चिती होण्याच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत प्राधिकृत अधिकारया कडे जमा करावी लागेल किंवा 15 व्या दिवशी रविवार किंवा सुटीचा दिवस येत असल्यास त्यापुढील दिवशी जमा करावी लागेल. **10.** वर नमूद कालावधीत भरणा न केल्यास विक्रीची पुन्हा घोषणा करण्यात आल्यानंतर सदर मालमत्तेची खाजगी कराराद्वारे लिलाव / विक्री करण्यात येईल. तोवर भरलेली रक्कम टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड द्वारे जप्त करण्यात येईल अशी कसूर करणारया खरेदीदारास मालमत्तेवर किंवा पुढे त्या मालमत्तेची ज्या रकमेस विक्री करण्यात येईल तिच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा सांगता येणार नाही. **11.** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ला ज्ञात असलेले मालमत्तेवरील बोजे : वरील तक्त्यानुसार. इच्छुक बोलीदारांनी मालमत्ता कर, वीज बिल इ. सह वैधानिक देणी इ. सारख्या मालमत्तेवरील बोज्यांच्या संदर्भात स्वतंत्रपणे चौकशी करावी. **12.** इतर कोणत्याही तपशिलांसाठी किंवा ई-लिलावाच्या प्रक्रियेच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदार सेवा प्रदाते, व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, 585 हेस्टिंग कॉलनी, व्हीआयपी नगर, आनंदपूर, कोलकाता 700 100, यांचेशी त्यांचे समन्वयक द्वारे **Auction.Manager@BidDeal.in, किंवा मनीष बन्सल, ईमेल आयडी : Manish.Bansal@tatacapital.com प्राधिकृत अधिकारी, मो. क्र. 8588983696 यांचेशी संपर्क साधू शकतात, कृपया तुमची शंका व्हॉट्सअप क्र. - 9999078669 वर पाठवावी. 13.** सर्वोच्च घोषित करण्यात आलेल्या बोली रकमेवर सर्वोच्च बोलीदारास 1% दराने टीडीएस द्यावा लागेल. हा भरणा सर्वोच्च बोलीदारास मालक / कर्जदाराच्या पॅनमध्ये करावा लागेल आणि चलन ची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करावी लागेल. **14.** वरील तपशीलासाठी सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर दिलेली https://surl.lt/bfcsee लिंक पाहावी. **15.** तसेच https://www.tatacapital.com/property-disposal.html या लिंकवर देखील ही भेट द्यावी.

**कृपया लक्षात घ्यावे** – टीसीएचएफएल ने या मालमत्तेच्या विक्री / लिलावासाठी वर नमूद लिलाव भागीदाराशिवाय इतर कोणत्याही ब्रोकर / एजंटची नियुक्ती केलेली नाही. कृपया इच्छुकांनी या संदर्भातील कोणत्याही चौकशीसाठी केवळ निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकारयांशी संपर्क साधावा.

स्वा./-
(प्राधिकृत अधिकारी)
टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.

**स्थळ : कोल्हापूर आणि सोलापूर**
**दिनांक : 12.08.2026**

गुणवत्ता अशा लक्ष्यावर नेम साधते जिथे इतर कोणीही पोहोचू शकत नाही; तर प्रतिभा असा लक्ष्यभेद करते, जो इतर कोणालाही दिसत नाही.
- आर्थर शोपेनहाउअर, जर्मन तत्त्वज्ञ

# महान नेते, सुधारक आणि प्रशासक

स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात
एमपीएससी
रोहिणी शहा

**प्रत्येक व्यक्तिमत्त्वासाठी ५ मूल्ये, २ जीवनप्रसंग, २ प्रशासकीय उपयोग, १ प्रसिद्ध विचार/संदेश अशी छोटी नोट तयार करावी. अशा नोट्समुळे संपूर्ण पेपरमध्ये त्याच व्यक्तिमत्त्वांचा अनेक प्रश्नांमध्ये प्रभावीपणे वापर करता येईल.**

**मानवी मूल्यांच्या** जोपासनेमध्ये महान नेते, सुधारक व प्रशासक यांच्या प्रभावाबाबत या लेखात चर्चा करु. या मुद्याची तयारी करताना केवळ महान व्यक्तींची चरित्रे किंवा त्यांचे प्रसिद्ध विचार पाठ करणे अपेक्षित नाही. त्यांच्या जीवनातील संघर्षमय प्रसंग, त्यावेळचे निर्णय, त्यामागची मूल्ये, नेतृत्वशैली, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक जीवनातील योगदान यांचा अभ्यास करून त्यातून आजच्या काळात कोणते धडे मिळतात हे समजून घेणे आवश्यक आहे.

एखाद्या महान व्यक्तीच्या जीवनातील मूल्ये प्रत्यक्ष जीवनात आणि विशेषतः लोकसेवा, प्रशासन, नेतृत्व व निर्णयप्रक्रियेत कशी लागू करता येतील, हे उमेदवाराला स्पष्ट करता यावे, हे आयोगाला अपेक्षित आहे.

प्रत्येक महान नेता, सुधारक किंवा प्रशासकाचा अभ्यास करताना पुढील मुद्दे विचारात घ्यावेत- त्यांची समकालीन सामाजिक किंवा प्रशासकीय परिस्थिती, समोरील आव्हाने, कार्यातून दिसलेली मूल्ये, त्यांच्या कार्याचा व त्यातील मूल्यांचा तत्कालीन समाजावर किंवा प्रशासनावर झालेला परिणाम आणि आजच्या प्रशासकीय व्यवस्थेत त्या शिकवणीचा उपयोग.

या व्यक्तिमत्त्वांच्या जीवनातून कोणता नैतिक किंवा प्रशासकीय निष्कर्ष उत्तरात मांडता येईल हे समजून घेणे हा तयारीचा सर्वात महत्वाचा भाग आहे.

प्रत्येक व्यक्तिमत्त्वांसाठी या मुद्द्यांच्या आधारे केलेली तयारी परिपूर्ण आणि उत्तरलेखन अधिक विश्लेषणात्मक होते.

### मूल्यकेंद्री अभ्यासासाठी व्यक्तिमत्त्वे

**भारतीय नेते** : महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम

**समाजसुधारक** : महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजा राममोहन रॉय, स्वामी विवेकानंद, संत गाडगेबाबा, विनोबा भावे

**प्रशासकीय व्यक्तिमत्त्वे** : सरदार वल्लभभाई पटेल, टी. एन. शेषन , ई. श्रीधरन, डॉ. किरण बेदी, आर्मस्ट्रॉंग पेम, एस. आर. शंकरन



## महान नेते

आदर्श नेता केवळ लोकांना दिशा देत नाही तर स्वतःच्या आचरणातून उदाहरण निर्माण करतो. कठीण परिस्थितीतही मूल्यांशी तडजोड न करता निर्णय घेणे हे प्रभावी नेतृत्वाचे महत्त्वाचे लक्षण आहे. या दृष्टिकोनातून महान नेत्यांच्या जीवनाचा अभ्यास करताना नेतृत्व, सत्यनिष्ठा, धैर्य, त्याग, दूरदृष्टी, लोककल्याण, समावेशकता आणि परिस्थितीचे व्यवस्थापन यांसारख्या मूल्यांवर भर द्यावा.

## समाजसुधारक

समाज सुधारकांचा अभ्यास करताना समाजातील अन्यायकारक प्रथा आणि असमानतेविरुद्ध त्यांनी केलेल्या संघर्षावर लक्ष केंद्रित करावे.

त्यांच्या जीवनातून सामाजिक धैर्य, विवेकवाद, समानता, मानवतावाद, शिक्षण, स्त्रीसक्षमीकरण आणि सामाजिक न्याय यांचे धडे कसे मिळतात ते विचारात घ्यायवा हवे.

## प्रशासक

एक आदर्श प्रशासक केवळ नियमांची अंमलबजावणी करणारा अधिकारी नसतो. तो सार्वजनिक हित, कायद्याचे राज्य, निष्पक्षता, सचोटी, उत्तरदायित्व, पारदर्शकता, संवेदनशीलता आणि कार्यक्षमता यांचा समतोल राखणारा लोकसेवक असतो. प्रशासकांच्या जीवनाचा अभ्यास करताना त्यांच्या निर्णयक्षमता, गंभीर परिस्थितीचे व्यवस्थापन, भ्रष्टाचाराविरोधातील भूमिका, नागरिकांशी वर्तन, नाविन्यपूर्ण उपाय आणि त्यांनी सार्वजनिक हिताला दिलेले प्राधान्य समजून घ्यावे.

सोबतच्या तक्त्यामध्ये अभ्यासासाठी व्यक्तिमत्त्वांची यादी दिली आहे.

प्रत्येक व्यक्तीमत्वाचे संपूर्ण चरित्र वाचण्याऐवजी नीतिमूल्यात्मक रूपरेषा तयार करावी. उदाहरणार्थ, महात्मा गांधींच्या बाबतीत संपूर्ण स्वातंत्र्यलढा पाठ करण्याऐवजी पुढील मुद्दे तयार करावेतः परिस्थिती → आव्हान → निर्णय → मूल्य → परिणाम → आजची उपयुक्तता.

अशा प्रकारे प्रत्येक व्यक्तिमत्त्वाच्या जीवनातील दोन किंवा तीन महत्त्वपूर्ण प्रसंग लक्षात ठेवावेत. त्यामुळे उत्तरामध्ये केवळ नाव किंवा विचार न देता जीवनातील वास्तविक प्रसंगाच्या आधारे मूल्य स्पष्ट करता येईल.

या घटकाचा अभ्यास करताना व्यक्तिमत्त्वांचे अंधानुकरण करण्याऐवजी त्यांच्या विचारांचा संदर्भ, मर्यादा आणि आजच्या काळातील उपयुक्तता यांचाही विचार करायला हवा.

उदाहरणार्थ, एखाद्या ऐतिहासिक नेत्याची विशिष्ट रणनीती त्या काळातील परिस्थितीत योग्य असू शकते; परंतु आधुनिक लोकशाही प्रशासनामध्ये तिचा वापर करताना घटनात्मक मूल्ये, कायद्याचे राज्य आणि मानवी अधिकार यांचा विचार करावा लागतो. उत्तरामध्ये विवेकपूर्ण आणि संतुलित दृष्टिकोन असायला हवा. या मुद्द्याचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे महान व्यक्तिमत्त्वांच्या शिकवणीचा आजच्या प्रशासनाशी संबंध जोडणे. उदाहरणार्थ, महात्मा गांधींच्या सत्य आणि साधनशुचितेचा संबंध भ्रष्टाचारविरोधी प्रशासनाशी जोडता येतो. डॉ. आंबेडकरांच्या समतेच्या विचारांचा संबंध सामाजिक न्याय आणि समावेशक धोरणांशी जोडता येतो. सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणविषयक कार्याचा संबंध मुलींचे शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाशी जोडता येतो. टी. एन. शेषन यांच्या निष्पक्षतेचा संबंध संस्थात्मक स्वायत्तता आणि निवडणूक व्यवस्थेतील पारदर्शकतेशी जोडता येतो.

या तयारीच्या आधारे केस स्टडीच्या प्रश्नांमध्ये एखाद्या अधिकाऱ्यासमोर राजकीय दबाव, भ्रष्टाचार, हितसंबंधांचा संघर्ष, दुर्बल घटकांवरील अन्याय किंवा नैतिक दुविधा निर्माण झाल्यास महान व्यक्तिमत्त्वांच्या शिकवणीचा संदर्भ देऊन उत्तर परिणामकारक करता येईल. मात्र उत्तरामध्ये त्या व्यक्तिमत्त्वांच्या मूल्याचा निर्णयाशी थेट संबंध स्पष्ट करणे आवश्यक आहे.

steelframe.india@gmail.com

# करिअरवाढीच्या संकल्पना

**प्रत्येकाचा करिअरमधला प्रवास वेगळा असतो. त्यामुळे प्रश्न केवळ 'माझी पुढची नोकरी कोणती?' असा नाही तर 'माझ्या कारकिर्दीतून मी काय घडवत आहे?' असा आहे. पुढील काही लेखात आपण करिअरसंबंधीच्या महत्त्वाच्या संकल्पना समजून घेऊया.**





कौशल्य तंत्र
सलील चिंचोरे

**करिअरच्या बाबतीत** आपल्याकडून घडणारी चूक म्हणजे 'असेच काम करीत राहिलो तर करिअर पुढे कुठेतरी जाईल' असे गृहीत धरणे. आतापर्यंत कंपनीमध्ये रुजू व्हायचे, परिश्रम करायचे, बढती मिळवायची व कॉर्पोरेट शिडी चढायची हा आदर्श पायंडा होता. पण आजची करिअर्स क्वचितच शिडीसारखी असतात. एखादा फायनान्समधून स्ट्रॅटेजीकडे वळू शकतो, कुणी सीएक्सओ होण्याऐवजी विशेषज्ञ होतो. काही करिअर्स वेगाने पुढे जातात; काही वळणे घेतात आणि काही पूर्णपणे दिशा बदलतात. यातून एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवतोः करिअरवाढीचा नेमका अर्थ काय आहे? मोठे पद, जास्त पगार आणि का हाताखाली अधिक लोक? आपल्या करिअरमधून काय हवे आहे याची स्पष्ट जाणीव आपल्याला असते का?

गेल्या काही वर्षांत करिअरबद्दल अनेक संकल्पना विकसित झाल्या आहेत. या संकल्पना वेगवेगळ्या वाटू शकतात. पण त्यातून लक्षात येते की करिअर संस्थात्मक मार्गावरून एका वैयक्तिक प्रवासाकडे सरकत आहे. तुमची कंपनी तुम्हाला संधी पुरवू शकते. पण हा प्रवास घडवण्याची जबाबदारी तुमचीच आहे. प्रत्येकाचा करिअरमधला प्रवास वेगळा असतो. त्यामुळे प्रश्न केवळ 'माझी पुढची नोकरी कोणती?' असा नाही तर 'माझ्या कारकिर्दीतून मी काय घडवत आहे?' असा आहे. पुढील काही लेखात आपण करिअरसंबंधीच्या महत्त्वाच्या संकल्पना समजून घेऊया.

पहिली संकल्पना म्हणजे 'करिअर लॅडर (शिडी)'. करिअर लॅडर हे करिअरमधील प्रगतीचे पारंपरिक प्रारूप आहे. २० व्या शतकात मोठ्या कंपन्यांमध्ये याचा उदय झाला. या संकल्पनेत कंपनीतील पदे ठराविक स्तरांमध्ये विभागलेली असतात. कर्मचाऱ्यांनी त्या स्तरांमधून वरच्या दिशेने प्रगती करावी अशी अपेक्षा असते. हे मॉडेल कर्मचाऱ्यांना आपली सध्याची स्थिती आणि करिअरमधील पुढील टप्पा कसा असेल याची जाणीव करून देते. तिथे पोहोचण्यासाठी कोणती क्षमता, कौशल्ये सिद्ध करावी लागतील हेही कर्मचाऱ्यांना समजते. करिअर लॅडरचे सोपे उदाहरण म्हणजे कर्मचारी → सहाय्यक व्यवस्थापक → व्यवस्थापक → वरिष्ठ व्यवस्थापक → उपाध्यक्ष → सीएक्सओ. आजही बहुतांशी कंपन्यांमध्ये या संकल्पनेचा वापर केला जातो. कर्मचारीही या संकल्पनेच्या मानसिकतेमध्ये आढळतात. त्यांच्यासाठी करिअरची वाढ म्हणजे फक्त आणि फक्त प्रमोशन मिळवणे. या संकल्पनेतील उणीव म्हणजे ही पद्धत करिअरमधील प्रगतीला केवळ वरच्या पदावर जाण्याशीच जोडते. कंपन्यांमध्ये कनिष्ठ पदांच्या तुलनेत वरिष्ठ पदे कमी असतात. म्हणून प्रत्येकाला प्रमोशनची समान संधी मिळेल असे नाही. यासाठी प्रगतीशील कंपन्यांनी करिअर लॅडर संकल्पनेत बदल केला. आधुनिक लॅडर पदांपेक्षा कामाची गुंतागुंत, प्रभाव आणि उत्तरदायित्व वाढवण्यावर अधिक भर देते. तुमच्या कंपनीत या संकल्पनेचा वापर होत असेल तर 'मला प्रमोशन मिळायला किती वेळ लागेल?' असे विचारण्यापेक्षा 'पुढच्या स्तरावर जाण्यासाठी मी काय करून दाखवू ?' असा प्रश्न स्वतःला विचारा.

दुसरी संकल्पना म्हणजे 'करिअर लॅटिस'. लॅडर संकल्पनेत करिअरची वाढ प्रामुख्याने उभी असते. लॅटिस संकल्पनेत करिअर पुढे जाण्यापूर्वी बाजूला, तिरकस आणि कधीकधी मागेही जाऊ शकते. उदाहरणार्थ, कर्मचारी सेल्स → मार्केटिंग → प्रोडक्ट → स्ट्रॅटेजी, किंवा इंजिनिअरिंग → प्रॉडक्ट मॅनेजमेंट → बिझनेस लीडरशिप अशा टप्प्यांतून जाऊ शकतो. एका आडव्या टप्प्यामुळे लगेचच उच्च पद, पगार मिळेलच असे नाही. परंतु त्यामुळे कर्मचाऱ्याच्या क्षमता आणि भविष्यातील पर्यायांमध्ये लक्षणीय वाढ होऊ शकते. लॅटिस संकल्पना करिअरच्या मधल्या टप्प्यातील कर्मचाऱ्यांसाठी खास महत्त्वाची आहे. करिअर लॅटीस सुचवते की केवळ तात्काळ प्रमोशन मिळवण्याच्या उद्देशाने करिअरमधील प्रत्येक पाऊल उचलू नका. 'या निर्णयामुळे तीन वर्षांनंतर माझे मूल्य अधिक वाढेल असा काही अनुभव मला मिळेल का?' हे आधी स्वतःला विचारा.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत.)

# 'फिनटेक'साठी तयार आहात का?



चौकटी-पल्याड
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

**वित्त आणि तंत्रज्ञान यांच्या या संगमातून वेगाने विकसित होणारे क्षेत्र म्हणजे 'फिनटेक'. परदेशातील विद्यापीठांमध्ये फिनटेकचे अभ्यासक्रमही वेगवेगळ्या स्वरुपात विकसित होत आहे.**

**मोबाईलवरून पैसे** पाठवणे, काही मिनिटांत कर्ज मिळवणे, घरबसल्या गुंतवणूक करणे, विमा खरेदी करणे किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने आर्थिक निर्णय घेणे, आजच्या या सगळ्या व्यवहारांमागे तंत्रज्ञानाची महत्त्वाची भूमिका आहे. वित्त आणि तंत्रज्ञान यांच्या संगमातून वेगाने विकसित होणारे क्षेत्र म्हणजे फिनटेक.

फिनटेक म्हणजे केवळ ऑनलाइन बँकिंग किंवा डिजिटल पेमेंट नव्हे. डिजिटल बँकिंग, मोबाइल पेमेंट, डिजिटल कर्जव्यवस्था, गुंतवणूक, विमा, आर्थिक जोखीम व्यवस्थापन, फसवणूक शोधणे, कृत्रिम बुद्धिमत्ता, माहितीचे विश्लेषण, सायबर सुरक्षा, ब्लॉकचेन आणि आर्थिक नियमन अशा अनेक क्षेत्रांचा त्यात समावेश होतो. त्यामुळे परदेशातील विद्यापीठांमध्ये फिनटेकचे अभ्यासक्रमही वेगवेगळ्या स्वरूपात विकसित होत आहेत.

उदाहरणार्थ, सिंगापूरमधील नानयांग तंत्रज्ञान विद्यापीठात फिनटेकच्या अभ्यासक्रमात कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञान, माहितीचे विश्लेषण आणि डिजिटल आर्थिक सेवा यावर भर आहे. हॉंगकॉंग विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठाचा अभ्यासक्रम अभियांत्रिकी, व्यवसाय व्यवस्थापन आणि विज्ञान या तीन शाखांना जोडतो. लंडनमधील युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनचा अभ्यासक्रम तुलनेने अधिक संगणकशास्त्र आणि गणित-आधारित आहे. तर सरे विद्यापीठात फिनटेकसोबत आर्थिक धोरण आणि नियमनाचा अभ्यास करता येतो.

| विद्यापीठ | देश | अभ्यासक्रमाची दिशा | कोणासाठी ? |
|---|---|---|---|
| युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन | ब्रिटन | संगणकशास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्ता, वित्त | गणित/अभियांत्रिकी/ संगणकशास्त्र पार्श्वभूमी |
| वॉरिक बिझनेस स्कूल | ब्रिटन | वित्त, तंत्रज्ञान, माहिती-विश्लेषण | विविध शाखांतील विद्यार्थी |
| नानयांग तंत्रज्ञान विद्यापीठ | सिंगापूर | कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आर्थिक सेवा | तंत्रज्ञान व वित्त दोन्हीमध्ये रस असणारे |
| हॉंगकॉंग विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठ | हॉंगकॉंग | विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवसाय यांचा संगम | बहुविषयक शिक्षण घेऊ इच्छिणारे |
| रीडिंग विद्यापीठ | ब्रिटन | वित्त, ब्लॉकचेन, डिजिटल चलन, यंत्र-अधिगम | वित्त व तंत्रज्ञानाचा संगम शोधणारे |
| कार्नेगी मेलॉन विद्यापीठ | अमेरिका | संगणकीय वित्त, गणित, सांख्यिकी | अत्यंत गणिती व तांत्रिक विद्यार्थ्यांसाठी |
| सरे विद्यापीठ | ब्रिटन | फिनटेक, आर्थिक धोरण व नियमन | वित्त, धोरण आणि तंत्रज्ञानात रस असणारे |

## कोणासाठी योग्य?

संगणकशास्त्र, गणित, सांख्यिकी आणि माहिती-विश्लेषण आवडणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक माहितीचे विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता, अल्गोरिदमवर आधारित व्यापार किंवा जोखीम विश्लेषण यांसारख्या क्षेत्रात जाता येते. वाणिज्य, अर्थशास्त्र, व्यवसाय व्यवस्थापन किंवा वित्त विषयाची पार्श्वभूमी असणाऱ्यांना डिजिटल बँकिंग, आर्थिक उत्पादने, डिजिटल पेमेंट, सल्लागार सेवा किंवा आर्थिक तंत्रज्ञान व्यवस्थापनाची दिशा निवडता येते. तर उद्योजक वृत्तीच्या विद्यार्थ्यांसाठी डिजिटल कर्ज, विमा, संपत्ती व्यवस्थापन किंवा वैयक्तिक आर्थिक नियोजन या सारख्या क्षेत्रांत नवे व्यवसाय उभे करण्याची संधी मिळू शकते.

परदेशात फिनटेक शिकण्याचा निर्णय घेताना केवळ अभ्यासक्रमाच्या नावावर किंवा विद्यापीठाच्या क्रमवारीवर विसंबून राहू नये. आपण निवडत असलेल्या अभ्यासक्रमात गणित, संगणकशास्त्र, वित्त आणि माहिती-विश्लेषणाचे प्रमाण किती आहे, प्रवेशासाठी कोणती पूर्वतयारी आवश्यक आहे, उद्योगातील प्रत्यक्ष प्रकल्प किंवा प्रशिक्षणाची संधी आहे का, अभ्यासक्रमानंतर कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या मिळतात आणि एकूण शिक्षणखर्चाच्या तुलनेत त्याचा परतावा किती आहे, हे सारे मुद्दे तपासणे आवश्यक आहे. फिनटेकचे आकर्षण त्याच्या बहु-विषयक स्वरूपात आहे. उद्याची बँक, पेमेंट व्यवस्था, विमा आणि गुंतवणूक कशी असेल, हे केवळ बँकर ठरवणार नाहीत. त्यात संगणकशास्त्रज्ञ, माहिती-विश्लेषक, अर्थतज्ज्ञ, गणितज्ञ, उद्योजक आणि धोरणतज्ज्ञ यांचीही भूमिका असेल. म्हणूनच फिनटेक म्हणजे केवळ उद्याच्या बँकेत नोकरी मिळवण्याचा मार्ग नाही, तर उद्याची आर्थिक व्यवस्था घडवणाऱ्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी आहे.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

## कोडिंगपासून तंत्रज्ञानाच्या नेतृत्वापर्यंत...

मुंबई विद्यापीठातून कॉम्प्युटर इंजिनीअरिंगची पदवी घेतल्यानंतर स्नेहा वालावलकर हिने सिंटेल या कंपनीत दोन वर्षे काम केले. काम मुख्यतः कोडिंगशी संबंधित होते. मात्र तंत्रज्ञानाचा वापर केवळ कोड लिहिण्यापुरता मर्यादित नसून त्याचा व्यवसाय, डेटा आणि व्यवस्थापनाशीही जवळचा संबंध आहे, हे या काळात तिच्या लक्षात आले. याच जाणिवेतून मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम्स अर्थात एमआयएसमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेण्याची इच्छा निर्माण झाली. सिंटेलमध्ये काम करत असतानाच तिने जीआरई आणि टोफेलची तयारी सुरु केली. समुपदेशकाच्या मदतीने अमेरिकेतील एमआयएसचे विविध अभ्यासक्रम आणि विद्यापीठांचा अभ्यास करून युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलँड, बाल्टिमोर काउंटी (यूएमबीसी) येथील अभ्यासक्रमाची निवड केली. यूएमबीसीमध्ये दाखल झाल्यानंतर तिने आठवड्याला २० तास कॅम्पसवर काम सुरू केले. यूएमबीसीमधील अभ्यासक्रमाने तिच्या करिअरला नवी दिशा दिली. डेटा सायन्स, डेटा मायनिंग, डेटा वेअरहाउसिंग, ह्युमन-सेंट्रिक कम्प्युटिंग, इकॉनॉमिक्स आणि सॉफ्टवेअर डॉक्युमेंटेशन अशा विषयांचा तिने अभ्यास केला. त्यामुळे कॉम्प्युटर इंजिनीअरिंगमधील तांत्रिक ज्ञानाला व्यवसाय आणि डेटाची जोड मिळाली. मास्टर्सनंतर अमेरिकेत नोकरी मिळवण्यासाठी तिने अनेक करिअर फेअर्सना भेटी दिल्या, असंख्य अर्ज केले आणि मुलाखती दिल्या. सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर बोस्टनमधील स्टेट स्ट्रीट



कॉर्पोरेशनमध्ये सिस्टम ॲनालिस्ट-प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर म्हणून तिची निवडझाली. एमआयएस शिक्षणाशी थेट जोडलेली ही भूमिका पुढील करिअरसाठी महत्त्वाची ठरली. अमेरिकेत चार वर्षे राहिल्यानंतर तेथील जीवनशैली आपल्याला फारशी भावत नाही, हे तिच्या लक्षात आले. भारतात परतण्याच्या इच्छेने तिने बजाज फायनसर्व्हमध्ये काम सुरू केले. २०१८ पासून एका सुप्रसिद्ध बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये यूजर एक्सपिरिअन्स डिझाइनपासून सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट लीडरशिपपर्यंत तिने वाटचाल केली आहे. २०२४मध्ये ती ग्लोबल सर्व्हिसेसमधील डायरेक्टर-सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट या पदावर पोहोचली. परदेशात शिकणे म्हणजे परदेशातच स्थायिक होणे नाही. आपल्या आवडीचा विषय ओळखणे, योग्य अभ्यासक्रम निवडणे, उपलब्ध संधींचा उपयोग करणे आणि सातत्याने प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. परदेशातून मिळालेला अनुभव आणि ज्ञान घेऊन भारतात परतूनही जागतिक दर्जाचे करिअर घडवता येते.

## शब्दकोडे- ६३



**आडवे शब्द :-**

(१) एक इंग्रजी महिना (४) रामायणात उल्लेख असलेले एक मोठे जंगल
(८) विजयादशमी (१०) कसून केलेली तपासणी (११) शेकडा
(१३) नूतन (१५) पर्वत (१६) खीर
(१८) बळ, ताकद (२०) भरपूर, मुबलक
(२२) तबेला, अश्वशाळा (२३) सरळ, सोपा
(२५) XXXX करणे म्हणजे चिडचिड करणे, रागाने बोलणे (२७) मुंबई उपनगरीय रेल्वेच्या पश्चिम रेल्वे मार्गावरील एक प्रमुख स्थानक
(२८) विस्मित, थक्क
(२९) गाडीचे वरील आच्छादन
(३०) दंड, भुज
(३१) एक हलकाफुलका विनोदी काव्यप्रकार
(३४) हलविता येण्यासारखी (संपत्ती)
(३७) पक्ष्यांचा मधुर ध्वनी
(३९) श्रवणेंद्रिय (४०) XXX उडणे म्हणजे घाबरगुंडी होणे (४१) नक्र
(४२) सूर्यकिरणांची धग

**उभे शब्द :-**

(१) अभिनय, गायन किंवा नृत्य क्षेत्रात काम मिळवण्यासाठी कलाकाराने दिलेली चाचणी (इंग्रजी शब्द) (२) एक पाणपक्षी (३) फळातील द्रव (५) बारा वस्तूंचा गट, संच (६) तुळशीच्या काडीच्या टोकाला कापूस गुंडाळून केलेला काकडा (७) मदनाची स्त्री (९) देशाशी संबंधित असलेला (१२) एक फुलझाड (१४) मुसळधार (पाऊस) (१६) हरणाचे पिल्लू
(१७) झपाट्याने, भरभर (१९) मुंबई-नाशिक मार्गावर असलेला घाट (२१) जमिनीत सहज उगवणारी आणि गुरांचा चारा असलेली एक तृण वनस्पती (२४) जगातील तिसरे सर्वात उंच पर्वतशिखर (२६) अध्यादेश (२७) अजब, चमत्कारिक (३१) मर्कट (३२) शाश्वत, मजबूत (३३) जंगल, वन (३५) मासा पकडण्यासाठी बनवलेला धातूचा आकडा (३६) एक जुने वजन व माप (३८) विश्व, दुनिया

– मनाली रानडे

manalikode26@gmail.com

## सुडोकू - ६३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | | ३ | | | ७ | | |
| ९ | २ | | १ | | | | | |
| | | ६ | | | | | ५ | |
| | ५ | | | | | ३ | | |
| | ३ | ८ | ५ | | ४ | ६ | १ | |
| | | २ | | | | | ८ | |
| | ७ | | | | | १ | | |
| | | | | | ६ | | ७ | ८ |
| | | ५ | | | १ | | ६ | |

## शब्दकोडे - ६२ चे उत्तर



## सुडोकू- ६२ चे उत्तर



## मध्य रेल्वे
पुणे मंडळ

### लिलाव विक्री

मध्य रेल्वेच्या पुणे पार्सल कार्यालयात ठेवलेल्या हरवलेल्या मालमत्तेची **जशी आहे जेथे आहे** तत्वावर विक्री करण्यात येईल, लिलाव **दि. 25.08.2026 रोजी सकाळी 10.30 वा.** पुणे पार्सल कार्यालयात घेण्यात येईल. प्रक्रियेच्या तपशीलासाठी कृपया मुख्य पार्सल सुपरवायजर यांच्या कार्यालयात कोणत्याही कामकाजाच्या दिवशी **सकाळी 09:00 ते सायं. 17:00 वा.** पर्यंत संपर्क साधावा.

**AK-52** वरी. वि. वा. व्य., पुणे

तुमची जनावरे रेल्वे रुळांपासून दूर ठेवा

## लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे.
### बांधकाम विभाग सन २०२६-२७
### जाहीर ई निविदा सूचना क्र. १३

जा.क्र. लोनप ५/बांधकाम/ई. निविदा/जा. प्रसिध्दी/२०२६-२७/२८६६ दिनांक - ११/०८/२०२६

लोणावळा नगरपरिषदेच्या मान्यतेने व वतीने नगरपरिषद निधीतून / शासनाच्या विविध विकास योजनेतून खालील प्रमाणे कामाकरीता अनुभव असणाऱ्या व शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आवश्यक त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदारांकडून जाहीर ई- निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम रुपये | कालावधी (पावसाळा सोडुन) | निविदा फॉर्मची किंमत रुपये (18% GST सहीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | लोणावळा नगरपरिषद हद्दीतील तुंगार्ली येथील जाखमाता उद्यान मा. शासनाच्या नमो उद्यान योजनेंतर्गत विकसित करणे. | ९५,८३,९१७/- | ९५,८३९/- | १८० दिवस | ३,५४०/- |

सदरील कामाची ई-निविदा व ई-निविदा प्रक्रियेचे संपूर्ण तपशील **http//mahatender.gov.in Tender by Location Lonavala** या संकेतस्थळावर दि. १२/०८/२०२६ ते दि. २१/०८/२०२६ निविदाप्रपत्र डाऊनलोड रक्कम व इसारा रक्कम ऑनलाईन **(Online System)** पध्दतीने भरावयाची आहे. त्याचप्रमाणे ई-निविदा ऑनलाईन भरण्याची मुदत दि. २१/०८/२०२६ रोजी दु. ४.३० वा. निविदा ते दि. २४/०८/२०२६ रोजी दुपारी ४.३० वा. उघडण्यात येतील. याबाबत काही अडचण असल्यास शंका उद्भवल्यास नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाशी संपर्क साधावा.

तसेच ई-निविदा भरतेवेळी अपलोड केलेल्या कागदपत्रांची एक प्रत **(Hard Copy)** नगरपरिषद कार्यालयात सादर करावी. कोणतेही स्पष्टीकरण न देता निविदा नाकारण्याचा हक्क नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- |
| (पंढरीनाथ साठे) | (अशोक साबळे) | (सनी दळवी) | (देविदास कडू) | (राजेंद्र सोनावणे) |
| नगर अभियंता, | मुख्याधिकारी, | बांधकाम समिती सभापती | उपनगराध्यक्ष | अध्यक्ष |
| लोणावळा नगरपरिषद | लोणावळा नगरपरिषद | लोणावळा नगरपरिषद | लोणावळा नगरपरिषद | लोणावळा नगरपरिषद |

लोणावळा नगरपरिषद

## कर्नाटक बँक लि.
तुमची कौटुंबिक बँक * संपूर्ण भारतात *

## विक्रीची ई-लिलाव जाहीर सूचना

मुख्य कार्यालय, मंगळूरु-575002 CIN: L85110KA1924PLC001128

एआरएम शाखा : दुसरा मजला 'ई'- ब्लॉक, द मेट्रोपॉलिटन, प्लॉट क्र. सी-26 आणि सी-27, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व) मुंबई - 400051. लँडलाईन: 022-35008017/35128482/35082558 ई-मेल : mumbaiarm@ktkbank.com वेबसाइट : www.karnatakabank.com

### 22.09.2026 रोजी अचल मालमत्तांची विक्री सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स 2002 मधील नियम 8(6) आणि 9(1) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.** याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून (ताब्याचे तपशील खाली नमूद करण्यात आलेले आहेत) **कर्नाटक बँक लि.** यांना घेणे असलेल्या थकबाकीच्या आणि तीवरील व्याज व शुल्कांच्या वसुलीसाठी त्यांची **दि. 22.09.2026** रोजी खाली नमूद वेळेत **'जशी आहे जेथे आहे'** आणि **'जशी आहे जे काही आहे'** आणि **'तेथे जे काही आहे'** तत्त्वावर विक्री करण्यात येईल. तपशील याप्रमाणे आहे आणि आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे आणि बयाणा रक्कम **दि. 21.09.2026 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत** खात्यात ऑनलाईन भरणा करून (तपशील खाली नमूद करण्यात आलेला आहे) जमा करावी.

| अ. क्र. | शाखेचे नाव | कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता | थकबाकी शिल्लक रु. | मालमत्तांचे वर्णन | आरक्षित किंमत / बयाणा रक्कम | लिलावाचा दिनांक व वेळ / बोली वृद्धी मूल्य | बयाणा रक्कम जमा करण्यासाठी खाते क्र. / आयएफएससी कोड चा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पिंपरी चिंचवड शाखा | **(अ) 1. मे. तेजस एन्टरप्रायजेस, द्वारे प्रोप्रायटरः श्री चंद्रशेखर गणपत अरु, पत्ताः** दुकान क्र. 1, संस्कृती बिल्डिंग, विंग ए, आयडीबीआय बँकेजवळ, पुणे मुंबई रोड, चिंचवड, पुणे - 411019. **2. श्री चंद्रशेखर गणपत अरु, वडिलांचे नाव श्री गणपत धोंडीबा अरु, 3. श्रीमती स्वाती चंद्रशेखर अरु, पतीचे नाव श्री चंद्रशेखर गणपत अरु. क्र. 2 व 3 पत्ताः** 45/8, सदनिका क्र. 1, सरस्वती महल, शीला विहार कॉलनी, एरंडवणे, शिळ फाटा, पुणे - 411038. **(ब) 1. श्री चंद्रशेखर गणपत अरु, वडिलांचे नाव श्री गणपत धोंडीबा अरु, 2. श्रीमती स्वाती चंद्रशेखर अरु, पतीचे नाव श्री चंद्रशेखर गणपत अरु, क्र. 2 व 3 पत्ताः** 45/8, सदनिका क्र. 1, सरस्वती महल, शीला विहार कॉलनी, एरंडवणे, शिळ फाटा, पुणे - 411038. | **अ] रु. 12,21,581.55 (रुपये बारा लक्ष एकवीस हजार पाचशे एक्क्याऐंशी आणि पंचावन्न पैसे फक्त) म्हणजे दि. 31.07.2026 रोजी PSOD खाते क्र. 6147000600000601 अंतर्गत रु. 8,61,784.55 आणि दि. 27.07.2026 रोजी DPN खाते क्र. 0614702400002201 अंतर्गत रु. 3,59,797.00 अधिक 27.07.2026 पासूनचे पुढील व्याज अधिक कर्नाटक बँक लि., पिंपरी चिंचवड शाखा यांना घेणे असलेली शुल्के. ब] OD खाते क्र. 6147000100000501 अंतर्गत दि. 31.07.2026 रोजी रु. 7,12,044.37 (रुपये सात लक्ष बारा हजार चौरेचाळीस आणि सदतीस पैसे फक्त) अधिक 01.08.2026 पासूनचे पुढील व्याज अधिक कर्नाटक बँक लि., पिंपरी चिंचवड शाखा यांना घेणे असलेली शुल्के.** | दुकान क्र. 1, तळ मजला, ए विंग, संस्कृती को-ऑप.रेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., क्षेत्रफळ सुमारे 333.00 चौ.फू. (बिल्ट अप क्षेत्रफळ) (दस्तावेजामधील क्षेत्रफळ 223.00 चौ.फू. + लॉफ्टचे क्षेत्रफळ 110.00 चौ.फू.), सीटीएस क्र. 4628, स.क्र. 199/ए/5, मुंबई-पुणे रोड, चिंचवड, पुणे - 411019, पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या हद्दीत. **चतुःसीमाः पूर्वेस** - सोसायटीचा प्रवेश रस्ता, **पश्चिमेस** - पार्किंग, **उत्तरेस** - दुकान क्र. 2, **दक्षिणेस** - पार्किंग व डक्ट. | **रु. 39.35,000/-** (रुपये एकोणचाळीस लक्ष पस्तीस हजार फक्त)<br>**रु. 3,93,500/-** (रुपये तीन लक्ष त्र्याण्णव हजार पाचशे फक्त) | **22.09.2026 रोजी स. 11.00 ते 11.15 वाजेपर्यंत**<br>**रु. 10,000/-** | **आरटीजीएस खाते क्रमांकः 6143500300002401, खात्याचे नावः कर्नाटक बँक लि., पिंपरी चिंचवड शाखा, आयएफएससी कोड - KARB0000614** |
| 2 | पुणे बावधन बुद्रुक शाखा | **(1) श्रीमती मनीषा दत्तात्रय लोंढे, पतीचे नाव दिवंगत श्री सचिन तुकाराम ताजवे, पत्ताः** सदनिका क्र. 22, वृंदावन गार्डन, फेज-I, स.क्र. 15, सीडब्ल्यूपीआरएस गेटजवळ, हॉटेल इंद्रप्रस्थजवळ, खडकवासला, पुणे - 411024. | **TL खाते क्र. 9337001600001501 अंतर्गत रु. 6,02,905.94 (रुपये सहा लक्ष दोन हजार नऊशे पाच आणि चौऱ्याण्णव पैसे फक्त) अधिक 30.07.2026 पासूनचे पुढील व्याज अधिक कर्नाटक बँक लि., पुणे बावधन बुद्रुक शाखा यांना घेणे असलेली शुल्के.** | निवासी सदनिका क्र. 22, चौथा मजला, क्षेत्रफळ सुमारे 548 चौ.फू. बिल्ट-अप म्हणजे 50.91 चौ.मी., वृंदावन गार्डन बिल्डिंग, सर्वे क्र. 15, हिस्सा क्र. 1, खडकवासला, तालुका हवेली, जिल्हा पुणे, ग्रामपंचायत खडकवासला च्या हद्दीत, तालुका पंचायत समिती हवेली, जिल्हा परिषद पुणे आणि जिल्हा निबंधक पुणे, उप निबंधक हवेली पुणे यांचे अधिकार-क्षेत्रात. **चतुःसीमाः पूर्वेस** - स.क्र 15 पैकी, **पश्चिमेस** - स.क्र. 15 व 18 पैकी, **उत्तरेस** - पुणे सिंहगड रोड, **दक्षिणेस** - स.क्र. 15 पैकी. | **रु. 20,30,000/-** (रुपये वीस लक्ष तीस हजार फक्त)<br>**रु. 2,03,000/-** (रुपये दोन लक्ष तीन हजार फक्त) | **22.09.2026 रोजी स. 11.45 ते दु. 12.00 वाजेपर्यंत**<br>**रु. 10,000/-** | **आरटीजीएस खाते क्रमांकः 9333500300002401, खात्याचे नावः कर्नाटक बँक लि., पुणे बावधन बुद्रुक शाखा, आयएफएससी कोड - KARB0000933** |

**(सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदार/गहाणकाराचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) मधील तरतुदीकडे वेधण्यात येते.)**

विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया **कर्नाटक बँक च्या https://karnatakabank.bank.in** या वेबसाईटवरील **"Auction Notices" / "Mega Auction Notices"** या मथळ्याअंतर्गत पाहावे.

सदर ई-लिलाव **https://auctionbazaar.com/** या पोर्टलच्या माध्यमातून **दि. 22.09.2026 रोजी** 5 मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारासह घेण्यात येईल. इच्छुक बोलीदारांनी **https://auctionbazaar.com/** या पोर्टलवर आपली नावे नोंदवावीत आणि आपला युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करून घ्यावा तसेच **मे. अर्का इमार्ट प्रा. लि.,** 6-3-1090/1/1, दुसरा मजला, भाग 2बी, उमा हैदराबाद हाऊस, राजभवन रोड, सोमाजीगुडा, हैदराबाद - 500082, **संपर्क क्रः 8370969696 (शिवा) / 7207941010 (सतीश / नीलेश), इमेलः ktkb@auctionbazaar.com / contact@auctionbazaar.com / support@auctionbazaar.com** यांचेकडून ई-लिलावाचे (अंदाजे 21.09.2026 रोजी) प्रशिक्षण प्राप्त करावे.

स्थानः मुंबई
दिनांकः 05.08.2026

स्वा/- मुख्य व्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी
कर्नाटक बँक लि.

## यूको बैंक UCO BANK
(A Govt. of India Undertaking)

अंचल कार्यालयाचा पत्ता: युको बँक, अंचल कार्यालय, पुणे. २१९०/२१९१, सहकारनगर, गल्ली नं. ४, पुणे-४११००९.
फोन : ०२०-२४५४४००६ ईमेल: zopune.rec@ucobank.co.in

### विक्री सूचना
### स्थावर मिळकती करीता {नियम-८(६)}

**सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ मधील नियम ८(६), सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या अन्वये स्थावर मिळकतींची विक्री करण्याकरिता ई-लिलाव विक्री सूचना**

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार आणि/किंवा हमीदार आणि/किंवा त्यांचे ज्ञात व अज्ञात कायदेशीर वारस यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर मिळकत / मिळकती ज्या युको बँक (सेक्युअर्ड क्रेडिटर) यांचेकडे गहाण/ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक/प्रतिकात्मक/प्रत्यक्ष ताबा अधिकृत अधिकारी, युको बँक (सेक्युअर्ड क्रेडिटर) यांनी घेतला आहे, त्यांची विक्री **''जसे आहे तसे'', '' जिथे आहे तिथे'' व ''जशी आहे त्या स्थितीत''** दि.११/०९/२०२६ रोजी, देय रक्कम अधिक न लागू केलेले व्याज, चार्जेस, रक्कम व खर्च, खाली नमूद कर्जदार आणि / किंवा हमीदार आणि/किंवा त्यांचे ज्ञात व अज्ञात कायदेशीर वारस यांचेकडून वसूल करण्याकरिता, युको बँक (सेक्युअर्ड क्रेडिटर) यांचेद्वारे करण्यात येणार आहे. टीडीएस घटक खरेदी मूल्याशिवाय मानला जाईल आणि तो खरेदीदाराने वहन करावा लागेल, ज्यामुळे तो भरल्यानंतर विक्री परिपूर्ण होईल. स्थावर मिळकतीची राखीव किंमत व अनामत रक्कम खाली नमूद केली आहे. विक्री ही खाली सही करणार यांचेतर्फे **website: https://www.baanknet.com/eauction-psb/x-login** या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे करण्यात येईल.

**अनामत रक्कम व बोली कागदपत्रे जमा करण्याचा शेवटचा दिनांक २८/०६/२०२६ रोजी ४.०० वाजेपर्यंत. ई-लिलाव विक्रीचा दिनांक आणि वेळ दि. २१/०६/२०२६ रोजी भा.प्र.वे. दु. १.०० ते ५.०० या वेळेत.**

| शाखेचे नाव आणि फोन नं. ई-मेल आयडी / अधिकृत अधिकारी | कर्जदार / हमीदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन | अ) १३ (२) नोटीस दिनांक, ब) ताबा नोटीसीचा दिनांक, क) थकबाकी रक्कम (रु.) | अ) राखीव किंमत ब) अनामत रक्कम क) वाढीव रक्कम (रु.) | ई-लिलाव विक्रीचा दिनांक व वेळ (अमर्यादित एक्स्टेन्शन १० मिनिटे प्रत्येकी) | ताबा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **शाखा :- पुणे कॅम्प (००६८) अधिकृत अधिकारी :- श्री. सतीश महादेव दुबे मो. क्र. ९९३०८०८५७९** | **कर्जदार :- श्री. मोहम्मद अली रौफ पानसरे व श्रीमती शाझिया रौफ पानसरे जामीनदार :- नाही** | व्यावसायिक मालमत्ता स्थित :- स. नं. ७८९/१, दुकान क्र. १०६ व १०५, सपकाळ कॉम्प्लेक्स, अग्रवाल कॉलनी, सदर बाजार, भवानी पेठ, पुणे, महाराष्ट्र - ४११००२. | अ. १३/०८/२०२५ ब. २८/१०/२०२५ क. रु. ५६,८०,४१३.५३ + न आकारलेले व्याज + पुढील व्याज + इतर शुल्क, त्यातून परतफेड केलेली रक्कम (असल्यास) वजा करून. | अ. रु. ५६,१०,०००/- रु. २८०५०००/- प्रत्येकी ब. रु. ५,६१,०००/- क. रु. १०,०००/- | **११/०९/२०२६ दुपारी १.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (वरीलप्रमाणे अमर्यादित मुदतवाढीसह)** | **प्रतिकात्मक ताबा** |
| **शाखा :- पुणे कॅम्प (००६८) अधिकृत अधिकारी :- श्री. सतीश महादेव दुबे मो. क्र. ९९३०८०८५७९** | **कर्जदार :- श्री. संजू सुखलाल कुमावत व श्रीमती सुनीता संजू कुमावत** | फ्लॅट क्र. ८०६, ८ वा मजला, इमारत क्र.A, D, S, वृंदावन, विठ्ठल मंदिर व PMC पाण्याच्या टाकीजवळ, स. नं. ३/२, ३/४ व ३/५, धानोरी, पुणे - ४११०१५. | अ. १५/११/२०२५ ब. ०९/०४/२०२६ क. रु. २६,४२,६१२/- + न आकारलेले व्याज + पुढील व्याज + इतर शुल्क, त्यातून परतफेड केलेली रक्कम (असल्यास) वजा करून. | अ. रु. ५३,१२,०००/- ब. रु. ५,३१,२००/- क. रु. १०,०००/- | **११/०९/२०२६ दुपारी १.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (वरीलप्रमाणे अमर्यादित मुदतवाढीसह)** | **प्रतिकात्मक ताबा** |
| **शाखा : सोलापूर (०२६४) अधिकृत अधिकारी :- श्री. अभिषेक रंजन मो. क्र. ९७२१९४३९६४** | **कर्जदार :- मे. ए. जे. सेल्स अँड सर्व्हिसेस (मालक - श्री. अमृत सिद्धाप्पा हत्ताळे) जामीनदार -एनए** | जुना सर्व्हे नं. ३२३/२/३, नवीन सर्व्हे नं. १२१/२/३, प्लॉट नं. ११ (भाग) व ९१, फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, श्री मारुती कॉम्प्लेक्स, बसवराज निलय नगर, माजेवाडी, सोलापूर - ४१३००४. **चतु:सीमा : पूर्वेस :** जिना व फ्लॅट नं. १०१ व १०२ **पश्चिमेस :** मोकळी जागा **उत्तरेस :** मोकळी जागा **दक्षिणेस :** फ्लॅट नं. १०४ | अ. २९/११/२०२५ ब. ०७/०२/२०२६ क. रु. ३४,४७,४८२.६९ + न आकारलेले व्याज + पुढील व्याज + इतर शुल्क, त्यातून परतफेड केलेली रक्कम (असल्यास) वजा करून. | अ. रु. ३२,००,०००/- ब. रु. ३,२०,०००/- क. रु. १०,०००/- | **११/०९/२०२६ दुपारी १.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (वरीलप्रमाणे अमर्यादित मुदतवाढीसह)** | **प्रतिकात्मक ताबा** |
| **शाखा : इचलकरंजी (२२२३) अधिकृत अधिकारी : श्री. सतीश महादेव दुबे मो. क्र. ९९३०८०८५७९** | **कर्जदार :- श्रीमती अनुजा अनिल गंजावे जामीनदार :- श्री. आनंद लक्ष्मण गंजावे** | सी. एस. नं. ७४२६, डब्ल्यू. एच. १५, एच. नं. ३०५/८, प्लॉट नं. २८, कला नगर, इचलकरंजी, कोल्हापूर - ४१६११५. | अ. १२/०२/२०२६ ब. १३/०५/२०२६ क. रु. १६,४३,२४७.८८/- + न आकारलेले व्याज + पुढील व्याज + इतर शुल्क, त्यातून परतफेड केलेली रक्कम (असल्यास) वजा करून. | अ. रु. ८०,५७,०००/- ब. रु. ८,०५,७००/- क. रु. १०,०००/- | **११/०९/२०२६ दुपारी १.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (वरीलप्रमाणे अमर्यादित मुदतवाढीसह)** | **प्रतिकात्मक ताबा** |
| **शाखा : इचलकरंजी (२२२३) अधिकृत अधिकारी : श्री. सतीश महादेव दुबे मो. क्र. ९९३०८०८५७९** | **कर्जदार :- श्री. शेतकन्ये संजय दत्तात्रय जामीनदार :- श्री. राजेश दत्तात्रय शेटके** | प्लॉट नं. ९ (भाग), आर. एस. नं. ३०९, महाश्वेता टेक्स्टाईल एलएलपीजवळ, रेल्वे ओव्हर ब्रिजजवळ, तारदाळ-हातकणंगले रस्ता, गाव - हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. | अ. ३१/०१/२०२० ब. १३/०५/२०२५ क. रु. २५,२९,११३.६२/- + न आकारलेले व्याज + पुढील व्याज + इतर शुल्क, त्यातून परतफेड केलेली रक्कम (असल्यास) वजा करून. | अ. रु. १०,७७,०००/- ब. रु. १,०७,७००/- क. रु. १०,०००/- | **११/०९/२०२६ दुपारी १.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (वरीलप्रमाणे अमर्यादित मुदतवाढीसह)** | **प्रतिकात्मक ताबा** |
| **शाखा : एम. सी. पिंपरी (१९७०) अधिकृत अधिकारी : श्री. निलेश कुमार मो. क्र. - ९९३१८६६१२९** | **कर्जदार :- श्री. स्वप्नील सोपान कारके व श्रीमती सपना स्वप्नील कारके व श्री. सोपान चंदू कारके** | स. नं. ६३, हिस्सा नं. २अ, क्षेत्रफळ ०० हे. ०७ आर पेक्षा अधिक, गाव नगरगाव, ता. वडगाव मावळ, उपनिबंधक वडगाव मावळ, जि. पुणे. **चतु:सीमा :- पूर्वेस :-** स. नं. ६३/२अ मधील श्री. साठे यांची मिळकत **पश्चिमेस :-** स. नं. ६३/२ए, मधील श्री. महाडिक यांची मिळकत **उत्तरेस :-** मोकळी जागा **दक्षिणेस :-** रस्ता | अ. २०/०५/२०२६ ब. २१/०७/२०२६ क. रु. २९,४८,५२१.३९/- + न आकारलेले व्याज + पुढील व्याज + इतर शुल्क, त्यातून परतफेड केलेली रक्कम (असल्यास) वजा करून. | अ. रु. ७३,९८,०००/- ब. रु. ७,३९,८००/- क. रु. १०,०००/- | **११/०९/२०२६ दुपारी १.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (वरीलप्रमाणे अमर्यादित मुदतवाढीसह)** | **प्रतिकात्मक ताबा** |

**अटी आणि शर्ती:** इच्छुक बोलीदार/खरेदीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी वापरून **https://www.baanknet.com/eauction-psb/x-login** या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करावी. तसेच, त्यांनी आवश्यक ती 'केवायसी' कागदपत्रे ३ दिवसांच्या आत अपलोड करावीत, अशीही त्यांना विनंती आहे. इच्छुक बोलीदार/खरेदीदारांनी 'ईएमडी' (अनामत रक्कम) पोर्टलवर नमूद केलेल्या ई-लिलावाच्या दिनांक आणि वेळेपूर्वी, म्हणजेच **१०/०९/२०२६ वेळ दु. ४.००** पर्यंत, त्यांच्या **'ग्लोबल ईएमडी वॉलेट'**मध्ये हस्तांतरित करणे अनिवार्य आहे. हा **ई-लिलाव ११/०९/२०२६** रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार(IST) **दुपारी ०१:०० ते सायंकाळी ०५:००** या वेळेत आयोजित केला जाईल; या लिलावाच्या कालावधीत प्रत्येकी १० मिनिटांचे अमर्यादित मुदतवाढ (extensions) दिले जातील. 'ईएमडी' (EMD) ची रक्कम **चेक, ड्राफ्ट किंवा रोख रक्कम** यांसारख्या इतर कोणत्याही माध्यमाद्वारे स्वीकारली जाणार नाही. वर नमूद केलेली 'ईएमडी' रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावी लागेल; किंवा ती रक्कम बोलीदाराच्या **'ग्लोबल ईएमडी वॉलेट'** मध्ये जमा करण्यासाठी वेबसाइटवरून **(https://baanknet.com/eauction-psb/x-login)** 'चलन' तयार करून, कोणत्याही अनुसूचित व्यापारी बँकेमार्फत केवळ NEFT/RTGS द्वारे हस्तांतरित करता येईल. ज्या बोलीदारांनी आवश्यक असलेली 'ईएमडी' रक्कम ऑनलाइन जमा केलेली नसेल, त्यांना या ई-लिलावात सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही. या 'ईएमडी' (अनामत रकमेवर) कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. विक्रीसंबंधीच्या सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी, कृपया **https://baanknet.com/eauction-psb/x-login** या लिंकला भेट द्या. यशस्वी बोलीदाराने, बोलीच्या एकूण रकमेपैकी २५% (पंचवीस टक्के) रक्कम - ज्यातून आधीच जमा केलेली 'ईएमडी' रक्कम वजा केली जाईल - लिलावानंतरच्या लगेचच्या पहिल्या कामकाजाच्या दिवशी जमा करणे अनिवार्य आहे; तसेच उर्वरित रक्कम लिलावाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अदा करणे आवश्यक आहे. विहित मुदतीमध्ये रक्कम जमा करण्यात कसूर झाल्यास, जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल.
अधिकृत अधिकाऱ्यास लिलाव रद्द करण्याचा आणि नव्याने लिलाव आयोजित करण्याचा अधिकार असेल. सूचनेमध्ये नमूद केलेले सर्व ज्ञात आणि अज्ञात वैधानिक देणी (उदा. नगरपालिका कर, वीज देयके इत्यादी) हे, यशस्वी बोलीदाराने लावलेल्या सर्वोच्च बोलीच्या रकमेव्यतिरिक्त, त्या यशस्वी बोलीदारानेच अदा करणे बंधनकारक असेल. जर सूचनेमध्ये नमूद केलेल्या मालमत्तेचे सविस्तर वर्णन आणि मालकी हक्काच्या मूळ अभिलेखांमधील (Records of Title) माहिती यामध्ये तफावत आढळल्यास, अशा वेळी मालकी हक्काच्या अभिलेखांमध्ये नमूद केलेली माहितीच अंतिम आणि अचूक मानली जाईल. मालमत्तेवरील कोणत्याही प्रकारच्या बोज्याची (Encumbrances) पडताळणी करण्याची जबाबदारी लिलावात सहभागी होणाऱ्या बोलीदाराची असेल; इतर कोणत्याही बँकेच्या कर्जाचा बोजा असल्यास, त्यास बँक जबाबदार राहणार नाही. बोलीदार, मालमत्तेची मालकी, तिचे वर्णन आणि परिमाणे (dimensions) यांची सत्यता पडताळून पाहण्यासाठी, मालमत्तेविषयीची सविस्तर माहिती बँकेच्या संबंधित शाखेतून प्राप्त करू शकतात. हे प्रसिद्धीकरण म्हणजे 'सुरक्षा हित अंमलबजावणी नियम २००२' (Security Interest Enforcement Rules 2002) च्या नियम ८(६) अन्वये, सर्व कर्जदार/जामीनदार/कायदेशीर वारसदार यांना देण्यात आलेली ३० दिवसांची 'विक्री सूचना' (Sale Notice) आहे.

**ठिकाण :- पुणे दिनांक : ११/०८/२०२६** (मराठी मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरावा) **प्राधिकृत अधिकारी**



## केनरा बँक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

**मालमत्ता वसुली व्यवस्थापन (एआरएम) शाखा :** १२५९, डेक्कन जिमखाना, रेणुका कॉम्प्लेक्स,१ ला मजला, जंगली महाराज रोड, पुणे-४११००४, **फोन :** + ९१ २० २५५११०३४/६३६४९०५१५३/७३५३३७२२६६, **ई-मेल ::** cb5208@canarabank.com

### ई-ऑक्शन विक्री सूचना

**सिक्युरिटायझेशन अँण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ मधील रूल ८ (६) व ९ च्या अटींनुसार स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता ई-ऑक्शन विक्री सूचना**

या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि कर्जदार व जामीनदार यांना विशेषकरून सूचना देण्यात येते की पुढे नमूद केलेल्या स्थावर / जंगम मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत असून कॅनरा बँक एआरएम शाखेचे अधिकृत अधिकारी यांनी या मालमत्तेचा **ताबा** घेतला आहे, या संदर्भात **कर्जदार** यांच्याकडून कॅनरा बँक, एआरएम शाखा यांना येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि आकार वसुल करण्याकरिता सदर मालमत्तांची विक्री **"जसे आहे, जेथे आहे"** आणि **"जसे आहे, जे आहे"** आणि **"तेथे जे आहे"** या तत्त्वावर खाली नमूद तारखेला करण्यात येणार आहे. फॅक्टरी जमीन व बिल्डींग आणि प्लॅन्ट व मशिनरी यांची एकत्रितपणे एकाच 'लॉट'मध्ये विक्री केली जाईल. केवळ फॅक्टरी जमीन व बिल्डींग यांच्यासाठी भरलेली अनामत रक्कम विक्रीच्या मान्यतेसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.

**स्थावर मालमत्ता, राखीव किंमत यांचा पूर्ण तपशील खालीलप्रमाणे**

**• ई-लिलावाची तारीख आणि वेळ तारीख : २८.०८.२०२६ रोजी दु. १२.०० ते १.०० वाजेपर्यंत**

**• बयाणा भरण्याची अंतिम तारीख : २७.०८.२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत • माहित असलेला बोजा : बँकेला माहित नाही.**

**• मालमत्ता पाहणीची तारीख : दि. १७.०८.२०२६ ते २१.०८.२०२६ रोजी स.११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत**

| अ. क्र. | कर्जदार/गहाणखतदार/ जामीनदारांचे नाव | मालमत्तेचा तपशील | येणे रक्कम | राखीव किंमत / बयाणा रक्कम / ताब्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | **श्रीमती. सोनाली सुजीत सावडीमठ,** १-१०/८५५, वर्धमान हौसिंग सोसायटी, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर-४१६११५. **श्रीमती. सोनाली सुजीत सावडीमठ,** प्लॉट नं. १६बी, टी-०७ आणि टी-०७ भाग, मेट्रो हाय-टेक टेक्सटाईल पार्क लि., ५ स्टार एमआयडीसी, हातकणंगले, ५ स्टार एमआयडीसी, कसबा सानगांव, ता. कागल, जि. कोल्हापूर-४१६२३६. | प्लॉट नं. १६बी चा सर्वसामाईक भाग, टी-.७ आणि टी-०७ भाग, मेट्रो हाय-टेक को-ऑप. टेक्सटाईल पार्क, ५ स्टार एमआयडीसी, हातकणंगले, ५ स्टार एमआयडीसी, कसबा सानगांव, ता. कागल, जि. कोल्हापूर-४१६२३६. क्षेत्रफळ ३४१ चौ.मी. **चतु:सीमा : उत्तरेस :** २० मीटर अंतर्गत रस्ता, **दक्षिणेस :** प्लॉट नं. १५ ए आणि १६ बी ही मालमत्ता, **पूर्वेस :** २० मीटर अंतर्गत रस्ता, **पश्चिमेस :** प्लॉट नं. १९ए आणि १९बी ही मालमत्ता. | रु. **२,५८,७३,८२८.३३ दि. ०३/०८/२०२६ रोजी** अधिक त्यावरील व्याज आणि आकार | रु. २१,६०,०००.००<br>रु. २,१६,०००.००<br>**प्रत्यक्ष ताबा** |
| २. | **श्री. सुजीत संजय सावडीमठ,** १०/८५५, वर्धमान हौसिंग सोसायटी, इचलकरंजी, ता. हातगणंगले, जि. कोल्हापूर-४१६११५. **श्री. सुजीत संजय सावडीमठ,** प्लॉट नं. १६ए, टी-०७ आणि टी-०७ भाग, मेट्रो हाय-टेक टेक्सटाईल पार्क लि., ५ स्टार एमआयडीसी हातकणंगले, ५ स्टार एमआयडीसी, कसबा सानगांव, ता. कागल, जि. कोल्हापूर-४१६२३६. | प्लॉट नं. १६ए चा सर्वसामाईक भाग, टी-०७ आणि टी-०७ भाग, मेट्रो हाय-टेक को-ऑप. टेक्सटाईल पार्क, ५ स्टार एमआयडीसी हातकणंगले, ५ स्टार एमआयडीसी, कसबा सानगांव, ता. कागल, जि. कोल्हापूर-४१६२३६, क्षेत्रफळ ३४१ चौ.मी. **चतु:सीमा : उत्तरेस :** २० मीटर अंतर्गत रस्ता, **दक्षिणेस :** प्लॉट नं. १५ ए आणि १६ बी ही मालमत्ता, **पूर्वेस :** २० मीटर अंतर्गत रस्ता, **पश्चिमेस :** प्लॉट नं. १९ए आणि १ ही मालमत्ता. | रु. **२,४५,५१,१७२.६५ दि. ०३/०८/२०२६ रोजी** अधिक त्यावरील व्याज आणि आकार | रु. २१,६०,०००.००<br>रु. २,१६,०००.००<br>**प्रत्यक्ष ताबा** |

ई-लिलावाच्या सविस्तर अटी आणि शर्ती **www.canarabank.com** किंवा **www.baanknet.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी शाखेशी संपर्क साधावा.

**दिनांक : ११/०८/२०२६,**
**स्थळ : पुणे**

**(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)**

**अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक**

## अपना सहकारी बॅंक लि.
## APNA SAHAKARI BANK LTD.
मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक

**नोंदणीकृत कार्यालय :** अपना बाजार, १०६-ए, नायगांव, मुंबई ४०० ०१४. **कॉर्पोरेट कार्यालय :** अपना बँक भवन, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई ४०० ०१२. फोन : ०२२-२४१६ ४८६०/२४१० ४८६१- ६२/२४११४८६३, फॅक्स : ०२२ -२४१०४६८०.
Email : corporateoffice@apnabank.co.in, Website : www.apnabank.co.in

### ताबा नोटीस

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अॅडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रामध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींसोबत व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्यासोबत कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# 'लार्जकॅप'ला अडीच वर्षांत पहिल्यांदाच गळती

## जुलैमध्ये इक्विटी फंडातील गुंतवणुकीत १५ टक्के घसरण

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

**मुंबई :** सरलेल्या जुलै महिन्यात म्युच्युअल फंडांच्या इक्विटी अर्थात समभागसंलग्न योजनांमधील निव्वळ गुंतवणुकीत मासिक आधारावर १५ टक्क्यांची घसरण होऊन ती २४,६९७ कोटी रुपयांपर्यंत खाली आली आहे. उल्लेखनीय म्हणजे लार्जकॅप फंडांनी डिसेंबर २०२३ नंतर म्हणजेच अडीच वर्षांत पहिल्यांदाच गळती लागली, त्या उलट स्मॉलकॅप फंडांनी विक्रमी ओघ मिळविला.

म्युच्युअल फंड घराण्यांची उद्योग संघटना 'ॲम्फी'ने मंगळवारी दिलेल्या माहितीनुसार, जूनमध्ये इक्विटी योजनांनी आकर्षिलेल्या २८,९७३ कोटी रुपयांच्या निव्वळ गुंतवणुकीच्या तुलनेत, जुलैमध्ये गुंतवणुकीचा वेग १४.८ टक्क्यांनी मंदावला आहे. तथापि इक्विटी श्रेणींमध्ये, 'स्मॉलकॅप' फंडांनी विक्रमी ७,७६८ कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक आकर्षित केली. त्यानंतर 'मिडकॅप' फंडांमध्ये ६,१९२ कोटी रुपये आणि 'फ्लेक्सीकॅप' फंडांमध्ये ४,७१० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. मात्र याच काळात 'लार्जकॅप' फंडांमधून, जूनमधील २,०६७ कोटी रुपयांच्या निव्वळ ओघाच्या तुलनेत, जुलैमध्ये १,३२२ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली गेली.

परकीय संस्थागत गुंतवणूकदारांची लार्ज-कॅप समभागांमध्ये जास्त भागीदारी असते. त्यामुळे बाजारात परदेशी गुंतवणूकदारांची खरेदी पुन्हा सुरू होताच, स्थानिक गुंतवणूकदारांनी यामधून नफावसुलीला प्राधान्य दिले असावे, अशी लार्जकॅपला गळतीची कारणमीमांसा 'ॲम्फी'चे मुख्य कार्यकारी अधिकारी व्यंकट चालसानी यांनी केली. सलग चार महिने निधी काढून घेतल्यानंतर, परदेशी गुंतवणूकदारांनी जुलै महिन्यात भारतीय बाजारात २१२ कोटी डॉलरची निव्वळ खरेदी केली आहे.

### मासिक 'एसआयपी' ओघ ३१,९६१ कोटींवर



गुंतवणुकीचे प्रमाण काहीसे मंदावले असले तरी किरकोळ गुंतवणूकदारांचा सहभाग कायम राहिला आहे. तरीही, 'सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन' अर्थात 'एसआयपी'मधील मासिक योगदान जूनमधील ३१,७८१ कोटी रुपयांवरून वाढून जुलैमध्ये ३१,९६१ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. सलग पाचव्या महिन्यांत हा ओघ ३१,००० कोटी रुपयांच्या पातळीवर राहिला आहे. ही आकडेवारी गुंतवणूकदारांचा सावध दृष्टिकोन दर्शवते. गुंतवणूक करताना अधिक चोखंदळपणा अनुसरला जात असल्याचे सुचवतो.

# पाच वर्षांत सरकारी बँकांच्या ४,०९३ शाखांना टाळे

**नवी दिल्ली :** देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी गेल्या पाच आर्थिक वर्षांत देशभरात एकूण ६,२५५ नवीन शाखा सुरू केल्या आहेत, तर याच काळात ४,०९३ शाखा बंद करण्यात आल्याची माहिती केंद्र सरकारने मंगळवारी संसदेत दिली. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी राज्यसभेत रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीचा हवाला देत ही माहिती दिली.

राज्यसभेत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, सरकारी बँकांच्या महाविलीनीकरणामुळे क्षेत्रवार सुसूत्रीकरण आणि डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या प्रभावामुळे शाखा बंद होण्याचे प्रमाण आर्थिक वर्ष २०२२ मध्ये सर्वाधिक होते. त्या वर्षात २,५६४ बँक शाखा बंद झाल्या. तर त्या उलट आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये १,८२३ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षात सर्वाधिक १,९६७ नवीन शाखांची भर पडली.

# चंदुकाका सराफ ज्वेल्सकडून द्विशताब्दीनिमित्त खास सवलती



**पुणे :** दोन शतकांचा समृद्ध वारसा तसेच विश्वास आणि गुणवत्तेचा भक्कम पायावर उभी अग्रगण्य नाममुद्रा 'चंदुकाका सराफ ज्वेल्स'ने २०० व्या वर्षाच्या सुवर्ण परंपरेचा उत्सव साजरा करताना ग्राहकांसाठी विशेष सवलत योजनांची घोषणा केली आहे. 'विश्वास सात पिढ्यां'चा या ब्रीदवाक्यासह दोन शतकांची गुणवत्ता, विश्वास आणि उत्कृष्ट कारागिरी जपत चंदुकाका सराफ ज्वेल्सने महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ग्राहकांमध्ये मानाचे विशेष स्थान निर्माण केले आहे.

या निमित्ताने सोन्याच्या दागिन्यांवर प्रति ग्रॅम फक्त ४९९ रुपये ते १,०९९ रुपये सरसकट मजुरी आकारली जाणार आहे. चांदीच्या दागिन्यांच्या घडणावळीवर ३० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात आली आहे. शिवाय दररोज पहिल्या २०० ग्राहकांसाठी विशेष आकर्षक योजना उपलब्ध असणार आहे. या सवलतींचा लाभ येत्या १६ ऑगस्ट २०२६ पर्यंत महाराष्ट्र आणि कर्नाटकातील सर्व चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या शाखांमधून ग्राहकांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## रत्नागिरी नगरपरिषद, रत्नागिरी

ई-निविदा सूचना क्र. १०, २०२६-२७ बांधकाम विभाग दिनांक १२/०८/२०२६ ते २०/०८/२०२६ पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
मुख्याधिकारी
रत्नागिरी नगरपरिषद

दिनांक : ११/०८/२०२६

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद करण्यात आलेली मिळकत आमचे अशिल **मुनमी कलिता** यांनी **मे. मनिष द्वारकादास महेश्वरी** यांचेकडुन कायमखुष ॲग्रीमेंट टु सेल या दस्ताने घेतलेली असून, सदरचा दस्त दिनांक ०८/०६/२०१८ रोजी मा. सह दुय्यम निबंधक हवेली ११, पुणे यांचे कार्यालयात दस्त क्रमांक ८३६३/२०१८ अन्वये नोंदविलेला आहे.

तसेच सदर दस्तापैकी अनसूची क्र. २ आणि रजिस्ट्रेशनची पावती आमचे अशिलांचे कागदोपत्रांपैकीचा भाग असून अनुसूची क्र. २ आणि रजिस्ट्रेशनची पावती आमचे अशिलांकडून दिनांक ०४/०७/२०२६ रोजी हरविलेली असून त्याची ऑनलाईन तक्रार वाघोली पोलिस स्टेशन, पुणे येथे केलेली असून त्याचा लोस्ट. रिपोर्ट. नं. ११३२९३-२०२६ अन्वये दिनांक ०८/०८/२०२६ रोजी केलेली आहे.

सदर मिळकतीवर कुणाचीही काही तक्रार असल्यास आजपासुन १५ (पंधरा) दिवसाचे आत तशी लेखी सुचना द्यावी हे जाहिर करणेकामी सदरील नोटीस दिली असे.

परिशिष्ट : अ) मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका हवेली मे. सब रजिस्ट्र सो. हवेली यांचे क्षेत्राधिकारातील तसेच पुणे महानगरपालिकाचे कार्यक्षेत्रातील गाव मौजे वाघोली येथील गट नं. ५६४ पैकी, गट नं. ५५९/१ पैकी या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ''मॅजेस्टिक सिटी'' या योजनेतील बिल्डींग/विंग नं. सी-२ मधील आठव्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ८०२ यासी कारपेट क्षेत्र ५६.८४ चौ. मी. + लगतचे टेरेस क्षेत्र ११.८४ चौ. मी. हि मिळकत आहे. सबब ही जाहीर नोटीस असे.

सही/-
**किशोरी थोपटे-देशमुख,**
ॲडव्होकेट, बी.एस.एल.,एल.एल.बी., एल.एल.एम. (लंडन)
ऑ. पार्वती हाईट्स, लांडेवाडी, पुणे-नाशिक रोड,
भोसरी, पुणे ३९, फोन नं. ७७२००७६९८०

दि. : १०/०८/२०२६
स्थळ : पुणे

# 'फिच'कडून भारताची 'पत' कायम!

## आशियातील सर्वात वेगवान अर्थव्यवस्था!

आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील ७.७ टक्क्यांच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात भारताचा विकासदर घसरून ६.६ टक्क्यांवर मंदावण्याची शक्यता 'फिच ग्रुप'च्या 'बीएमआय' या उपकंपनीने मंगळवारी व्यक्त केला. गेल्या वर्षीच्या वस्तू व सेवा कर (जीएसटी) सुधारणांचा प्रभाव ओसरणे आणि ९.४ टक्क्यांवर पोहोचलेल्या महागाईमुळे सर्वसामान्य कुटुंबांच्या उत्पन्नावर व खरेदी क्षमतेवर झालेला परिणाम, ही विकासदर मंदावण्याची मुख्य कारणे तिने सांगितली आहेत. तथापि विकासदराचा वेग मंदावला असला, तरी भारत आशिया-प्रशांत क्षेत्रातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान कायम ठेवेल, असा अहवालाचा विश्वासही आहे.

### आव्हानांनंतरही ६.४ टक्के विकासदराचा अंदाज

पीटीआय, नवी दिल्ली

**पश्चिम आशियातील** संकटामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटासारखी आव्हाने असूनही अर्थव्यवस्थेची मजबुतीने घोडदौड सुरू असल्याचे नमूद करत, आघाडीची आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्था असलेल्या 'फिच रेटिंग्ज'ने मंगळवारी भारताचे सार्वभौम पतमानांकन 'स्थिर' दृष्टिकोनासह 'बीबीबी -' (उणे) या श्रेणीवर कायम ठेवले.

अमेरिका-इराण संघर्षामुळे निर्माण झालेल्या अनिश्चिततेचा भारताच्या विकासक्षमतेवर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता नाही, असेही फिचने नमूद केले. तिने दिलेले 'बीबीबी -' हे पतमानांकन 'गुंतवणुकीसाठी योग्य' श्रेणीतील सर्वात तळातील मानांकन आहे. तथापि हे मानांकन भारताची मजबूत विकासक्षमता आणि बाह्य वित्तपुरवठ्याची भक्कम स्थिती दर्शवते.

अलीकडच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेने विविध धक्क्यांचा यशस्वीपणे सामना केला आहे आणि हा कल पुढेही कायम राहील अशी अपेक्षा फिचने व्यक्त केली आहे. तसेच, मार्च २०२७ अखेर संपणाऱ्या चालू आर्थिक वर्षात विकासदर (जीडीपी) ६.४ टक्के राहील, असा अंदाजही तिने वर्तवला. ऊर्जा क्षेत्रातील धक्क्यांमुळे निर्माण झालेली अल्पकालीन आर्थिक आव्हाने असली तरी, स्थूल-आर्थिक स्थिरता राखण्याचा आणि धोरणांवरील विश्वासार्हता सुधारण्याचा सातत्यपूर्ण आलेख भारताची मजबूत विकासगती टिकवून ठेवण्यास आणि आर्थिक उभारीस मदतकारक ठरेल, असे फिचने म्हटले आहे.

उच्च विकासदरामुळे संरचनात्मक पतमानांकांमध्ये सातत्याने सुधारणा होण्यास मदत होईल आणि सरकारी कर्जाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता वाढेल.

आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात सरकारने कर्ज-जीडीपी गुणोत्तर ५५.६ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे, जो सरलेल्या म्हणजे २०२५-२६ मधील ५६.१ टक्क्यांच्या तुलनेत कमी आहे. सरकारने मार्च २०३१ पर्यंत कर्ज-जीडीपी गुणोत्तर ५० टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

# प्रत्यक्ष कर संकलनात २३ टक्के वाढ

### १० ऑगस्टपर्यंत ८.११ लाख कोटींवर

पीटीआय, नवी दिल्ली

**विद्यमान आर्थिक** वर्षात १० ऑगस्टपर्यंत निव्वळ प्रत्यक्ष कर संकलन वार्षिक तुलनेत २३.०९ टक्क्यांनी वाढून ८.११ लाख कोटी रुपयांपुढे गेले असल्याचे मंगळवारी अधिकृत आकडेवारीने स्पष्ट केले.

प्राप्तिकर विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, कंपनी कर आणि वैयक्तिक प्राप्तिकर संकलनातील वाढीमुळे तिजोरीत मोठी भर पडली आहे. निव्वळ कंपनी कर संकलन १९.८३ टक्क्यांनी वाढून सुमारे २.७० लाख कोटी रुपये झाले, तर वैयक्तिक प्राप्तिकर संकलन २३ टक्क्यांनी वाढून ५.०७ लाख कोटी रुपये झाले.

अर्थव्यवस्था आणि भांडवली बाजारातील सकारात्मक वातावरणामुळे महसूल संकलनाचा वेग मजबूत राहिला आहे, असे केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) स्पष्ट केले. सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) अर्थात रोखे उलाढाल कराचे संकलन ५१ टक्क्यांनी वाढून ३३,८२४ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. १ एप्रिल ते १० ऑगस्ट या कालावधीत करदात्यांना १.४३ लाख कोटी रुपयांचा परतावा (रिफंड) देण्यात आला. मागील वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत यात ३.८ टक्क्यांची वाढ झाली आहे. एकूण प्रत्यक्ष कर संकलनात (ज्यामध्ये कंपनी कर, वैयक्तिक प्राप्तिकर आणि एसटीटी यांचा समावेश होतो) १० ऑगस्टपर्यंत १९.७५ टक्क्यांची वाढ होऊन सुमारे ९.५५ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. सरकारने चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष करांमधून २६.९७ लाख कोटी रुपये जमा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. मागील आर्थिक वर्षात जमा झालेल्या २३.४० लाख कोटी रुपयांच्या तुलनेत ही १५ टक्क्यांची वाढ आहे.

## CENTRAL INSTITUTE OF ROAD TRANSPORT

Post Box No 1897, Bhosari, Pune - 26. Ph: 020 - 67345300

### TENDER NOTICE

CIRT, Pune invites tenders from reputed and experienced Advertising Agencies for the following requirements :

**Tender No. :** ADM:GEN:1503:34

**Tender Description :** Annual Contract for releasing advertisements in leading newspapers.

**Last Date of Submission :** 01/09/2026

Interested firms are requested to view and download detailed tender document from our website **https://www.cirtindia.com**

## जाहिर नोटीस

**फॉर्म क्र. URC – 2**

अधिनियमांच्या विभाग XXI च्या भाग ख मधील तरतुदींनुसार नोंदणी करण्यासंबंधीच्या जाहिरातीची नोटीस

[कंपनी अधिनियम, 2013 च्या कलम 374 (b) आणि कंपनी (नोंदणी करण्यासाठी अधिकृत) नियम, 2014 च्या नियम 4 (1) नुसार]

१. नोटीस देणेत येते की या दिवसापासून २१ दिवसांचे आधी कंपनी निबंधक, पुणे यांचेकडे **"रांका ज्वेलर्स खराडी"** या नावाने असलेले मर्यादित दायित्व भागीदारी, कंपनी अधिनियम, २०१३ च्या विभाग XXI च्या भाग मधील तरतुदींनुसार खाजगी मर्यादित कंपनी **"रांका ज्वेलर्स जेम्स प्रायव्हेट लिमिटेड"** या नावाखाली नोंदणी करणे आमच्या विचाराधीन आहे.

२. कंपनीची प्रस्तावित प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:- "हिऱ्यांचे, मौल्यवान व अर्ध-मौल्यवान रत्नांचे तसेच हिरे, सोने, चांदी, प्लॅटिनम आणि मौल्यवान व अर्ध-मौल्यवान रत्नजडित दागिन्यांचे उत्पादन, आयात, निर्यात, खरेदी व विक्री करण्याचा व्यवसाय करणे तसेच या व्यवसायात विक्रेता, व्यापारी, उत्पादक, आयातदार, निर्यातदार, खरेदीदार, विक्रेता इत्यादी म्हणून कार्य करणे आणि त्यासंबंधित इतर सर्व व्यवसाय व उपक्रम चालविणे, जोपर्यंत भागीदारांदरम्यान लेखी स्वरूपात परस्पर संमतीने अन्यथा ठरविण्यात येत नाही."

३. प्रस्तावित कंपनीच्या मेमोरेंडम ऑफ असोसिएशन आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनचे मसुदे सर्व्हे क्र. ५०/२, शोरूम क्र. १०३, कोणार्क अल्फा, खराडी, पुणे – ४११०१४ येथील कार्यालयात तपासली जाऊ शकते.

४. याद्वारे नोटीस देणेत येते की ज्या व्यक्तिचा या अर्जाला आक्षेप असेल त्या व्यक्तिने आपले आक्षेप लेखी स्वरूपात पुण्याचे निबंधक, शेती महामंडळ भवन, पहिला मजला, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट रस्ता, पुणे – ४११०१६ आणि केंद्रीय नोंदणी केंद्र (CRC), 6, 7, 8, सेक्टर 5, IMT मानेसर, जिल्हा गुडगाव (हरियाणा), पिन कोड-१२२०५० यांचेकडे ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून **२१ दिवसांचे** आत कळवावे. त्यांची एक प्रत कंपनीचे नोंदणीकृत कार्यालयाकडे पाठवावी.

**अर्जदारांची नावे**
मेसर्स रांका ज्वेलर्स खराडीच्या भागीदारांसाठी आणि त्यांच्या वतीने

**मोनिका रमेश रांका** — भागीदार
**रुषभ रमेश रांका** — भागीदार

दिनांक : १२/०८/२०२६

## invent

**इन्व्हेंट ॲसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
**नोंद. कार्यालयः** बख्तावर, सुट 'बी', तळमजला, बॅकबे रिक्लेमेशन स्कीम ब्लॉक III, 229, नरिमन पॉइंट, मुंबई- 400 021.

### मागणी सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 3(1) सह वाचल्या जाणारया सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या कलम 13(2) अंतर्गत. निम्नस्वाक्षारीकार हे इन्व्हेन्ट ॲसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (सदर कायदा) च्या अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 3(1) सह वाचल्या जाणारया नमूद कायद्याच्या कलम 13(2) मधील देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये कर्जदार ["सदर कर्जदार"] यांना संबंधित मागणी सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जे खालील नमूद करण्यात आले आहे. उपरोक्तच्या संदर्भात नमूद कर्जदार यांना परत एकदा सूचना देण्यात येत आहे की नमूद कर्जदाराच्या द्वारे जर काही अन्य कागदपत्रे / लेखी स्वरूपासह असलेल्या कर्ज कराराच्या अंतर्गत असलेल्या जे नमूद सूचनेमध्ये तपशिलामध्ये देण्यात आलेल्या भरणा आणि / किंवा वसुली होईपर्यंतच्या त्यावरील व्याजासह खाली देण्यात आलेल्या रकमेचा भरणा सदर सूचना प्रसिद्धीपासून साठ दिवसांच्या आत इन्व्हेन्ट ॲसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना करण्यात यावा. कर्जाच्या रकमेच्या देय परताव्यासाठी सुरक्षा म्हणून खालील मत्ता नमूद कर्जदार (रां) च्या द्वारे अनुक्रमे इन्व्हेन्ट ॲसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. ह्यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत.

| कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक | मागणी सूचना दिनांक आणि रक्कम सोबत एनपीए दिनांक |
|---|---|
| 1) अमर भीमाशंकर क्षीरसागर (अर्जदार)<br>2) ज्योती अमर क्षीरसागर (सह-अर्जदार 1)<br>3) भानुदास भीमाशंकर क्षीरसागर (सह-अर्जदार 2)<br>4) सूरज अशोक कांबळे (जामीनदार)<br>कर्ज खाते क्र. : 1022020100182<br>अर्जदाराचा पत्ता : नंदी किनारी झोपडपट्टी, मारुती मंदिर, सारिपूत बुध विहार 13, ताडीवाला रोड पुणे, पुणे शहर, पुणे- 411001, महाराष्ट्र. | 10-जुलै-2026<br>रु. 10,81,914/- (रुपये दहा लाख एक्याऐंशी हजार नऊशे चौदा फक्त)<br>दिनांक : 2-जुलै-2026 रोजी नुसार \| एनपीए : 29-जून-2026 |
| सुरक्षित मालमत्तेचे वर्णनः पुढील स्थित मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, प्लॉट क्र. 24 येथे स्थित मालमत्ता, एकूण मोजमाप क्षेत्र सुमारे 00 हे. 10 आर. त्यातून काढलेले क्षेत्रफळ मोजमाप सुमारे 1000 चौ. फूट. गट क्र. 1056 येथे, गाव कुंजीरवाडी, ता. हवेली जि. पुणे, त्यावर उभ्या असलेल्या सर्व वर्तमान आणि भविष्यातील संरचनांसह, आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः 20 फूट रस्ता, पश्चिमः गट क्र. 1067, दक्षिणः प्लॉट क्र. 23, उत्तरः प्लॉट क्र. 25. | |
| 1) अमित मधुकर भोरे (अर्जदार)<br>2) माया अमित भोरे (सह-अर्जदार 1)<br>कर्ज खाते क्र. : S108202000039<br>अर्जदाराचा पत्ता : स. क्र. 140/4, मालगाव रोड, खोत नगर रोड, कवठेमहांकाळ, सांगली, महाराष्ट्र, 416410. | 10-जुलै-2026<br>रु. 7,17,883/- (रुपये सात लाख सतरा हजार आठशे त्र्याऐंशी फक्त)<br>दिनांक : 2-जुलै-2026 रोजी नुसार \| एनपीए : 1-मे-2025 |
| सुरक्षित मालमत्तेचे वर्णन : पुढील स्थित मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, जुना आर एस क्र. 150/1/2/12/बी, त्याचा नवीन आर. एस. क्र. 102/1/2/12/बी, मोजमाप क्षेत्रफळ हे. 1.24 आर. मूल्यांकन रु. 2.80 पै. त्यामध्ये मोजमाप क्षेत्रफळ हे. 0.04.64 आर. गुंठेवारी नियमितीकरण नंतर प्लॉट क्र. 46, मोजमाप 92.90 चौ. मीटर, मालमत्ता मिरज, ता. मिरज, जिल्हा- सांगली येथे स्थित आहे, एसएमकेसी सांगलीच्या हद्दीत., त्यावर उभ्या असलेल्या सर्व वर्तमान आणि भविष्यातील संरचनांसह आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः प्लॉट क्र. 32, पश्चिमः रस्ता, दक्षिणः लगतचा प्लॉट क्र. 47, उत्तरः लगतचा प्लॉट क्र. 45. | |

**कर्जदार / सह-कर्जदार आणि जामीनदार यांना वैधानिक सूचना**

कर्जदार / सह-कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ता यापुढे कधीही जाहीर लिलाव / निविदा पद्धतीने विकली जाऊ शकते आणि त्यामुळे ही सूचना सुरक्षा (हित) अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 6, 8 आणि 9 अंतर्गत सूचना म्हणून देखील मानली जाईल.

**दिनांकः 12.08.2026**
**ठिकाणः पुणे / सांगली**

**सही/- प्राधिकृत अधिकारी,**
**इन्व्हेन्ट ॲसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**

GHraisoni COLLEGE | Engineering and Management Pune

DTE Code : 6155

An Empowered Autonomous Institute, Affiliated to SPPU, Pune
NAAC Accredited "A+" Grade & NBA

**MBA & MCA Direct Second Year Admissions for AY 2026-27**

Admission Notice for Direct Second Year (Lateral Entry) of Full Time Post Graduate Degree Course in Managements.

Institute Level Admissions Schedule for DSY MBA & MCA

| Sr. No. | Schedule for Admission Process | Date & Time |
|---|---|---|
| 1. | Sale & acceptance of applications along with necessary documents | Up to 13/08/2026 |
| 2. | Display of provisional merit list | 14/08/2026 up to 4.00 PM |
| 3. | Grievances pertaining to merit list | 15/08/2026 up to 4.00 PM |
| 4. | Display of final merit list | 16/08/2026 up to 10.00 AM |
| 5. | Admission at college campus | 16/08/2026 To 17/08/2026 |

Admission Counselling is also Open on Sundays & Holidays. NO DONATION.

College Campus : New Gat No. 1200, Domkhel Road, Wagholi, Pune
W : www.ghrcemp.raisoni.net | E : admission@ghrcemp.raisoni.net
M : 7720088580, 8605625522, 9561238840, 8975862626

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

Scan QR for Website

## SMFG Grihashakti

**एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

**कॉर्पोरेट कार्यालय :** 503 आणि 504, 5वा मजला, जी-ब्लॉक, इन्सिप्रे बीकेसी, बीकेसी मेन रोड, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (ई), मुंबई - 400051.

**नोंद. कार्यालय :** कॉमर्सझोन आयटी पार्क, टॉवर बी, पहिला मजला, क्र. 111, माउंट पूनमल्ली रोड, पोरूर, चेन्नई - 600116, तमिळनाडू.

### मागणी सूचना

**वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा, 2002 ("कायदा") ची अंमलबजावणी आणि सुरक्षा हीत (अंमलबजावणी) नियम, 2002 ("नियम") च्या तरतुदी अंतर्गत.**

एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड (यापुढे एसएमएचएफसी म्हणून संदर्भित) चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी नियम 3 यासह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13(12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत आणि कायद्याअंतर्गत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संबंधीत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता खालील ऋणकोंवर फर्माविणारी कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत मागणी सूचना निर्गमित केली आहे. निम्नस्वाक्षरीकारांना रास्त विश्वास वाटतो की ऋणको मागणी सूचना स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहेत, त्यामुळे नियमानुसार प्रत्यययोजन व प्रसिद्धीद्वारा सूचनेच्या पोचवणीस बाधा होत आहे. मागणी सूचनेचा समाविष्ट तपशील याखाली नमूद केला आहे :

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. आणि ऋणको / सह-ऋणकोचे नाव या प्रकरणी मालमत्ताधारक असेल तर | सुरक्षित मत्ता / तारण मालमत्तेचे वर्णन | अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना दिनांक आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | कर्ज खाते क्र. : 601939512152356<br>1. सय्यद मुबीन कादरी<br>2. अतिया दस्तगीर पीरजादे<br>पत्ता : फ्लॅट क्र. 14, पाचवा मजला, इमारत क्र. ए आकांक्षा, सीटीएस क्र. 106 ते 126, 1421 ते 1429 बोपोडी हवेली पुणे - 411003. | पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 14, पाचवा मजला, क्षेत्रफळ मोजमाप 425 चौ. फूट म्हणजेच 39.48 चौ. मीटर, 'आकांक्षा' नावाने ओळखल्या जाणारया इमारतीमधील 'विंग ए' मध्ये, जमीन संबंधित सीटीएस क्र. 106 ते 126 आणि 1421 ते 1429, एकूण क्षेत्रफळ मोजमाप 1195.12 चौ. मीटर, बोपोडी गाव, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित आणि चतुःसीमा खालीलप्रमाणे : पूर्व किंवा त्या दिशेने : सीटीएस क्र. 128, 129 आणि 131; दक्षिण किंवा त्या दिशेने : सीटीएस क्र. 51 ते 54; पश्चिम किंवा त्या दिशेने : भाऊ पाटील रोड; उत्तर किंवा त्या दिशेने : रस्ता. | 21.07.2026<br>रु. 1842233.99 (रु. अठरा लाख बेचाळीस हजार दोनशे तेहतीस आणि नव्याण्णव पैसे फक्त) दि. 14.07.2026 रोजी नुसार<br>एनपीए दिनांक : 06.07.2026 |

ऋणकोंना याद्वारा सल्ला देण्यात येतो की त्यांनी मागणी सूचनेचे अनुपालन करावे आणि प्रदानाच्या वसुलीच्या तारखेपर्यंत लागू व्याज, अतिरिक्त व्याज, बाउन्स आकार, किंमत व खर्च यासह एकत्रीत या प्रसिद्धीच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत यावर दिलेली आणि त्यात नमूद केलेल्या मागणी रकमेचे प्रदान करावे. ऋणकोंनी नोंद घ्यावी की **एसएमएचएफ**सी सुरक्षित धनको आहेत ऋणकोंद्वारा लाभ घेतलेली कर्ज सुविधा ऋणकोद्वारा गहाण ठेवलेल्या सुरक्षित मत्ता म्हणून असलेल्या स्थावर मालमत्तेच्या अनुसार सुरक्षित ऋण आहे. जर ऋणको विनिर्दिष्ट वेळेच्या आत त्यांची दायित्वे संपूर्णपणे सोडविण्यास असमर्थ ठरल्यास, **एसएमएचएफ**सी अंतर्भूत सुरक्षित मत्तेचा ताबा घेण्याकरिता कायद्याच्या कलम 13 (4) अंतर्गत सर्व हक्कांच्या अमंलबजावणीस हक्कदार असेल, परंतु त्याखालील नियम आणि कायद्याअंतर्गत उपलब्ध अन्य कोणत्याही मार्गे विनंती करुन किंवा विक्रिद्वारा किंवा सदर मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या मर्यादेत आणि प्रदानाच्या वसुलीकरिता नाही. **एसएमएचएफसी** कडे विक्रि किंवा हस्तांतरणाकरिता हक्कांचा वापर करण्यापूर्वी सुरक्षित मत्ता मोहोरबंद करणे आणि / किंवा जप्त करण्याचा अधिकारसुद्धा आहेत. सुरक्षित मत्तेच्या विक्रिनंतर, जर एसएमएचएफसी च्या देय रकमेची वसुली अपुरी पडल्यास गहाण असलेल्या मालमत्तेच्या मूल्याबाबत उर्वरित देणींच्या वसुलीकरिता **एसएमएचएफसी** कडे स्वतंत्र विधि प्रक्रिया सुरु करण्याचा हक्क सुद्धा आहे. हा कोणत्याही अन्य कायद्याअंतर्गत **एसएमएचएफ**सी कडे उपलब्ध अन्य सर्व अतिरिक्त आणि स्वतंत्र उपाय आहे. कायद्याच्या कलम 13(13) यापुढे आणि सुरक्षित मत्तेच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत कायद्याच्या कलम 13(8) कडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत, ज्यायोगे ऋणकोंना **एसएमएचएफसी** च्या पूर्व-लेखी परवानगीशिवाय, सुरक्षित मत्तेचा व्यवहार किंवा कोणत्याही सुरक्षित मत्तेची विक्रि, भाडेपट्टा किंवा अन्यथा कोणत्याही (अन्य सामान्य व्यवसायाखेरीज) तरहेने त्याची वासलात लावण्यास मना केलेली आहे / प्रतिबंध करण्यात आले आहे आणि त्याचे अनुपालन न झाल्यास उक्त कायद्याच्या कलम 29 अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. मागणी सूचनेची प्रत निम्नस्वाक्षरीकाराकडे उपलब्ध आहे आणि ऋणको, जर ते इच्छुक असल्यास, सदर प्रत नेहमीच्या कार्यालयीन वेळेत कामाच्या कोणत्याही दिवशी निम्नस्वाक्षरीकारांकडून गोळा करु शकतील.

**स्थळ : पुणे, महाराष्ट्र**
**दिनांक : 21.07.2026**

**स्वा./- प्राधिकृत अधिकारी,**
**एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कं. लि.**

## Arcil

**असेट रिकंस्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि. (एआरसीआयएल)**
विविध एआरसीआयएल ट्रस्टींचे ट्रस्टी म्हणून आपल्या क्षमतेत कार्य करतात
एआरसीआयएल कार्यालय: द रुबी, दहावा मजला, 29, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई – 400 028.
वेबसाईट : https://auction.arcil.co.in; CIN-U65999MH2002PLC134884

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 चे नियम 6, 8 आणि 9 च्या नियमांना वाचताना, सिक्योरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 (सरफेसी ॲक्ट) च्या अधीन शक्तीचा प्रयोग करताना ऑनलाईन ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीसाठी सार्वजनिक सूचना.**

सामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार / हमीदार / गहाणदार यांना सूचित करण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता / असेट रिकंस्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेडकडे गहाण ठेवलेली / आकारणी ठेवलेली मालमत्ता, विविध एआरसीआयएल ट्रस्ट (''एआरसीआयएल'') च्या ट्रस्टीच्या स्वरुपात आपल्या क्षमतेत कार्य करताना (नोंदणीकृत असाइनमेंट कराराच्या माध्यमातून आर्थिक मालमत्तेच्या असाइनमेंटनुसार) यांना अतिरिक्त व्याज, शुल्क आणि खर्च इत्यादीसह थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी ऑनलाईन ई-लिलावाच्या माध्यमातून ''जिथे आहे'', ''जसे आहे'', ''जे काही आहे'' आणि ''कोणत्याही समर्थनाशिवाय या आधारावर'' विकले जाईल, जसे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 (''नियम'') चे नियम 6, 8 आणि 9 चे नियम वाचताना, सिक्योरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 (''ॲक्ट'') च्या तरतुदींनुसार खाली दिले गेले आहे.

| कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदार यांचे नाव | एलएएन क्र. आणि विक्रय बँक | ट्रस्टचे नाव | सरफेसी सूचनेचा दिनांक अनुक्रमे 28.05.2021 आणि 17.04.2023 नुसार थकबाकी रक्कम | ताबा प्रकार आणि दिनांक | निरीक्षणाचा दिनांक | मालमत्ता आणि क्षेत्राचा प्रकार | अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) | आरक्षित मूल्य | ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जदार:<br>1. प्रवीण बाळभीम कांबळे<br>2. मनीषा प्रवीण कांबळे | कर्ज खाते क्र. HHLPUC00441885 सम्मान कॅपिटल लिमिटेड ('एससीएल') (पूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जायचे) | एआरसी आईएल-ट्रस्ट-2025-015 | रु. 17,88,447.88/- (रुपये सतरा लाख अठ्याऐंशी हजार चारशे सत्तेचाळीस आणि अठ्याऐंशी पैसे फक्त) 27.05.2021 पर्यंत + त्यावर अतिरिक्त व्याज + कायदेशीर शुल्क | 18.01.2025 रोजी वास्तविक ताबा | विनंतीनुसार व्यवस्था केली जाईल | फ्रीहोल्ड – 631 चौ. फू. (सुपर बिल्ट-अप क्षेत्र) | रु. 3,06,900/- (रुपए तीन लाख सहा हजार नऊशे मात्र) | रु. 30,69,000/- (रुपए तीस लाख एकोणसत्तर हजार मात्र) | 02.09.2026 रोजी दुपारी 03:30 वाजता |
| लिलाव करण्यात येणाऱ्या सुरक्षित मालमत्तेचे वर्णन: फ्लॅट क्र. 909, नववा मजला, विंग एच, लाईफ रिपब्लिक, सेक्टर आर16 – सिक्सटिन्थ एव्हेन्यू, एस. क्र. 91, जांबे आणि मारुंजी, मुळशी, पुणे, महाराष्ट्र – 411057. | | | | | | | | | |
| कर्जदार:<br>1. आमिर अकबर शेख<br>2. शमीम अकबर शेख | कर्ज खाते क्र. HHLPUN00338968 सम्मान कॅपिटल लिमिटेड (''एससीएल'') (पूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जायचे) | एआरसी आईएल-ट्रस्ट-2025-015 | रु. 5,87,072.50/- (रुपये पाच लाख सत्याऐंशी हजार बहात्तर आणि पन्नास पैसे फक्त) 13.04.2023 पर्यंत + त्यावर अतिरिक्त व्याज + कायदेशीर शुल्क | 29.05.2025 रोजी वास्तविक ताबा | विनंतीनुसार व्यवस्था केली जाईल | फ्री होल्ड – 14.59 चौ. मी. (कार्पेट क्षेत्र) | रु. 71,700/- (रुपये एकाहत्तर हजार सातशे फक्त) | रु. 7,17,000/- (रुपये सात लाख सतरा हजार फक्त) | 02.09.2026 रोजी संध्याकाळी 04:00 वाजता |
| लिलाव करण्यात येणाऱ्या सुरक्षित मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट क्र. 306, तिसऱ्या मजल्यावरील 14.59 चौ. मी. (157 चौ. फू. शी समतुल्य) मोजमापाचे कार्पेट क्षेत्र, ''एक्सआरबीया अंबी'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निवासी कॉम्प्लेक्सच्या बिल्डिंग 'ए2' मध्ये, गाव अंबीमध्ये स्थित, तालुका मावळ, जिल्हा पुणे, पुणे-410506, महाराष्ट्र. | | | | | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| एआरसीआयएल ला ज्ञात असलेले प्रलंबित खटले | शून्य | एआरसीआयएल ला ज्ञात असलेले ऋणभार/देय | शून्य |
| बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक | त्याच दिवशी लिलावाच्या 2 तास आधी | बोली वाढीची रक्कम: | बोली दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे |
| डिमांड ड्राफ्ट या नावाने तयार केला जाईल: | एआरसीआयएल-ट्रस्ट-2025-015 | सममूल्यावर देय | |
| आरटीजीएस तपशील | एआरसीआयएल-ट्रस्ट-2025-015, ट्रस्ट खाते क्र. – 57500001702225, एचडीएफसी बँक लिमिटेड, शाखा : कमला मिल, मुंबई, आयएफएससी कोड: HDFC0000542. | | |
| संपर्क व्यक्तीचे नाव आणि क्रमांक | संतोष खोपडे – 0124-6910910; +91 70654 51024 (auctionhelpline@sammaancapital.com) | | |

**नियम व अटी :**

1. लिलाव विक्री ई-लिलावाद्वारे https://auction.arcil.co.in या वेबसाईटद्वारे आणि बोली दस्तऐवजाच्या अटी व शर्तींनुसार आणि त्यात नमूद प्रक्रियेनुसार केली जात आहे.
2. प्राधिकृत अधिकारी (''एओ'')/ एआरसीआयएल यांना इंटरनेट कनेक्टिव्हिटी, नेटवर्क समस्या, सिस्टीम क्रॅश डाऊन, पॉवर फेल इ. साठी जबाबदार धरले जाणार नाही.
3. लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर एओ कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकारु/नाकारु/सुधारित/रद्द करु शकतात किंवा पुढे ढकलू शकतात.
4. यशस्वी खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना कोणतेही वैधानिक देय, कर, देय शुल्क, खरेदीच्या मोबदल्यात लागू जीएसटी, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. भरावे लागतील, जे लागू कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेला त्याच्या/तिच्या/त्यांच्या पक्षात हस्तांतरित/सुपूर्त करण्यासाठी याचे देय करणे आवश्यक आहे.
5. इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सुपूर्त करण्यापूर्वी, सुरक्षित मालमत्तेला प्रभावित करणारे दायित्व, सुरक्षित संपत्तीचे शीर्षक आणि वैधानिक देय इत्यादींसह दावे/अधिकार/देय संबंधित आपली स्वतंत्र चौकशी/उचित आकलन करावे. लिलावाची जाहिरात एआरसीआयएलची कोणतीही वचनबद्धता देत नाही किंवा कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही. एआरसीआयएलचे प्राधिकृत अधिकारी कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यासाठी/अधिकार/देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाहीत.
6. वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या लिलावाच्या सूचनेमध्ये नमूद केलेले तपशील हे अधोस्वाक्षरीदारांच्या सर्वोत्तम माहितीसाठी सांगण्यात आले आहेत; तथापि अधोस्वाक्षरी केलेले कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा वगळण्यासाठी जबाबदार/उत्तरदायी असणार नाही.
7. कर्जदार/हमीदार/गहाणदार, जे या थकबाकीसाठी जबाबदार आहेत, त्यांनी या विक्री सूचनेला वर नमूद केलेल्या लिलाव विक्रीच्या होल्डिंगबद्दल, सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियमांच्या नियम 8 आणि 9 अंतर्गत सूचनेच्या स्वरुपात मानावे.
8. जर वर निर्धारित लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाल्यास, एआरसीआयएल यांना नियम आणि अधिनियमांचे नियम 8(5) च्या तरतुदींनुसार इतर कोणत्याही पद्धतींनी सुरक्षित मालमत्ता विकण्याचा अधिकार आहे.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
असेट रिकंस्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि.
एआरसीआयएल-ट्रस्ट-2025-015-चे ट्रस्टी

स्थळ : पुणे
तारीख : 29.07.2026

# चाकण उद्योग क्षेत्राला असुविधांचे ग्रहण

## जागेची टंचाई, पायाभूत सुविधांच्या समस्यांमुळे उद्योगांपुढे अडचणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**पुणे :** चाकण परिसरातील २० लघुउद्योगांनी पुण्याबाहेर स्थलांतरित होण्याचा इशारा दिल्यावरून गदारोळ उडाला असून, या निमित्ताने चाकणमधील जागेची टंचाई, पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था आणि वाहतूक कोंडीची समस्या प्रकर्षाने चर्चेत आली आहे. या लघुउद्योगांच्या गटाने सातारा जिल्ह्यातील खंडाळा औद्योगिक क्षेत्रात विस्तार करण्यासाठी मार्च महिन्यात जागेची मागणी केली होती. त्यामुळे या उद्योगांचा विस्तार, की स्थलांतर असा प्रश्न निर्माण झाला आहे.

चाकण हे वाहननिर्मितीसह उत्पादन क्षेत्राचे देशातील आघाडीचे केंद्र आहे. जागतिक पातळीवरील अनेक कंपन्या चाकणमध्ये कार्यरत आहेत. या परिसरातील २० लघुउद्योगांनी जागेच्या टंचाईमुळे सातारा जिल्ह्यातील खंडाळा औद्योगिक क्षेत्रात स्थलांतरित होण्याचा इशारा दिला. या लघुउद्योगांनी विस्तारासाठी जागा उपलब्ध नसण्यासह पायाभूत सुविधांची खराब अवस्था आणि वाहतूककोंडी हे प्रश्न उपस्थित केले. चाकण परिसरातून हे लघुउद्योग अद्याप स्थलांतरित झालेले नसून, जागा आणि इतर सुविधा न मिळाल्यास स्थलांतर करावे लागेल, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

'महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) चाकण आणि तळेगावमधील उद्योग संघटनांची आज बैठक घेतली. त्यात उद्योगांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. त्यांचे प्रश्न केवळ एमआयडीसी क्षेत्रापुरते मर्यादित नसून, त्यात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांचा समावेश आहे. 'एमआयडीसी'कडून हद्दीतील कचऱ्याचे व्यवस्थापन केले जात असून, त्या बाहेरील क्षेत्रात हे शक्य नाही. 'एमआयडीसी'कडून चाकणमध्ये अनेक रस्त्यांची कामे सुरू आहेत. त्यातील काही पूर्ण झाली असून, काही प्रगतिपथावर आहेत. लवकरात लवकर ही कामे पूर्ण करून वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल,' असे 'एमआयडीसी'चे अधीक्षक अभियंता नीलेश मोढवे यांनी सांगितले.



लघुउद्योगांच्या या गटातील २० पैकी केवळ ४ कंपन्या चाकण एमआयडीसी हद्दीतील आहेत. या कंपन्यांनी सातारा जिल्ह्यातील खंडाळा औद्योगिक क्षेत्रात विस्तारासाठी मार्चमध्ये म्हणजे पावसाळा सुरू होण्याआधी जागेची मागणी केली होती. चाकणमधून व्यवसाय बंद करून हे उद्योग स्थलांतरित होणार नाहीत.
– नितीन गवळी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

राज्यात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग सुरू करताना त्यांची नोंद केली जाते. मात्र, तो उद्योग स्थलांतरित अथवा बंद झाल्यानंतर त्याची नोंद ठेवली जात नाही. त्यामुळे उद्योगांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यातून किती उद्योग बंद झाले वा स्थलांतरित झाले याबाबतची वस्तुस्थिती समजेल. चाकणला पुढील आठवड्यात भेट देऊन उद्योगांशी चर्चा करून त्यांच्या समस्या सोडविण्यात येतील.
– उदय सामंत, उद्योगमंत्री

चाकण परिसरात उद्योगांच्या विस्तारासाठी जागेची टंचाई आहे. त्याचबरोबर पायाभूत सुविधांची अवस्था दयनीय आहे. त्यामुळे आम्ही सातारा जिल्ह्यात जागेसाठी अर्ज केला होता. चाकण सोडून जाण्याची आमची अजिबात इच्छा नाही. आम्हाला इथे जागा आणि पुरेशा पायाभूत सुविधा मिळाल्यास आम्ही चाकण सोडून जाणार नाही.
– शंतनू कुलकर्णी, अध्यक्ष, लघुउद्योजक गट



## चाकणमधून तीन वर्षांत एकाही उद्योगाचे स्थलांतर नाही

### एमआयडीसीचा दावा; पाचशे कंपन्यांना एक हजार एकर जमीन

**संजय जाधव, लोकसत्ता**

**पुणे :** चाकण औद्योगिक क्षेत्र सुमारे सात हजार एकरांवर विस्तारले असून, या क्षेत्राबाहेर तेवढ्याच जागेवर औद्योगिक विस्तार झाला आहे. गेल्या तीन वर्षांत चाकणमधून एकही उद्योग स्थलांतरित झालेला नाही. या कालावधीत चाकणमध्ये नवीन पाचशे कंपन्यांची गुंतवणूक झाली आहे. जागेच्या वाढत्या मागणीमुळे आगामी काळात चाकण औद्योगिक क्षेत्राचा सहावा टप्पा विकसित केला जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) दिली.

चाकण औद्योगिक क्षेत्रातून कंपन्या स्थलांतरित होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. यामुळे चाकणमधील जागेच्या टंचाईची समस्या समोर आली आहे. याबाबत 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी म्हणाले, की चाकण औद्योगिक क्षेत्र एकूण ७ हजार २५० एकरांवर विस्तारलेले आहे. चाकण औद्योगिक क्षेत्राच्या बाहेर यापेक्षा जास्त जागेवर उद्योग विस्तारलेले आहेत. चाकण औद्योगिक क्षेत्राचे एकूण पाच टप्पे आहेत. आगामी काळात विस्ताराचा सहावा टप्पा हाती घेतला जाणार आहे. याबाबतचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. त्यामुळे उद्योगांना आणखी जागा उपलब्ध होणार आहे. याचबरोबर खेडमध्येही सध्या उद्योगांना विस्तारासाठी जागा उपलब्ध आहे.

**रस्ते प्रकल्पांना गती**

- **चाकण टप्पा १ व २** - १४.६५ किलोमीटर चौपदरी रस्त्याचे काँक्रिटीकरण सुरू.
- **आळंदी फाटा ते फोक्सवॅगन ते स्कोडा कंपनी** - ५.७ किलोमीटर चौपदरी रस्त्याचे काँक्रिटीकरण सुरू.
- **चाकण टप्पा ४** - ४.४ किलोमीटर चौपदरी मुख्य रस्त्याचे बांधकाम सुरू.
- **चाकण टप्पा ५** - ३.५ किलोमीटर सहापदरी काँक्रीट रस्त्याचे काम पूर्ण.
- **चाकण टप्पा २** - ५.५ किलोमीटर चौपदरी रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्ण.

चाकणमधील उद्योगांच्या पायाभूत सुविधांसाठी एमआयडीसीला दर वर्षी ७५ ते १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जात आहे. तळेगाव–चाकण–शिक्रापूर महामार्गाचे सहापदरीकरण आणि उन्नत महामार्गाच्या प्रकल्पाचे काम लवकरच सुरू होणार आहे. चाकणमधून अद्यापपर्यंत एकही कंपनी बाहेर निघून गेलेली नाही.
– उदय सामंत, उद्योगमंत्री

चाकणमध्ये गेल्या वर्षभरात एक हजार जागांवर नवीन उद्योग आले आहेत. या कालावधीत ५०० कंपन्यांनी चाकणमध्ये गुंतवणूक केलेली आहे. चाकणमधून गेल्या तीन वर्षांत एकही कंपनी स्थलांतरित झालेली नाही. उद्योगांना चाकणमध्ये सध्या पुरेशी जागा मिळत नसल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राचा सहावा टप्पा विकसित केला जाणार आहे.
– नितीन गवळी, प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी



## कारवाई ते कायापालट



शहरबात
शिक्षणाची

चिन्मय पाटणकर

**गेल्या काही** महिन्यांपासून अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडून केली जात असलेली कारवाई चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी या कारवाईचा फटका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील भोजनगृहाला बसला. अन्न आणि औषध प्रशासन विभागाने तपासणी करून विद्यापीठाच्या भोजनगृहातील अव्यवस्था अखोरेखित केली. भोजनगृह चालकाचा परवाना निलंबित केला. या प्रकारामुळे विद्यापीठातील भोजनगृहाचा कारभार उघडकीस आला. मात्र, या प्रकारानंतर विद्यापीठ प्रशासनाने आवश्यक ती दुरुस्ती करून भोजनगृहाचा कायापालट करून भोजनगृह नव्याने सुरू केले.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून, परराज्यातून आलेले मुलगे, मुली विद्यापीठाच्या वसतिगृहांमध्ये राहतात. या विद्यार्थ्यांना विद्यापीठातील भोजनगृहाच्या माध्यमातून सवलतीच्या दरात भोजनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. भोजनगृह खासगी ठेकेदारांना चालविण्यास दिली जातात. मात्र, विद्यार्थ्यांकडून भोजनाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. भोजनात अळी सापडण्यासारखे प्रकार काही वेळा घडले. विद्यापीठ प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना, कारवाई केली गेली. सध्या त्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधींचा सहभाग असलेली भोजनगृह गुणवत्ता नियंत्रण समितीही अस्तित्वात आहे. मात्र, अन्न आणि औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईमुळे विद्यापीठातील भोजनगृह आणि त्यातील भोजनाच्या दर्जाविषयी पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले. आता विद्यापीठाने तेच भोजनगृह नव्याने कार्यान्वित केले.

विद्यापीठ विद्यार्थी कृती संघर्ष समितीचे डॉ. राहुल ससाणे यांनी मात्र भोजनगृह सुरू करण्याबाबत आता काही प्रश्न उपस्थित केले आहेत. परवाना निलंबित केलेल्या ठेकेदारालाच पुन्हा भोजनगृह सुरू करण्याची परवानगी कशी दिली, पुन्हा निविदा प्रक्रिया का राबवण्यात आली नाही, भोजनगृह गुणवत्ता नियंत्रण समितीला कल्पना न देता भोजनगृह कसे सुरू करण्यात आले, असे मुद्दे त्यांनी मांडले. तसेच, शासनाच्या कारवाईनंतरही त्याच भोजनगृह चालकास काम का देण्यात आले, असा सवाल अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेनेही उपस्थित केला. भोजनाची गुणवत्ता तपासूनच भोजनगृह चालवण्यास परवानगी द्यावी, विद्यार्थ्यांच्या अन्नात झुरळ किंवा तत्सम किडे आढळल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी संघटनांच्या आरोप-आक्षेपांबाबत सविस्तर स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, 'विद्यापीठाच्या भोजनगृहाचे कंत्राट तीन वर्षांसाठी निविदा प्रक्रिया राबवून देण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी अन्न आणि औषध प्रशासन विभागाने केलेल्या तपासणीत एका भोजनगृहाची व्यवस्था निश्चित केलेल्या मानकांप्रमाणे नसल्याचे आढळून आले. त्यामुळे भोजनगृह चालविणाऱ्या संबंधित ठेकेदाराचा परवाना निलंबित करण्यात आला. विद्यापीठ प्रशासनाने ही बाब गांभीर्याने घेऊन भोजनगृहाच्या व्यवस्थेचा कायापालट केला. अन्न आणि औषध प्रशासन विभागाने भोजनगृहाची पुन्हा तपासणी करून ठेकेदाराचा परवाना पूर्ववत केला. त्यानंतरच भोजनगृह कार्यान्वित करण्यात आले. या कालावधीत विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, याची संपूर्ण काळजी विद्यापीठ प्रशासनाकडून घेण्यात आली. आता बाकी भोजनगृहांमध्येही आवश्यक ते बदल केले जाणार आहेत. संघटनांनी गैरसमजुतीतून आक्षेप घेतले आहेत.'

व्यवस्था बदलण्यास एक धक्का बसावा लागतो. अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या कारवाईनंतर विद्यापीठ प्रश्नासनाने भोजनगृहात बदल केला. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण भोजन मिळणे हीच सर्वोच्च प्राथमिकता असायला हवी. एका कारवाईनंतर एका भोजनगृहात बदल झाला. आता उर्वरित भोजनगृहे, उपाहारगृहांवर कारवाई होण्याची वाट न पाहता विद्यापीठ प्रशासन संबंधित तेथील व्यवस्था व खाद्यपदार्थांचा दर्जा सुधारण्याकडे लक्ष देईल, अशी अपेक्षा.

chinmay.patankar
@expressindia.com

## कर्तव्य, जबाबदाऱ्यांचे स्मरणही ठेवा

### 'तिरंगा यात्रे'त मुख्यमंत्री फडणवीस यांचे तरुणांना आवाहन; विकसित महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'विकसित भारताच्या निर्मितीसाठी तरुणांनी तिरंगा हाती घेतला आहे. युवा शक्तीच्या सामर्थ्यावर उद्याचा विकसित भारत घडणार असून समतेचा, प्रगतीचा आणि युवांच्या स्वप्नांना बळ देणारा विकसित महाराष्ट्रही घडणार आहे,' असे सांगत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'तिरंगा हाती घेतल्यानंतर राज्यघटनेतील अधिकारांबरोबरच कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांचे स्मरणही ठेवावे लागेल,' असा सल्ला दिला.

स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाला मानवंदना देण्यासाठी तिरंगा गौरव समितीच्या वतीने मंगळवारी तिरंगा यात्रा काढली. पोलीस मैदानापासून सुरू झालेल्या या यात्रेचा समारोप डेक्कन परिसरात झाला, त्यावेळी फडणवीस बोलत होते. महापौर मंजूषा नागपुरे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, शहराध्यक्ष धीरज घाटे, शत्रुघ्न काटे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले,' तिरंगा हाती घेताना राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांची आणि जबाबदाऱ्यांची जाणीवही सर्वांनी ठेवली पाहिजे. विकसित भारताच्या स्वप्नाबरोबरच येत्या २० वर्षांत विकसित महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प आहे. पुणे विद्येचे आणि संशोधनाचे, उद्योगाचे शहर आहे. त्यामुळे येथील तरुणांच्या बळावरच उद्याचा बलशाली भारत उभा राहील.'





मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात तिरंगा यात्रेला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद.

### यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

ललित महल चौकातून यात्रेला प्रारंभ झाला. फर्ग्युसन महाविद्यालय मार्गाने छत्रपती संभाजी महाराज चौकात यात्रेचा समारोप झाला. यावेळी दुतर्फा उभे राहून नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम्' आणि 'भारत माता की जय' अशा घोषणा दिल्या. ध्वनिवर्धकावरून वाजणारी देशभक्तीपर गीते, बँड पथकाकडून वाजवल्या जात असलेल्या देशभक्तीपर गीतांच्या सुरावटी अशा वातावरणामुळे यात्रेत उत्साह भरला गेला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हाती तिरंगा घेत भारतमातेचा जयजयकार करत यात्रेत सामील झाले.

नागरिकांनी फुलांच्या पाकळ्या उधळत, घोषणा देत यात्रेचे स्वागत केले. विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, एनसीसी आणि एनएसएसचे छात्र तसेच काही माजी सैनिक यात्रेत सहभागी झाले होते. काही युवक स्वातंत्र्यसैनिकांच्या वेशभूषेत आले होते.

### काँग्रेसची टीका

'कोणत्याही तिरंगा यात्रेला कोणाचा विरोध असणार नाही. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुण्यातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांची पाहणी करण्यासाठी दौरा केला असता, खड्डे विरहित पुणे बनवण्यासाठी प्रयत्न केला असता तर पुणेकरांनी त्यांना धन्यवाद दिले असते,' अशी टीका काँग्रेसच्या शहराध्यक्ष दिप्ती चवधरी यांनी केली.

खड्डे, वाहतूक कोंडीकडे मुख्यमंत्री, भाजपचे केंद्रातील, राज्यातील मंत्री, पुण्यातील आमदार आणि पुणे महानगरपालिकेतील भाजप नगरसेवक हे का लक्ष देत नाहीत ? 'जेन-झी'च्या आंदोलनामुळे खडबडून जागे झालेल्या भाजपला आता तरी जनतेचे खरे प्रश्न सोडवण्यासाठी सुबुद्धी मिळेल,' असे चवधरी यांनी सांगितले.

### वाहतूक कोंडी

तिरंगा यात्रेमुळे शहरातील मध्यवर्ती भागासह डेक्कन परिसरातील वाहतुकीमध्ये बदल कोले. अनेक रस्ते बंद करण्यात आल्यामुळे डेक्कन, भांडारकर रस्ता, कर्वे रस्ता, शास्त्री रस्ता परिसरात वाहतूक कोंडी झाली.

## पहिले 'नांदी' साहित्य संमेलन पुण्यात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

न्या. रानडे यांना अभिवादन करून शुक्रवारी हिराबागेत संमेलन



**पुणे :** पुण्यातील टिळक रस्त्यावरील हिराबाग येथे ११ मे १८७८ रोजी पहिले मराठी ग्रंथकार संमेलन (साहित्य संमेलन) झाले होते. त्याच परिसरात या संमेलनाचे अध्यक्ष न्या. महादेव गोविंद रानडे यांना अभिवादन करून शुक्रवारी (१४ ऑगस्ट) पहिले नांदी साहित्य संमेलन होणार आहे. ज्योत्स्ना भोळे सभागृहातील हे संमेलन म्हणजे शतकोत्सवी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या वाटचालीतील सर्वप्रथम झालेल्या संमेलनाची स्मृती या स्वरुपात ते साजरे होईल.

जानेवारीमध्ये पुण्यात शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार असून त्यापूर्वी महाराष्ट्र, बृहन्महाराष्ट्र आणि परदेशांमध्ये ९९ साहित्य संमेलने आयोजित करण्यात येणार आहेत. त्यापैकी नांदी साहित्य संमेलन हिराबाग येथील ज्योत्स्ना भोळे सभागृहात शुक्रवारी सकाळी १० ते २ या वेळेत होणार असून, ते फक्त विशेष निमंत्रितांसाठी असेल, अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, समर्थ युवा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे आणि या संमेलनाचे सहसंयोजक असलेल्या महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सागर देशपांडे यांनी दिली.

सोमण म्हणाले, 'महाराष्ट्र साहित्य परिषद, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था या न्या. रानडे यांच्याच प्रेरणेतून स्थापन झाल्या असल्याने या नांदी संमेलनात न्या. रानडे यांच्यावरील एक नाट्यप्रवेश सादर करणार आहे. तसेच मराठी भाषेच्या व्याकरणासाठी मोलाचे योगदान दिलेल्या यास्मिन शेख आणि व्यंगचित्रकार शि. द. फडणीस या शतायुषी दिग्गजांचा मूर्तिशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात येईल.'

यानिमित्ताने मराठी भाषा, साहित्य, संशोधन आणि ग्रंथप्रसाराच्या कार्यात योगदान देत असलेल्या आणि शंभरी ओलांडलेल्या पुण्यातील काही संस्थांचा मराठी भाषा विभाग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सन्मान करण्यात येईल, असे देशपांडे यांनी सांगितले.

### संमेलनाध्यक्षपदी विश्वास पाटील

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील हेच नांदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असतील. पुण्यात वास्तव्यास असलेल्या राजेंद्र बनहट्टी, डॉ. सदानंद मोरे, डॉ. अरुणा ढेरे, डॉ. श्रीपाल सबनीस, भारत सासणे आणि लक्ष्मीकांत देशमुख या माजी संमेलनाध्यक्षांची या वेळी विशेष उपस्थिती असेल. पूर्वार्धात हा सन्मान सोहळा आणि अध्यक्षीय भाषण होईल, त्याच ठिकाणी - उत्तरार्धात महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त 'सत्यशोधक महात्मा' हा दीर्घांक सादर होणार आहे. संवाद पुणे संस्थेची निर्मिती असून, त्याचे दिग्दर्शन योगेश सोमण यांनी केले आहे. अभिजात मराठी भाषेच्या वाटचालीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हा एक महत्त्वाचा टप्पा असून, पुण्यनगरीत झालेल्या पहिल्या संमेलनाच्या आठवणी यानिमित्ताने जागवल्या जाणार आहेत, अशी माहिती राजेश पांडे यांनी दिली.

## 'डिजिटल ॲरेस्ट'च्या बतावणीने फसवणुकीत वाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'डिजिटल ॲरेस्ट'ची बतावणी करून फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. सायबर चोरट्यांनी एका ज्येष्ठ वकील महिलेची ७० लाखांची फसवणूक करण्याची घटना ताजी असतानाच आणखी एका ज्येष्ठ महिलेची १२ लाखांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला.

याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध वानवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने फिर्याद दिली आहे. तक्रारदार ७५ वर्षीय ज्येष्ठ महिला वानवडी भागात राहायला आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिलेच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी ५ ऑगस्ट रोजी संपर्क साधला. पोलीस असल्याची बतावणी चोरट्यांनी महिलेकडे केली. आधारकार्डचा गैरवापर करण्यात आला आहे. 'महिलेविरुद्ध अटक वॉरंट बजाविण्यात येणार असून, या प्रकरणात डिजिटल ॲरेस्ट करण्यात येणार आहे,' अशी भीती चोरट्यांनी महिलेला दाखविली. त्यानंतर चोरट्यांनी महिलेला धमकावून तातडीने बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले.

घाबरलेल्या महिलेने चोरट्यांच्या खात्यात १२ लाख रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक बगाडे तपास करत आहेत. 'सायबर चोरट्यांकडून फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. चोरट्यांच्या बतावणीकडे दुर्लक्ष करावे,' असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

# पिंपरीत नवे वाहनतळ धोरण

## संपूर्ण शहरासाठी 'टेलिस्कोपिक' शुल्क रचना; स्थायी समितीत प्रस्ताव

लोकसत्ता प्रतिनिधी

**पिंपरी :** शहरातील काही प्रमुख रस्त्यांसाठी आणलेले सशुल्क वाहनतळ (पे अँण्ड पार्क) धोरण गुंडाळल्यानंतर आता संपूर्ण शहरासाठी नव्याने वाहनतळ धोरण निश्चित केले आहे. रस्त्यालगत, रस्ताबाह्य पार्किंचे नियोजन केले असून, यासाठी 'टेलिस्कोपिक' शुल्क रचना, पार्किंग पास व निवासी पार्किंगनुसार शुल्क निश्चित केले आहे. याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराच्या लोकसंख्येबरोबरच वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सद्य:स्थितीत शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाख असून, वाहनांची संख्या २५ लाखांच्या पुढे आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रचंड वाहतूककोंडी होत आहे. अनधिकृत पार्किंग, पादचारी मार्गावरील अतिक्रमणांमध्ये वाढ झाल्यामुळे शिस्तबद्ध, सुरक्षित व शाश्वत पार्किंग व्यवस्था विकसित करण्यासाठी नव्याने वाहनतळ धोरण तयार केले आहे. वाढती लोकसंख्या, वाहने, प्रमुख रस्त्यांवरील वाहतूकीचा वाढता ताण याचा नवीन धोरणात विचार केला आहे. पार्किंग व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित करण्याच्या उद्देशाने धोरण तयार केल्याचे दळणवळण विभागाचा कार्यकारी अभियंता सुनील पवार यांनी सांगितले.

### पास आणि निवासी परवाना

| | वाहनाचा प्रकार | नियमित शुल्क | अनुदानित शुल्क |
|---|---|---|---|
| रस्ताबाह्य दैनंदिन पास (१२ तास) | दुचाकी | ६० | ०० |
| | चारचाकी | १२० | ०० |
| रस्ताबाह्य मासिक पास | दुचाकी | १,८०० | १,३५० |
| | चारचाकी | ३,६०० | २,७०० |
| रस्त्यालगत निवासी मासिक परवाना | दुचाकी | १,८०० | ४५० |
| | चारचाकी | ७,२०० | १,८०० |







### अशी असेल शुल्क प्रणाली

वाहने थांबण्याच्या कालावधीनुसार प्रतितास शुल्कामध्ये वाढ करण्यासाठी 'टेलिस्कोपिक' शुल्क प्रणाली आणली आहे. त्यामुळे रस्त्यालगतच्या दीर्घकालीन पार्किंगला आळा, पार्किंग जागांचा अधिक कार्यक्षम वापर, पार्किंगची उपलब्धता आणि रस्ताबाह्य पार्किंग सुविधेच्या वापरास प्रोत्साहन मिळेल, असा दळणवळण विभागाचा दावा आहे. चारचाकी वाहनांसाठी पहिल्या दोन तासांकरिता ४०, चार तासांसाठी ५०, सहा तासांसाठी ६०, आठ तासांसाठी ७०, १० तासांसाठी ८० रुपये आणि १० तासांनंतर प्रत्येक अतिरिक्त तासासाठी १०० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. दुचाकीसाठी दोन तासांकरिता १०, चार तास १५, सहा तास २०, आठ तास २५, १० तास ३० रुपये आणि १० तासांनंतर प्रत्येक अतिरिक्त तासासाठी ४० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे.

शहरातील वाहतूककोंडी सोडविणे, वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी वाहनतळ धोरण आणले आहे. 'पे अँण्ड पार्किंग'च्या स्थळांव्यतिरिक्त सर्व पार्किंग बेकायदा ग्राह्य धरले जाईल. त्यावर पोलिसांकडून कारवाई करण्यात येईल.
**तृप्ती सांडभोर,** अतिरिक्त आयुक्त

वाहतूक व्यवस्थेला अधिक शिस्तबद्ध व कार्यक्षम बनविण्यासाठी वाहनतळ धोरणाची प्रभावी अंमलबजावणी ही काळाची गरज आहे. नागरिकांना सोईस्कर, सुरक्षित व सुलभ पार्किंग सुविधा उपलब्ध करून देताना वाहतूककोंडी कमी करणे, रस्त्यांचा कार्यक्षम वापर करणे आणि शहराच्या नियोजनबद्ध विकासाला चालना देण्यात येणार आहे.
**रवी लांडगे,** महापौर

शहराचा सुनियोजित विकास आणि नागरिकांना वाहतुकीची कोणतीही अडचण भासू नये, यासाठी वाहनतळ धोरण आणले आहे. यामुळे शहरातील वाहतूककोंडी सुटण्यास मदत होईल. हे धोरण राबवताना केवळ वाहतूक सुरळीत करणे एवढाच हेतू नसून, पादचारी आणि सायकलस्वारांनाही सुरक्षित रस्ते मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.
**अभिषेक बारणे,** अध्यक्ष,स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड महापालिका

# संक्षिप्त



### डॉ. डी. वाय. पाटील यांना श्रद्धांजली

**आकुर्डी येथील** डी. वाय. पाटील शिक्षण संकुल येथे समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक डॉ. डी. वाय. पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलगुरू मनीष भल्ला, माजी संकुल संचालक कर्नल जोशी, वाय. के. पाटील, डॉ. के. टी. जाधव, प्राचार्य डॉ. नीरज व्यवहारे, बिपिन शर्मा यांनी पाटील यांच्या आठवणींना उजाळा देणारे मनोगत व्यक्त केले. पाटील यांची दूरदृष्टी, मूल्ये, शिकवण, विचार आणि समृद्ध वारसा भावी अनेक पिढ्यांना सदैव मार्गदर्शन, शिक्षण, समाज आणि मानवतेच्या क्षेत्रात त्यांनी दिलेले अतुलनीय योगदान प्रेरणा देत राहील, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

### रंगूनवाला कॉलेजमध्ये डिजिटल दंतचिकित्सा केंद्र

**एम. ए. रंगूनवाला** कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटरमध्ये 'आबेदा इनामदार सेंटर ऑफ इम्प्लांटोलॉजी अँड डिजिटल डेंटिस्ट्री' सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात विद्यार्थ्यांना आधुनिक दंतचिकित्सा तंत्रज्ञान शिकण्याची आणि त्याचा प्रत्यक्ष सराव करण्याची संधी मिळणार आहे. संस्थेच्या अध्यक्षा आबेदा इनामदार यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रामनदीप दुग्गल, डॉ. विवेक हेगडे, डॉ. स्मिता मुसानी यांनीही योगदान दिले. डॉ. मोहित खेर यांच्या नेतृत्वाखाली या केंद्रातील उपचार आणि संशोधन करण्यात येणार आहे.

### सफाई साधने विकसित करण्यासाठी 'सेफर चॅलेंज'

सफाई कामगारांसाठी अधिक सुरक्षित साधने विकसित करण्यासाठी रॅकेट आणि ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेज ऑफ इंडियाने (एएससीआय) सेफर चॅलेंज ही स्पर्धा सुरू केली आहे. या स्पर्धेत स्टार्टअप्स, अभियंते, संशोधक, शैक्षणिक संस्थांना सहभागी होता येणार आहे. कंपनीच्या दक्षिण आशिया आणि आफ्रिका विभागातील संचालक रवी भटनागर यांनी ही माहिती दिली. केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संस्थेचे उप-सल्लागार डॉ. रमाकांत, पर्यावरण तज्ज्ञ डॉ. इंदिरा चक्रवर्ती, निवृत्त सनदी अधिकारी डॉ. बी. जनार्दन रेड्डी या स्पर्धेत मार्गदर्शन करणार आहेत. साहिल तलवार, असद उमर, डॉ. एम. स्नेहलथा आणि डॉ. विवेक सिंग चौहान परीक्षण करणार आहेत. अधिक माहितीसाठी https://asci.org.in/safer या संकेतस्थळावर संपर्क करण्याचे आवाहन कंपनीकडून करण्यात आले आहे.

# मार्केट यार्ड, कर्वेनगर भागांत चोरट्यांचा उच्छाद

## तीन महिलांचे दागिने पळविले

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** महिलांकडील दागिने हिसकावणाऱ्या चोरट्यांनी उच्छाद मांडला. चोरट्यांनी मार्केट यार्ड, कर्वेनगर भागात वेगवेगळ्या घटनेत महिलांकडील पावणेदोन लाख रुपयांचे हिसकावून नेले.

याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७९ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे मार्केट यार्ड परिसरात राहायला आहेत. रविवारी (९ ऑगस्ट) तक्रारदार ज्येष्ठ नागरिक आणि त्यांची पत्नी मार्केट यार्ड भागातील अल अमीन सोसायटीच्या परिसरातून रात्री नऊच्या सुमारास निघाले होते. त्या वेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील ७८ हजार रुपयांचे मंगळसूत्र पळविले. मार्केट यार्ड परिसरातील कुमार पार्क सोसायटी परिसरात रविवारी रात्री पावणेनऊच्या सुमारास एका महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपयांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावले. मार्केट यार्ड परिसरात एकापाठोपाठ दोन साखळी चोरीच्या घटना घडल्या. पोलिसांनी मार्केट यार्ड परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असून, पोलीस उपनिरीक्षक अक्षयकुमार गडगे तपास करत आहेत. कर्वेनगर भागातील कुलश्री सोसायटीच्या परिसरात सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास दुचाकीस्वार चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपयांचे मंगळसूत्र हिसकावून नेले. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# श्री मोरया गोसावी महाराज यांची उद्यापासून द्वारयात्रा

**पिंपरी :** चिंचवडगावातील श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी संजीवन समाधी मंदिरातून निघणाऱ्या पारंपरिक श्रावण द्वारयात्रेस उद्या (गुरुवार) पासून प्रारंभ होणार आहे. या यात्रेच्या माध्यमामधून चिंचवडगावाच्या चारही दिशांना असलेल्या देवीच्या स्थानांना भेट देण्याची परंपरा आहे.

चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार देव महाराज यांनी ही माहिती दिली. द्वारयात्रेच्या काळात दररोज सकाळी नऊ वाजता यात्रेसाठी श्री मंगलमूर्ती वाड्यातून चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार देव महाराज यांच्या समवेत सुमारे १०० ते १५० भाविकांचा समुदाय वाजत-गाजत निघतो. श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधीचे दर्शन घेऊन यात्रेस प्रारंभ केला जातो.

# श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्टच्या उत्सवाची वासापूजनाने नांदी

## श्री गणेश सुवर्णधाम देखाव्याच्या प्रतिकृतीचे अनावरण



लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टच्या १३५ व्या गणेशोत्सवाची नांदी मंडपाच्या वासापूजनाने झाली. श्री गणेश सुवर्णधाम देखाव्याच्या प्रतिकृतीचे अनावरणही करण्यात आले.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंदिर येथे पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले आणि अशोक इलेक्ट्रिकलचे अशोक शहा, तसेच उत्सवप्रमुख व विश्वस्त पुनीत बालन यांच्या हस्ते उत्सव मंडपाचे विधिवत वासापूजन केले. ट्रस्टकडून 'श्री गणेश सुवर्णधाम' हा आकर्षक देखावा उभारण्यात येणार आहे. पार्वतीनंदन शिवपुत्र श्री गणेशाची वास्तू जिथे 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' या भारतीय संस्कृतीतील विचारांचा आचार-विचार केला जातो, या संकल्पनेवर आधारित हा देखावा असणार आहे. आई-वडिलांप्रति कृतज्ञता, त्यांचे महत्त्व आणि भारतीय संस्कृतीतील मातृ-पितृपूजनाची परंपरा या माध्यमातून अधोरेखित करण्याचा प्रयत्न देखाव्यातून आहे.

'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीच्या सजावटीचे वासापूजन क्रांतिदिनी झाले. या वर्षी श्री गणेश सुवर्णधाम हा काल्पनिक देखावा उभारला जाणार आहे. या वर्षीही डीजेमुक्त गणेशोत्सव आणि दहीहंडी साजरी करणार आहोत,' असे पुनीत बालन यांनी सांगितले.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीच्या १३५ व्या गणेशोत्सव मंडपाच्या वासापूजनाचा मान मिळाला, याचा आनंद आहे. कार्यकर्त्यांचा उत्साह आणि विसर्जन मिरवणुकीतील शिस्त पाहिल्यानंतर पुण्याचा गणेशोत्सव आगळावेगळा का आहे, हे कळले.
**- कृषीकेश रावले,** पोलीस उपायुक्त

# पिंपरीत एक लाख भटके श्वान

## निर्बीजीकरणाचे प्रमाण अत्यल्प

लोकसत्ता प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात भटक्या श्वानांची संख्या सुमारे एक लाख असताना महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडून दर वर्षी केवळ दोन ते तीन हजार श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात येत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. मागील सव्वाचार वर्षांत केवळ १२ हजार ४३० श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात भटक्या श्वानांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. भटके श्वान समूहाने फिरतात. रात्री किंवा पहाटेच्या वेळी वाहनचालकांच्या अंगावर धावून जातात. दर महिन्याला दोन हजारांहून अधिक श्वान हल्ल्यांचे रुग्ण रुग्णालयात दाखल होत आहेत. त्यामुळे श्वानांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी महापालिकेकडून श्वान निर्बीजीकरण उपक्रम राबविला जात आहे. मात्र, त्याचे प्रमाण अत्यल्प आहे. मागील सव्वाचार वर्षांत केवळ १२ हजार ४३० श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केली आहे. श्वानांची संख्या वाढत असताना निर्बीजीकरण शस्त्रक्रियेचे प्रमाण अत्यल्प असल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे.






### करोना कालावधीत सर्वाधिक निर्बीजीकरण

करोना काळात २०२०-२१ मध्ये २१ हजार ७३७, २०२१-२२ मध्ये १२ हजार ६९८ श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया केल्याची महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे नोंद आहे. यासाठी तीन कोटी ३५ लाख रुपये खर्च झाले आहेत. त्यानंतर दोन वर्षे सामाजिक दायित्व निधीतून खर्च करण्यात आला. ऑगस्ट २०२५ पासून श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रियेचा खर्च पुन्हा महापालिकेमार्फत सुरू करण्यात आला आहे. एका श्वानाच्या निर्बीजीकरण शस्त्रक्रियेसाठी अंदाजे ११०० रुपये खर्च येत असल्याचे या विभागाकडून सांगितले जात आहे.

### निवारागृहांचा अभाव

शहरात अंदाजे एक लाख भटके श्वान आहेत. सार्वजनिक ठिकाणी असलेले मोकाट, भटके श्वान ठेवण्यासाठी महापालिकेचे निवारागृह नाहीत. सद्य:स्थितीत एकही निवारागृह नाही. त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागणार आहेत. निवारागृह निर्माण केले जाणार असल्याचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांनी सांगितले.

भटक्या श्वानांवरील निर्बीजीकरण शस्त्रक्रियेच्या नावाखाली मागील काही वर्षांत कोट्यवधी रुपयांचा खर्च केला आहे. राजकीय नेत्यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांना याचे काम दिले जात आहे. या संस्था प्रत्यक्षात निर्बीजीकरण शस्त्रक्रिया न करता कागद रंगवून कोट्यवधी रुपयांची देयके काढतात. श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया हे भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे.
**- मारुती भापकर,** सामाजिक कार्यकर्ते

### माहिती देण्यास टाळाटाळ

मागील वर्षभरात श्वान निर्बीजीकरणावर किती खर्च केला, एक शस्त्रक्रियेसाठी नेमका किती खर्च येतो, याची पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांना माहिती देता आली नाही. त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली.

# श्वानांसाठी नवीन पाच निवारा केंद्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील भटके श्वान ठेवण्यासाठी खासगी-सार्वजनिक भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) पाच निवारा केंद्र (शेल्टर्स) उभारण्यात येणार आहेत. एका केंद्राची क्षमता एक हजार राहणार आहे. श्वानांचे निर्बीजीकरणही वाढविण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले, चिखलीतील चार वर्षांच्या मुलीवर श्वानांकडून हल्ला झालेली घटना गंभीर आहे. पशुवैद्यकीय अधिकारी मुलीच्या घरी भेट देऊन आले आहेत. मुलीची प्रकृती आता स्थिर आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी तत्काळ पावले उचलली आहेत. एक हजार श्वान ठेवण्याची क्षमता असलेले पाच निवारा केंद्र उभारण्यात येणार आहेत. यासाठी पशुवैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी आणि तीन स्वयंसेवी संस्थांशी संपर्क साधला आहे. त्यांच्या माध्यमातून हे काम त्वरित सुरू केले जाईल. ज्या भागांतून नागरिकांच्या तक्रारी येत आहेत, तिथे पथक पाठवून श्वानांना पकडले जात आहे. चिखलीतील घटनेत प्रशासनाकडून दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा झाला आहे का, याची सखोल चौकशीचे आदेश पशुवैद्यकीय विभागाच्या उपायुक्तांना दिल्याचे आयुक्तांनी सांगितले.




विद्याधर कुलकर्णी

**'जुने जाऊद्या मरणालागुनी...' असे म्हणत असलो, तरी 'जुने ते सोने' च असते, याची प्रचिती 'पूना इन एफटीआयआय स्टुडंट्स फिल्म्स' या अनोख्या लघुपट महोत्सवाने आली. १९६० ते १९७० च्या दशकातील जुन्या पुण्याचे मनोहारी दर्शन घडविणाऱ्या १४ लघुपटांतून रसिकही स्मरणरंजनामध्ये रममाण झाले.**

# जुन्या पुण्याचे मनोहारी दर्शन घडविणारा महोत्सव

**ग्रामदैवत कसबा** गणपती, तांबडी जोगेश्वरी, शनिवारवाडा, तळ्यातला गणपती, राजा केळकर संग्रहालय या महत्त्वाच्या स्थानांसह शिक्षण आणि संस्कृतीचे माहेरघर ही पुण्याची ओळख. एके काळी चित्रपटनिर्मितीचे केंद्र असलेल्या पुण्यामध्ये प्रभात स्टुडिओच्या जागेवर राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेची (एफटीआयआय) स्थापना झाली. चित्रपटाच्या विविध तांत्रिक गोष्टींमध्ये पारंगत मनुष्यबळ घडविणारी संस्था असा लौकिक संपादन केलेल्या या संस्थेमध्ये नुकताच आगळावेगळा लघुपट महोत्सव झाला.

'पूना इन एफटीआयआय फिल्म्स' अंतर्गत जुन्या पुण्याची नव्याने ओळख करून देणारे १४ लघुपट पाहण्याची संधी चित्रपटप्रेमींना मिळाली. १९६४



साली निर्मिती झालेल्या 'वन डे' या लघुपटाने या महोत्सवाची सुरुवात झाली. विविध जाती आणि आर्थिक स्तरांतील नागरिकांचे वास्तव्य असलेल्या खेड्यामध्ये कशी शांतता नांदत होती, हे १९ मिनिटे कालावधीच्या या लघुपटातून पाहता आले. सार्वजनिक वाहतूक आणि पायाभूत सुविधा यांअंतर्गत पुणे आणि मुंबई या शहरांना जोडणाऱ्या 'डेक्कन क्वीन' या रेल्वेच्या लोकप्रियतेचे गमक ११ मिनिटांच्या कालावधीमध्ये पडद्यावर पाहता आले. पुण्याची जीवनवाहिनी असलेल्या पीएमटी सेवेविषयीची माहिती 'सर्व्हिस ऑफ पीएमटी' या नऊ मिनिटांच्या लघुपटामध्ये अनुभवता आली. 'डे अँट द रेसकोर्स' या लघुपटामध्ये रेसकोर्सवरील अश्वशर्यती पाहता आल्या. हडपसर येथील ग्लायडिंग सेंटरची कार्यपद्धती 'ए रोमान्स इन द स्काय' या लघुपटातून दिसली. १९६८ मध्ये निर्मिती झालेल्या या लघुपटामध्ये त्या काळी विद्यार्थी असलेल्या शबाना आझमी आणि कंवलजित यांचे रुपेरी पडद्यावर दर्शन झाले.

'आर्ट अँड कल्चर' विभागामध्ये 'भीमसेन जोशी' हा १९६९ मध्ये निर्मिती करण्यात आलेला दहा मिनिटे कालावधीचा लघुपट पाहता आला. 'मिस्टर केळकर अँड हिज म्युझियम' या लघुपटातून एका माणसाचा संग्रह असा लौकिक असलेल्या राजा दिनकर केळकर संग्रहालय कॅमेऱ्याद्वारे जवळून पाहता आले. संग्रहालयाचे संस्थापक काकासाहेब केळकर यांची मुलाखत हे या लघुपटाचे वैशिष्ट्य ठरले. 'बिफोर द थर्ड बेल गोज' हा लघुपट मराठी रंगभूमीचे वैभव दाखविणारा होता. विजय तेंडुलकर यांचे 'अशी पाखरे येती' नाटकाचे वाचन येथपासून ते नाटक रंगमंचावर सादर होईपर्यंतच्या विविध टप्प्यांचे दर्शन दहा मिनिटे कालावधीच्या लघुपटात घडले. 'फिल्म गेझ' या सात मिनिटांच्या लघुपटात पुण्यातील विविध एकपडदा चित्रपटगृहांची सफर घडली.

'एज्युकेशन अँड हेल्थकेअर' अंतर्गत डॉ. मणिभाई देसाई यांनी स्थापन केलेल्या उरुळीकांचन येथील निसर्गोपचार केंद्राच्या कार्यावर आधारित 'नेचर क्युअर', 'होम सायन्स', येरवडा मनोरुग्णालयाच्या कार्याचा वेध घेणारा 'मेंटल हॉस्पिटल' हा लघुपट, सिम्बायोसिस संस्थेची स्थापना होण्यास केंद्रीभूत ठरलेला क्षण असलेला 'अन आफ्रिकन स्टुडंट्स इन पूना' आणि 'डॉ. कानेटकर - ए यंग सर्जन' हे लघुपट पाहण्याची संधी चित्रपटप्रेमींना लाभली.

चित्रपटांचे ज्येष्ठ अभ्यासक समर नखाते यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी निर्मिलेल्या या लघुपटांचे महत्त्व अधोरेखित केले. इतिहासाचे अभ्यासक मंदार लवाटे यांनी साधलेल्या संवादातून जुन्या पुण्याची महती उलगडली. या आगळ्यावेगळ्या चित्रपट महोत्सवाला पुणेकरांनी अभूतपूर्व प्रतिसाद न दिला तरच नवल!

vidyadhar.kulkarni@expressindia.com

# दैनंदिनी



● **शिष्यवृत्ती प्रदान :** दि पूना मर्चंट्स चेंबर, कै. रघुवीरसिंहजी गोयल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'बीएमसीसी'तील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान, प्रमुख उपस्थिती - मोहन जोशी, विठ्ठल मणियार, स्थळ - 'बीएमसीसी'चा टाटा हॉल, डेक्कन जिमखाना, सकाळी ११

● **प्रदर्शन :** पुणे गॅलरी ऑफ व्हिज्युअल आर्ट्स प्रस्तुत संत तुकाराम महाराज गाथा ग्रंथातील अभंगांतून स्फुरलेल्या चित्रकार-शिल्पकार भास्कर हांडे यांच्या निवडक कलाकृतींचे प्रदर्शन, 'तुझे रूप, माझे देणे,' स्थळ - श्रीराम लागू रंग-अवकाश, हिराबाग चौक, टिळक रस्ता, स. ११ ते ७

● **व्याख्यान :** गीता धर्म मंडळ, दैनंदिन ज्ञानसत्र, व्याख्यान, विषय - वाल्मिकी रामायणातील सुभाषिते, वक्त्या - डॉ. राधा गोडबोले, स्थळ - गीताधर्म मंडळ, सदाशिव पेठ, सायं. ५

● **धार्मिक :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, अतिरुद्र महायज्ञ, स्थळ - श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिर, छत्रपती शिवाजी रस्ता, दुपारी १ ते सायं. ७

● **धार्मिक :** पवित्र नाम देवालय, १४९ वा वर्धापनदिन, फॅमिली ब्लेसिंग मिटिंग, वक्त्या - स्टेला रमोला डेव्हीडसन, स्थळ - पवित्र नाम देवालय, पंचहौद मिशन, ४ गुरुवार पेठ, सायं. ६

● **धार्मिक :** अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट, दीप अमावस्या, महाआरती, उपस्थिती - कालीचरण महाराज, दत्तदासजी महाराज, स्थळ - अखिल मंडई म्हसोबा मंदिर, शुक्रवार पेठ, सायं. ७

# संक्षिप्त

## मल्लखांब स्पर्धेत राई, मिहिरा सरस

**पुणे :** विनायकी क्रीडा महोत्सवातंर्गत आयोजित मल्लखांब स्पर्धेत राई दामले, मिहिरा कर्वे, अमोघ सोमण, स्वयंभू वळकुंदे, आर्यन कोरे, अयोध्या भेगडे, शिवाजीत वळकुंदे, स्पृहा लांडगे यांनी विविध गटांतून विजेतेपद मिळवले. मुलींच्या ८ वर्षांखालील गटात राई दामलेने ६.४० गुणांसह, तर मुलांच्या गटात स्वयंभू वाळकुंडेने ३.६० गुणांसह बाजी मारली. मुलांच्या १० वर्षांखालील गटात अमोघ सोमण याने ८.०५ गुणांसह, मुलींच्या गटात मिहिरा कर्वेने ७.६० गुणांसह विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील १२ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्यन कोरे आणि मुलींच्या गटात अयोध्या भेगडे, तर १४ वर्षांखालील मुलांच्या गटात शिवाजीत वळकुंदे आणि मुलींच्या गटात स्पृहा लांडगेने बाजी मारली.

## बुद्धिबळ स्पर्धेत सावळकर विजेता

**पुणे :** साताऱ्यातील विश्वगंगा प्रतिष्ठान आयोजित जलदगती मानांकन बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या आदित्य सावळकर याने विजेतेपद मिळवले. अखेरच्या फेरीत पहिल्या पटावर आदित्यने पुण्याच्या मिहीर सरवदेचा, तर दुसऱ्या पटावर अहिल्यानगरच्या आशीष चौधरीने पुण्याच्याच सुयश वडकेचा पराभव केला. दोघांचेही ८.५ गुण झाल्यामुळे सरस गुण सरासरीवर आदित्यला विजयी घोषित करण्यात आले. आशीष दुसऱ्या, तर पुण्याचा केवल निर्गुण तिसऱ्या स्थानावर आला.

## पुण्यात आजपासून जागतिक हे-बॉल स्पर्धा

**पुणे :** कोंढवा येथील 'जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटर'मधील 'राजन खिंवसरा बिलियर्डस अँड स्नूकर अकादमी' येथे 'अॅपेक्स स्पोर्ट्स डब्ल्यूपीए हे-बॉल जागतिक अजिंक्यपद' स्पर्धेस आजपासून सुरुवात होणार आहे. जागतिक स्तरावरील दिग्गज खेळाडूंचा खेळ पुण्यातील 'क्यू स्पोर्ट्स'प्रेमींना पहायला मिळणार आहे. स्पर्धेत एकूण चार लाख डॉलर्सची पारितोषिके देण्यात येणार आहेत. जगातील अव्वल दहा पुरूष खेळाडूंपैकी सहा आणि महिला खेळाडूंपैकी आठ खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. एकूण १२८ खेळाडू (प्रत्येक गटात ६४ खेळाडू) स्पर्धेत खेळतील.

# परदेश दौऱ्यात सराव सामना मोलाचा!

## कोटक यांचे मत; गावस्कर यांच्या भूमिकेशी साधर्म्य

**वृत्तसंस्था, कोलंबो**



### 'पंतला मोकळीक देणे गरजेचे'

● भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतला गेल्या काही काळापासून सातत्यपूर्ण कामगिरी करता आलेली नाही. धावांसाठी त्याचा संघर्ष श्रीलंका एकादशविरुद्धच्या सराव सामन्यातही दिसून आला.

● सराव सामन्याच्या पहिल्या डावात तो बेजबाबदार फटका मारून बाद झाला, तर दुसऱ्या डावात त्याने आपल्या नैसर्गिक आक्रमक खेळाला बगल देत खेळपट्टीवर टिकून खेळण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला मोठी खेळी करता आली नाही. पंतसारख्या खेळाडूला मोकळीक देणे गरजेचे असल्याचे मत माजी कसोटीपटू दीप दासगुप्ताने व्यक्त केले आहे.

● "संघ व्यवस्थापनाने पंतला आक्रमकपणे खेळण्याची मोकळीक दिली पाहिजे. श्रीलंकेच्या संघात डावखुऱ्या फिरकी गोलंदाजांची संख्या मोठी आहे. त्यांच्याविरुद्ध डावखुऱ्या पंतची कामगिरी निर्णायक ठरू शकेल," असे दीप दासगुप्ता म्हणाला.

**भारतीय संघाने** गेल्या काही परदेश दौऱ्यांत सराव सामना खेळण्यापेक्षा नेट्समध्ये घाम गाळण्यास आणि आंतरसंघीय सामने खेळण्यास प्राधान्य दिले होते. मात्र, आता या धोरणात बदल करताना श्रीलंका दौऱ्यातील कसोटी मालिकेपूर्वी भारताने सराव सामना खेळणे पसंत केले. परदेशातील खेळपट्ट्या आणि परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी प्रत्यक्ष सामन्याचा अनुभव हा केवळ नेट्समधील सरावापेक्षा अधिक मोलाचा असल्याचे मत भारताचे फलंदाजी प्रशिक्षक सितांशू कोटक यांनी व्यक्त केले. त्यांचे हे वक्तव्य दिग्गज कसोटीपटू सुनील गावस्कर यांच्या भूमिकेला बळ देणारे आहे.

श्रीलंकेविरुद्ध १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेपूर्वी भारताने गेल्या आठवड्यात तीनदिवसीय सराव सामना खेळला. कोलंबोतील नॉनडेस्क्रिप्ट्स क्रिकेट क्लबच्या मैदानावर झालेल्या या सराव सामन्यात भारताने श्रीलंका क्रिकेट एकादश संघाचा पराभव केला. मात्र, अंतिम निकालापेक्षा खेळाडूंना मिळालेला सराव अधिक महत्त्वाचा असल्याचे कोटक यांना वाटते.

"आम्ही केवळ नेट्समध्ये आणखी चार दिवस सराव केला असता, तरी त्याचा या सराव सामन्याइतका फायदा झाला नसता. गोलंदाजांनी चांगल्या तीव्रतेने गोलंदाजी केली, फलंदाजांनाही स्पर्धात्मक पातळीवर खेळता आले. प्रत्येकाला संधी देण्याचा आमचा प्रयत्न होता. गोलंदाजांनीही फलंदाजी केली. आम्हाला येथील परिस्थिती आणि खेळपट्टीचे स्वरूप समजले. त्यामुळे सराव सामना अत्यंत उपयुक्त ठरला," असे कोटक यांनी 'बीसीसीआय'ने प्रसिद्ध केलेल्या चित्रफितीत सांगितले.

या सामन्यात देवदत्त पडिक्कलने नाबाद १४२ धावांची खेळी करताना साई सुदर्शनच्या अनुपस्थितीत तिसऱ्या क्रमांकासाठी आपली दावेदारी भक्कम केली. "देवदत्तची खेळी खूप चांगली होती. त्याने ज्या पद्धतीने फलंदाजी केली, ते विशेष समाधान देणारे होते," असे कोटक म्हणाले.

### गावस्करांचा मुद्दा अधोरेखित

कोटक यांचे मत सुनील गावस्कर यांच्या जुन्या भूमिकेला बळ देणारे आहे. परदेश दौऱ्यांवर प्रत्यक्ष परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी सराव सामने खेळणे आवश्यक असल्याचे गावस्कर यांनी सातत्याने सांगितले आहे. २०२५ मध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील भारतीय संघाच्या अपयशानंतर गावस्करांनी परदेशातील मालिकेपूर्वी तेथे लवकर पोहोचून प्रथमश्रेणी सामने खेळण्याचे महत्त्व अधोरेखित केले होते. नेट्समध्ये तांत्रिक तयारी करता येते, पण सामन्यातील दडपण, खेळपट्टीचे स्वरूप, धावांचा पाठलाग आणि गोलंदाजांची प्रत्यक्ष लय याचा अनुभव केवळ सामन्यातूनच मिळतो. विशेषतः नव्या खेळाडूंसाठी असे सामने फायदेशीर ठरतात, असे त्यांचे म्हणणे आहे.

## अभिषेक, सुमितची चमकदार कामगिरी

**पुणे :** कनिष्ठ गटाच्या जिल्हा अॅथलेटिक्स स्पर्धेत ३००० मीटर शर्यतीत अभिषेक गुलभिले आणि तिहेरी उडीत सूरज गव्हाणे याने विजेतेपद मिळवले. या स्पर्धेतून राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी पुणे संघाची निवड करण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील क्रीडा संकुलात पार पडलेल्या स्पर्धेत अखेरच्या दिवशी २० वर्षांखालील गटात अभिषेकने ९ मिनिटे २५.२२ सेकंद अशी वेळ देत ३००० मीटर धावण्याची शर्यत जिंकली. सूरजने १३.२८ मीटर उडी मारताना तिहेरी उडीचे विजेतेपद मिळविले.

याच वयोगटातील ११० मीटर अडथळा शर्यत मंथन जुतलिंगे याने १५.७१ सेकंद वेळ देत जिंकली. मुलींच्या २० वर्षांखालील गटात मानसी यादवने १० मिनिटे ३३.५४ सेकंद वेळ देताना ३००० मीटर धावण्याची शर्यत जिंकली. कृष्णाली जगताप (२०० मीटर), दिया जोशी (लांब उडी) आणि सिद्धी भोईर (तिहेरी उडी) यांनी विजेतेपद मिळवले.

# ट्रम्प यांचा इन्फान्टिनो यांना पाठिंबा

## 'युएफा'सह अन्य खंडीय संघटनांची 'फिफा'वरील नाराजी मात्र कायम

**वृत्तसंस्था, न्यूयॉर्क**



**युरोप, उत्तर** अमेरिका आणि आशियातील फुटबॉल संघटनांनी 'फिफा'चे अध्यक्ष जियानी इन्फान्टिनो यांच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित करताना त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली असतानाच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मात्र त्यांना भक्कम पाठिंबा दर्शवला आहे. इन्फान्टिनो यांना अध्यक्षपदावरून हटवण्याचा विचार करणेही घोडचूक ठरेल, असे ट्रम्प म्हणाले. इन्फान्टिनो यांच्या नेतृत्वाखाली नुकताच पार पडलेला विस्तारित 'फिफा' विश्वचषक हा आतापर्यंतचा सर्वांत यशस्वी विश्वचषक असल्याचा दावा करत ट्रम्प यांनी त्यांचे जोरदार समर्थन केले.

इन्फान्टिनो यांच्या अध्यक्षपदाभोवतीचे वाद 'फिफा फॉरवर्ड एंटरप्राइज' या प्रस्तावामुळे अधिक तीव्र झाले. 'फिफा'शी संबंधित स्पर्धांमध्ये, विशेषतः विश्वचषकात, खासगी क्षेत्राचा सहभाग आणि गुंतवणूक वाढवण्याचा या योजनेचा उद्देश होता. मात्र, या प्रस्तावाला जगभरातील फुटबॉल संघटनांकडून विरोध झाला. युरोपीयन फुटबॉल महासंघ (युएफा), उत्तर-मध्य अमेरिका आणि कॅरेबियन फुटबॉल महासंघ (कॉनकाकाफ), तसेच आशियाई फुटबॉल महासंघ (एएफसी) यांनी 'फिफा'च्या प्रस्तावाला विरोध दर्शवला. वाढत्या दबावानंतर 'फिफा'ने अखेर हा प्रस्ताव मागे घेतला. मात्र, त्यानंतरही इन्फान्टिनो यांच्यावरील नाराजी कायम आहे. या खंडीय संघटनांनी इन्फान्टिनो आणि 'फिफा'वर 'फसवणूक' आणि 'विश्वासभंग' केल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. परंतु ट्रम्प यांनी इन्फान्टिनो यांनी पाठिंबा दर्शवला आहे.

"फिफाने कोणत्याही कारणास्तव इन्फान्टिनो यांना पदावरून हटवण्याचा विचार केला, तर ती घोडचूक ठरेल. ते शानदार काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आतापर्यंतचा सर्वांत यशस्वी विश्वचषक झाला. ते नसतील तर विश्वचषक पुन्हा कधीही इतका यशस्वी किंवा नफ्याचा ठरणार नाही," असे ट्रम्प यांनी समाजमाध्यमांवर लिहिले.

अमेरिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेदरम्यान ट्रम्प आणि इन्फान्टिनो यांच्यातील वाढलेली जवळीक फुटबॉलविश्वात चर्चेचा विषय ठरली होती. त्यातच ट्रम्प यांच्या जावयाच्या भावाच्या कंपनीचे 'फिफा'च्या वादग्रस्त हिस्सा विक्रीच्या योजनेत महत्त्वाचे स्थान असल्याचे समोर आल्याने प्रश्न आणखी वाढले. मात्र, या योजनेबाबत इन्फान्टिनो यांच्याशी आपण चर्चा केली नसल्याचे ट्रम्प यांनी सांगितले होते.

# हरमनप्रीतच भारताचे मुख्य अस्त्र

## हॉकी विश्वचषकाबाबत माजी ड्रॅग-फ्लिकर जुगराज यांचे मत

**पीटीआय, नवी दिल्ली**



राष्ट्रकुल, आशियाई क्रीडा स्पर्धा, आशिया चषकापाठोपाठ ऑलिम्पिक पदकाचीही कसर भरून निघाली. आता विश्वचषक पदकाची प्रतीक्षाही संपेल.

**- जुगराज सिंग**

**आगामी विश्वचषक** हॉकी स्पर्धेत कर्णधार हरमनप्रीत सिंगचा आक्रमक खेळ आणि ड्रॅग-फ्लिकिंग हेच भारतीय संघाचे मुख्य अस्त्र ठरेल, असे मत माजी हॉकीपटू आणि यशस्वी ड्रॅग-फ्लिकर जुगराज सिंगने नोंदवले आहे. हरमनप्रीतचा खेळ पाहिला की त्याच्यात माझेच प्रतिबिंब दिसते, असेही जुगराज म्हणाले.

जुगराज सिंग यांची जडणघडण ज्या सुरजित हॉकी अकादमीत झाली, त्याच अकादमीतून हरमनप्रीतही तयार झाला आहे. हरमनप्रीतचा खेळ आणि खेळाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन पाहिला की मला माझ्या खेळण्याच्या दिवसांची आठवण होते. त्याची शैली अगदी माझ्यासारखीच आहे. त्याची खेळण्याची पद्धत आणि आक्रमकता मला माझीच आठवण करून देते, असे जुगराज म्हणाले.

"तुला मैदानावर खेळताना पाहिले की मला मीच खेळत असल्यासारखे वाटते," असे आपण हरमनप्रीतला अनेकदा सांगितल्याचेही जुगराज यांनी नमूद केले. हरमनप्रीतची विश्वातील सर्वोत्तम ड्रॅग-फ्लिकर्समध्ये गणना केली जाते. "टोक्यो ऑलिम्पिकपासून तो शानदार खेळ करत आहे. जो खेळाडू संघाला गरज असताना सातत्याने चांगली कामगिरी करतो, तोच संघाचे मुख्य अस्त्र ठरतो. मला वाटते, तो खेळाडू हरमनप्रीत असेल," असे जुगराज यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

जुगराज यांचीही गणना जगातील सर्वोत्तम ड्रॅग-फ्लिकर्समध्ये केली जात होती. मात्र, २००३ मध्ये जालंधरजवळ झालेल्या एका कार अपघातामुळे त्यांच्या आशादायी कारकीर्दीला पूर्णविराम मिळाला.

"मैदानाबाहेरून मी बऱ्याच गोष्टी टिपू शकतो आणि हरमनप्रीतला मार्गदर्शन करू शकतो. हरमनप्रीतही अनेकदा माझ्याशी आपल्या खेळातील सुधारणांबाबत चर्चा करतो," असे जुगराज यांनी सांगितले.

## 'बुमराच्या अनुपस्थितीत गुरनूरच आशास्थान'

**कोलकाता :** श्रीलंकेविरुद्धच्या आगामी दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत जसप्रीत बुमराच्या अनुपस्थितीत गुरनूर ब्रार भारतीय वेगवान गोलंदाजीतील मुख्य आशास्थान ठरू शकतो, असे वक्तव्य श्रीलंकेचा माजी अष्टपैलू परवेझ महारूफने केले आहे. गुरनूरची शैली श्रीलंकेतील हवामानाला अतिशय पूरक आहे. मी संघ व्यवस्थापनात असतो, तर त्याला कसोटी पदार्पणाची संधी देण्याचा मोह निश्चित झाला असता, असे महारूफ म्हणाला.

"मोहम्मद सिराज भारताच्या वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करेल, परंतु अफगाणिस्तानविरुद्ध कसोटीत खेळलेल्या प्रसिद्ध कृष्णाच्या जागी अननुभवी गुरनूरला कसोटी पदार्पणाची संधी मिळणार का, याबाबत तर्क लावले जात आहेत. विशेषतः जुन्या चेंडूने रिव्हर्स स्विंग करण्याची जी क्षमता बुमराकडे आहे, त्याची भारताला मोठी उणीव भासेल," असे महारूफ म्हणाला.

## स्वरदा सानेचे दुहेरी यश



**पुणे :** बालुफ ऑटोमेशन प्लेअर्स चषक जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेत अखेरच्या दिवशी स्वरदा साने हिने महिला गटातून विजेतेपदावर मोहोर उमटवली. यापूर्वी तिने १९ वर्षांखालील गटाचेही विजेतेपद मिळवले होते.

शारदा स्पोर्ट्स सेंटर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीतही बिगरमानांकित स्वरदा हिने मानांकित खेळाडूंवरील वर्चस्वाची मालिका कायम राखली. विजेतेपदाच्या लढतीत स्वरदाने चौथ्या मानांकित आद्या गवात्रे हिचे आव्हान संघर्षपूर्ण लढतीत ११-७, ८-११, ६-११, ११-७, ९-११, ११-३, १२-१० असे संपुष्टात आणले.

त्यापूर्वी उपांत्य फेरीत स्वरदाने तिसऱ्या मानांकित जान्हवी फणसे हिचे आव्हान अशाच सात गेमच्या लढतीत संपुष्टात आणले होते. आद्याने अग्रमानांकित फौझिया मेहेरल्लीचा पराभव केला होता. ती इंडिया खेलेगा टेबल टेनिस अकादमीत सन्मय परांजपे यांच्याकडे मार्गदर्शन घेते.

पुरुष विभागाच्या अंतिम लढतीत अग्रमानांकित इशान खांडेकर याने लौकिकाला साजेसा खेळ करताना सातव्या मानांकित शुभंकर रानडे याचा ११-६, ८-११, ११-६, ११-६, ११-४ असा पराभव केला. स. प. महाविद्यालयात शिकणारा इशान पीवायसीच्या टॉस अकादमीत दिपेश अभ्यंकर यांच्याकडे मार्गदर्शन घेतो.

# पहिल्या फेरीत प्रज्ञानंदची बरोबरी



**सेंट लुईस :** भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदला प्रतिष्ठेच्या सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेतील पहिल्याच फेरीच्या सामन्यात अमेरिकेच्या सॅम्युएल सेव्हियनविरुद्ध बरोबरीवर समाधान मानावे लागले. दुसरीकडे, अग्रमानांकित फॅबियानो कारुआनाने नेदरलँड्सच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टचा पराभव करत स्पर्धेत विजयी सलामी दिली. पहिल्या फेरीत विजय मिळवणारा कारुआना हा एकमेव खेळाडू ठरला.

ग्रँड चेस टूरमधील महत्त्वाच्या स्पर्धांपैकी एक असलेल्या सिंकेफिल्ड चषकामध्ये यंदा १० खेळाडू सहभागी झाले आहेत. एकूण नऊ फेऱ्यांच्या या स्पर्धेतील पहिल्या फेरीत प्रज्ञानंदने काळ्या मोहऱ्यांसह खेळताना सेव्हियनला कोणतीही संधी न देता सामना बरोबरीत सोडवला. रुई लोपेझच्या आर्खेन्गेल्स्क प्रकारात झालेल्या सामन्यात दोन्ही खेळाडूंनी सावध पवित्रा घेतला. त्यामुळे डावात फारशी गुंतागुंत निर्माण झाली नाही. अखेरीस ४८ चालींनंतर दोघांनी गुण विभागून घेतला.

जावोखिर सिंदारोव आणि लेव्हॉन अरोनियन, जर्मनीचा व्हिन्सेंट केमेर आणि अमेरिकेचा वेस्ली सो, तसेच नेदरलँड्सचा अनुभवी ग्रँडमास्टर अनिश गिरी आणि फ्रान्सचा मॅक्सिम व्हॅचिएर-लाग्रेव्ह यांच्यातील लढती बरोबरीत सुटल्या. पहिल्या फेरीत कारुआना हा एकमेव विजेता ठरल्याने त्याने गुणतालिकेत आघाडी घेतली आहे.

# जाचक निर्बंधांविरोधात रशिया महासंघाची याचिका

**वृत्तसंस्था, लोझान**

**युक्रेनवरील आक्रमणानंतर** रशियन खेळाडूंवर जागतिक अॅथलेटिक्स संघटनेने लादलेल्या निर्बंधांना आव्हान देण्यासाठी रशियन अॅथलेटिक्स महासंघाने क्रीडा लवादाकडे स्वतंत्र याचिका दाखल केली आहे. हे निर्बंध महासंघाच्या अधिकारांचे उल्लंघन करणारे असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर रशियन खेळाडूंच्या प्रतिनिधित्वाच्या हक्कांवर गदा आणणारे आहेत, असा महासंघाचा दावा आहे.

रशियन सैन्याने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर जागतिक अॅथलेटिक्स संघटनेने मार्च २०२२ मध्ये रशिया आणि त्याचा मित्रदेश बेलारूसच्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधून वगळले होते. जुलैमध्ये झालेल्या कौन्सिलच्या बैठकीतही हे निर्बंध कायम ठेवण्यात आल्याने रशियन अॅथलेटिक्स महासंघाने ते उठवण्याच्या मागणीसाठी क्रीडा लवादाकडे स्वतंत्र याचिका दाखल केली आहे.

"रशियन अॅथलेटिक्सवर लादण्यात आलेले निर्बंध अभूतपूर्व आहेत. इतर कोणत्याही क्रीडा महासंघाला अशा कठोर निर्बंधांना सामोरे जावे लागलेले नाही. हे निर्बंध केवळ महासंघाच्या नियमित कामकाजात अडथळा आणत नाहीत, तर रशियातील अॅथलेटिक्सच्या विकासालाही, विशेषतः युवा खेळाडूंच्या प्रगतीला, बाधा पोहोचवत आहेत," असे रशियन अॅथलेटिक्स महासंघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बोरिस यारीशेव्स्की यांनी म्हटले आहे.

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) लॉस एंजलिस २०२८ ऑलिम्पिकच्या पार्श्वभूमीवर रशियावरील काही निर्बंध शिथिल केले आहेत. इतर क्रीडा महासंघांनीही असेच पाऊल उचलावे, असे आवाहन त्यांनी केले होते. मात्र, जागतिक अॅथलेटिक्सने रशियावरील निर्बंध कायम ठेवले आहेत.

# एकदिवसीय प्रारूपाविना क्रिकेटचा विचारही अवघड -जॉन्टी



**मुंबई :** जगभरातील ट्वेन्टी-२० लीगची वाढती संख्या आणि फ्रँचायझी क्रिकेटचा वाढता प्रभाव यामुळे भविष्यात द्विपक्षीय एकदिवसीय मालिकांची संख्या कमी होऊ शकते. मात्र, ५०-५० षटकांच्या प्रारूपाविना क्रिकेटची कल्पना करणेही अवघड आहे, असे वक्तव्य दक्षिण आफ्रिकेचा माजी खेळाडू जॉन्टी ऱ्होड्सने केले.

युरोपीय ट्वेन्टी-२० प्रीमियर लीगमधील (इटीपीएल) रॉटरडॅम डॉकर्स संघाच्या जर्सीचे मंगळवारी मुंबईत अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाला रॉटरडॅम संघाचे सह-मालक जॉन्टी ऱ्होड्स आणि अभिनेता जॉन अब्राहम उपस्थित होते.

जर्सी अनावरण कार्यक्रमानंतर जॉन्टीने माध्यमांशी संवाद साधताना क्रिकेटच्या भवितव्यावर भाष्य केले. "ट्वेन्टी-२० क्रिकेट सुरू झाले तेव्हा त्याचा कसोटीवर परिणाम होईल, असे म्हटले जात होते. मात्र, तसे झाले नाही. उलट, काही कसोटी सामन्यांमध्ये ट्वेन्टी-२० सारखा आक्रमक खेळ पाहायला मिळतो. एकदिवसीय क्रिकेट कदाचित अडचणीत येऊ शकते, कारण त्यासाठी नव्या आणि वेगळ्या प्रकारच्या प्रेक्षकांना आकर्षित करावे लागते. आगामी काळात द्विपक्षीय मालिकांची संख्या कमी होऊ शकते. मात्र, एकदिवसीय प्रारूपाविना क्रिकेटची कल्पना करणेही अवघड आहे," असे जॉन्टी म्हणाला.


# पदमजी पेपर प्रॉडक्ट्स लिमिटेड

PUDUMJEE

greenlime Think Fresh Pudumjee Hygiene International Hygiene Solutions

नोंदणीकृत कार्यालय: थेरगाव, पुणे - ४११ ०३३.

दूरध्वनी: ०२०-४०७७३३३३, ई-मेल: pune@pudumjee.com

संकेतस्थळ: www.pudumjee.com सीआयएन : एल२१०९८पीएन२०१५पीएलसी१५३७१७

## ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाही करिता अलेखापरिक्षित वित्तिय निष्कर्षांचे विवरण

(₹ लाखात, अन्यथा नमूद नाही तोपर्यंत)

| अनु. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | ३०-जून-२०२६ | ३१-मार्च-२०२६ | ३०-जून-२०२५ | ३१-मार्च-२०२६ |
| | | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| १. | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | २०,२९२ | २०,०५५ | १९,६४५ | ८०,७८८ |
| २. | व्याज, घसारा आणि करपूर्व नफा (इबीआयटीडीए) | ५,११९ | ३,२७७ | ५,२२५ | १४,५०१ |
| ३. | करापूर्वी कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) | ४,४६९ | २,६८० | ४,८२९ | १२,६२५ |
| ४. | करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) | ३,३७२ | १,९७२ | ३,६२४ | ९,३५९ |
| ५. | कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता नफा (करानंतर) आणि अन्य व्यापक उत्पन्न (करानंतर)समाविष्ट] | ३,४५३ | १,७५८ | ३,९०५ | ९,२३० |
| ६. | समन्याय भाग भांडवल | ९५० | ९५० | ९५० | ९५० |
| ७. | ताळेबंदानुसार पुनर्मूल्यन राखीव वगळता अन्य समन्याय | | | | ६५,९९८ |
| ८. | प्रती समन्याय भाग कमाई : मूलभूत व सौम्य केलेले (₹) | ३.५५ | २.०८ | ३.८२ | ९.८६ |

नोंदी :

१. वरील वित्तिय निष्कर्षांचे लेखा समितीद्वारा परिक्षण करण्यात आले होते व मान्य करण्यात आले होते आणि संचालक मंडळाद्वारा रेकॉर्डवर घेण्यात आले होते.

२. हे विवरण कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित कंपनी (भारतीय लेखांकन दर्जा) नियम, २०१५ (इंड एएस) तसेच शक्य तितक्या प्रमाणात अन्य मान्यताप्रात लेखांकन पध्दती आणि धोरणांच्या अनुसार तयार करण्यात आले आहे.

३. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेट्स) रेग्युलेशन, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत मर्यादित परिक्षण सांविधिक लेखापरिक्षकांद्वारा पार पाडण्यात आले आहे.

४. मागील कालावधीची आकडेवारी, जेथे आवश्यक तेथे, सद्य कालावधीच्या सादरीकरणाशी अनुरुप पुनर्मांडणी/पुनर्गठित करण्यात आली आहे.

५. वरील विवरण सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेट्स) रेग्युलेशन, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे फाईल केलेल्या ३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता वित्तिय निष्कर्षाचा सविस्तर प्रारुप उतारा आहे. या वित्तिय निष्कर्षांचे सविस्तर प्रारुप www.bseindia.com व www.nseindia.com या स्टॉक एक्सचेंजच्या संकेतस्थळावर तसेच www.pudumjee.com या कंपनीच्या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे. तसेच, हे वित्तीय निष्कर्ष खाली दिलेला क्यू आर कोड स्कॅन करून पाहण्यास उपलब्ध आहेत.

संचालक मंडळाच्या वतीने

स्थळ : पुणे
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२६

pudumjeepapers

अरुणकुमार एम. जाटिया
कार्यकारी अध्यक्ष
(डीआयएन : ०११०४२५६ )


हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, अँडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहिल्यानगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.

■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

# नवजात बालकांमध्ये के जीवनसत्त्वाचे महत्त्व काय?

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** नवजात बालकांच्या शरीरात 'के' जीवनसत्त्व पुरेशा प्रमाणात नसते. रक्त गोठण्यासाठी हे आवश्यक आहे. म्हणूनच जगातील बहुतांश देशांत जन्मानंतर सर्व नवजातांना 'के' जीवनसत्त्वाचे इंजेक्शन दिले जाते. हे इंजेक्शन न दिल्यास त्यांना 'के' जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या रक्तस्त्रावाचा धोका असतो. ही दुर्मीळ, जीवघेणी स्थिती असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

शरीरात के जीवनसत्त्वाचे प्रमाण कमी असल्यास बाळाला 'व्हिटॅमिन के डेफिशियन्सी ब्लीडिंग' हा गंभीर आजार होऊ शकतो. शिवाय बाळाच्या मेंदूत किंवा पोटात धोकादायक अंतर्गत रक्तस्राव होण्याचा धोका असतो. यकृतावर परिणाम होऊन बाळाच्या के जीवनसत्त्वाचे शोषण बिघडते. के जीवनसत्त्व ही लस किंवा औषध नसून, ते आवश्यक पौषकतत्त्व आहे.

गर्भधारणेदरम्यान गर्भनाळेतून फारच कमी के जीवनसत्त्व बाळापर्यंत पोहोचते. नवजातांच्या आतड्यात के जीवनसत्त्व तयार करणारे जिवाणू व्यवस्थित तयार झालेले नसतात. मानवी दुधातही त्याचे प्रमाण कमी असते. निरोगी नवजातांसाठी जन्माच्या वेळी एक मिलिग्राम इंजेक्शन सहसा मांडीच्या स्नायूतून दिले जाते.

के जीवनसत्त्वाचे इंजेक्शन न घेतलेल्या नवजातांची संख्या वाढत असल्याचे अमेरिका आणि स्वीडनमधील दोन मोठ्या अभ्यासांमध्ये समोर आले आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सरकारी आणि खासगी दोन्ही रुग्णालयांमध्ये बाळाच्या जन्मानंतर पहिल्या काही तासांतच हे इंजेक्शन देणे अनिवार्य आहे.







# 'स्वाभिमानी'च्या पदाधिकाऱ्यांमध्ये बदल

## प्रदेशाध्यक्षपदी घनश्याम चौधरी, प्रकाश बालवडकर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**कोल्हापूर :** स्वाभिमानी शेतकरी संघटना व स्वाभिमानी पक्षाच्या वतीने पुणे (किवळे) येथे दोन दिवसीय राज्य कार्यकारिणी बैठकीची बुधवारी सांगता झाली. संघटना आणि पक्ष या दोन्हींच्या नेतृत्वात खांदेपालट करण्यात आले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी घनश्याम चौधरी (नंदुरबार), स्वाभिमानी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी प्रकाश बालवडकर (पुणे), स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या युवा आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी मयूर बोर्डे, युवा आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी सूर्यभान जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. बैठकीला संस्थापक-अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह राज्य, जिल्हा आणि तालुका पातळीवरील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. बैठकीत राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी पक्षाची आगामी भूमिका आणि निवडणुकांबाबतची रणनीती निश्चित करण्यात आली. हमीभाव, कर्जमाफी, वीजबिल समस्या आदी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आंदोलनाची दिशा ठरवण्यात आली. राजू शेट्टी म्हणाले, आगामी काळात कोणत्याही सत्तेच्या आमिषाला बळी न पडता संघटना बळीराजाच्या हितासाठी कटिबद्ध राहील. कार्यकर्त्यांनी मरगळ झटकून पक्षाच्या ध्येयधोरणांचा प्रचार गावागावांत करावा.

# 'वारणा'ची दूध खरेदी दरात वाढ

## म्हशीचे दीड तर गायीच्या दूध दरात १ रुपया वाढ

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** वारणानगर येथील वारणा दूध संघाने म्हैस दूध खरेदी दरात प्रतिलिटर १ रुपये ५० पैसे, तर गाईच्या दूध खरेदी दरात प्रतिलिटर १ रुपया वाढ केली आहे. तसेच, म्हैस दूध विक्री दर प्रतिलिटर २ रुपये दरवाढ केली आहे. ही दरवाढ मंगळवारपासून लागू झाली झाल्याची माहिती वारणा समूहाचे अध्यक्ष आमदार विनय कोरे यांनी दिली.

कोरे म्हणाले की, शेतकऱ्यांना दूध दरवाढ देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला असून, आता म्हैस दुधाच्या ६.० फॅट व ९.० एस.एन. एफ. ला खरेदी दरात प्रतिलिटर १ रुपये ५० पैसे, तर गाईच्या ३.५ फॅट. व ८.५ एस.एन.एफ.च्या दूध खरेदी दरात प्रतिलिटर १ रुपया वाढ केली आहे. म्हैस दुधाच्या विक्री दरात २ रुपयांची वाढ केली आहे.

संघाने अल्पदरात पशु वैद्यकीय सेवा, अमृत पशुधन सुरक्षा कवच, रेडी संगोपन योजना, जातिवंत म्हैस संवर्धन, इतर अनुदान पर योजना तसेच दिवाळीत फरक बिल यांसारखे उपक्रमाच्या माध्यमातीन अधिकाधिक परतावा दूध उत्पादकांना देण्याची वारणाची परंपरा राहिली आहे, असे अध्यक्ष एच. आर. जाधव कार्यकारी संचालक सुधीर कामेरीकर यांनी सांगितले. यावेळी उपाध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, लेखा व्यवस्थापक प्रवीण शेलार, संकलन व्यवस्थापक डॉ. जे. बी. पाटील, विपणन व्यवस्थापक अनिल हेर्ले उपस्थित होते.

सध्या वारणाच्या दुधात दोन महिन्यांत तब्बल प्रतिदिन ५० हजार लिटरची, पनीरमध्ये प्रतिदिन ५ ते ६ टन, दही १५ टन वाढ झाली आहे. मुंबईमध्ये सर्वाधिक दही विक्री झाल्याचे कार्यकारी संचालक सुधीर कामेरीकर यांनी सांगितले.

# श्रावणाच्या उंबरठ्यावर उपवास महागला!

## साबुदाणा, शेंगदाणा, भगर, राजगिऱ्यासह तेलाच्या दरात वाढ

**दिगंबर शिंदे, लोकसत्ता**

**सांगली :** व्रतवैकल्य, उपवासाचा महिना असलेला श्रावण महिना गुरुवारपासून सुरू होत असतानाच उपवासाचे पदार्थ २० ते ३० टक्क्यांनी महागल्याने यंदाचा उपवास खिशालाही कात्री लावणारा ठरणार आहे. श्रावणी सोमवार, गोकुळ अष्टमी, नारळी पौर्णिमा हे श्रावणातील महत्त्वाचे उपवासाचे दिवस झाल्यानंतर अगदी गणपती, दसऱ्यातील नवरात्र हे उपवास असल्याने दर वाढून उपवासही महाग ठरणार आहेत.

लो

संस्कृती आणि परंपरा म्हणून श्रावण महिन्यात बहुसंख्य कुटुंबांत देवकार्याचे आयोजन करण्यात येते. यासाठी उपवास महत्त्वाचा मानला जातो.



● काही जण श्रावणात दिवसातून एकवेळ जेवण करण्याचे म्हणजे एकभुक्त राहण्याचे व्रत करतात.

आषाढी एकादशीपासूनच उपवासाच्या पदार्थांची मागणी वाढती असते. यंदा तामिळनाडूमध्ये साबुदाना कंदाचे अपेक्षित उत्पादन न झाल्याने त्याची उपलब्धता कमी आहे. साबुदाण्याची दरवाढ झाल्याने अन्य पदार्थांचेही दर वाढले आहेत.
– महेश फुटाणे,
किराणा माल व्यावसायिक, मिरज

गेल्या आठवड्यापर्यंत ७० रुपये किलोने मिळणारा साबुदाणा आता ८० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे, तर १४० ते १५० रुपये किलो असलेला भगर म्हणजेच वरीचे दर किलोला २०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. राजगिरा १२० रुपये किलोने विकला जात होता. त्याचे दर आता १५० ते १६० रुपये किलो झाले आहेत. तर १६० ते १७० रुपये किलो असलेले खाद्यतेल आता १९० रुपये किलो झाले आहे. १४० रुपये किलोने मिळणारा शेंगदाणा १६० रुपये किलोवर पोहोचला आहे. यामुळे यंदाच्या श्रावणातील उपवासही महागडा ठरणार आहे.

श्रावणातील सर्व सोमवारी उपवास करण्याची अनेकांची प्रथा आहे. तर शनिवार आणि कुलस्वामीचा वार म्हणून रविवारी उपवास केला जातो. श्रावणानंतर गणेशोत्सव आणि पंधरा दिवसांचा पितृपक्ष वगळल्यानंतर नवरात्र अशी उपवासाची जंत्रीच या काळात असते.

# शिरवळजवळ भीषण अपघातात चार ठार

## दोघे गंभीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सातारा :** पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर शिरवळ येथे मध्यरात्री सव्वाएकच्या सुमारास झालेल्या मोटारीच्या भीषण अपघातात चार तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला तर दोघे जण गंभीर जखमी झाले. मोटारीवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. अपघातातील सर्वजण पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील आहेत.

वेदांत अर्जुन वारिंगे, सोनलिंग धीरेंद्र ठाकूर, आदित्य बाळासाहेब गरुड (रा. कामशेत) आणि निखिल बाळू राऊत (रा. तळेगाव दाभाडे) अशी मृत तरुणांची नावे आहेत. तर दीक्षित दयानंद पुजारी आणि मयूर हनुमंत शिंदे हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याहून साताऱ्याच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या मोटारीवरील (क्रमांक एम एच १४ एलजे ३०३३) चालकाचे नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटलेली मोटार रस्ता दुभाजकाला जोरदार धडकून उलटली. ही उलटलेली मोटार उडून विरुद्ध दिशेच्या मार्गिकेमध्ये जात समोरून येणाऱ्या ट्रकला (क्रमांक केए २७ सी ५८७८) धडकली. ही धडक एवढी भीषण होती की, यामध्ये मोटारीचा चक्काचूर झाला आहे. अपघातातील सर्वजण पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील आहेत. या प्रकरणी शिरवळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पुणे-बंगळुरू महामार्गावर शिरवळजवळ झालेल्या अपघातात चक्काचूर झालेली मोटार.

## मावळ, तळेगाव परिसरात हळहळ

अपघाताची माहिती मिळताच सारोळा महामार्ग व शिरवळ पोलीस मदत केंद्राच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने महामार्गावरून बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. अपघाताचा आवाज ऐकून आणि माहिती मिळताच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक जमा झाले होते. या घटनेमुळे मावळ आणि तळेगाव परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.


## अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

जाहिरात क्र.अपोमसं/गुअवि/आस्था-३/सरळसेवा भरती-सशादप/२०२६/५५३

पुणे दि. ०६ ऑगस्ट २०२६

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाच्या आस्थापनेवरील सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांची १६ रिक्त पदे भरणेकरिता दि. १०/०२/२०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करून ११/०३/२०२६ रोजीपर्यंत अर्ज स्वीकारण्यात आले आहेत.

उक्त पद भरती संबंधातील या कार्यालयाच्या www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमधील व शुद्धीपत्रकातील सर्व अटी व शर्ती लागू राहतील. सदर भरती संबंधात अर्हता प्राप्त करणारे उमेदवारांना खालील दिलेल्या विहित दिनांकापर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे तसेच ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

उमेदवार फक्त ऑनलाईन पद्धतीने www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर भेट देवून आवेदन अर्ज भरू शकतात.

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन आवेदन अर्ज सुरु होण्याचा दिनांक व वेळ :- | दि. १२/०८/२०२६ वेळ १०.००वा. पासून |
| २ | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ :- | दि. १०/०९/२०२६ वेळ २४.००वा. पर्यंत |

भरतीकरिता तपशिलवार जाहिरात व शुद्धीपत्रक क्र. २ www.mahacid.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

सही/-
पोलीस उपमहानिरीक्षक, (प्रशासन)
अपोमसं, गु.अ.वि., म.राज्य, पुणे कार्यालय.

डीजीआयपीआर-२२३६-२०२६-२७



## VASANTDADA PATIL PRATISHTHAN'S LAW COLLEGE

Vasantdada Patil Educational Complex, Eastern Express Highway, Padmabhushan Vasantdada Patil Marg, Sion Mumbai 400022.

**UNAIDED**

**Applications are invited for the following Teaching Posts from the Academic year 2026-27**

| Sr. No. | Cadre | Subject | Total No. of Posts | Posts Reserved for |
|---|---|---|---|---|
| 1. | Principal | -- | 01 | 01- Open |
| 2. | Assistant Professor | Law | 08 | 01 - SC, 01-ST, 01 - DT (A), 01 - OBC, 01 - SEBC, 01 - EWS, 02 - Open. Horizontal Reservation - Women - 01 Post (Open - 01) |
| 3. | Librarian | -- | 01 | 01 - Open |

The posts for the reserved category candidates will be filled in by the same category candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.

Reservation for women will be as per **University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.**

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

**"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018 Government of Maharashtra Resolution No. Misc - 2018 / C.R.56 / 18 / UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS / (CT) / ICD / 2018-19 / 1241, dated 26th March, 2019 and revised from time to time" The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in**

Applicants who are already employed must send their application through proper channel. Applicants are required to account for breaks, if any in their academic career.

Application with full details should reach the **GENERAL SECRETARY, Vasantdada Patil Pratishthan's LAW COLLEGE, Vasantdada Patil Educational Complex, Eastern Express Highway, Padmabhushan Vasantdada Patil Marg, Sion, Mumbai - 400022,** within 15 days from the date of publication of this advertisement.

**This is University approved advertisement.**

Sd/-
GENERAL SECRETARY



## Finolex Cables Limited

**Registered Office :** 26/27, Mumbai-Pune Road, Pimpri, Pune 411 018 (India)
**Tel :** (91) (20) 27475963 | **Fax :** (91) (020) 27472239
**Website :** http://www.finolex.com | **Email :** sales@finolex.com
**CIN :** L31300MH1967PLC016531

**Statement of Standalone & Consolidated Financial results of Finolex Cables Limited for the quarter ended 30th June, 2026**
**Prepared in compliance with the Indian Accounting Standards (Ind AS)**

(Rs. In Crore)

| | Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended | | | Year Ended | Quarter Ended | | | Year Ended |
| | | 30-Jun-2026 | 31-Mar-2026 | 30-Jun-2025 | 31-Mar-2026 | 30-Jun-2026 | 31-Mar-2026 | 30-Jun-2025 | 31-Mar-2026 |
| | | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| 1. | Total Income from Operations | 2,064.64 | 1,983.76 | 1,449.64 | 6,558.99 | 2,064.64 | 1,983.76 | 1,449.64 | 6,486.64 |
| 2. | Net Profit before Tax | 277.37 | 218.86 | 170.76 | 806.93 | 314.46 | 303.38 | 202.55 | 928.52 |
| 3. | Net Profit after Tax | 221.28 | 161.19 | 138.82 | 622.87 | 249.04 | 224.43 | 162.62 | 713.72 |
| 4. | Total Comprehensive Income | 238.91 | 152.83 | 150.46 | 621.85 | 266.67 | 216.08 | 174.21 | 712.99 |
| 5. | Paid up equity share capital (face value Rs.2/-each) | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 | 30.59 |
| 6. | Earnings per share (of Rs. 2/-each)(Not annualised) | | | | | | | | |
| | (a) Basic (in Rs)/Share (not annualised for quarters) | 14.47 | 10.54 | 9.08 | 40.73 | 16.28 | 14.67 | 10.63 | 46.67 |
| | (b) Diluted (in Rs)/Share (not annualised for quarters) | 14.47 | 10.54 | 9.08 | 40.73 | 16.28 | 14.67 | 10.63 | 46.67 |

**Note :**
The above is an extract of the detailed format for quarter and year ended financial results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Standalone & Consolidated financial results for the quarter ended 30th June, 2026 are available on the Stock Exchange websites www.nseindia.com and www.bseindia.com and under the Investor Relations section of our website at http://www.finolex.com.

**Place :** Pune
**Date :** 11th August, 2026

**By Order of the Board**
Sd/-
Ratnakar Barve
Whole Time Director-Chairman
(DIN :09341821)



Clean Science

## क्लीन सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी लिमिटेड

**नोंदणी कार्यालय:** कार्यालय क्र. ६०३ आणि ६०४, ६वा मजला, टॉवर क्र. १५, सायबरसिटी, मगरपट्टा सिटी, हडपसर, पुणे, महाराष्ट्र -४११०१३.
**संकेतस्थळ:** www.cleanscience.co.in, **ई-मेल:** compliance@cleanscience.co.in
**दू.क्र.:** +९१ २० ४१२६४७६१, **CIN:** L24114PN2003PLC018532

**कंपनीच्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (AGM) सूचना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC) / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे (OAVM) आयोजित करण्यात येणारी सभा**

सर्व सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की, **क्लीन सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी लिमिटेड** ची तेविसावी (२३ वी) वार्षिक सर्वसाधारण सभा ('AGM') ही **शनिवार, १२ सप्टेंबर, २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता (IST)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('VC') / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('OAVM') आयोजित करण्यात येणार आहे. ही सभा कंपनी अधिनियम, २०१३ मधील लागू तरतुदी, त्यांअंतर्गत करण्यात आलेले नियम, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('MCA') द्वारे जारी करण्यात आलेले सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ (यापूर्वी जारी करण्यात आलेल्या संबंधित परिपत्रकांच्या पुढे) तसेच सेबी (सूचीबद्धतेच्या जबाबदाऱ्या आणि प्रकटीकरणाच्या आवश्यकता) विनियम, २०१५ ('सेबी सूचीबद्धता विनियम') मधील लागू तरतुदींनुसार आयोजित करण्यात येत आहे. या सभेमध्ये २३ व्या AGM च्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या कामकाजाचा विचार करण्यात येईल.

**AGM सूचना व वार्षिक अहवालाचे इलेक्ट्रॉनिक वितरण**

कंपनी अधिनियम, २०१३, त्यांअंतर्गत करण्यात आलेले नियम, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('MCA') व भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ ('SEBI') यांनी जारी केलेली संबंधित परिपत्रके तसेच सेबी सूचीबद्धता विनियम नुसार, २३ व्या AGM ची सूचना व आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे त्या सभासदांना पाठविण्यात येईल, ज्यांचे ई-मेल पत्ते त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट, एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत.

AGM ची सूचना व आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर **https://cleanscience.co.in/investors/annual-report/**, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('NSDL') च्या वेबसाइटवर **https://www.evoting.nsdl.com/**, तसेच स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर म्हणजेच **बीएसई लिमिटेड ('BSE') - https://www.bseindia.com/** आणि **नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ('NSE') - https://www.nseindia.com/ येथे उपलब्ध असेल.**

सभासद AGM मध्ये फक्त VC/OAVM सुविधेद्वारे **https://www.evoting.nsdl.com/** येथे सहभागी होऊ शकतील. VC/OAVM द्वारे AGM मध्ये सहभागी होण्याच्या सविस्तर सूचना AGM नोटीसमध्ये देण्यात आल्या आहेत. VC/OAVM द्वारे AGM मध्ये सहभागी होणाऱ्या सभासदांची गणना कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरमच्या उद्देशासाठी करण्यात येईल.

**रिमोट ई-मतदान**

कंपनी AGM च्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर सभासदांना रिमोट ई-मतदान द्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देत आहे. रिमोट ई-मतदान ची सविस्तर प्रक्रिया व सूचना AGM नोटीसमध्ये देण्यात आल्या आहेत.

AGM दरम्यान देखील ई-मतदान ची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. VC/OAVM द्वारे AGM मध्ये सहभागी होणारे आणि ज्यांनी रिमोट ई-मतदानाद्वारे मतदान केलेले नाही असे सभासद AGM दरम्यान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतील.

ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंटकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांनी AGM नोटीसमध्ये दिलेल्या प्रक्रियेनुसार ई-मेल पत्ता नोंदणी तसेच यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त करून रिमोट ई-मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे.

**लाभांश**

कंपनीच्या संचालक मंडळाने दिनांक १४ मे, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी रु. १/- दर्शनी मूल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी रु. ४.०० अंतिम लाभांश देण्याची शिफारस केली आहे. सदर लाभांश AGM मध्ये सभासदांच्या मंजुरीच्या अधीन राहील. अंतिम लाभांशासाठी सभासदांची पात्रता निश्चित करण्यासाठी शनिवार, ५ सप्टेंबर, २०२६ ही कट-ऑफ दिनांक निश्चित करण्यात आली आहे. AGM मध्ये मंजुरी मिळाल्यास, ज्या सभासदांच्या बँक खात्याचा तपशील डिपॉझिटरी किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंटकडे उपलब्ध आहे, त्यांना अंतिम लाभांश इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अदा करण्यात येईल. ज्या सभासदांचे बँक खाते तपशील उपलब्ध नाहीत किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लाभांश अदा करणे शक्य होणार नाही, अशा सभासदांना लाभांश वॉरंट/डिमांड ड्राफ्ट/चेक पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल. सभासदांनी लाभांश इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्राप्त करण्यासाठी AGM नोटीसमध्ये नमूद केलेल्या पद्धतीनुसार बँक खाते तपशील अद्ययावत करावेत.

**लाभांशावरील कर**

वित्त अधिनियम, २०२० मधील तरतुदींनुसार लाभांश उत्पन्न हे सभासदांच्या हातात करपात्र आहे आणि कंपनीला आयकर अधिनियम, १९६१ मधील लागू तरतुदींनुसार लाभांश अदा करताना स्रोतावर कर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचा अंतिम लाभांश AGM मध्ये सभासदांनी मंजूर केल्यास, लागू दराने कर कपात करून अदा करण्यात येईल. सभासदांनी AGM नोटीसमध्ये दिलेल्या 'TDS on Dividend' संबंधी सूचनांचा संदर्भ घ्यावा. सदर माहिती कंपनीच्या वेबसाइटवर **https://cleanscience.co.in/investors/compliance/notices/** येथे उपलब्ध असेल. कर सवलत मिळविण्यासाठी किंवा कमी दराने कर कपातीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे **https://web.in.mpms.mufg.com/formsreg/submission-of-Form-121-41.html** येथे **शनिवार, ५ सप्टेंबर, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावीत.

ज्या सभासदांनी लाभांश प्राप्तीसाठी ई-मेल पत्ता आणि/किंवा बँक खाते तपशील नोंदणीकृत/अद्ययावत केलेले नाहीत, त्यांनी कंपनी/डिपॉझिटरीच्या नोंदींमध्ये खालीलप्रमाणे ते अद्ययावत करावेत:

| | |
|---|---|
| **डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणारे सभासद** | संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटमार्फत |
| **भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणारे सभासद** | आवश्यक कागदपत्रांसह विहित अर्ज कंपनीच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंटकडे सादर करून |

**क्लीन सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी लिमिटेड करता**

दिनांक: ११ ऑगस्ट, २०२६
स्थळ: पुणे

**रुचिता विज**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**


सातारा येथील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यतारावरील रस्ता पालिकेच्या वतीने बसविण्यात आलेल्या पथदिव्यांनी रात्रीच्या वेळी असा उजळून निघत आहे. (छाया : राजेश पुराणिक)

# कास धरण तुडुंब; सातारकरांची पाण्याची चिंता मिटली

## नगरपालिकेकडून पारंपरिक पद्धतीने जलपूजन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**सातारा :** सातारा शहराची तहान भागविणारे प्रमुख जलस्रोत असलेले ऐतिहासिक कास धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. कासच्या या मुबलक जलसाठ्यामुळे सातारा शहराच्या पाणीपुरवठ्याला मोठा दिलासा मिळाला असून, सातारकरांची पुढील वर्षभराची पाण्याची चिंता मिटण्याची चिन्हे आहेत. कासच्या या तुडुंब जलसाठ्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सातारा नगरपालिकेच्या वतीने रविवारी अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने जलपूजन करण्यात आले.

सातारा शहरासाठी कास तलाव हा केवळ पाण्याचा मुख्य स्रोत नसून, शहराच्या संस्कृतीशी आणि भावविश्वाशी जोडलेला एक महत्त्वाचा घटक आहे. कास धरण पूर्ण भरल्यानंतर त्याचे जलपूजन करण्याची परंपरा यंदाही मोठ्या श्रद्धेने जपण्यात आली. या वेळी कासच्या जलसाठ्याची रीतसर 'ओटी' भरून साडी-चोळी अर्पण करण्यात आली. या सोहळ्याच्या निमित्ताने पाण्याचे संवर्धन, काटकसरीने वापर आणि भावी पिढ्यांसाठी जलसाठ्याचे जतन करण्याचा महत्त्वाचा संदेश नागरिकांना देण्यात आला.


साताऱ्याला पाणीपुरवठा करणारे कास धरण भरल्याने सातारा पालिका व नागरिकांच्या वतीने जलपूजन करताना नगराध्यक्ष अमोल मोहिते, उपनगराध्यक्ष ॲड. दत्ता बनकर, नगरसेवक.

कास धरण 'ओव्हरफ्लो' झाल्यामुळे सातारा शहराला भविष्यात २४ तास पाणीपुरवठा करण्याच्या पालिकेच्या योजनेला मोठा आधार मिळाला आहे. आगामी काळात उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि वितरण व्यवस्था सक्षम ठेवल्यास शहरवासीयांना सुरळीत आणि नियमित पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे.

यामुळे शहरावरील संभाव्य पाणीटंचाईचे संकट टळले असले, तरी वाढती लोकसंख्या आणि शहराचा विस्तार लक्षात घेता सातारकरांनी पाण्याचा अपव्यय टाळून काटेकोर वापर करणे आवश्यक आहे.

या जलपूजन सोहळ्यास नगराध्यक्ष अमोल मोहिते, उपनगराध्यक्ष दत्ता बनकर, आरोग्य सभापती धनंजय जांभळे, शिक्षण सभापती शंकर किर्दत, महिला व बालकल्याण सभापती मोनिका घोरपडे, उपसभापती सुजाता गिरीगोसावी यांच्यासह नगरसेवक शंकर माळवदे, मयूर कांबळे, रविराज किर्दत, सुधाकर यादव, नगरसेविका रीना भणगे, प्राची शहाणे आणि पालिका अभियंता दिलीप छिद्रे, शहाजी वाठारे, दिग्विजय गाढवे आदींसह नागरिक उपस्थित होते.

# साताऱ्यात अतिक्रमणांवर नगरपालिकेचा हातोडा

## रस्त्यावरील अनधिकृत बांधकामे, फलक हटवले

लोकसत्ता प्रतिनिधी

**सातारा :** सातारा शहरातील वाढत्या अतिक्रमणांविरोधात नगरपालिकेने मोठी कारवाई सुरू केली आहे. वाहतुकीस अडथळा ठरणारे अनधिकृत बांधकामे, फलकांवर मोठी कारवाई करण्यात आल्याने अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले आहेत.

शहरात वाढत्या अतिक्रमणांमुळे रोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे पादचारी हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर पालिकेने संबंधितांना नोटिसा बजावून स्वतःहून अतिक्रमणे हटवण्याचा इशारा दिला होता. तरीही दुर्लक्ष केल्याने अखेर पालिकेने हातोडा चालवला.

मुख्याधिकारी विनोद जळक यांच्या सूचनेनुसार, अतिक्रमण निरीक्षक प्रशांत निकम व त्यांच्या पथकाने ही कारवाई पार पाडली. या कारवाईदरम्यान वाहतुकीला अडथळा ठरणारा गोडोली चौकातील जुना जकात नाका आणि कोसळण्याच्या स्थितीत असलेले एक धोकादायक झाड तातडीने हटवण्यात आले, ज्यामुळे संभाव्य अपघात टळला आहे.



मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी, मंगळवारी सकाळी पालिकेच्या पथकाने गोडोली परिसरात धडक कारवाई करत साईबाबा मंदिर ते जकातनाका परिसरातील वाहतुकीस अडथळा ठरणारे १४ ते १५ लोखंडी बोर्ड व फलक हटवले. दरम्यान, सध्या केवळ किरकोळ फलकांवर कारवाई होत असली, तरी रस्त्यांवर पक्के बस्तान मांडून बसलेल्या मोठ्या अतिक्रमणांवर पालिका कधी हातोडा चालवणार? असा सवाल नागरिक विचारत आहेत. शहरातील सर्व प्रमुख रस्ते व पदपथ कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# पक्षाचे अस्तित्व संपल्याने सुषमा अंधारेंची व्यर्थ बडबड

## भाजप आमदार देवेंद्र कोठे यांचा पलटवार

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्या दोन दिवसीय सोलापूर दौऱ्यादरम्यान पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर केलेल्या टिकेला भाजपने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी पत्रकार परिषद घेत अंधारे यांच्यावर गंभीर आरोप केले.

'ज्या पक्षाचे अस्तित्वच उरलेले नाही, त्यांच्या नेत्यांनी सोलापुरात येऊन बडबड करणे व्यर्थ आहे', असा टोला लगावत भाजप आमदारांनी अंधारे यांची टीका वैफल्यातून आल्याचा दावा केला.

पत्रकार परिषदेत बोलताना आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, शिवसेनेत मोठ्या अपेक्षेने आलेल्या अंधारे यांची, पंगतीला बसले अन् स्वयंपाक संपला.. अशी अवस्था झाली आहे. वास्तविक हिंदूत्व अन् दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्यावर वाईट शब्दांमध्ये टीका करणाऱ्यांना ठाकरेंनी पक्षाचे उपनेतेपद दिल्याने, पक्षाची वाताहत झाली आहे.

पालकमंत्री गोरेंवर सोलापूरची जबाबदारी आल्यानंतर त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला मोठे यश मिळवून दिले. मागील चार टर्मपासून लोकांमधून ते निवडून येत आहेत. विकासात्मक काम करणाऱ्या पालकमंत्री गोरेंवर टीका-टिप्पणी करण्याची अंधारे यांनी सुपारी घेतली आहे.

सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणे नवीन नाही, तर बहुतांश वेळा हे गुन्हे राजकीय सूडबुद्धीने दाखल झालेले असतात. त्याचा थेट राजकारणाशी संबंध जोडणे अयोग्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

### अंधारे वैफल्यग्रस्त...

शिवसेना ठाकरे गटावर टीका करताना, भाजपचे शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, सोलापुरात शिवसेना (ठाकरे गट) अस्तित्व संपले असून, त्यांच्याकडे साधा ग्रामपंचायत सदस्यही उरलेला नाही. अंधारे यांच्या प्रतिस्पर्धी प्रा. ज्योती वाघमारे या खासदार झाल्या, तर अंधारे मात्र मागेच राहिल्या. त्यामुळे वैफल्यग्रस्त होऊन अंधारे टीका करत आहेत, असेही कोठे यांनी सांगितले. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात सोलापुरात घोषणा देणाऱ्या वकिलांच्या विरोधात कायदेशीर प्रक्रिया सुरु असून, काय कारवाई होते, ते लवकरच दिसेल, असेही आमदार कोठे यांनी यावेळी बोलताना सांगितले. तसेच, मुंबई महापालिकेत उबाठाच्या नेत्यांनी काय केले, ते आधी पाहावे आणि इतरांवर टीका करण्यापेक्षा विकासकामांवर बोलावे, असे आवाहन भाजपच्या आमदारांनी केले.


मुसळधार पावसातही एसटीमध्ये जागा पकडण्यासाठी सुरू असलेला प्रवाशांचा आटापिटा. इचलकरंजी बस स्थानकातील चित्र. (छाया : दयानंद लिपारे)

# श्रावणात सिद्धेश्वर मंदिरात गजर; पूर्व भागात रथोत्सव

## सोलापुरात उद्यापासून भक्तीचा महाकुंभ


सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वर श्रावणमास निमित्ताने मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. (छाया : चेतन लिगाडे, सोलापूर)

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** श्रावणाच्या पहिल्या सरी बरसताच शिवयोगी सिद्धरामेश्वरांच्या वास्तव्याने पावन झालेल्या सोलापूर नगरीत धार्मिक आणि सांस्कृतिक चैतन्याचे वातावरण निर्माण होते. उद्यापासून (गुरुवारी) शहरात भक्तीचा हा महाकुंभ खऱ्या अर्थाने सुरू होत असून, सिद्धेश्वर मंदिरासह शहराच्या पूर्व भागात भक्ती, श्रद्धा आणि भाषिक एकतेचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे.

आकर्षक आरास

श्री सिद्धेश्वर मंदिराच्या सभोवताली तलाव आहे. श्रावण महिन्यानिमित्त सिद्धेश्वर मंदिर हे संपूर्ण शहराचे धार्मिक ऊर्जाकेंद्र असते.

यंदाच्या चारही सोमवारी मंदिरातील योगसमाधीवर आकर्षक फुलांची मेघडंबरी आरास केली जाणार आहे. रोज पहाटे पाच वाजता काकड आरतीने सुरू होणारा भक्तीचा गजर रात्री उशिरापर्यंत कायम राहील.

मंदिर प्रशासनाकडून दररोज सकाळी साडेसात वाजता रुद्राभिषेक, साडेआठ वाजता सामूहिक महामंत्र आणि रात्री ९ वाजता प्रदक्षिणा पालखी सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे. श्रावणमास निमित्ताने मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

> संपूर्ण श्रावणात सिद्धेश्वर मंदिरात भाविकांसाठी अभिषेक, सिद्धरामेश्वर पुराणाचे पारायण आणि महापूजेचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक सोमवारी भक्तांची होणारी गर्दी विचारात घेता, दर्शनासाठी मंदिर पहाटेपासूनच खुले ठेवले जाईल.
> –आनंद हब्बू, पुजारी, सिद्धेश्वर मंदिर.

### पूर्व भागात रथोत्सव

सोलापूर ही बहुभाषिकांची नगरी असून, विविध समाजघटकांच्या सण-उत्सवांची मांदीयाळी असते. श्रावणमास निमित्ताने १७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत शहराच्या पूर्व भागात तेलुगू, कन्नड, पद्मशाली, स्वकुलसाळी, तोगटवीर, नाभिक आणि परीट या सात समाजांचे पारंपरिक रथोत्सव दिमाखात पार पडणार आहेत.

- **१७ ऑगस्ट :** चिम्मटेश्वर रथोत्सव
- **२५ ऑगस्ट :** नीलकंठेश्वर व जिव्हेश्वर रथोत्सव
- **२८ ऑगस्ट :** मार्कंडेय रथोत्सव (या रथोत्सवात थेट चरख्यावर सूत कातून देवाला वस्त्र अर्पण करण्याची शेकडो वर्षांची परंपरा युवा पिढी जपत आहे.)

पूजासाहित्य विक्रीचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. इतर प्राथमिक सोय-सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

### आज घरोघरी दीपपूजन

दीप अमावस्य निमित्ताने बुधवारी विविध मंदिरांसह, घरोघरी दीपपूजन करण्यात येईल. घरातील जुने, नवे दीप स्वच्छ करून त्यास दूध, गंगाजलने अभिषेक करण्यात येईल. दीपअमावस्यापासून विविध झाडांच्या पानं-फुलांच्या पत्रीचे महत्त्व सुरु होते. दुर्वा, आघाडा, बेल, धोतरा आदी झाडांची पानं वाहण्यात येतील. तसेच, लाह्यांचा नैवेद्य दाखविण्यात येतो. काहींच्या घरी प्रथेनुसार ज्वारी, बाजरी किंवा कणिक यामध्ये गूळ घालून त्याचे दिवे करतात. तर, काहींच्या घरी मातीचे दिवे तयार करून पूजन करण्यात येते. शास्त्रानुसार दीपपूजानंतर श्रावणाला सरुवात होते, असेही धर्मशास्त्राचे अभ्यासक वेदमूर्ती ऋषीकेश दादेगावकर यांनी सांगितले.

# पंतप्रधान मोदींना त्यांचे छायाचित्र विणलेली 'सोलापुरी चादर' भेट


खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांच्याकडून पंतप्रधानांना 'सोलापुरी चादर' भेट

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** राष्ट्रीय हातमाग दिनाचे औचित्य साधून शिवसेना (शिंदे गट) राज्यसभा खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी शुक्रवारी (८ ऑगस्ट) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या वेळी त्यांनी सोलापूरच्या प्रसिद्ध हातमाग परंपरेचे प्रतीक असलेली आणि पंतप्रधान मोदींचे छायाचित्र विणलेली विशेष 'सोलापुरी चादर' भेट देऊन त्यांचा सन्मान केला.

पंतप्रधान निवासस्थानी 'एनडीए'च्या नवनिर्वाचित लोकसभा व राज्यसभा खासदारांसाठी विशेष अल्पोपाहाराचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात मूळच्या सोलापूरच्या असलेल्या डॉ. वाघमारे यांनी ही वैशिष्ट्यपूर्ण भेट पंतप्रधान मोदींना दिली. सोलापुरी चादरीवर स्वतःची सुबक प्रतिमा विणलेली पाहून पंतप्रधानांनी या कलाकृतीचे कौतुक केले. या वेळी त्यांनी सोलापूरच्या समृद्ध हातमाग परंपरेची आस्थेने चौकशी करत स्थानिक विणकरांच्या कौशल्याची प्रशंसा केली.

> सोलापूरची हातमाग परंपरा ही आपल्या सांस्कृतिक वैभवाचा महत्त्वाचा भाग आहे. राष्ट्रीय हातमाग दिनी सोलापूरच्या कारागिरांची ही अप्रतिम कलाकृती पंतप्रधानांना भेट देण्याची संधी मिळणे, हा माझ्यासाठी आणि संपूर्ण सोलापूरकरांसाठी अभिमानास्पद क्षण आहे. – प्रा. डॉ. ज्योती वाघमारे, खासदार (राज्यसभा)

# सोलापूर दूध भेसळप्रकरणी महिन्यानंतरही अहवालाची प्रतीक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने जुलै महिन्यात सोलापूर जिल्ह्यात राबवलेल्या धडक मोहीमच्या माध्यमातून चार ठिकाणी मोठी कारवाई केली. पण, महिना लोटला तरी, मुंबईच्या प्रयोगशाळेकडून अद्याप तपासणी अहवाल आलेला नाही. प्रशासनाच्या या सुस्त कारभारामुळे भेसळविरोधी मोहिमेच्या गांभीर्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

> जिल्ह्यातून जप्त केलेल्या सर्व पदार्थांचे नमुने जुलै महिन्यात मुंबईच्या प्रयोगशाळेत पाठवले होते. प्रयोगशाळेकडून अद्याप अहवाल आलेला नसल्याने अंतिम कारवाई प्रलंबित आहे. अहवाल लवकरात लवकर मिळवण्यासाठी प्रशासनाकडून पाठपुरावा सुरू आहे.
> –साहेबराव देसाई, सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन

अन्न व औषध प्रशासनाने ११ जुलै रोजी सांगोला तालुक्यातील 'अजिक्यराणा मिल्क इंडस्ट्रीज'वर छापा टाकून ३७ हजार ५३२ लिटर संशयास्पद दूध नष्ट केले होते, तर इतर पदार्थ तपासणीसाठी जप्त केले होते. याशिवाय माळशिरस येथील 'गणेश डेअरी प्रा. लि.', मोहोळमधील चंद्रमौळी एमआयडीसी, काटेवाडी, पेनूर, सारोळे व तांबोळे येथील सहा नोंदणीकृत दूध संकलन संस्था, तसेच शहरातील 'रामदेव डेअरी'तून ५११ किलो भेसळयुक्त बर्फी व वनस्पती तुपाचा साठा जप्त करण्यात आला होता. अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर परिसरातूनही पेढा व दुग्धजन्य पदार्थ जप्त करण्यात आले होते. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणावर जप्तीची कारवाई करूनही मुंबईतील प्रयोगशाळेकडून अहवाल न आल्याने पुढील कायदेशीर कारवाई ठप्प झाली आहे. जप्त केलेल्या पदार्थांमध्ये मानवी शरीराला घातक ठरणाऱ्या नेमक्या कोणत्या अपायकारक घटकांची भेसळ होती, याचा उलगडा अद्याप झालेला नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोरांवर कडक कारवाई करण्याऐवजी प्रशासकीय दिरंगाईमुळे ही संपूर्ण मोहीम कागदी घोडे नाचवणारीच ठरल्याची टीका होत आहे.

# सांगलीत विद्यार्थ्यांच्या वाहनाला अपघात; मुलगी ठार

लोकसत्ता प्रतिनिधी

**सांगली :** शाळकरी मुलांची वाहतूक करणारी मोटार पुलाच्या संरक्षक कठड्याला धडकून झालेल्या अपघातात सहा वर्षांची मुलगी ठार झाली. मेणी-आटूगडेवाडी (ता. शिराळा) दरम्यान सोमवारी सकाळी झालेल्या या अपघातात काही मुले जखमी झाली असून, त्यांना विविध ठिकाणच्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

सह्याद्री पब्लिक स्कूलच्या आटगुडेवाडी-मेणी येथील शाळेतील मुलांना शाळेसाठी घेऊन येणारी स्कूल बस (एमएच १० ईई ७९३१) ही रस्त्यावरील पुलाच्या संरक्षण कठड्याला धडकली. या अपघातात चालकाशेजारी बसलेली श्रीशा श्रीनाथ उर्फ गणेश इंगळे (वय ६) ही मुलगी जागीच ठार झाली. तर या अपघातात काही मुले जखमी झाली असून, त्यांना कोकरूड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात तर काही मुलांना शिराळा व कराड येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जिल्हा परिषद सदस्य विराज नाईक यांनी कोकरूड रुग्णालयात जाऊन जखमी मुलांची चौकशी करून पालकांना धीर दिला.

सह्याद्री पब्लिक स्कूल मेणी येथील शाळेत शिक्षण घेत असलेल्या मुलांची ने-आण करण्यासाठी शेंडगेवाडी येथील युवराज कदम यांची स्कूल बस निश्चित करण्यात आली आहे. सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे कदम हे शाळेतील मुलांना घेउन निघाले असताना अचानक वाहनावरील ताबा सुटला. यामुळे स्कूल बस पुलावरील संरक्षक कठड्यावर जाऊन आदळली. यामुळे हा अपघात घडला.

# आनेवाडी टोल नाक्यावरील उभ्या ट्रकमुळे वाहतुकीला अडथळा

### अपघाताचा वाढता धोका

लोकसत्ता प्रतिनिधी

**सातारा :** पुणे - बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील आनेवाडी टोल नाक्याशेजारी पुण्याकडून साताऱ्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर रस्त्याच्या कडेला बेशिस्तपणे उभ्या करण्यात येणाऱ्या ट्रकमुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असून, अपघाताचा धोका वाढला आहे. या प्रकारामुळे विशेषतः दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.


आनेवाडी टोल नाक्यावर सातारा दिशेला जाताना धोकादायक पद्धतीने थांबलेले ट्रक.

टोलनाक्यालगत अनेक ट्रक दीर्घकाळ उभे राहत असल्याने रस्त्याची उपयुक्त रुंदी कमी होते. परिणामी भरधाव वाहनांना अचानक लेन बदलावी लागत असून, वाहतूककोंडीसह अपघाताची शक्यता निर्माण होत आहे. रात्रीच्या वेळी, तसेच पावसाळ्यात दृश्यमानता कमी असल्याने ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरत असल्याचे वाहनचालकांचे म्हणणे आहे.

> आनेवाडी टोल नाक्याशेजारी बेशिस्तपणे उभ्या ट्रकमुळे वाहतुकीला गंभीर अडथळा निर्माण होत असून, अपघाताचा धोका वाढला आहे. टोल व्यवस्थापन, महामार्ग प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी तातडीने दखल घेऊन अशा वाहनांवर कारवाई करावी. तसेच, पार्किंगसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून वाहनचालकांचा प्रवास सुरक्षित करावा.
> – अविनाश दुर्गावळे, अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जावळी तालुका

स्थानिकांच्या माहितीनुसार, काही ट्रकचालक टोल नाक्याजवळच वाहन उभे करून विश्रांती घेतात किंवा इतर वाहनांची प्रतीक्षा करतात. त्यामुळे टोल परिसरात अनावश्यक गर्दी होत असून, नियमित प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना त्याचा फटका बसत आहे. अनेकांनी या समस्येबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

या पार्श्वभूमीवर टोल व्यवस्थापनाने अव्यवस्थितपणे ट्रक उभे करणाऱ्या चालकांना समज देऊन आवश्यक ती कारवाई करावी, तसेच ट्रक पार्किंगसाठी स्वतंत्र जागेची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. वाहतूक पोलिसांनीही या ठिकाणी नियमित गस्त घालून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

कोणतीही मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी टोल व्यवस्थापन, महामार्ग प्रशासन आणि वाहतूक विभागाने समन्वय साधून तातडीने प्रभावी उपाययोजना केल्यास वाहनचालकांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुरळीत होण्यास मदत होईल.

# अरणनगरीत संत सावता महाराज पुण्यतिथीचा सोहळा

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** *शांति शेवंती फुलली । प्रेम जाई जुई व्याली । सावताने केला मळा । विठ्ठल देखियला डोळा ॥* या संत सावता माळी यांच्या अभंगवाणीचा निनाद, टाळ-मृदंगाचा गजर आणि 'श्री संत सावता महाराज की जय'च्या जयघोषात श्रीक्षेत्र अरण (ता. माढा) येथे मंगळवारी श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७३१ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त समाधी स्थळावर हजारो भाविकांनी भक्तिभावाने पुष्पवृष्टी केली. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे वंशज ह. भ. प. बाळासाहेब देहूकर महाराज यांचे कीर्तन आणि पंढरपूरहून आलेल्या विठुरायाच्या पालखीच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

कीर्तनानंतर दुपारी बाराच्या सुमारास सावता महाराजांच्या समाधी स्थळावर पुष्पवृष्टी करण्यात आली. तत्पूर्वी ह. भ. प. बाळासाहेब देहूकर महाराज व जयश्री देहूकर यांनी सपत्नीक महापूजा केली. त्यानंतर माढ्याचे आमदार अभिजित पाटील, आमदार योगेश टिळेकर, प्रणिती रणजीतसिंह शिंदे, माजी आमदार विनायकराव पाटील आणि यशवंत शिंदे, जिल्हा परिषद सदस्या वंदना शिवाजी कांबळे यांच्या हस्ते अभिषेक व महापूजा पार पडली.

या प्रसंगी देवस्थान ट्रस्टचे सचिव अॅड. विजय शिंदे, विश्वस्त सावता रणदिवे, अजय काळे, महाराजांचे वंशज रमेश महाराज सावता, प्रभू महाराज आणि दादा महाराज हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. शनिवारी पंढरीतून प्रस्थान ठेवलेली श्रीहरी पालखी सोमवारी (दि. १०) रात्री संत सावता माळी यांच्या अरण नगरीत विसावली. भक्ताच्या भेटीला आलेल्या परमात्याचे गावकरी यांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. देव अन् भक्ताच्या भेटीचा अभूतपूर्व सोहळा पाहताना भाविकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

पालखी भेटीनंतर विठुरायाची पालखी गावातील शिंदे वाड्यात मुक्कामी विसावली. सोहळ्यानिमित्त संत सावता महाराज समाधी स्थळ, स्मारक आणि परिसर आकर्षक विद्युत रोषणाई व विविध फुलांच्या सजावटीने उजळून निघाला आहे.




अरण येथे मंगळवारी संत सावता महाराज यांच्या संजीवन समाधीवर फुलांचा वर्षाव करण्यात आला.

### आज श्रीफळ हंडी सोहळा

महाराष्ट्रातील एकमेव आणि वैशिष्ट्यपूर्ण असा 'श्रीफळ हंडी' फोडण्याचा सोहळा बुधवारी सायंकाळी साडेसहा वाजता पार पडणार आहे. श्रीफळ हंडी देहूकर महाराज यांच्या उपस्थितीत फोडण्यात येईल. या श्रीफळ हंडीत सुमारे पाच हजारांपेक्षा अधिक नारळ एकत्रित गुंफलेले असतात. श्रीहरी पांडुरंग व संत सावता महाराज यांच्या पालखी समोर हंडी फोडण्यात येते. हा सोहळा पाहण्यासाठी मंदिर परिसरात 'एलईडी स्क्रीन'ची विशेष सोय करण्यात आल्याची माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल गाजरे व सचिव अॅड. विजय शिंदे यांनी दिली. शुक्रवारी पालखीच्या पंढरपूर प्रस्थानाने सोहळ्याची सांगता होईल.

# सोलापुरात २० ऑगस्टला भाजपची विभागीय बैठक

## मुख्यमंत्री फडणवीस यांची उपस्थिती

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** भारतीय जनता पक्षाची पश्चिम महाराष्ट्र विभागीय बैठक येत्या २० ऑगस्ट रोजी सोलापुरात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण प्रमुख उपस्थित राहणार असून, पश्चिम महाराष्ट्रातील पक्षाचे सर्व खासदार, आमदार व पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण आणि शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी दिली.

सोलापूरच्या शासकीय विश्रामगृहात भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पूर्वतयारी बैठक पार पडली. आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, स्थायी समिति सभापती रंजिता चाकोते यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी व पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते. या वेळी विभागीय कार्यक्रमाच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

दरम्यान, पक्षाच्या आगामी उपक्रमांची माहिती देताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, १० ते १५ ऑगस्ट दरम्यान 'हर घर तिरंगा' अभियान राबवले जात आहे. या अंतर्गत १० ते १३ ऑगस्ट दरम्यान विधानसभा स्तरावर युवा व महिला मोर्चाच्या पुढाकाराने भव्य तिरंगा यात्रा काढल्या जातील, तर १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान घरोघरी तिरंगा फडकवण्यात येईल. तसेच १४ ऑगस्ट रोजी 'विभाजन विभिषिका स्मृतिदिना'निमित्त फाळणीच्या वेदनांचे स्मरण म्हणून मूक मिरवणूक, छायाचित्र प्रदर्शन आणि विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे.

### कामांचा आढावा घेणार

गुरुवारी (२० ऑगस्ट) सकाळी ११ वाजता सुरू होणाऱ्या या बैठकीत आमदार, खासदार, मंडलाध्यक्ष, एसआयआर प्रमुख आणि पदवीधर नोंदणीप्रमुखांच्या कामगिरीचा थेट आढावा मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्षांकडून घेतला जाणार आहे.

### पदाधिकाऱ्यांची कोंडी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही महिन्यांपूर्वी इंधन बचत, सार्वजनिक वाहनांचा वापर, अनावश्यक खर्च टाळण्याबाबत आवाहन केले होते. त्यानुसार सुरुवातीला काही दिवस काटकसर करीत असल्याचा दिखावा पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केला. पण, पुन्हा त्याचा सोयीस्कर विसर भाजपला पडला आहे. पश्चिम विभागीय बैठक पंचतारांकित हॉटेलमध्ये घेण्याची तयारी पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केली. पण, पुन्हा पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाची आठवण झाल्याने बैठकीसाठी मध्यवर्ती, सोयीसुविधांनी युक्त सभागृहाची शोधमोहीम सुरू आहे. प्रदीर्घ कालावधीनंतर सोलापुरात होत असलेल्या बैठकीच्या ठिकाणावरून पुन्हा ट्रोल होऊ नये, याबाबतची खबरदारी पक्षातर्फे सुरू आहे.

# शरद पवार यांची भूमिका कायम भाजपला अनुकूल

## सुजात आंबेडकर यांची टीका

लोकसत्ता प्रतिनिधी

**सांगली :** शरद पवार यांची भूमिका कायम भाजपला अनुकूल राहिली असल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केली. काँग्रेस व शिवसेना ठाकरे गटाला मागे खेचण्यासाठी राजकारण पवार करत असल्याची टीकाही त्यांनी या वेळी केली.

वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा मिरजेत झाला. मार्गदर्शन करताना ते बोलत होते. माजी नगरसेवक अशोक कांबळे यांच्यासह समर्थक कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेशही झाला. या वेळी प्रदेश उपाध्यक्ष सोमनाथ साळुंखे, जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, सामाजिक कार्यकर्त्या चंद्रिका कांबळे, राजू कांबळे, युवा नेते आकाश कांबळे, डॉ. रविकुमार गवई आदी उपस्थित होते.

या वेळी आंबेडकर म्हणाले, 'शरद पवार यांनी पुरोगामी राजकारण करण्याचा नाटक केले. मात्र, यापुढे जनता त्यांचे हे नाटक चालू देणार नाही. भाजपला विरोध करण्याची ताकद केवळ वंचित बहुजन आघाडीमध्ये आहे. त्यामुळे युवक आणि कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात ओढा 'वंचित'कडे आहे,' असे सांगून ते पुढे म्हणाले, 'भाजपला हरवायचे असेल, तर बुलेट नव्हे बॅलेटच्या माध्यमातून त्यांना हरवावे लागेल.'

प्रदेश उपाध्यक्ष सोमनाथ साळुंखे म्हणाले, 'ज्यांनी मंडल आयोग लागू केला नाही ते काँग्रेस आणि ज्यांनी मंडल आयोगाला विरोध केला ते भाजप हे दोन्ही पक्ष ओबीसींच्या विरोधातील आहेत.



वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांचा संवाद मेळाव्यात सत्कार करण्यात आला.

# सुरूरमध्ये पोलिसांवर हल्ला; दोघांना अटक

लोकसत्ता प्रतिनिधी

**सातारा :** सुरूर (ता. वाई) येथील बाजारतळावर संशयास्पद दुचाकी अडवून चौकशी करणाऱ्या रात्रगस्तीवरील पोलिसांच्या पथकावर दुचाकीस्वारांनी हल्ला केला. या हल्ल्यात एक पोलीस कॉन्स्टेबल जखमी झाले असून, पोलिसांच्या शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी भुईंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखा व भुईंज पोलिसांच्या संयुक्त पथकाने या प्रकरणातील विनोद नितीन भोसले (खामगाव साखरवाडी ता. फलटण) व अन्य एका संशयिताला ताब्यात घेतले असून, त्याला न्यायालयात हजर केले जाणार आहे.

मध्यरात्रीच्या सुमारास सुरूर येथील बाजारतळावर काही नागरिक थांबल्याची माहिती भुईंज (ता. वाई) पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार रात्रगस्तीचे पोलीस उपनिरीक्षक सूरज शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल किरण निंबाळकर, सतीश कदम आणि होमगार्डचे पथक घटनास्थळी पोहोचले. पारधी वस्तीच्या दिशेने तपासणीसाठी जात असताना समोरून येणाऱ्या विनाक्रमांकाच्या संशयास्पद दुचाकीला पोलिसांनी थांबवून चौकशी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुचाकीवरील संशयितांनी पोलिसांच्या कामात अडथळा आणत पोलीस कॉन्स्टेबल किरण निंबाळकर यांच्यावर हत्याराने वार करून पळ काढला. या हल्ल्यात निंबाळकर यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली.

## जाहिर नोटीस

**फॉर्म क्र. URC – 2**

अधिनियमांच्या विभाग XXI च्या भाग ख मधील तरतुदींनुसार नोंदणी करण्यासंबंधीच्या जाहिरातीची नोटीस

[कंपनी अधिनियम, 2013 च्या कलम 374 (b) आणि कंपनी (नोंदणी करण्यासाठी अधिकृत) नियम, 2014 च्या नियम 4 (1) नुसार]

१. नोटीस देणेत येते की या दिवसापासून २१ दिवसांचे आधी कंपनी निबंधक, पुणे यांचेकडे **"रांका ज्वेलर्स खराडी"** या नावाने असलेले मर्यादित दायित्व भागीदारी, कंपनी अधिनियम, २०१३ च्या विभाग XXI च्या भाग मधील तरतुदींनुसार खाजगी मर्यादित कंपनी **"रांका ज्वेलर्स जेम्स प्रायव्हेट लिमिटेड"** या नावाखाली नोंदणी करणे आमच्या विचाराधीन आहे.

२. कंपनीची प्रस्तावित प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:- "हिऱ्यांचे, मौल्यवान व अर्ध-मौल्यवान रत्नांचे तसेच हिरे, सोने, चांदी, प्लॅटिनम आणि मौल्यवान व अर्ध-मौल्यवान रत्नजडित दागिन्यांचे उत्पादन, आयात, निर्यात, खरेदी व विक्री करण्याचा व्यवसाय करणे तसेच या व्यवसायात विक्रेता, व्यापारी, उत्पादक, आयातदार, निर्यातदार, खरेदीदार, विक्रेता इत्यादी म्हणून कार्य करणे आणि त्यासंबंधित इतर सर्व व्यवसाय व उपक्रम चालविणे, जोपर्यंत भागीदारांदरम्यान लेखी स्वरूपात परस्पर संमतीने अन्यथा ठरविण्यात येत नाही."

३. प्रस्तावित कंपनीच्या मेमोरेंडम ऑफ असोसिएशन आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनचे मसुदे सर्व्हे क्र. ५०/२, शोरूम क्र. १०३, कोणार्क अल्फा, खराडी, पुणे – ४११०१४ येथील कार्यालयात तपासली जाऊ शकते.

४. याद्वारे नोटीस देणेत येते की ज्या व्यक्तिचा या अर्जाला आक्षेप असेल त्या व्यक्तिने आपले आक्षेप लेखी स्वरूपात पुण्याचे निबंधक, शेती महामंडळ भवन, पहिला मजला, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट रस्ता, पुणे – ४११०१६ आणि केंद्रीय नोंदणी केंद्र (CRC), 6, 7, 8, सेक्टर 5, IMT मानेसर, जिल्हा गुडगाव (हरियाणा), पिन कोड-१२२०५० यांचेकडे ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून **२१ दिवसांचे** आत कळवावे. त्यांची एक प्रत कंपनीचे नोंदणीकृत कार्यालयाकडे पाठवावी.

**अर्जदारांची नावे**
मेसर्स रांका ज्वेलर्स खराडीच्या भागीदारांसाठी आणि त्यांच्या वतीने

**मोनिका रमेश रांका** भागीदार
**रुषभ रमेश रांका** भागीदार

दिनांक : १२/०८/२०२६

## इंडियन बँक Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD BANK

**विश्रामबाग सांगली शाखा**
मनोहर सी.एस. क्र. ८२९७, अनुराधा हॉटेलच्या शेजारी, सांगली–मिरज रोड, विश्रामबाग, सांगली ४१६४१६. Phone: 02332303002 E-mail: sangli.s566@indianbank.co.in

**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)**
सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम (८(१) अंतर्गत

ज्या अर्थी, खाली सही करणार हे **इंडियन बँकचे** सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अन्वये सक्षम अधिकारी आहेत आणि त्यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(१२)आणि नियम ८ व ९ सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या (नियम ३) नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून **दि.०२.०५.२०२६** रोजी **कर्जदार श्री. योगेश नारायण जाधव (कर्जदार व गहाणदार), श्री. नारायण सिध्दराया जाधव (सह–कर्जदार व गहाणदार) आणि श्री. निलेश शांतिनाथ पाटील (जामीनदार)** आमच्या **विश्रामबाग सांगली शाखेतुन** यांना मागणी नोटीस पाठवून मागणी नोटीशीत उल्लेखित केलेली एकत्रित रक्कम **रु.९,६५,५४४/– (रुपये नऊ लाख पासष्ठ हजार पाचशे चव्वेचाळीस फक्त)** सदर नोटीस मिळाल्यापासून **६० दिवसांच्या** आत पैसे भरण्याची सूचना दिलेली होती.

**कर्जदार** ही रक्कम परत करू न शकल्याने **कर्जदार**आणि सामान्य जनतेला कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी उपरोक्त कायद्यातील कलम १३(४) आणि उपरोक्त नियमातील नियम ८ यानुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून खालील वर्णन केलेल्या मालमत्तेचा **दि. १० ऑगस्ट २०२६** रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

विशेषत्वाने **कर्जदार** आणि सर्वसामान्य जनतेला सावध करण्यात येते की, सदरच्या मालमत्तेबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेसंबंधी केलेला असा कोणत्याही प्रकारचा व्यवहार **इंडियन बँकेचा** बोजा रक्कम **रु. ९,६५,५४४/– (रुपये नऊ लाख पासष्ठ हजार पाचशे चव्वेचाळीस फक्त) दि. १०.०८.२०२६** रोजी आणि भविष्यातील व्याज आणि खर्चासह अधीन राहिल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम ८ च्या तरतुदीकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात आले आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**ज्या मालमत्तांवर सुरक्षा हक्क निर्माण करण्यात आला आहे, त्या मालमत्तांचे सविस्तर तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत :**

**तारण ठेवलेली मालमत्ता: श्री. योगेश नारायण जाधव (कर्जदार आणि गहाणखतदार) आणि श्री. नारायण सिध्दराया जाधव (सहकर्जदार आणि गहाणखतदार) आणि निलेश शांतीनाथ पाटील (जामीनदार)**यांच्या नावावर असलेले **गट क्र. १३१/४ मधील एन.ए. प्लॉट क्र. १३,** क्षेत्रफळ २४३ चौ. मीटर, बांधकाम व सामाईक क्षेत्रासह क्षेत्रफळ २२.०६ चौ. मीटर, पश्चिमेकडील १२१.५० चौ. मीटर क्षेत्र **जुना बुधगाव, सांगली, सांगली–मिरज–कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील** प्लॉट. मालमत्तेच्या **चतु:सीमा : पूर्वेस :** निलेश शांतिनाथ पाटील यांच्या प्लॉट क्र. १३ मधील उर्वरित भाग, **दक्षिणेस :** आर. एस. क्र. १३१/५, **पश्चिमेस :** प्लॉट क्र. ११ व १२, **उत्तरेस :** रस्ता

**दिनांक : १०.०८.२०२६**
**ठिकाण : सांगली**
(मराठी मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरावा)
**अधिकृत अधिकारी इंडियन बँक**

## बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra
एक परिवार एक बँक

**आस्ति वसुली शाखा :** दुसरा मजला, आगरकर हायस्कूल बिल्डींग, सोमवार पेठ, पुणे–४११०११. फोन : ७०३०९२४०७८
ईमेल : bmgr1453@bankofmaharashtra.bank.in

**मागणी नोटीस**

**[सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट,२००२ (सरफेसी अॅक्ट)च्या सेक्शन १३(२) अंतर्गत सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल २००२ च्या रुल ३(१) सह]**

**बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये** असलेले, पुढे नमूद करण्यात आलेले खाते अनुत्पादक (एनपीए) ठरविण्यात आले आहे, त्यावरुन बँकेने सरफेसी अॅक्टच्या सेक्शन १३(२) नुसार पुढे नमूद केलेल्या तारखेस सूचना जारी केल्या आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार/जामीनदार यांच्या पत्त्यावर नोटिस न मिळाल्याने सर्व संबधितांच्या माहितीसाठी सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. पुढे नमूद करण्यात आलेले कर्जदार/ जामीनदार यांना कळविण्यात येते की, ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत **बँक ऑफ महाराष्ट्र** यांना खाली नमूद करण्यात आलेल्या तारखेस येणे असलेली रक्कम, करारात नमूद करण्यात आलेल्या दराने रक्कम परत करण्याच्या तारखेपर्यंतचे कर्ज/आणि अन्य करार आणि त्यानुसार संबंधित व्यक्तींनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार भविष्यातील व्याजासह परत करावी. सदर करार आणि कागदपत्रे यानुसार कर्जदारांची बांधिलकी म्हणून खाली दिल्याप्रमाणे त्यांच्या नावापुढे नमूद करण्यात आलेल्या मालमत्ता **बँक ऑफ महाराष्ट्र** यांच्याकडे गहाण आहेत.

| अ. क्र. | शाखा व कर्जदार आणि जामीनदार यांची नावे आणि पत्ते | मागणी नोटीसीनुसार येणे रक्कम |
|---|---|---|
| १ | **शाखा : कामोठे, रायगड अंचल** **कर्जदार : १) मे. युनायटेड शिपर्स, प्रोप्रा. श्री. मनोज प्रेमचंद धर्मानी,** बी–१०, न्यू व्यापार भवन ४९ जवळ, पी. डी'मेलो रोड, कारनॅक बंदर मस्जिद, बंदर–४००००९. **तसेच :** फ्लॅट नं. ५०३–बी, स्वामी जयरामदास सीएचएस, चेंबूर नाका, प्लॉट नं. ५१५, चेंबूर, मुंबई–४०००७१. **जामीनदार : २) सौ. पायल मनोज धर्मानी,** फ्लॅट नं. ५०३–बी, स्वामी जयरामदास सीएचएस, चेंबूर नाका, प्लॉट नं. ५१५, चेंबूर, मुंबई–४०००७१. **३) सौ. पुष्पा अजित सिंग विरानी,** फ्लॅट नं. ३०२, प्लॉट नं. १६–१७, ओम नमः शिवाय बिल्डींग, सिंधी सोसायटी, चेंबूर–४०००७१. **४) श्री. अमृल्लाह अन्वरूल्लाह चौधरी,** ६०७, हिल व्ह्यू अपार्टमेंट, सिबली नगर, मुंबई–पुणे हायवे, ठाणे–४००६१२. | रु. १५,५८,८७,८५८.४६/– **(रुपये पंधरा कोटी अठ्ठावन्न लाख सत्त्याऐंशी हजार आठशे अठ्ठावन्न आणि पैसे सेहेचाळीस फक्त)** अधिक त्यावरील दि. २३/०७/२०२६ पासूनचे करारानुसार होणाऱ्या दराने लागू न केलेले वार्षिक व्याज,तसेच दंडात्मक व्याज, किंमत व खर्च |
| | **कर्जाचा प्रकार :** टर्म लोन, खाते नं. : ६००८२०९९६४२ — **एनपीएची तारीख:** दि. २८/०८/२०१४ — **मागणी नोटीसची तारीख :** दि. २३/०७/२०२६ | |
| | **१) गहाणतारण मालमत्तेचे वर्णन : प्राथमिक सुरक्षा :** एक्झिक्युटंटचे नाव : श्री. मनोज प्रेमचंद धर्माणी; बोजाचा प्रकार : समतुल्य गहाणखत; CERSAI Asset Id- : 100000493590 (अनुषंगिक सुरक्षा); **प्राथमिक सुरक्षा :** स्थावर मालमत्तेचे गहाणखत म्हणजेच २४०० मे. टन क्षमतेचे नवीन मालवाहू जहाज; **अनुषंगिक सुरक्षा :** शॉप नं. २, झायतून अपार्टमेंटस्, सी.एस.नं. १३५६, माहिम विभाग १०/१२/१४/१४ए, वीर सावरकर मार्ग, कॅडेल रोड, माहिम, मुंबई–४०००१६. | |
| २ | **शाखा : कॅम्प, पुणे** **कर्जदार : १) श्री. अनमोल सुखदेव वाघमारे,** प्लॉट नं. ७७ए आणि ७८ए, रो हाऊस नं. २, विंग ए, स.नं. ५९९ए+५९८+५९३/४१ए, सीटीएस नं. ३५८७, सहानी सुजन पार्क को–ऑप. हौसिंग सोसायटी लि., बिबवेवाडी (मुंजेरी), पुणे–४११०३७. **ऑफिसचा पत्ता :** रामानंद कन्स्ट्रक्शन, स.नं. ३४/१/९/१/२/३/४/५/६, शिव शंभो नगर, लेन नं. २, कात्रज, कोंढवा रोड, गोकुळ नगर, कात्रज, पुणे–४११०४६. **सह–कर्जदार : २) सौ. अनुपमा अनमोल वाघमारे,** प्लॉट नं. ७७ए आणि ७८ए, रो हाऊस नं. २, विंग ए, स.नं. ५९९ए+५९८+५९३/४१ए, सीटीएस नं. ३५८७, सहानी सुजन पार्क को–ऑप. हौसिंग सोसायटी लि., बिबवेवाडी (मुंजेरी), पुणे–४११०३७. | रु. ५,३४,५५,९७१.००/– **(रुपये पाच कोटी चौतीस लाख पंचावन्न हजार नऊशे एक्काहत्तर फक्त)** अधिक त्यावरील दि. २३/०७/२०२६ पासूनचे करारानुसार होणाऱ्या दराने व्याज, तसेच दंडात्मक व्याज, किंमत व खर्च |
| | **कर्जाचा प्रकार :** हौसिंग लोन – टर्म लोन खाते नं. : ६०३७१३७७९६५; हौसिंग लोन – टर्म लोन खाते नं. : ६०३८३८९६३२२; पर्सनल टर्म लोन खाते नं. : ६०४४०७३२५९३ — **एनपीएची तारीख:** दि. ३१/०७/२०२३ — **मागणी नोटीसची तारीख :** दि. २३/०७/२०२६ | |
| | **गहाणतारण मालमत्तेचे वर्णन : प्राथमिक सुरक्षा :** **१) एक्झिक्युटंटचे नाव : श्री. अनमोल सुखदेव वाघमारे आणि सौ. अनुपमा अनमोल वाघमारे;** बोजाचा प्रकार : समतुल्य गहाणखत; CERSAI Asset Id- : 200051067104; **प्राथमिक सुरक्षा :** प्लॉट नं. ७७ए आणि ७८ए, रो हाऊस नं. २, विंग ए, स.नं. ५९९ए+५९८+५९३/४१ए, सीटीएस नं. ३५८७, साहनी सुजन पार्क को–ऑप. हौसिंग सोसायटी लि., बिबवेवाडी (मुंजेरी) पुणे–४११०३७. **२) एक्झिक्युटंटचे नाव : श्री. अनमोल सुखदेव वाघमारे;** बोजाचा प्रकार : समतुल्य गहाणखत; CERSAI Asset Id- : 200017568191; **तपशील :** फ्लॅट नं. ०२, १ ला मजला, 'कृष्णाय अपार्टमेंट', सिटी सर्व्हे नं. २८/२ आणि २९/१, आनंदनगर, हिंगणे खुर्द, पुणे–४११०५१. | |

जर संबंधित कर्जदार /जामीनदार सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर **बँक ऑफ महाराष्ट्र** यांना येणे असलेली रक्कम परत करण्यास असफल ठरले तर, वर नमूद केलेल्या तारण मालमत्तेच्या संदर्भात सदर अॅक्टच्या सेक्शन १३(४) आणि लागू होणारे रुल्स यांसह संबंधित कर्जदार / जामीनदार व गहाणदार यांच्या खर्च आणि परिणामांसह जोखमीवर कारवाई करण्याचा **बँक ऑफ महाराष्ट्र** यांना अधिकार आहे.
सरफेसी अॅक्टमधील तरतुदींनुसार संबंधित कर्जदार /जामीनदार यांना सदर मालमत्ता, कोणत्याही प्रकारे विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य मार्गाने **बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या** लेखी अनुमतीशिवाय हस्तांतरीत करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर तरतुदींचा भंग केल्यास सदर व्यक्ती सरफेसी अॅक्टमधील तरतुदींनुसार शिक्षा आणि/ किंवा दंडास पात्र ठरेल. सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदीकडे वेधून घेतले जात आहे.
अधिक तपशिलासाठी संबंधित शाखेमधून नोटीसा मिळू शकेल. सदर नोटीस ही प्रादेशिक भाषेमध्येसुद्धा प्रसिद्ध करण्यात येते. कोणत्याही प्रकारच्या स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य धरली जाईल.

**दिनांक : ११/०८/२०२६**
**स्थळ : पुणे**

(श्री. सुधीर कुलकर्णी)
सहाय्यक महाप्रबंधक व अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ महाराष्ट्र, आस्ति वसुली शाखा, पुणे

## BHARATPUR DEVELOPMENT AUTHORITY

Sr. No :- Tech/BDA/2025-26/11811 - 22 Date :- 07/08/2026

**EXPRESSION OF INTREST NO 01/2026-27**

**Preparation Of Consultancy Services For Upliftment and Beautification of Junctions namely Jama Masjid And Laxman Mandir For Providing of DPR Including PMC at Bharatpur City.**

The Bharatpur Development Authority (BDA), Bharatpur Invites proposal for Preparation of Consultancy Services for Upliftment and Beautification of Junction namely Jama Masjid And Laxman Mandir For Providing of DPR Including PMC at Bharatpur City. Detailed of EOI, eligibility criteria schedule and condition can be seen on **https://eproc.rajasthan.gov.in** from dated 10.08.2026 10:00 AM to 20.08.2026 at 2.00 pm.

**UBN No. : WAQ2627SLOB00108**
**Raj.Samwad/C/26/9299**

**Executive Engineer**
**BDA, Bharatpur**

## invent

**इन्व्हेंट अॅसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
**नोंद. कार्यालयः** बख्तावर, सुट 'बी', तळमजला, बॅकबे रिक्लेमेशन स्कीम ब्लॉक III, 229, नरिमन पॉइंट, मुंबई- 400 021.

**मागणी सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 3(1) सह वाचल्या जाणारया सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 च्या कलम 13(2) अंतर्गत. निम्नस्वाक्षारीकार हे इन्व्हेन्ट अॅसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 (सदर कायदा) च्या अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 3(1) सह वाचल्या जाणारया नमूद कायद्याच्या कलम 13(2) मधील देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये कर्जदार ["सदर कर्जदार"] यांना संबंधित मागणी सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जे खालील नमूद करण्यात आले आहे. उपरोक्तच्या संदर्भात नमूद कर्जदार यांना परत एकदा सूचना देण्यात येत आहे की नमूद कर्जदाराच्या द्वारे जर काही अन्य कागदपत्रे / लेखी स्वरूपासह असलेल्या कर्ज कराराच्या अंतर्गत असलेल्या जे नमूद सूचनेमध्ये तपशिलामध्ये देण्यात आलेल्या भरणा आणि / किंवा वसुली होईपर्यंतच्या त्यावरील व्याजासह खाली देण्यात आलेल्या रकमेचा भरणा सदर सूचना प्रसिद्धीपासून साठ दिवसांच्या आत इन्व्हेन्ट अॅसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना करण्यात यावा. कर्जाच्या रकमेच्या देय परताव्यासाठी सुरक्षा म्हणून खालील मत्ता नमूद कर्जदार (रां) च्या द्वारे अनुक्रमे इन्व्हेन्ट अॅसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. ह्यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत.

| कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक | मागणी सूचना दिनांक आणि रक्कम सोबत एनपीए दिनांक |
|---|---|
| 1) अमर भीमाशंकर क्षीरसागर (अर्जदार) 2) ज्योती अमर क्षीरसागर (सह-अर्जदार 1) 3) भानुदास भीमाशंकर क्षीरसागर (सह-अर्जदार 2) 4) सूरज अशोक कांबळे (जामीनदार) **कर्ज खाते क्र. : 1022020100182** **अर्जदाराचा पत्ता :** नंदी किनारी झोपडपट्टी, मारुती मंदिर, सारिपूत बुध विहार 13, ताडीवाला रोड पुणे, पुणे शहर, पुणे- 411001, महाराष्ट्र. | 10–जुलै–2026 रु. 10,81,914/– (रुपये दहा लाख एक्याऐंशी हजार नऊशे चौदा फक्त) दिनांक : 2–जुलै–2026 रोजी नुसार । एनपीए : 29–जून–2026 |
| **सुरक्षित मालमत्तेचे वर्णनः** पुढील स्थित मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, प्लॉट क्र. 24 येथे स्थित मालमत्ता, एकूण मोजमाप क्षेत्र सुमारे 00 हे. 10 आर. त्यातून काढलेले क्षेत्रफळ मोजमाप सुमारे 1000 चौ. फूट. गट क्र. 1056 येथे, गाव कुंजीरवाडी, ता. हवेली जि. पुणे, त्यावर उभ्या असलेल्या सर्व वर्तमान आणि भविष्यातील संरचनांसह, आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः 20 फूट रस्ता, पश्चिमः गट क्र. 1067, दक्षिणः प्लॉट क्र. 23, उत्तरः प्लॉट क्र. 25. | |
| 1) अमित मधुकर भोरे (अर्जदार) 2) माया अमित भोरे (सह-अर्जदार 1) **कर्ज खाते क्र. : S108202000039** **अर्जदाराचा पत्ता :** स. क्र. 140/4, मालगाव रोड, खोत नगर रोड, कवठेमहांकाळ, सांगली, महाराष्ट्र, 416410. | 10–जुलै–2026 रु. 7,17,883/– (रुपये सात लाख सतरा हजार आठशे त्र्याऐंशी फक्त) दिनांक : 2–जुलै–2026 रोजी नुसार । एनपीए : 1–मे–2025 |
| सुरक्षित मालमत्तेचे वर्णन : पुढील स्थित मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, जुना आर एस क्र. 150/1/2/12/बी, त्याचा नवीन आर. एस. क्र. 102/1/2/12/बी, मोजमाप क्षेत्रफळ हे. 1.24 आर. मूल्यांकन रु. 2.80 पै. त्यामध्ये मोजमाप क्षेत्रफळ हे. 0.04.64 आर. गुंठेवारी नियमितीकरण नंतर प्लॉट क्र. 46, मोजमाप 92.90 चौ. मीटर, मालमत्ता मिरज, ता. मिरज, जिल्हा- सांगली येथे स्थित आहे, एसएमकेसी सांगलीच्या हद्दीत., त्यावर उभ्या असलेल्या सर्व वर्तमान आणि भविष्यातील संरचनांसह आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः प्लॉट क्र. 32, पश्चिमः रस्ता, दक्षिणः लगतचा प्लॉट क्र. 47, उत्तरः लगतचा प्लॉट क्र. 45. | |

**कर्जदार / सह-कर्जदार आणि जामीनदार यांना वैधानिक सूचना**
कर्जदार / सह-कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ता यापुढे कधीही जाहीर लिलाव / निविदा पद्धतीने विकली जाऊ शकते आणि त्यामुळे ही सूचना सुरक्षा (हित) अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 6, 8 आणि 9 अंतर्गत सूचना म्हणून देखील मानली जाईल.

**दिनांकः 12.08.2026**
**ठिकाणः पुणे / सांगली**

**सही/- प्राधिकृत अधिकारी,**
**इन्व्हेन्ट अॅसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**

## SBI

**भारतीय स्टेट बँक केंद्रीकृत खुदरा आस्ति प्रबंधन केंद्र,** तारा चेंबर्स, मरीआई गेट जवळ, वाकडेवाडी, मुंबई–पुणे रोड, पुणे – ४११००३.
**Email Id : sbi.65162@sbi.co.in**

**ताबा नोटीस (नियम ८(१)**

ज्याअर्थी, **भारतीय स्टेट बँक पुणेचे** अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनानशियल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या कलम १३(१२) नियम ३ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारान्वये **श्री. विनीत नवानी आणि सौ. आदिती हेमदान** यांना **दिनांक २५.०५.२०२६ रोजी मागणी नोटीस पाठवून (वृत्तपत्र प्रसिद्ध दि ०५/०६/२०२६) दिनांक २५.०५.२०२६** रोजी **येणे असलेली रक्कम रु. ४९,३८,९३३/– (रुपये एकोणपन्नास लाख अडतीस हजार नऊशे तेहत्तीस फक्त) अधिक पुढील व्याज खर्च, कायदेशीर शुल्क इ.** सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांचे आत भरणा करण्याची मागणी केली होती.

तमाम जनतेस व विशेषत: कर्जदार यांना सूचित करण्यात येते की, संबंधित कर्जदार हे नोटीशीत मागणी केल्यानुसार कर्ज रकमेचा भरणा करू न शकल्याने, खाली सही करणार अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या सदर कायद्याच्या कलम १३(४) नुसार व नियम ८ व ९ नुसार खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **दिनांक १०.०८.२०२६** रोजी **प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

सर्व सामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार/गहाणखतदार/कायदेशीर वारस यांना जाहीर सावधानतेची सूचना देण्यात येते की त्यांनी खाली उल्लेखिलेल्या मालमत्तेसंबंधात कोणताही व्यवहार करू नये. जर असा कोणताही व्यवहार केला गेला तर तो **भारतीय स्टेट बँक पुणे च्या दि.२५.०५.२०२६ रोजी येणे असलेली रक्कम रु ४९,३८,९३३/– (रुपये एकोणपन्नास लाख अडतीस हजार नऊशे तेहत्तीस फक्त ) अधिक पुढील व्याज खर्च, कायदेशीर शुल्क इ. बोजासह असेल.**

**मिळकतीवरील बोजा कर्जफेड करून उतरवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेबाबत कर्जदाराचे ध्यान सदर कायद्याच्या कलम १३ उपकलम ८ कडे आकर्षित करण्यात येते.**

**अचल मालमत्तेचे वर्णन – भाग २ (अचल मालमत्तेचे इक्विटेबल मॉर्गेज)**

**श्री. विनीत नवानी आणि सौ. आदिती हेमदान यांच्या मालकीचा** सिल्व्हर मिस्ट या प्रकल्पातील **फ्लॅट क्र. अ–१०५ अ विंग मधील** पहिला मजला चटई क्षेत्र ६८३.०० चौ.फुट अधिक लगतची टेरेस क्षेत्र ६३ चौ. फुट सर्व्हे नं २८२/३/४, २८२/३/५,२८२/३/६– ए , लोहगाव तालुका. पुणे ४११०४७

**दिनांक :१०.०८.२०२६**
**स्थळ : पुणे**
**मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मसूदा ग्राह्य धरावा**

**(अधिकृत अधिकारी)**
**भारतीय स्टेट बँक,**
**केंद्रीकृत खुदरा आस्ति प्रबंधन केंद्र, पुणे**

## जाहिर नोटीस

तमांम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकतीचे **श्री यशवंत लक्ष्मण राजवाडे व सौ सुमन यशवंत राजवाडे,** राहणार : २०१, चार्नी विले रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२०, भाडेपट्टाधारक आहे. (येथून पुढे यांचा उल्लेख 'सदर भाडेकरू असा केला आहे). सदर मिळकतीत असणारे भाडेकरू हक्क विकण्या संदर्भात आमचे अशील व सदर भाडेकरू यांच्यामध्ये बोलणी चालू आहे. तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबध व अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०८ दिवसांत** अस्सल कागदपत्रानिशी आमची समक्ष भेटून खात्री करून द्यावी अन्यथा सदर मिळकतीमध्ये कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजले जाईल. तदनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

मालमत्तेच्या वर नमूद केलेल्या भाडेकरू (Lessees) आमच्या अशिलाला असेही कळविले आहे की, परिशिष्ट मालमत्तेची (scheduled property) खालील मालकी हक्काची कागदपत्रे (title deeds) एकतर गहाळ किंवा हरवलेली असल्यामुळे उपलब्ध नाहीत:–

१. **सिंध को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड** यांनी **श्रीमती सुशीला ताराचंद भाटिया आणि श्री दीपक धरमदास भाटिया** यांच्या लाभात दिनांक ०१/०३/१९८९, रोजी निष्पादित करून दिलेला भाडेपट्टा करार, ज्याची नोंदणी दुय्यम निबंधक, हवेली क्र. ०२ यांच्या कार्यालयात अनुक्रमांक ३७३/१९८९ अन्वये करण्यात आली आहे.

२. **श्रीमती सुशीला ताराचंद भाटिया आणि श्री. दीपक धरमदास भाटिया** यांनी **सिंध को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड** यांच्या लाभात दिनांक २४/०५/२००१ रोजी निष्पादित केलेले समर्पण पत्र (Surrender Deed), ज्याची नोंदणी दुय्यम निबंधक, हवेली क्र. ०२ यांच्या कार्यालयात अनुक्रमांक ३८००/२००१ अन्वये करण्यात आली आहे.

३. **श्रीमती मालती अशोक भाटिया आणि श्रीमती सुधा निरंजन भाटिया** यांनी **श्री. दीपक धरमदास भाटिया** यांच्या लाभात दिनांक १०/०५/२००१ रोजी निष्पादित केलेले हक्कसोड पत्र, ज्याची नोंदणी दुय्यम निबंधक, हवेली क्र. ०२ यांच्या कार्यालयात करण्यात आली आहे.

४. सदर मालमत्तेवरील हक्क, मालकी आणि हितसंबंध **श्रीमती सुशीला ताराचंद भाटिया** यांच्या लाभात सोडून देण्याच्या संदर्भात **श्री. सतीश ताराचंद भाटिया, श्रीमती वीणा मुकेश गागलानी** आणि **राणी के. भाटिया** यांनी निष्पादित केलेले प्रतिज्ञापत्र.

५. **सिंध को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड** यांनी **यशवंत लक्ष्मण राजवाडे** यांच्या लाभात दिनांक २४/०५/२००१ रोजी निष्पादित करून दिलेला भाडेपट्टा करार, ज्याची नोंदणी दुय्यम निबंधक, हवेली क्र. ०२ यांच्या कार्यालयात अनुक्रमांक ३८०१/२००१ अन्वये करण्यात आली आहे.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली यांचे अधिकार कक्षेतील तसेच पुणे महानगरपालिका, यांच्या स्थळ सीमेतील महसूली **गांव मौजे औंध** येथील **सर्वे क्रमांक ५३ ते ५५, ५७, ५८, ६१ ते ७८, १३५, १३६,** यासी **सिटी सर्वे क्र. १३३९,** यावरील मंजूर लेआऊट मधील **सिंध सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित** मधील **प्लॉट क्रमांक २३३ (जुना प्लॉट क्रमांक ३०५)** यासी **क्षेत्र ९२१.४१ चौरस मिटर व त्यावर बांधलेली इमारत,**

तसेच "सिंध को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीचे शेअर प्रमाणपत्र (भाग प्रमाणपत्र) क्र. D–268 अंतर्गत येणारे विशिष्ट शेअर क्रमांक २००, आणि २८७७ ते २८८० (दोन्ही समाविष्ट करून) असलेले प्रत्येकी रु. १००/– किंमतीचे ५ (पाच) पूर्ण भरणा केलेले शेअर्स (भाग), आणि त्यासोबतच त्याचे सुखाधिकार (easements), संलग्न सुविधा (appurtenances), प्रवेश व निर्गमन (येण्या–जाण्याचा अधिकार), सामायिक, अनुषंगिक आणि इतर संबंधित प्रासंगिक अधिकारांसह." काहीही एक राखीव न ठेवता.

**गांधी सुभाष, अॅडव्होकेट**
**एस गांधी असोसीएटस, अॅडव्होकेटस,**
१, वेंकटेश विला, सीटीएस क्रमांक १२०४/९, घोलेरोड, शिवाजीनगर, पुणे – ४११००४. दूरध्वनी क्रमांक ०२०– २५५२११५९, २५५११९५९.